**Dr. Madhukarrao Wasnik**

**PWS Arts and Commerce College**

**Kamptee Road, Nagpur-26**

## Bibliometrics of the Publication During the year 2017-2018

| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | Dr. Babasaheb Ambedkarancha Streevishayak Drushtikon | Dr. Manisha Nagpure | Vidyawarta Multidisciplinary International Research Journal<br>UGC Approved<br>Sr. No. 43053 | Apl-2018 | **Impact Factor 5-011** | **-** | **-** |
| **2** | Marathi Sahityatil Dalit Striyanchi Aatmakathne : Ek Parikshan | Dr. Manisha Nagpure | IRFA Uniresearch Multidisciplinary International E- Research Journal | 2017 | **Impact Factor 3.452** | **-** | **-** |

## Bibliometrics of the Publication During the year 2018-2019

| Sr. No | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | Parivartanwadi Vichar Vyavstheche V Mulyavyavstheche UrjaKendra: Dikshabhumi | Dr. Manisha Nagpure | Research Journey Peer Reviewed International Multidisciplinary E-Research Journal<br><br>ISSN: 2348- 7143 | Oct- 2018 | **Impact Factor- 6.261** | **-** | **-** |
| 2 | Streewad Aani Streewadi Samikshya | Dr. Manisha Nagpure | Ajanta Peer Reviewed International Multidisciplinary Quaterly Research Journal UGC Listed Refered Journal Sr. No. 40776<br><br>ISSN: 2277-753 | Jan-Mar 2019 | Impact Facor-<br><br>5.5 | - | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **3** | Bhartiya Sanvidhan Aani Stree | Dr. Manisha Nagpure | Ajanta<br>Peer Reviewed International Multidisciplinary Quaterly Research Journal<br>UGC Listed Refered Journal<br>Sr. No. 40776<br><br>ISSN: 2277-753 | Feb-2019 | **-** | **-** | **-** |

# Bibliometrics of the Publication During the year 2019-20

| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | Sathhottari Dalit Ambedkari Kadambaritil Stree Vyaktiresha | Dr. Manisha Nagpure | Power of Knowledge International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal<br>ISSN- 2320 4494<br>Impact Factor-<br><br>2.7286 | July 2020 | **-** | **-** | **-** |
| **2** | Dr. Babasaheb Ambedkar Yanchi Rajkiya Bhumika<br><br>Aani Ajchi Paristhiti | Dr. Manisha Nagpure | Ajanta International Multidisciplinary Quarterly Research Journal ( UGC Listed) | April - June 2020 | **-** | **-** | **-** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ISSN- 2277-5730<br>Peer Reviewed<br>Impact Factor- 6.399 | | | | |
| **3** | Marathi Sahityawar Jagtikikarnacha Parinam | Dr. Manisha Nagpure | Ajanta International Multidisciplinary Quarterly Research Journal<br>(UGC Listed)<br>ISSN- 2277-5730<br>Peer Reviewed<br>Impact Factor 6.399 | Jan- March 2020 | | | |
| **4** | Marathi Lekhikanchya<br>Gramin katha Sahityatil<br>Stree Janiva | Dr. Manisha Nagpure | Marathi Pradhyapak sanshodhan Patrika Annual Research Journal<br>ISSN 2454- 7409<br>Peer Reviewed<br>Impact Factor- 5.604 | Jan-2020 | | | |
| **5** | Asha Bage Yachya Kadambarit<br>Manovishlekta | Dr. Manisha Nagpure | Ajanta International Multidisciplinary Quarterly Research Journal<br>(UGC Listed)<br>ISSN- 2277-5730<br>Peer Reviewed<br>Impact Factor 6.399 | Jan-2020 | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **6** | Prasar Madhyamanchi<br>Bhumika V Aajche<br><br>Samajik Vastav | Dr. Manisha Nagpure | Research Journey Multidisciplinary International E-Research Journal<br>ISSN 2348-7143<br>Peer Reviewed<br><br>Impact Factor 6.625 | Dec- 2019 | | | |

## Bibliometrics of the Publication During the year 2020-2021

| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Zulva: Jogtinichya Jivnachi Saseholpat | Dr. Manisha Nagpure | Vidyawarta<br>International Interdisciplinary<br>Multilingual Refereed Journal<br>Peer Reviewed<br>ISSN- 2319-3918<br>Impact Factor-7.041 | Oct 2020 | | | |
| 2 | Sathhottari Dalit Ambedkari Kadambaritil Stree Vyaktiresha | Dr. Manisha Nagpure | Power of Knowledge International Multilingual Quarterly Peer Reviewed Research Journal<br>ISSN- 2320-4494<br>Impact Factor-2.7286 | July 2020 | | | |

## Bibliometrics of the Publication During the year 2021-2022

| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Sathhottary Dalit-Ambedkari Kadambaritil Rajkiya Janiva | Dr. Manisha Nagpure | Akshara Peer Reviewed & Refereed International Multidisciplinary Research Journal<br>Vol-5 UGC Listed<br>ISSN- 2582-5429 | Aug 2021 | **Impact Factor 5.54** | - | - |
| 2. | Sathhottary Dalit Ambedkari Kadambari ani Bauddh Tatwadhyan | Dr. Manisha Nagpure | Perspectives<br>A National Interdisciplinary Annual Research Journal<br>Peer Reviewed<br>ISSN 2249-5134 | Mar 2021 | - | - | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | Mahila Sakshmikarnache Badalte Swarup | Dr. Manisha Nagpure | Sanshodhak<br>Dhule<br>UGC Care Listed Journal<br>ISSN 2394-5990 | Mar 2022 | **-** | **-** | **-** |
| 4 | Navodattar Marathi Kathetil Badalte Samajik Mulye v Janiva | Dr. Manisha Nagpure | Multidisciplinary<br>International Level<br>Journal of Research and<br>Development<br>ISSN 2230- 9578 | April<br>2022 | **Impact Factor**<br>**7.26** | **-** | **-** |
| 5 | Verul Yethil Vividh Devtanchya Murtimadhe Ganesh Murtiche Sthan | Dr. Manisha Nagpure | TIFAN<br>UGC Care Listed Journal<br>ISSN 2231-573X | May-June<br>2022 | **-** | **-** | **-** |

## Bibliometrics of the Publication During the year 2022-2023

| Sr.<br><br>No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | Yashwantrao Chavan Yanchi Rajkiya Vatchal | Dr. Manisha Nagpure | **UGC Care Listed Journal**<br><br>ISSN 2231-573 X | March 2023 | | | |
| **2** | Swatontrottar Kalkhandatil Marathi Sahitya Pravahachi Vatchal | Dr. Manisha Nagpure | **Perspectives**<br>ANational Interdisciplinary Annual<br><br>Research Journal Peer Reviewed<br><br>ISSN 2249-5134 | Oct 2022 | | | |

**Principal**

**Dr. Yeshwant Patil**

Printing Area UGC Jr.No.43053 UGC Approved Refereed Journal

# Printing Area

Special Issue April-2018

International Multilingual Research Journal

ISSN 2394-5303



## The Nation Builder :
## Dr. Babasaheb Ambedkar

Prof. Dinesh Jaronde

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका
# प्रिंटिंग एरिया
Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages
April 2018, Special Issue

# The Nation Builder : Dr. Babasaheb Ambedkar

Editor
Prof. Dinesh R. Jaronde

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

40) स्त्री सबलीकरणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान
प्रा. डॉ. ए.के. महातळे, चंद्रपूर || 133

41) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन
प्रा. डॉ. मनीषा रंगराव नागपुरे, नागपूर || 137

42) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शेती
श्री. मुरलीधर पंडीत गायकवाड, जि.रायगड. || 141

43) Dr. Ambedkar and Empowerment of Indian Women: From A Philosophical ...
Dr.Sachin Khokale, Gangakhed || 144

44) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मानवी हक्क
प्रा. प्रतिभा गडवे (दातिर), जि. नागपूर || 147

45) भारतातील बौध्द धर्माचा उदय आणि अस्त : डॉ. बाबासाहेब आंबेडकर
प्रा. मनोहर गुडधे, जि. चंद्रपूर || 150

46) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वे
नितिन गणपती खांडेकर, जि. सांगली. || 153

47) संसदीय लोकशाही आणि डॉ. आंबेडकर
प्रा. प्रविण जयकृष्ण गुल्हाणे, अमरावती || 155

48) स्त्री मुक्तीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान
माधुरी म. देशमुख, अकोट || 157

49) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षण
डॉ. शशी विनोद पनपालिया, जिल्हा गोंदिया || 159

50) Dr. Ambedkar: A Champion of The Down Trodden
Dr. Preeti Trivedi, Kanpur || 164

51) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार
सहा. प्रा.प्रविण पी. राऊत, जि. गोंदिया || 167

52) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषय विचार
प्रा. डॉ. टि. डी. राजगुरे, जि. वाशिम || 171



२२०

41

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन

प्रा. डॉ. मनीषा रंगराव नागपुरे,
सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग,म. वा. पी. डब्ल्यु. एस. महा., कामठी रोड, नागपूर

**********

प्रस्तावना :—

जगामध्ये कोणत्याही राष्ट्राची उन्नती किंवा अधोगती ही त्या राष्ट्रातील स्त्रियांच्या स्थितीवर अवलंबून असते या संदर्भात भारतीय समाजाचा विचार केला तर आपल्याला असे दिसते की, आज भारतीय समाजातील स्त्रियांमध्ये फार मोठे परिवर्तन घडून आले आहे संगणक युगात वावरणारी ही स्त्री मग ती ग्रामीण असो की, दलित मध्यम वर्गीय असो की, उच्चवर्णीय तिच्यात सामाजिक, आर्थिक राजकीय व बौद्धिकदृष्ट्या विविधांगी परिवर्तन घडून आले आहे. या सर्व परिवर्तनात ज्यांचे अतिशय मोलाचे योगदानच नव्हे तर स्त्री उत्थानाला पायाच ज्यांनी संविधानाच्या माध्यमातून तयार केला ते बाबासाहेब आंबेडकर व त्यांची दलित चळवळ ही खऱ्या अर्थाने आजच्या स्त्रीवादी विचार सरणीची उर्जा केंद्र ठरली आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आपले विचार प्रत्यक्षात कृतीत उतरवणारे व ते लेखी स्वरूपात या देशाला प्रदान करणारे ते महापुरूष होते. पुरूषी पारतंत्र्यात खितपत पडलेल्या करोडो माता—भगिनी या भारत देशामध्ये खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाल्या असे बाबासाहेब म्हणतात. ''स्त्री ही समाजाचा अलंकार आहे. स्त्रियांनी स्वाभीमानाने जगले पाहिजे. काया, वाचा, मन या त्रिशुद्धीने शुचिर्भूत व्हावे. कारण स्त्रियांच्या चरित्राला अधिक मान आहे''. स्त्रिची प्रगती म्हणजेच समाजाची प्रगती असे बाबासाहेब म्हणतात. स्त्रियांच्या संघटनेवर बाबासाहेबांचा फार मोठा विश्वास होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मंत्रीमंडळात मजूर मंत्री असतांना त्यांनी खाण कामगारांना प्रसुती लाभ कायदा १९४१ मध्ये सुधारणा घडवून समस्त स्त्री कामगारांना त्याचा लाभ मिळवून दिला. त खाणीत स्त्री—पुरूष कामगारांना समान मजूरी मान्यता देऊन स्त्री—पुरूषांना समान मजूरी देण्याची तरतूद करवून घेतली. एवढ्यावरच बाबासाहेब थांबले नाही तर १९४८ मध्ये समस्त स्त्री वर्गाच्या हक्कासाठी, उन्नतीसाठी, विकासासाठी अत्यंत परिश्रम पूर्वक हिंदू कोड बील संसदेत सादर केले. व स्त्री वर्गाला एक सन्मानाचे जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त करून दिला. पुढे भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून तिचे स्थान अधिक बळकट करण्याच्या हेतूने मूलभुत हक्क व अधिकार तिला मिळवून दिलेत. सर्वप्रथम तर त्यांनी कलम १२ नुसार मनुस्मृती नष्ट करून संविधानापुर्वीचे मनूचे कायदे नष्ट केलेत. कलम १४ नुसार स्त्रिला समान दर्जा प्राप्त करून दिला. याचाच परिणाम म्हणजे पुढे स्त्रिवर्ग मोठ्या प्रमाणावर पुरूषांबरोबर शिक्षण, नोकरी, अधिकारी, मंत्री, राजकारण, न्यायधिश, कलेक्टर या पदापर्यंत आज त्यांचा सर्वत्र वावर होतांना दिसतो. कलम १६ नुसार त्यांना समान संधी देवून कलम २३ ने त्यांना संरक्षण देण्यात आले. कलम ३९५ नुसार स्त्री कल्याणाच्या विविध योजना अंमलात आणून स्त्रिला सन्मान देण्याचा प्रयत्न सतत होतांना दिसतो. बाबासाहेबांचे विचार आणि कार्य हे या देशातील स्त्रियांच्या चळवळीसाठी सदैव प्रेरणादायी ठरले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्रीसुधारणा विषयक दृष्टिकोन तिन माध्यमातून प्रामुख्याने व्यक्त होतो.

१) डॉ. आंबेडकरांचे लेखन
२) नैमितीक भाषणे
३) हिंदु कोडबिलाची निर्मिती

भारतीय परंपरेत स्त्रीचे जे शोषन ज्या जाती व्यवस्थेद्वारे होते ती जातीव्यवस्था नष्ट झाली पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. लग्न झालेल्या प्रत्येक स्त्रीने नवऱ्याची गुलाम होवून राहणे नकारले पाहिजे व मित्र म्हणून समानतेच्या नात्याने उभे राहायला शिकले पाहिजे. तसेच, प्रत्येक स्त्रीने धीर, बुद्धिमान आणि भितीमुक्त असले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे सर्व विचार दलित स्त्रियांपुरतेच मर्यादित करण्याचे कोणतेच कारण नाही तर, ते सर्वच खालावलेल्या अवस्थेत जीवन जगणाऱ्या सर्वच स्त्रीवर्गाला मार्गदर्शक ठरणारे आहेत.

आंबेडकरांचे सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे हिंदू कोड बिलाची उभारणी, हिंदूचे विवाह कौटुंबिक कायद्याने नियमित करण्याची कल्पना प्रथम इंग्रज राजवटीत अंमलात आली. सती व बालहत्या यांना प्रतिबंध करणारे कायदे, संततीवयाचा कायदा व धर्मांतरित माणसाचा कुटुंबाच्या संपत्तीवरील हक्क कायम राखणारा कायदा असे अनेक कायदे करण्यासाठी राजकारण्यांवर स्त्रिया दडपण आणू लागल्या. हिंदू कायद्याचे एकत्रीकरण करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी १९४१ साली शासनाने बी.एन.राव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने १५ ऑगस्ट १९४४ रोजी हिंदू कोड बिलाचा मध्यवर्ती मसुदा कायदेमंडळाला सादर केला. पण दुसरे महायुद्ध, सत्तांतर, फाळणी इत्यादी घटनेत हे विधेयक तसेच पडून राहिले. १९३५ साली धर्मांतराची घोषणा केल्यावर आंबडेरांनी भारतातील निरनिराळया धर्मांचा तौलनिक अभ्यास केला. याच काळात हिंदू कायद्यात सुधारणा करुन त्याचे एकसूत्रीकरण करण्याची स्त्रियांची मागणी पुढे येत होती. तेव्हा हिंदू धर्मशास्त्रज्ञांनी स्त्रियांवर केलेल्या अन्यायाची त्यांना प्रथम जाणीव झाली व अस्पृश्यांप्रमाणे स्त्रियांवरही होणारा अन्याय दूर करणे त्यांना गरजेचे वाटू लागले. हा अन्याय दूर करुन स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी कंबर कसली. भारताचे कायदेमंत्री म्हणून निवड झाल्यावर या दृष्टिकोनाला अनुसरुन स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने राजकीय हक्क देणारा राज्य घटनेचा मसुदा त्यांनी तयार केला व त्यांना सामाजिक हक्क मिळावेत म्हणून हिंदू कोडबिलाचा पाठपुरावा केला. राव समितीने केलेले विधेयक घटना समितीने केलेले विधेयक घटना समितीकडून मंजूर करुन घेण्याची जबाबदारी त्यांचेवर होती. या कायद्याचे विवाह, घटस्फोट, पोटगी, मालमत्तेचा वारसा व अल्पवयीन मुलांचे पालकत्व असे पाच भाग होते.

विवाह—विधिपूर्वक लावलेले व नोंदणी पद्धतीने केलेले अशी दोन्ही लग्ने या कायद्याने अधिकृत ठरवली. विवाहाचे वय मुलासाठी १७ व मुलीसाठी १४ हून अधिक असावे. यामध्ये प्रथमच अंतरजातीय व सगोत्र विवाहांना मान्यता देण्यात आली. पहिली पत्नी जिवंत असता दुसऱ्या विवाहास प्रतिबंध करण्यात आला. लग्न कायदेशीर ठरुन विवाहविच्छेद होऊ शकण्यास मान्यता मिळाली. घटस्फोट, लग्न हा धार्मिक संस्कार मानल्यामुळे पूर्वी धार्मिक पद्धतीने झालेल्या लग्नाला घटस्फोटाची परवानगी नव्हती. आता धर्मांतर, एकाने दुसऱ्यांचा केलेला परित्याग, रखेल ठेवणे किंवा होणे, वेड, महारोग, गुप्तरोग, क्रौर्य इत्यादी कारणासाठी घटस्फोटाला परवानी मिळाली. वारसा १९३७ च्या कायद्याने मृताची विधवा सून यांचा वारसा हक्क मान्य करण्यात आला होता. नव्या कायद्याने मुलींसाठी मुलांच्या हिश्याचा निम्मा हिस्सा मिळणार होता. स्त्री वारसांमध्ये ती स्त्री श्रीमंत आहे की गरीब, विवाहित की अविवाहित, तिला मूल आहे की नाही हा भेदाभेद काढून टाकण्यात आला. स्त्रीधनात मुलाचा हिस्सा व आईच्या मालमत्तेत मुलीला मुलाचा अर्धा हिस्सा देऊन मुलाला व मुलीला समानतेने वागवण्याचा विधेयकाचा प्रयत्न होता. स्त्रीच्या मालमत्तेवर तिला अधिकार मिळाला. हुंडा ही वधूची मालमत्ता समजली गेली.

निवड समितीने या मसुद्यावर पुढे काही बल केले. हा मसुदा पुढे आल्यावर त्यला पारंपरिक पितृप्रधान संस्कृतीने खूपच विरोध केला; पण आंबेडकरांनी सामाजिक व राजकीय स्तरावर खूपच नेटाने हिंदू कायद्यात सुधारणा करण्याची गरज लावून धरली. फेब्रुवारी १९५१ पर्यंत विधेयकाची फक्त चार कलमे संमत झाली. या दिरंगाईमुळे आंबेडकर अतिशय अस्वस्थ होत. १९५२ ते ५६ या काळात हिंदू विवाह कायदा, पोटगीचा कायदा, वारसा हक्क व अल्पवयीन मुाच्या पालकत्वाचा कायदा असे चार कायदे अखेर भारतीय संसदेने मान्य केले.

स्त्री स्वातंत्र्याच्या इतिहासात हिंदू कोड बिल हा सर्वात महत्वाचा टप्पा मानावा लागेल. वेदकालीन संस्कृतीमध्ये स्त्रीला वेदाध्ययनाचा अधिकार होता असे मानले जाते. बौद्धिक व सामाजिक जीवनातही त्यांना मानाचे स्थान असावे. आदिम गणसमाजात स्त्रीसत्ताही अस्तित्वात असावी. यापुढील काळात मात्र याज्ञवल्क्य, मनू यांच्या स्मृतीमधून स्त्रियांची सर्व स्तरावर पिछेहाट झालेली दिसते.विसाव्या शतकाच्या पहिल्या पाच दशकापर्यंत हिंदू धर्माचा काच स्त्रियांच्या गळयाभोवती घट्ट होता व त्यातूनच सती, विधवांचे विद्रुपीकरण यासारख्या अनिष्ट चालीरिती जन्माला आल्या व तगून राहिल्या होत्या.

आंबेडकरांनी या प्रश्नाला दोन प्रकारे उत्तर दिले आहे. एक स्वत: बौद्ध धर्माचा स्वीकार करुन आणि दुसरे हिंदू कोड बिल पास होण्यासाठी अथक संघर्ष करुन. बौद्ध व्यवस्था स्त्री पुरुष समता सांगणारी व वर्णव्यवस्थाविरोधी अशी परंपरा गौतम बुद्धाच्या भिखखू संघात स्त्रियांना प्रवेश होता. बुद्धांनी स्त्रियांना परिव्रज्येचा म्हणजेच धम्मदीक्षेचा अधिकार दिला होता. त्यामुळे स्त्रियांवरील अन्याय दूर झाला. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना ज्ञानार्जन करता येऊ लागले व स्त्रियांचे सुप्तावस्थेतील आध्यात्मिक तेज व्यक्त होऊ शकले. गौतम बुद्धाने भारतातील स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त केले. त्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणली. लिंगभेदाच्या अटी न बाळगता स्त्रियांना थोर पदाला जाऊन पोचण्याचा मार्ग मोकळा केला. यातूनच स्त्रियांना पुरुषांबरोबरीचा समान दर्जा मिळण्याचा मार्ग खुला झाला. स्वत: बौद्ध धर्म स्वीकारण्यातल्या अनेक कारणापैकी जेथे स्त्रियांना सन्मान राखला जातो, अशा धर्माचा स्वीकार करुन आंबेडकरांनी एक प्रकारे स्त्रीविषयक जाणिवांची आपली बांधीलकी सिद्ध केली आहे.

कायद्याने सर्व सुधारणा घडवून आणता येत नाहीत हे खरे असले तरी कायद्यामुळे मोठया प्रमाणात परिवर्तनाच्या शक्यता निर्माण होतात हेही तितकेच खरे आहे. हिंदू कोड बिलापासून पुढील कायदे करण्यास सुरुवात झाली आहे. एकपत्नीत्वाच्या कायद्याने स्त्रियांना खूप मोठा मानसिक दिलासा व विवाहांतर्गत स्थैर्य दिले. स्त्रीचे कुटुंबातील स्थान पक्के केले. एरवी संस्कार म्हणून विवाहविच्छेद होण्यावर बंदी असताना या बिलाने घटस्फोटाचा मार्ग स्त्री पुरुष दोघांनाही खुला करुन दिला. पटत नसताना आयुष्भर मात खात जाच सहन करुन मुकाटयाने जगणाऱ्या स्त्रीला नवीन आयुष्य जगण्याची संधी या कायद्याने उपलब्ध करुन दिली. वारसा हक्कामुळे मुलीला मुलाएवढा वाटा मिळण्याची तरतूद केली. अल्पवयीन मुलींचे विवाह कायद्याने रोखले गेले. एकप्रकारे हे बिल म्हणजे स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा पहिला जाहीरनामा होता. या बिलामुळे हिंदू या मोठया संज्ञेखाली अठरा पगड, जाती जमाती, पंथ हे एका कायद्याखाली आले. वर्गावर्गातील उच्चनीच हे भेद व लिंगभेद हे कायम ठेवून कायदा केला असता, तरी पत्र्याच्या बंगल्यासारखा कधीच कोसळला असता. आज २१व्या शतकात प्रवेश करताना मागे वळून पाहिले तर गेल्या ५० वर्षात भारतातील स्त्रियांनी मागच्या अनेक शतकाच्या तुलनेत खूप काही मिळविले आहे असे म्हणता येईल. शिक्षणाचा प्रसार आज तळागाळातल्या स्त्रियांपर्यंत पोचला आहे. शासकीय व खाजगी उद्योगधंद्यामध्ये स्त्रिया मोठया पदावर कामे करीत आहेत. राजकारणामध्ये स्त्रिया भाग घेत आहेत. जिल्हा पातळीपर्यंत ३३ टक्के राखीव जागा मिळून त्यांच्या हाती थोडी फार सत्ता आली आहे. पांढरपेशा समाजामध्ये स्त्री–पुरुष संबंधात बऱ्यापैकी मोकळेपणा आला आहे. विभक्त कुटुंबात स्त्रियांना पूर्वीपेक्षा मानाचे स्थान मिळाले आहे. स्त्रीच्या अंगी कर्तृत्व असले तर संघर्ष करुन हा होईना पण स्त्रिया आपल्याला हवे ते ईप्सित साध्य करुन घेताना दिसत आहेत. शैक्षणिक सुविधा आणि राखीव जागांमुळे शिक्षणाला पूर्णपणे वंचित असलेली मागच्या पिढीतील जी शोषित स्त्री होती तिच्या पुढच्या पिढीतील मुलं आज शिकून सवरुन चांगल्या पदावर नोकऱ्या करीत आहेत. मुक्त मनाने सन्मानाने समाजात वावरण्याची संधी आज त्यांना मिळालेली आहे. संस्कृती, साहित्य, नाटय या क्षेत्रातही आता स्त्रियांची संख्या वाढत आहे. मुख्य म्हणजे स्त्री असणे म्हणजे कोणताही कमीपणा नाही आणि आपल्यालाही सर्व क्षेत्र खुली आहेत एवढे तरी स्त्रियांना आज जाणवू लागले आहे.

जातींचे बांध विसरुन स्त्रिया एकत्र याव्यात हे आंबेडकरांचे आवाहनही आपण पूर्ण करुन शकलो नाही. पूर्वीच्या रुढ अर्थाने जातीव्यवसथा नष्ट झाली तरी मनामनातली जातीजातीतली तेढ आजही कायम आहे.

शिक्षणाचा प्रसार झाला तरी आंतरजातीय विवाहाची संख्या वाढली नाही. ग्रामीण भागात अल्पवयीन मुलींचे विवाह मोठया प्रमाणात होतात. मोठया प्रमाणामध्ये स्त्रिया परित्यक्तेचे जीवन जगतात. पोटगीचे अधिकार कायद्यो मान्य केले तरी स्त्रियांच्या पदरात ते पुरेशा योग्य प्रमाणात पडत नाहीत. स्त्रीधनाच्या आणि वारसा हक्कांच्या कायद्यात वेळोवेळी सुधारणा होऊनही स्त्रिया त्याबद्दल जागरुक नाहीत. पित्याच्या संपत्तीत आपला वाटा मागणं आजही

बायकांना अवघड जात वा आवडत नाही. हुंडाविरोधी कायदा झाला तरी हुंडयांची पद्धत जात नाही.

बलात्कारासारख्या गंभीर घटनांमधूनही आरोपी सहीसलामत सुटतात आणि स्त्रियांचीच नाचक्की होते. स्त्रियांना सर्व क्षेत्रात दुय्यम स्थानावर ठेवण्योच पुरुषी राजकारण आजही बदलेले नाही. सर्व स्त्रियां एकत्र आल्या तर त्या समाजाचा चेहरा मोहरा बदलू शकतात अशी आंबेडकरांची धारणा होती. खरे म्हणजे ग्रामीण स्तरापासून उच्चभ्रू स्त्रियांपर्यंत स्त्रिया म्हणून असलेले काही प्रश्न सर्वांना सारखेच आहेत. तरी स्त्रियांचा एक लिंगाधारित असा प्रबळ राजकीय पक्ष दबावगट म्हणून तयार होऊ शकत नाही. पूर्वीच्या जातीव्वस्थेत आता उलट आर्थिक स्तरावर अनेक भेदांची भर पडली आहे. आपले प्रश्न सोडविण्यासाठी एकत्र येण्याची निकड आज स्त्रियांनाच वाटत नाही. आज ज्या स्त्रिया राजकारणात आहेत. त्या एकतर पुरुषांप्रमाणे राजकारण खेळतात नाही तर त्यांच्या हातातील कळसूत्री बाहुल्या बनतात. मुख्य म्हणजे भारतयी स्त्रियांना अनेक गोष्टी न मागता मिळत गेल्या. मतदानाचे अधिकार मिळाले. घटनेने समान अधिकार दिले. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव यांची भूक लागून त्यासाठी संघर्ष करावा लागण्यापूर्वीच कायदेशीरपणे उर्मीच कधी निर्माण झाली नाही.

आजही विधवा, घटस्फोटिता, प्रौढ कुमारिका यांच्याकडे बघण्याची समाजाची दृष्टी कलुषितच आहे. त्यांना सुरक्षित व सन्मानपूर्वक जगणही कठीण व्हावं, अशीच परिस्थिती आहे. उलट सौभाग्य, पातिव्रत्य, योनिशुचिता अशा मूल्यांची आज भरमसाठ वाढझाली असून पुरुषांशी असलेल्या बाईच्या संबंधावर तिचं मोठेपण मोजलं जाऊ लागलं आहे. प्रसार—माध्यमांनी स्त्रीच्या चित्रणाची इतकी मोठी मजल मारली आहे की इतहासांनही तिचं जितकं अवमूल्यन केलं नसेल तितकं सिनेमा आणि जाहिरातींनी केलं आहे. भांडवलशाही पद्धतीत पाहता पाहता स्त्री ही नुसती भोग्य वस्तूच झाली असं नाही तर सौंदर्यस्पर्धांच्या गोंडस नावाखाली तिच्या शरीराचा आंतरराष्ट्रीय खुला बाजारच भरवला जाऊ लागला.

पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात पुढे येण्याची हाक आंबेडकरांनी स्त्रियांना दिली. पण स्त्रियांचं बरोबर असणं हे पुरुषांना मानावलं नाही. स्त्रीला आपल्या समवेत नेणं, तिला बरोबरीचं स्थान देणं, तिचा स्त्री म्हणून सन्मान राखणं, तिला संधी उपलब्ध झाली तर आपली अस्मिता बाजूस सारुन तिला पुढं जाऊ देणं अशी मानसिकता सर्वसामान्य पुरुषांमध्ये आजही दिसत नाही. या प्रबोधनाची आज प्रथम आवश्यकता आहे. स्त्री परप्रकाशित नसून स्वयंसिद्धा आहे असा परिवर्तनवादी विचार महात्मा फुलेंनी जनमानसात रुजविला.

भगवान बुद्धाने आणि महात्मा फुलेंनी स्त्रीला पुरुषापेक्षा श्रेष्ठ मानले. स्त्रियांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर भर देणारी यंत्रणा अजूनही उपलब्ध झालेली नाही. गर्भावस्थेत बाळाचे संरक्षण करणारी नैसर्गिक यंत्रणाच सांगतेय की स्त्री ही सामर्थ्यशाली आहे. 'अरे मानसा मानसा; कधी होशील मानुस? असा प्रश्न करणाऱ्या बहिणाबाई अजूनही उत्तराच्या प्रतीक्षेत आहेत.'

बाबासाहेबांनी स्त्रीमधील प्रतिकारशक्तीला आव्हान देत त्यांनी सांगितले की कोणी पुरुष जुगारी, दारुडा असेल आणि त्रास देत असेल तर त्याला घरात घेऊ नका. याशिवाय उपदेश केला की स्त्रियांनी कालबाहय रुढींना तिलांजली द्यावी, स्वच्छ राहावे, शिक्षण घ्यावे आणि मुलींना शिकवावे. स्त्रीला समानता देणाऱ्या बौद्ध धम्माचा अंगीकार करणारे बाबासाहेब स्त्रीमुक्तीचे 'मसिहा' होत. बाबासाहेबांनी स्त्रियांच्या मानसिकतेचा, प्रगतीचा जेवढा बारकाईने विचार केला, तेवढा विचार प्रत्यक्ष स्त्री स्वतःबद्दल करु शकत नाही, हे सत्य आहे. सर्वकष स्वातंत्र्याचा विचार करत असतांना त्यांनी स्त्रीस्वातंत्र्याचा विचार केला.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. मूल जाधव, भगवान बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री

२. लोकराज्य, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेषांक, मुंबई, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, १६ एप्रील १९९०.

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड—१८, भाग—३, प्रकाशक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने व प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२.

४. भारताचे संविधान, डॉ.बी.आर. आंबेडकर, चौधरी लॉ पब्लीशर्स, पुणे, द्वितीय आवृत्ती, २०१५.

५. कसबे रावसाहेब, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्य घटना, सुगत प्रकाशन. ❑❑❑

Impact Factor - 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**July-August-September-2017**
**Vol. 4 Issue 3**

## मराठी साहित्य संशोधन विशेषांक

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 225/-

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013) | Vol. 4, Issue 3
UGC Approved Journal- Sr. No. 40705 & 44117 July-Aug.-Sept. 2017

# अनुक्रमणिका


| अ.नं. | शोध निबंधाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| @ | संपादकीय | - डॉ. धनराज धनगर | 05 |
| 1 | आदिवासींचे धवळे : उगम आणि विकास | - डॉ. अंजली मस्करेन्हस | 06 |
| 2 | लोकसाहित्यातील लोकसंस्कृतीतून येणाऱ्या लोकप्रयोज्य कलांचा अभ्यास | - डॉ अनिता सोनवणे | 15 |
| 3 | गोर बंजारा लोकसाहित्यातील मानवी मूल्ये | - प्रा. नेमीचंद चव्हाण | 20 |
| 4 | बंजारा लोकसाहित्यातील समाजदर्शन | - प्रा. तुकाराम चव्हाण | 28 |
| 5 | लोकसाहित्य संशोधनाच्या नव्या दिशा | - डॉ. निवृत्ती मिसाळ | 33 |
| 6 | लोकसाहित्य संशोधन अभ्यास पद्धती | - डॉ. सागर लटके | 35 |
| 7 | मराठी आख्यायिका : एक आकलन | - डॉ. भाऊसाहेब गमे | 40 |
| 8 | महानुभावीय साहित्याचे संशोधन-संपादन-प्रकाशन : पार्श्वभूमी व संधी | - डॉ प्रमोद आंबेकर | 44 |
| 9 | महानुभावीय व वारकरी संप्रदायाच्या अनुषंगाने मराठी साहित्य | - श्री अनिल महाजन | 49 |
| 10 | 'संतु आंतोनीची जीवित्वकथा' या ग्रंथावर ज्ञानेश्वरीचा प्रभाव | - प्रा. विनय मडगावकर | 54 |
| 11 | संत ज्ञानेश्वरांचे कार्य आणि कर्तुत्व | - एस. आर. साळुंखे | 58 |
| 12 | संत चोखामेळा यांच्या अभंगातील समाज वास्तव | – डॉ. उज्ज्वला पाटील | 64 |
| 13 | नामयाची दासी जनी | - डॉ. वसंत शेंडगे | 68 |
| 14 | समर्थ रामदास स्वामींचे प्रशासन विषयक विचार | - डॉ. अलका बडगे | 73 |
| 15 | शाहिरी वाङ्मयातील ध्रुवतारा : भाऊ फक्कड | - प्रा. संगीता सूर्यवंशी | 77 |
| 16 | गीतकार ना. धों. महानोर | - डॉ. तुषार चांदवडकर | 85 |
| 17 | विठ्ठल वाघ यांच्या कवितेतील कृषिनिष्ठ जाणिवा | - डॉ. ममता दयणे | 89 |
| 18 | डॉ. यशवंत मनोहरांच्या कादंब-यांतून अभिव्यक्त होणारा आंबेडकरी स्त्रीवाद | – प्रा. मनीषा डोंगरे | 94 |
| 19 | धादांत खैरलांजी : स्त्री दृष्टीकोनातून | - डॉ. शंकर मुंढे | 97 |
| 20 | मराठी साहित्यातील दलित स्त्रियांची आत्मकथने :एक परीक्षण | - डॉ. मनीषा नागपुरे | 99 |
| 21 | दलित साहित्यातील कथेचे अवलोकन | – डॉ. चंद्रमणी गजभिये | 105 |
| 22 | शंकरराव खरातांची दलित कथा एक आकलन | - डॉ. आर. एम. केदार | 109 |
| 23 | महात्मा फुले यांच्या वाङ्मयातील वैचारिकता | –प्रा. मिलिंदकुमार देवरे | 113 |
| 24 | तिसऱ्या सहस्त्रकाची कविता : आस्वाद आणि आकलन | - डॉ. सिद्धार्थ भगत | 117 |
| 25 | मराठी भाषेची स्थिती - गती | - डॉ. स्नेहल मराठे | 124 |
| 26 | समकालीन भारतीय साहित्य | – प्रा. सर्जेराव जाधव | 128 |
| 27 | मराठी नाट्य वाङ्मयाची पूर्व पीठिका | – डॉ. राम चौधरी | 133 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
UGC Approved Journal- Sr. No. 40705 & 44117 July-Aug.-Sept. 2017 | Vol. 4, Issue 3

# मराठी साहित्यातील दलित स्त्रियांची आत्मकथने : एक परीक्षण

डॉ. मनीषा नागपुरे

मराठी दलित आत्मकथनांमध्ये स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथनांना एक विशेष महत्त्व आहे. सामाजिक परंपरा आणि परिवर्तन याचे एक मौलिक स्वरुप दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून चित्रित होताना दिसते. दलित स्त्रियांना आपल्या आत्मचरित्रातून आपल्या जीवनानुभवाचे दर्शन घडविले आहे. ही आत्मचरित्रे आत्मकथने असल्याने व्यक्तीगत सुख–दुःखाचा प्रभाव या आत्मचरित्रांवर दिसतो. स्त्री परंपरेला जखडून असलेल्या समान वास्तवाचे प्रतिबिंब या दलित आत्मकथनातून रोखठोक स्वरुपात प्रतित होतांना दिसते. दलित जीवनातील गरीबी, कुपोषण, रोगराई, अस्वच्छता परंपरेला जखडून राहण्याची आस्था या सर्व बाबींचे चित्रण यात पहायला मिळते. प्राप्त परिस्थितीला तोंड देणारी स्त्री यातून चित्रित झाली आहे. त्याचप्रमाणे प्रतिकूल परिस्थितीला टक्कर देवून स्वतःचे व्यक्तीमत्त्व विकसित करणारी ही दलित स्त्री आहे. 'माणूस' म्हणून जगण्याची तिची उमेद या आत्मचरित्रातून प्रकट होते. सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा प्रभावही या स्त्रियांच्या जीवनावर झालेला आहे. अपमान, अवहेलना, विसंगती हया सर्वच आत्मकथनातून पारदर्शकपणे या लेखिकांनी शब्दबद्ध केली आहे. स्वकष्टाने जागृतीचा मूलमंत्र सांगतांना परीवर्तनाचा एक नवा स्त्रोत या लेखिकांना गवसलेला दिसतो. एकूणच मराठी स्त्री आत्मचरित्राच्या प्रवाहात दलित स्त्रियांचे आत्मकथने ही वेगळी ठरतात हे विशेषत्वाने लक्षात घ्यावे लागते.

'आत्मचरित्र' हा आकृतीबंध वाङ्मयाच्या विविध आकृतीबधां पैकी एक महत्वाचा व विशेष प्रभाव पाडणारा आकृतीबंध म्हणून नावरुपास आलेला आहे. समाजामध्ये मान्यता पावलेली थोर व्यक्तीमत्त्वे जेव्हा त्यांचे आत्मचरित्र लेखन करतात तेव्हा वाचक, अभ्यासक, समीक्षक त्याची आवर्जून नोंद घेतात. आत्मचरित्राला आजचे रुप लाभण्यापूर्वी आठवणी, आख्यायिका, आत्मनिवेदने, रोजनिशी इ. स्वरुपात आत्मचरित्रसदृश्य लेखन केले जात होतेच. आत्मचरित्रातील प्रांजळ निवेदन ही महत्वाची बाब असते. शेवटी 'आत्मचरित्र' हा एक 'आत्मशोध' असतो. 'स्व' रुपाकडे ज्याला तटस्थपणे बघता येते तो आत्मचरित्र उत्तमरितीने लिहू शकतो. सावरकरांच्या मते आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार म्हणजे मानवी आयुष्यातील घटनांच्या केवळ रुक्ष नोंदी नव्हेत तर व्यक्तीच्या आत्मविष्काराचा तो एक कलात्मक प्रकार आहे. तर दुर्गाबाई भागवत यांच्या मते ''मनच मनाला भिते. मनच मनावर मोहून जाते. मनच मनाला क्लृप्त्या शिकविते. दुसऱ्याच्या नजरेतून स्वतःकडे बघण्याची संवग युक्ती सांगते. मनच आतल्या खुज्या माणसांची देवतूल्य मनोरम भव्य मूर्ती घडविते.'' प्रांजळ निवेदनाबरोबरच घटनाप्रसंगाची निवड आणि मांडणी आत्मचरित्र नायकाच्या समग्र व्यक्तित्वाचा आलेख इ. कारणांमुळे आत्मचरित्र हा आकृतीबंध कलात्मक व वाचकप्रीयही झालेला दिसून येतो.

'आत्मचरित्र' या वाङ्मयप्रकारात पुरुष वर्गाचा सहभाग जरी मोठा असला तरी स्त्रियांनीही त्यात निश्चितच मोलाची भर टाकलेली दिसते. भारतीय स्त्रीवादाच्या सैद्धांतिक बैठकीच्या पायाभूत विचारांच्या दृष्टीने या आत्मचरित्रांचे वाचन केले तर अनेक अभ्यासपूर्ण निष्कर्ष मिळतात इतका कस या आत्मचरित्रात असल्याचे आढळते. व त्यातही स्त्रियांच्या आत्मचरित्रलेखनात दलित स्त्रियांनी लिहिलेली आत्मचरित्रे महत्त्वाची ठरतात. या आत्मचरित्रांनी समाजाचे वेगळे दर्शन घडविले दलितत्व व स्त्रीत्व अशा दोन कारणांनी ज्यांना समाजात स्थान नव्हते अशा स्त्रिया 'स्व' त्वाचे व भोगलेल्या दुःखाचे चित्रण या आत्मचरित्रांतून करुन वाचकांना विचारप्रवृत्त करतात. मराठी दलित आत्मकथनांमध्ये स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथनांना एक विशेष महत्व आहे. सर्वसाधारणपणे असे दिसते की कुटुंबसंस्था समाज व्यवस्था इत्यादी गोष्टी स्त्रीच्या दुःखाला कारणीभूत असतात; तशा त्या दलित स्त्रिच्या दुःखालाही कारणीभूत असतात. शिवाय तिच्या दलित असण्यामुळे तर त्या अधिकच गडद होतात. खूप

सारे प्रश्न ही उभे करतात. मराठी स्त्री– आत्मचरित्रामध्ये दलित स्त्रियांची आत्मकथने वेगळी ठरतात, ती या बहुपेढी दुःख व प्रश्नांमुळेच!

दलित आत्मकथनातूनही स्त्री मुक्तीचा आक्रोश ऐकू येतो. स्वातंत्र्यानंतर दलित आत्मकथनांची सुरुवात झालेली दिसते. दलित समाजाला उच्चवर्णीय समाजाने ज्या पद्धतीने वाळीत टाकले होते, बहिष्कृत व तिरस्कृत केले होते त्यांचा स्पर्शच काय, सावलीचा पण विटाळ होता. म्हणून शांताबाई म्हणतात, ए म्हाराचे पोरे!तितच उबं राहा। हे शब्द कानात घुमत राहतात. आपण दलित आहोत याची सारखी जाणीव ते करुन देत असत.... आये मास्तर पन मानूस हाय आपुन बी मानूसच हाय मग मास्तर कसा आपल्याला शिवून घेत नाय? ही गोष्ट माझ्या मनाला लागून राहिली होती[१] असे शांताबाई कांबळे म्हणतात. विटाळ–चांडाळाच्या कल्पना किती तीव्र होत्या हे त्यांच्या आत्मकथनातून लक्षात येते. आपला काहीही अपराध नसतांना पशूपेक्षा हीन दर्जाची वागणूक आपल्याला मिळते याची चीड या आत्मकथनातून व्यक्त होते. तसेच या समाजाचे अठराविश्वे दारिद्रय व त्यामुळे होणारी उपासमार याचे चित्रणच अधिक दिसते. 'माझ्या जन्माची चित्तरकथा' हे दलित महिलेचे पहिले आत्मचरित्र म्हणावे लागेल. तर दलित स्त्रीचे पहिले आत्मकथन म्हणून प्रा. कुमुद पावडे यांच्या 'अंत:स्फोट' चा उल्लेख करावा लागेल. आत्मचरित्र आणि आत्मकथन यांच्या सीमारेषा अस्पष्ट असल्या तरी ढोबळमानाने असे म्हणता येईल की, आत्मचरित्र हे आयुष्याच्या उत्तरार्धात लिहिले जाते. तर आत्मकथन लेखनाचा निश्चित असा कालखंड ठरविता येत नाही. आत्मकथन लेखनही एक (Continuing process) निरंतर प्रक्रिया असते; या अर्थाने आत्मचरित्र आणि आत्मकथन यात फरक असतो. असे विवेचन मनोहर जाधव यांनी केले आहे.[२]

'माझ्या जन्माची चित्तरकथा' या आत्मचरित्रात शांताबाईनी अस्पृश्यतेमुळे त्यांना जी मानहानी स्वीकारावी लागली त्याचे चित्रण करतांना निवेदनात कुठेही भावविवशता येवू दिली नाही हे महत्वाचे किंवा कुठे मुद्दाम सहानुभूती मिळविण्याचाही प्रयत्न केलेला दिसत नाही. तर तटस्थपणे चित्रण केल्याचेच या आत्मचरित्रात दिसून येते. हे आत्मचरित्र म्हणजे शांताबाईची आत्मकहाणीच आहे. "माझ्या वाट्याला जे जीवन आले तसे कोणाच्या वाट्याला यायला नको. लेखन करतांना काही गोष्टी लिहावयाच्या की नको, असे वाटत होते हे दु:खभोग लिहून झाल्याने ठीक वाटले"३ असे शांताबाई म्हणतात. केवळ दलित म्हणून नव्हे तर ज्या काळात एकूणच स्त्रिया फारशा शिकत नव्हत्या व त्यातही दलित स्त्रियांना तर शिक्षण मिळणे ही कठीण गोष्ट होती. अशा काळात शांताबाईनी जो शैक्षणिक प्रवास केला व प्रतिकूल परिस्थितीशी झगडा, वर्तमानांशी तडजोड आणि भवितव्याकडे निश्चित वाटचाल या वृत्तीमुळे शांताबाई या इतर सर्वसामान्य दलित स्त्रियांपेक्षा वेगळ्या ठरल्या. "शांताबाईनी जे भोगल सहन केल, झुंज दिली. त्यातून यशस्वी वाट काढली हा आदर्श केवळ दलित स्त्रीलाच नव्हे, तर समस्त स्त्रीजातीलाच प्रेरणा देणारा आहे." हा निर्मला कानडे यांचा अभिप्राय बोलका आहे. स्त्रियांचे समाजतील दुय्यमस्थान अजुनही पुसले गेले नाही. या तुलनेत स्वातंत्र्यपूर्वी कालखंडात शांताबाईसारख्या दलित महिलेने केलेली यशस्वी वाटचाल स्तिमीत करणारी आहे. शांताबाईच्या या चित्तरकथेने मराठी आत्मचरित्र साहित्याला मोलाचं देणं दिले आहे.

जनाबाई गिऱ्हे यांनी 'मरणकळा' या आत्मकथनातून भूक अपमान आणि अन्याय याचे चित्रण केलेले दिसते. हा समान धागा सर्वच आत्मचरित्रातून कमी अधिक प्रमाणात व्यापून राहिला आहे. माझ्या जन्माची चित्तरकथा, 'जिणं आयुचं' रात्रंदिन आम्हा' इ. दलित स्त्रियांची आत्मकथनेदेखील याला अपवाद नाहीत. कुत्र्यापेक्षा त्यांचं जीणं भयंकर होतं जनाबाई त्याच्या आयुष्यातले अनेक प्रसंग सांगतात की, या भुकेने त्यांचे जीवन कसे नकोसे केले होते. भूक अशी असते की, ती पोटच्या पोराचाही विचार करीत नाही अशावेळी माणूसं पाप–पुण्य, चांगले–वाईट, स्वच्छता, रीती–रीवाज कशाचाच विचार करीत नाही. काहीच नाही मिळाले तर मातीतील ज्वारी,

नाही जे समाजता सर्वांना माहित आहे त्यात सांगण्यासारखे काय आहे?'' असे या तक्रारीचे साधारणत: स्वरुप आहे. परिसंवाद, चर्चासत्रातून अशी मते व्यक्त केली जातात. अपमानस्पद जीवनाला ही समाजव्यवस्था अंतिमत: जबाबदार आहे आणि तिला जाब विचारण्याचा हक्क या आत्मकथनकारांना आहे. हे विसरले जाते. ''साहित्याने कलात्मक उंची गाठलीच पाहिजे हे एकदम शंभर टक्के खरं आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, खरा प्रांजळ 'उच्चार' त्याने दडवून ठेवावा हा सामाजिक सद्सद्विवेकबुद्धीचा उच्चारच पुढे कला होतो''[९] हे डॉ. वि.स.जोग यांचे मतही यासंदर्भात विचारात घेण्यासारखे आहे. नारायण सुर्वे यांच्या भूमिकेतून ही दलित स्त्री–आत्मकथने तपासली तर त्यातही प्रांजळ उच्चार दिसतो. तो इतिहासाला व्यक्त करतो 'स्व' च्या अस्तित्वासाठी, अस्तित्वाच्या समाज मान्यतेसाठी अखंड संघर्ष स्त्रीला आजही करावा लागत आहे. ही आत्मकथने आत्मशोधनाच्या प्रक्रियेचा भाग आहे. म्हणून ही सर्व आत्मकथने कुठल्याही एका व्यक्ती जीवनाची न राहता तत्कालीन समाज–जीवनाचे प्रतिनिधित्व करतात. भविष्य काळात विविध स्तरातील शोषित स्त्रिया जेव्हा आत्मकथन लिहू लागतील, तेव्हा व्यवस्थेच्या अनेक अनोळखी कप्प्यांचे विदारक दर्शन होईल आणि स्त्रियांच्या दु:खाची कोंडी फोडण्यास मदत होइल.

सामाजिक परंपरा आणि परिवर्तन याचे एक मौलिक स्वरुप दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून चित्रित होतांना दिसते. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या क्रांतीकारी कृतीपूर्वी यातील काही लेखिकांचा जन्म झालेला आहे. त्यामुळे हिंदू समाजव्यवस्थेने निर्मिलेले सामाजिक पाश, विषयमूल्ये याचा या लेखिकांना अनुभव आहे. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीमुळे परिवर्तनाचे वारे वाहू लागले आणि बौद्ध धम्म स्वीकारल्यानंतर जी प्रगत मानसिकता या समाजाने स्वीकारली त्याच्याही या लेखिका साक्षीदार आहेत. त्यामुळे असे म्हणता येईल की, बौद्ध धम्म स्वीकारानंतरचे परिवर्तन या आत्मकथनांनी चित्रित केले व ते नोंद घेण्यासारखे आहे. आत्मकथने लिहिल्यानंतर या दलित स्त्रियांनी आत्मकथनानंतर अन्य कोणते लेखन केलेले दिसत नाही या संदर्भात गंगाधर पानतावणे म्हणतात– ''मराठी साहित्यक्षेत्रात आपल्या आत्मकथनाने नावलौकिक प्राप्त करणाऱ्या शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, मुक्ता सर्वगौड प्रा. कुमुद पावडे आणि शांताबाई दाणी यांचे लेखन मंदावते आहे. प्रचंड ताकद आणि जीवनानुभवाची समृद्धी असलेल्या या लेखिकांनी आत्मसमर्थ्याचा विसर पडू न देता वाङ्मयाच्या क्षेत्रात प्रभावीपणे उभे राहिले पाहिजे. पायवाट पुसत येणाऱ्या नवीन लेखिकांना त्यामुळे आत्मविश्वास आणि आत्मबल प्राप्त होवू शकेल.''[१०] यासाठी या लेखिकांनी साहित्य लेखननिष्ठेचे व्रत अंगीकारायला पाहिजे त्यांच्या आत्मकथनांमुळे मराठी साहित्याला वेगळाच अन्वयार्थ लाभला आहे.''[११] हे प्रा.प्रज्ञा लोखंडे यांचे मत या संदर्भात महत्त्वाचे आहे. मुख्य प्रवाहाच्या जवळ आल्यावर जिथे दलित आत्मकथनाचा प्रवाह थांबल्यासारखा दिसतो. तिथुन वर्तमानव्यूहात जगणाऱ्या आजच्या सुशिक्षित मध्यमवर्गीय दलित स्त्रियांनी जर यापुढे आत्मकथने लिहिली तर एकूण मराठीतल्या आत्मकथनात्मक साहित्य–प्रकाराला आंणखी काही निराळी परिमाणे मिळण्याची शक्यता नंतरच्या काळात संभवू शकते.

**संदर्भ ग्रंथ**

१. कांबळे शांताबाई – माझ्या जन्माची चित्तारकथा, पूर्वा प्रकाशन १९८६, पृ. ०६
२. जाधव मनोहर – दलित स्त्रियांची आत्मकथने (समकालीन साहित्यचर्चा) नागनाथ, कोतापल्ले गौरवग्रंथ प्रतिमा प्रकाशन पुणे–पृ. ४३९
३. साहित्य सूची – शांताबाई कांबळे दिवाळी अंक १९८७, पृ.६९
४. गिन्हे जनाबाई – मरणकळा, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर १९९२
५. प्रा. सुखराम हिवराळे यांचे प्रास्ताविक– मरणकळा, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९९२

International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal- Sr. No. 40705 & 44117 July-Aug.-Sept. 2017 | Vol. 4, Issue 3

नाही जे समाजता सर्वांना माहित आहे त्यात सांगण्यासारखे काय आहे?'' असे या तक्रारीचे साधारणत: स्वरुप आहे. परिसंवाद, चर्चासत्रातून अशी मते व्यक्त केली जातात. अपमानस्पद जीवनाला ही समाजव्यवस्था अंतिमत: जबाबदार आहे आणि तिला जाब विचारण्याचा हक्क या आत्मकथनकारांना आहे. हे विसरले जाते. ''साहित्याने कलात्मक उंची गाठलीच पाहिजे हे एकदम शंभर टक्के खरं आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, खरा प्रांजळ 'उच्चार' त्याने दडवून ठेवावा हा सामाजिक सद्सद्विवेकबुद्धीचा उच्चारच पुढे कला होतो''[९] हे डॉ. वि.स.जोग यांचे मतही यासंदर्भात विचारात घेण्यासारखे आहे. नारायण सूर्वे यांच्या भूमिकेतून ही दलित स्त्री–आत्मकथने तपासली तर त्यातही प्रांजळ उच्चार दिसतो. तो इतिहासाला व्यक्त करतो 'स्व' च्या अस्तित्वासाठी, अस्तित्वाच्या समाज मान्यतेसाठी अखंड संघर्ष स्त्रीला आजही करावा लागत आहे. ही आत्मकथने आत्मशोधनाच्या प्रक्रियेचा भाग आहे. म्हणून ही सर्व आत्मकथने कुठल्याही एका व्यक्ती जीवनाची न राहता तत्कालीन समाज–जीवनाचे प्रतिनिधित्व करतात. भविष्य काळात विविध स्तरातील शोषित स्त्रिया जेव्हा आत्मकथन लिहू लागतील, तेव्हा व्यवस्थेच्या अनेक अनोळखी कप्प्यांचे विदारक दर्शन होईल आणि स्त्रियांच्या दु:खाची कोंडी फोडण्यास मदत होइल.

सामाजिक परंपरा आणि परिवर्तन याचे एक मौलिक स्वरुप दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून चित्रित होतांना दिसते. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या क्रांतीकारी कृतीपूर्वी यातील काही लेखिकांचा जन्म झालेला आहे. त्यामुळे हिंदू समाजव्यवस्थेने निर्मिलेले सामाजिक पाश, विषयमूल्ये याचा या लेखिकांना अनुभव आहे. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीमुळे परिवर्तनाचे वारे वाहू लागले आणि बौद्ध धम्म स्वीकारल्यानंतर जी प्रगत मानसिकता या समाजाने स्वीकारली त्याच्याही या लेखिका साक्षीदार आहेत. त्यामुळे असे म्हणता येईल की, बौद्ध धम्म स्वीकारानंतरचे परिवर्तन या आत्मकथनांनी चित्रित केले व ते नोंद घेण्यासारखे आहे. आत्मकथने लिहिल्यानंतर या दलित स्त्रियांनी आत्मकथनानंतर अन्य कोणते लेखन केलेले दिसत नाही या संदर्भात गंगाधर पानतावणे म्हणतात— ''मराठी साहित्यक्षेत्रात आपल्या आत्मकथनाने नावलौकिक प्राप्त करणाऱ्या शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, मुक्ता सर्वगौड प्रा. कुमुद पावडे आणि शांताबाई दाणी यांचे लेखन मंदावते आहे. प्रचंड ताकद आणि जीवनानुभवाची समृद्धी असलेल्या या लेखिकांनी आत्मसमर्थ्याचा विसर पडू न देता वाङ्मयाच्या क्षेत्रात प्रभावीपणे उभे राहिले पाहिजे. पायवाट पुसत येणाऱ्या नवीन लेखिकांना त्यामुळे आत्मविश्वास आणि आत्मबल प्राप्त होवू शकेल.''[१०] यासाठी या लेखिकांनी साहित्य लेखननिष्ठेचे व्रत अंगीकारायला पाहिजे त्यांच्या आत्मकथनांमुळे मराठी साहित्याला वेगळाच अन्वयार्थ लाभला आहे.[११] हे प्रा.प्रज्ञा लोखंडे यांचे मत या संदर्भात महत्त्वाचे आहे. मुख्य प्रवाहाच्या जवळ आल्यावर जिथे दलित आत्मकथनाचा प्रवाह थांबल्यासारखा दिसतो. तिथुन वर्तमानव्यूहात जगणाऱ्या आजच्या सुशिक्षित मध्यमवर्गीय दलित स्त्रियांनी जर यापुढे आत्मकथने लिहिली तर एकूण मराठीतल्या आत्मकथनात्मक साहित्य–प्रकाराला आणखी काही निराळी परिमाणे मिळण्याची शक्यता नंतरच्या काळात संभवू शकते.

**संदर्भ ग्रंथ**

१. कांबळे शांताबाई — माझ्या जन्माची चित्तारकथा, पूर्वी प्रकाशन १९८६, पृ. ०६
२. जाधव मनोहर — दलित स्त्रियांची आत्मकथने (समकालीन साहित्यचर्चा) नागनाथ, कोतापल्ले गौरवग्रंथ प्रतिमा प्रकाशन पुणे—पृ. ४३९
३. साहित्य सूची — शांताबाई कांबळे दिवाळी अंक १९८७, पृ.६९
४. गिन्हे जनाबाई — मरणकळा, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर १९९२
५. प्रा. सुखराम हिवराळे यांचे प्रास्ताविक— मरणकळा, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९९२

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

SPECIAL ISSUE-68 October - 2018

# दीक्षाभूमी आणि धम्मचक्र प्रवर्तन



**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue -**
Prof. Diensh Jaronde
Head, Dept. of Psycology,
Indira Mahavidyalaya, Kalamb,
Dist. Yawatmal [M.S.] INDIA

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2018

Special Issue-68

## दीक्षाभूमी आणि धम्मचक्र प्रवर्तन

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue:**
Prof. Diensh Jaronde
Head, Dept. of Psycology,
Indira Mahavidyalaya, Kalamb,
Dist. Yawatmal [M.S.] INDIA

*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे प्रकाशन वा पुनर्प्रकाशनाचे अधिकार प्रकाशक आणि संबधित लेखाकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत त्या मताशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 400/-

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF)-6.261(2017),
UGC Approved Journal
Special Issue 68 : दीक्षाभूमी आणि धम्मचक्र प्रवर्तन
ISSN : 2348-7143
October. 2018

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखकाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | वाङ्मयीन, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्रांतीच्या चळवळीत दीक्षाभूमीचे योगदान | प्रा. राजेश मेश्राम | 05 |
| 2 | दीक्षाभूमी : शिक्षणविषयक चळवळ | डॉ. रामधन हिरे | 08 |
| 3 | धम्मचक्र परिवर्तन आणि शैक्षणिक क्रांती | डॉ. अंबादास बर्वे | 10 |
| 4 | धम्मचक्र प्रवर्तन दिन व भारतीय संविधान | डॉ. माधव सोनेकर | 14 |
| 5 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बुद्ध धम्माची चळवळ | डॉ. दिनेश धाकडे | 18 |
| 6 | दीक्षाभूमी : शैक्षणिक क्रांतीची चळवळ | प्रा. एम. एच डाखे | 21 |
| 7 | दीक्षाभूमी : विचार परिवर्तनाची प्रेरणाभूमी | प्रा. महानंद बिडगर | 23 |
| 8 | परिवर्तनवादी विचार व्यवस्थेचे व मूल्यव्यवस्थेचे उर्जा केंद्र : दीक्षाभूमी | डॉ. मनीषा नागपुरे | 27 |
| 9 | दीक्षाभूमी व बौद्ध धर्मातील अष्टांग मार्ग आणि बौद्ध धर्मातील तीन अंग | प्रा. लक्ष्मण बैसाने | 31 |
| 10 | दीक्षाभूमी: बौद्धधम्म प्रचार-प्रसार केंद्र | डॉ.कमलकिशोर बा. इंगोले. | 36 |
| 11 | बुद्ध धम्म आणि वैज्ञानिक दृष्टीकोन | डॉ. तातेराव केंद्रे | 38 |
| 12 | बुद्ध आणि त्याचा धम्म | प्रा. सुयोग गजभिये | 42 |
| 13 | धम्म चक्र प्रवर्तन दिन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर | डॉ. साईनाथ शेटोड | 45 |
| 14 | सामाजिक क्रांतीचे प्रेरणास्थान दीक्षा भूमी | प्रा. रुपाली कणसे | 48 |
| 15 | दीक्षाभूमी आणि बौद्ध धर्माचा भारतीय समाजावरील प्रभाव | प्रा. सिद्धार्थ इंगोले | 52 |
| 16 | धम्म चक्र परिवर्तन दिन आणि समाजाची आजची स्थिती | डॉ. सुरेश सोमकुंवर | 57 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व धम्मक्रांती | डॉ. प्रफुल्ल बनसोड | 61 |
| 18 | धम्म चक्र प्रवर्तन दिन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. प्रदीप अंबोरे | 65 |
| 19 | आजची धर्मांतरित बौध्द महिला व बावीस प्रतिज्ञा | पाचांगे रागिनी लक्ष्मण | 68 |
| 20 | धम्म चक्र प्रवर्तन व बौद्ध धम्म | डॉ. पौर्णिमा रहांगडाले | 74 |
| 21 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मदीक्षा आणि बौद्ध समाज बाधवांची सद्यस्थिती | प्रा. ए. जी. अंभोरे | 79 |
| 22 | बोधीसत्व आंबेडकरांच्या धम्मदीक्षेचे यश | प्रा. प्रभाकर घोडेस्वार | 83 |
| 23 | धम्म चक्र परिवर्तन आणि आजची स्थिती | डॉ. विलास चव्हाण | 86 |
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर : एक राजकीय विश्लेषण | प्रा. डी. एस. पाटील | 90 |
| 25 | दीक्षा भूमीवरील धम्म क्रांतीचा पश्चिम विदर्भावरील प्रभाव | पुरुषोत्तम बांडे | 92 |
| 26 | दीक्षाभूमी आणि वैचारिक प्रेरणा | प्रा. श्याम देवकर | 97 |
| 27 | बौध्द धम्म आणि जागतिक शांतता | डॉ. विजयसिंग पवार | 100 |
| 28 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मक्रांती व धम्मक्रांतीनंतर स्त्रियांची स्थिती | डॉ. पद्मानंद तायडे | 102 |
| 29 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व धम्मचक्र प्रवर्तन | डॉ. एल.बी. डोंगरे | 107 |
| 30 | नागपूरच्या दीक्षाभूमीवरील लोककल्याणकारी बाजारपेठ : एक अध्ययन | प्रा. हरेश गजभिये | 110 |
| 31 | दीक्षाभूमी आणि धर्मांतरानंतरचा आंबेडकरी समाज | प्रा. जयवंत जुकरे | 114 |
| 32 | दीक्षाभूमी : निर्मिती आणि प्रेरणा | डॉ. प्रदीप औजेकर | 119 |
| 33 | दीक्षाभूमी और बाईस प्रतिज्ञाएँ | डॉ. शंकर पजई | 122 |
| 34 | धम्मचक्र परिवर्तन और वर्तमान स्थिती | डॉ. जितेंद्र शेळके | 124 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे प्रकाशन वा पुनर्प्रकाशनाचे अधिकार प्रकाशक आणि संबधित लेखाकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत त्या मताशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*



२१२

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF)-6.261(2017),
UGC Approved Journal Special Issue 68 : दीक्षाभूमी आणि धम्मचक्र प्रवर्तन
ISSN : 2348-7143
October. 2018

# परिवर्तनवादी विचारव्यवस्थेचे व मूल्यव्यवस्थेचे ऊर्जा केंद्र - दीक्षाभूमी

डॉ. मनीषा नागपूरे
सहयोगी प्राध्यापिका,
म. वा. पी. डब्ल्यु. एस. महा. नागपूर-४४००१३

**प्रस्तावना -**

दीक्षाभूमी हे भारतीय बौद्धांचे विशेषतः आंबेडकरवादी बौद्ध धर्मियांचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि आपल्या अनुयायांनाही नवयान बौद्ध धम्माची दीक्षा दिली त्यामुळे या भूमीला 'दीक्षाभूमी' म्हटले गेले. आपल्या अनुयायांना नवयान बौद्ध धम्माची दीक्षा देतांना दिलेल्या प्रतिज्ञा मानवी प्रवृत्तीला सत्प्रवृत्त करणाऱ्या सामाजिक क्रांतीच्या दिशा दिग्दर्शक ठरतात या बावीस प्रतिज्ञांना धम्म प्रतिज्ञा असेही म्हटले जाते. दीक्षाभूमी ही जागतिक भूमी असून संपूर्ण जगात तिचे पावित्र्य राखले गेले. बाबासाहेबांच्या स्वप्नातील धम्मसंस्कार केंद्र तयार करण्याच्या दिशेने दीक्षाभूमीकडे संपूर्ण जगाने बघणे आवश्यक आहे. भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी दीक्षाभूमीला मानवतेचे प्रेरणास्थान म्हटले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पवित्र दीक्षाभूमीवर समता तसेच सामाजिक क्रांतीची मुहुर्तमेढ रोवली आणि त्यामुळेच संपूर्ण समाज प्रगतीपशावर अग्रेसर होवू शकला. ही दीक्षाभूमी अवघ्या विश्वासाठी त्याग, शांती आणि मानवतेची प्रेरणा देणारी आहे. ही दीक्षाभूमी भारतातील ऐतिहासिक आणि क्रांतीकारक स्थळ मानले जाते. भारतातील समस्त वंचीत पीडित-दलित वाद्यांकरिता ही दीक्षाभूमी नवी प्रेरणा देणारे ऊर्जा केंद्र ठरले आहे. हे नाव सर्व परिवर्तनवाद्यांकरिता आणि प्रागतिक मंडळीकरिता नवनिर्मितीचे एक केंद्र ठरले आहे. १४ ऑक्टोबर १९५६ मध्ये बाबासाहेबांनी केलेली धार्मिक क्रांती दीक्षाभूमीवर घडून आली तेव्हा पासून भारतीय पटलावर एका नवीन प्रेरणास्थळाचा उदय झाला. या प्रेरणास्थळाचा प्रभाव प्रचंड स्वरूपाचा आहे. त्यामुळेच दीक्षाभूमीच्या संबंधात तिच्या प्रेरणा व प्रभावाच्या संबंधात दीक्षाभूमीच्या योगदानाच्या आशा आक्षेपांच्या संबंधात नव्यानेच विचार करणे आवश्यक ठरते.

धम्मस्वीकार ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आधुनिक भारताच्या इतिहासातील अत्यंत क्रांतीकारक घटना ठरते. या क्रांतीची नाळ थेट अडीच हजार वर्षापूर्वीच्या तथागत गौतम बुद्धांच्या धम्म क्रांतीशी जुळणारी आहे. अडीच हजार वर्षापूर्वी तथागत गौतम बुद्धाने कर्मकांडावर व उच्चनीचतेवर आधारित असलेल्या वैदिक धर्माशी संघर्ष करून बौद्ध धर्माची स्थापना केली होती. तथागत गौतमाच्या अशा समतावादी बौद्ध धम्माचे पुनरूज्जीवन बाबासाहेबांनी केले. बौद्ध धम्माचे हे पुनरूज्जीवन खऱ्या अर्थाने नवसर्जन होते. या नवसर्जनाने परिवर्तनाचे निदर्शक असणारे धम्मचक्र पुन्हा एकदा गतीमान झाले व नवबौद्ध बांधवांना ते सतत गतिशील करीत राहिले. त्यामुळे बाबासाहेबांनी केलेली ही धम्म क्रांती संपूर्ण भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारी प्रक्रिया ठरते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्माचा केलेला त्याग आणि बौद्ध धम्माचा केलेला स्वीकार ही महानतम क्रांती घडली ती नागपूर नगरीमध्ये. जाणीवपूर्वक बाबासाहेबांनी या शहराची निवड केली व शहराच्या मध्यस्थळी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि सोबतच आपल्या दलित समाजातील लाखो अनुयायांना ही दीक्षा सामुहिकपणे दिली. बौद्ध धम्माची दीक्षा घेण्यात आलेले हे स्थळ आज "दीक्षाभूमी" या नावाने ओळखले जाते. आधुनिक भारताच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो धार्मिक पाया रचला तो या

ISSN : 2348-7143
October. 2018

दीक्षाभूमीवरच भारतातील समस्त वंचित पीडित-दलित बांधवांकरिता ही दीक्षाभूमी नवी प्रेरणा देणारे उर्जा केंद्र ठरले. १४ ऑक्टोबर १९५६ ला बाबासाहेबांनी दीक्षाभूमीवर केलेली ही धार्मिक क्रांती भारतीय पटलावर एका नवीन प्रेरणास्थळाचा उदय करणारी ठरली. आज या प्रेरणास्थळाचा प्रभाव जनमानसाच्या मनावर प्रचंड स्वरूपाचा आहे. दीक्षाभूमीच्या पवित्र मातीमध्ये बाबासाहेब आंबेडकराचे समग्र-शोषित-वंचित समाजाच्या मुक्तीचे स्वप्न मिसळले आहेत. ज्या भूमीवर बाबासाहेबांनी दलित समाजाचा भूतकाळ पूर्णपणे बदलवून टाकला आणि वर्तमानाला एक नवा अन्वयार्थ प्रदान केला त्या भूमीचे पावित्र्य केवळ १९५६ च्या धम्म क्राती पुरते मर्यादित राहिले नाही तर हे पावित्र्य इहकेंद्री पावित्र्य झाले. मनुष्याच्या मुक्तीकरिता आणि मनुष्यतत्वाच्या संवर्धनाकरिता दीक्षाभूमीची निर्मिती झाली म्हणूनच दीक्षाभूमीचे उद्दिष्ट व दीक्षाभूमीची ध्येयासक्ती ही इतर कोणत्याही धर्मिक, पौराणिक स्थळांपेक्षा पूर्णतः आगळेवेगळी व मुल्यगर्भ सवरूपाची ठरते.

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणाला बासष्ट वर्ष झाली आहेत आणि दीक्षाभूमीलाही बासष्ट वर्ष झाली आहेत. बासष्ट वर्षाचा हा कालखंड आंबेडकरी समाजाकरिता आपल्या धम्मचरणाच्या, राजकारणाच्या, समाजकारणाच्या, अर्थकारणाच्या, संस्कृतिकारणाच्या संदर्भात नव्याने विचार करण्याइतपत पुरेसा आहे. म्हणूनच दीक्षाभूमीच्या व तत्संबंधीत धम्मकारण, समाजकारण व इतरही घटकांबाबत पुनर्विचार आणि नवचिंतन करणे ही काळाची सामुहिक गरज ठरते. बाबासाहेब आंबेडेरांनी घेतलेला हिंदू धर्मांतराचा निर्णय हा दलित मुक्तीच्या व समता तत्वाच्या ऐतिहासिक गरजेतून निर्माण झालेला होता. बाबासाहेबांनी नागपूर शहराची धम्मदीक्षेकरिता केलेली निवड ही जाणीवपूर्वक केलेली असून इतिहासाच्या प्रगल्भ भानातून ती आलेली आहे. नागपूर शहराला प्राचीन काळापासून असलेला बौद्ध संस्कृतीचा इतिहास बाबासाहेबांना अत्यंत महत्त्वाचा वाटला या ऐतिहासिक वारश्यासोबतच दलित वर्गाची संख्यात्मक आणि गुणात्मक बहुलता नागपूर शहराला दीक्षाकेंद्र म्हणून निवडण्यामागे महत्वपूर्ण ठरल्या. दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला बौद्ध धम्माचा सामुहिक पातळीवरील स्वीकार ही मुळात धम्मक्रांती होती. ज्या प्रकारे फ्रान्समधील राज्यक्रांती, रशीयांमधील साम्यवादी क्रांती या जशा जागतिक पातळीवरील महत्वाचा घटनाक्रम आहे. तितकीच क्रांतीकारक असणारी बाबासाहेबांची धम्मक्रांती आहे. बाबासाहेबांनी केलेल्या या धम्मक्रांतीला संपूर्ण क्रांती म्हणता येईल. त्या धम्म क्रांतीला अधिकाधिक परिपूर्ण व संपूर्ण ठेवण्यात आपण कितपत यशस्वी ठरलो याचा विचार देखील आज करणे अपरिहार्य ठरते.

दीक्षाभूमी ही आज तत्कालीन बौद्ध धम्म स्वीकाराचे वास्तव आहे. त्याचप्रमाणे समग्र मानवमुक्तीचे ते स्वप्नदेखील आहे. मानवमुक्तीचे वास्तव आणि स्वप्न या दोन्ही घटकांचा अनोखा संगम दीक्षाभुमीमध्ये पाहावयास मिळतो. ज्या दीक्षाभुमीने व्यवस्थापरिवर्तनाचा अविस्मरणीय अनुभव १९५६ मध्ये अनुभवला त्या अनुभवाची अनुभूती घेण्यासाठी ह्या दीक्षाभुमीवर दरवर्षी लाखो बौद्ध बांधव आणि इतरही परिवर्तनवादी बांधव भेट देत कृत-कृतार्थ होत असतात. भारताच्या कानाकोपऱ्यातून जे लाखो दलित-वंचित लोक येतात. त्या सर्वांच्या मनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या धम्मचक्र प्रर्वतनाबद्दल एक विलक्षण स्वरूपाचा श्रद्धाभाव असतो. हा श्रद्धाभावच त्यांना या स्थळाजवळ खेचून आणीत असतो व बाबासाहेबांच्या धम्मदीक्षेला वंदन करीत असतो. येथील विचारपरिर्वनाची व व्यवस्थापरिवर्तनाची प्रेरणा आपल्यासोबत घेवून जाण्याचा प्रयत्न ही सर्व मंडळी करतांना दिसतात. बाबासाहेबांच्या धम्मदीक्षेबद्दलचा श्रद्धाभाव, भक्तिभाव, विचारभाव अशा वेगवेगळ्या छटांचे संमिश्रण येथे येणाऱ्या लोक समुदायाच्या मनात झालेले असते.

बाबासाहेबांची बौद्ध धम्म स्वीकाराकडे तसेच बौद्ध धम्माकडे पाहण्याची जी क्रांतीकारक विचारदृष्टी होती ती आत्मसात करण्यामध्ये येथील समाज जीवनाला पुरेशी सफलता प्राप्त होवू शकली नाही. दीक्षाभूमीच्या

ISSN : 2348-7143
October. 2018

संबंधात विचारमंथन करतांना आजची धम्म चळवळ ही संख्यात्मक दृष्टिकोनातून मोठ्या प्रमाणात फोफावली असल्याचे चित्र दिसून येत असले तरी प्रत्यक्षात वस्तूस्थिती मात्र तशी नाही. धम्माचरणाचे रूपांतर झपाट्याने धर्माचरणात होवू लागले आहे. धम्म आणि धर्म यात बाबासाहेबांनी ठळकपणे ओढलेली सीमारेषाच फार पुसट झाली आहे. १९५६ मध्ये दीक्षाभुमीवर धम्मदीक्षेचा जो कळस गाठला गेला त्याच्याकडे आम्हाला फक्त मान उंचावून पाहता आले पण त्या दिशेने मार्गक्रमण करण्यासाठी आम्हाला पाहिजे तितके धम्मतत्पर होता आले नाही. बाबासाहेबांच्या बौद्ध धम्माचा क्रांतीकारक आशय आम्हाला पचविता आला नाही आणि त्या आशयाला खेड्यापाड्यातील दलित-वंचित अभावग्रस्त वर्गापर्यंत पोचविता आले नाही. या संदर्भात डॉ. शैलेंद्र लेंडे याचे मत असे आहे की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असलेले सामाजिक ध्येय, त्यांना अभिप्रेत असलेला बौद्ध धम्म त्यांना अभिप्रेत असणारे बौद्ध संस्कृतिकारण त्यांना अभिप्रेत असणारे आंबेडकरी अर्थकारण व शिक्षणकारण या विविध घटकांची अंमलबजावणी करण्याची सुर्वणसंधी दीक्षाभुमीला प्राप्त झाली होती. बाबासाहेबांनी ही सुवर्णसंधी दीक्षाभुमीला देवू केली होती. दीक्षाभुमीला मात्र ही सुवर्णसंधी मध्यम वर्गीय अभिजनवादी पांढरपेशा सुखवस्तू शहरी नवबौद्ध वर्गापुरती सीमीत ठेवता आली. परिणामी बौद्ध धम्माचा व बौद्ध संस्कृतीचा ज्या प्रमाणात भारतीय समाजाच्या दलितांमधील व अन्य दलित घटकांत प्रचार-प्रसार व्हावयास पाहिजे होता, त्याला एक प्रकारे खीळ बसली" असे डॉ. शैलेंद्र लेंडे आपल्या दीक्षाभुमीवर लिहलेल्या लेखात नमूद करतात.

बाबासहेबांना अभिप्रेत असाणारा बौद्ध धम्म आणि त्यातील संपूर्ण मानवमुक्तीचा आशय हळूहळू मागे पडू लागला आहे. या संदर्भात डॉ. भा. ल. भोळे लिहितात. "दीक्षाभुमीवरच्या या संकटांना आपल्याला डोळसपणे सामोरे जायला पाहिजे नाही तर मग बाबासाहेबांच्या धम्मचक्र प्रवर्तनाचा संदेश इथल्या इथंच जिरेल आणि इथे फक्त स्मारक उभे राहिल ते आणखी उंच होईल कदाचित, परंतु बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथाचा मागमुसही तिथे राहणार नाही. हे आपण स्पष्टपणे बोलायला पाहिजे तेव्हा बाबासाहेबांचा संदेश कायम महत्वाचा आहे. तो संदेश केवळ दलितापुरता मर्यादित नव्हता, तर तो मानवमुक्तीचा संदेश आहे आणि संबंध मानवाने तो मानवमुक्तीचा संदेश म्हणून स्वीकारला पाहिजे. त्याची जी इहलौकीकता आहे, त्याचे जे दूरगामित्व आहे, त्याची जी काही परिवर्तनक्षमता आहे, तिचा पुरेपुर अविष्कार आपल्याला घडविता आला पाहिजे." भा. ल. भोळे यांच्या सारख्या समाजनिष्ठ अभ्यासकाने दिलेला हा इशारा महत्वाचा ठरतो. आधुनिक भारतीय समाजाला दीक्षाभुमीचा हा जो समृद्ध वारसा प्राप्त झाला आहे. तो बाबासाहेबांच्या सामुहिक धम्म स्वीकारामुळे प्राप्त झाला आहे. दीक्षाभुमी हा केवळ भाव-भावनांचे संवेदना-तरंगाचे व कल्पना कल्लोळाचे केद्र नाही. तर ते एका नव्या विचारव्यवस्थेचे व पर्यायी मूल्य व्यवस्थेचे केद्र आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर बौद्ध धम्माला केवळ सर्वश्रेष्ठ स्वरूपाचा धर्म मानत नाहीत तर त्याला ते एक श्रेष्ठतम स्वरूपाचा सामाजिक सिद्धांत मानतात. एवढेच नाही तर आजच्या आधुनिक विचारव्यवस्थेमध्ये बौद्ध धम्माच्या तुलनेत दुसरा कोणताच मार्ग मानवमुक्तीची खात्री देणार नाही या निष्कर्षापर्यंत येतांना दिसतात.

आजच्या समकालीन मूल्यऱ्हासाच्या मूल्यविहिनतेच्या कालखंडात मूल्यांची ज्योत कोणी निष्ठापूर्वक तेवत ठेवू शकत असेल तर ती म्हणजे दीक्षाभुमीच होय. ह्या ज्योतिर्मयी, प्राकाशपूरिज भूमिकेला निभावून नेण्याचे महत्त्कार्य दीक्षाभुमीला मोठ्या जिकिरीने व जोखमीने पार पाडावे लागेल. दीक्षाभुमीवर आणि पर्यायाने नागपूर शहरावर या शहरातील व परिसरातील वंचित वर्गावर बाबासाहेबांनी टाकलेला हा विश्वास केवळ त्या काळापुरता सिमित ठेवणे योग्य ठरणार नाही तर या विश्वासाला आजही कायम ठेवणे अत्यावश्यक ठरते

आणि त्या विश्वासाला कायम ठेवण्याबरोबरच त्याला सतत वृद्धीगंत करता आले तर दीक्षाभुमीचे देणे आपण अंशतः फेडल्याची कृतार्थ भावना आपल्या मनात निर्माण होवू शकेल असे म्हणावेसे वाटते.

**संदर्भ ग्रंथसूची -**

1. मून, वसंत (संपादक) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धम्मप्रवास, मनोविकास प्रकाशन, मुंबई १९८९
2. लोकराज्य - धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक, ऑक्टोबर २००६
3. गौरवग्रंथ - डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २५ डिसेंबर १९९३.
4. डॉ. शैलेंद्र लेंडे - दीक्षाभूमी : काल, आज आणि उद्या अक्षरगाथा-परिवर्तनाच्या चळवळीचा विशेषांक.
5. डॉ. भा. ल. भोळे - 'संदर्भ दलित चळवळीचा'
6. डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'मी बुद्ध धम्म का स्वीकारला? जयभीम विशेषांक - संपादक सुरेश द्वारशीवार, २ ऑक्टोबर २००६

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277-5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - IV

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. A. Koli**
Professor & Head (Retd.),
Department of Economics,
Shivaji University, Kolhapur.

# CONTENTS OF MARATHI PART - IV


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मुस्लिम मराठी साहित्य समीक्षा<br>**डॉ. शेख इक्बाल मिन्ने** | १-९ |
| २ | स्त्रीवादी साहित्य समीक्षा<br>**प्रा. डॉ. विजया यादवराव गेडाम** | १०-१४ |
| ३ | स्त्रीवादी समीक्षेचे प्रमेय<br>**सहा. प्रा. अंकुश काळे**<br>**सहयोगी प्रा. शंकर वाघमारे** | १५-१६ |
| ४ | सौंदर्य संकल्पना : एक चिंतन<br>**डॉ. शंकरानंद किशनराव येडले** | १७-२० |
| ५ | समीक्षा विचार आणि जागतिकीकरण<br>**आरगडे अंबादास रोहिदास** | २१-२५ |
| ६ | 'मी असा घडलो' चे समाजशास्त्रीय मूल्यमापन<br>**प्रा. अरविंद आसाराम भराडे** | २६-२९ |
| ७ | 'मानुषी' या प्रतिभा रानडे यांच्या कादंबरीतील समीक्षा<br>**बाबासाहेब पांडूरंग लवडे** | ३०-३२ |
| ८ | स्त्रीवादी साहित्य समीक्षा<br>**दत्तात्रय त्रिंबक भानुसे** | ३३-३७ |
| ९ | दलित साहित्य एक स्वतंत्र समीक्षा : एक चिंतन<br>**प्रा. डॉ. दिलीप बिरुटे** | ३८-४२ |
| १० | आदिवासी साहित्य : एक धगधगते वास्तव<br>**कु. दिपीका जी. हटवार** | ४३-४६ |
| ११ | आधुनिक आदिवासी मराठी साहित्याची समीक्षा<br>**प्रा. ज्ञानेश्वर किसन म्हात्रे** | ४७-५१ |
| १२ | स्त्रीवाद आणि स्त्रीवादी समीक्षा<br>**डॉ. मनीषा नागपुरे** | ५२-५६ |
| १३ | स्त्रीवादी समीक्षा<br>**प्रा. डॉ. टापरे अंजली दत्तात्रय** | ५७-५९ |

# १२. स्त्रीवाद आणि स्त्रीवादी समीक्षा

डॉ. मनीषा नागपुरे
पी. डब्लु. एस. महाविद्यालय नागपुर.

**स्त्रीवाद संकल्पना**

स्त्रीवाद हे बायकांनी बायकांसाठी चालविलेल्या चळवळीचे नाव नसून मागील काही वर्षात चहुदिशांनी विकसित झालेली एक विचारप्रणाली आहे. स्त्रीवाद म्हणजे स्त्रीच्या सर्वांगीण मुक्तीचा विचार करणारी विचारप्रणाली आहे. स्त्रीवादी विचारांचा आरंभ अठराव्या शतकात झाला. मेरी वोलस्टोन काफ्ट (1759–1799) ही स्त्री सुधारणेची मागणी करणारी पहिली स्त्री. तिचे जीवन आणि लेखन म्हणजे स्त्रीची ओळख पुरूषांच्या माध्यमातुन करून देणाऱ्या संस्थाविरूद्धचा दीर्घ संघर्षच होते. स्त्री पुरूषांना समान शिक्षण दिले गेले पाहिजे. स्त्रीला स्वतःच्या बौद्धिक आणि नैतिक शक्यतांचा विकास करण्याची संधी पुरुषांच्या बरोबरीने मिळाली पाहिजे. स्त्रीची बुद्धी पुरूषाहून तसूभरही उणी नसल्याने निर्णय घेण्याची क्षमता तिच्यातही पुरूषाएवढीच असते हे जाणून तिला वागणूक दिली पाहिजे. बाईने स्वतः नटव्या बाहुलीसारखे पुरुषांच्या रंजनाचे खेळणे व्हायला नकार दिला पाहिजे आणि आपल्या विवेकाचा आवाज ऐकला पाहिजे हे सांगणारी ही पहिली स्त्री. स्त्री ही संपूर्ण 'Complete in herself' असते. हा तिच्या विवेचनाचा गाभा आहे. हा तिचा ग्रंथ 1972 साली प्रकाशित झाला. यानंतर सुमारे शंभर वर्षानी जॉन स्टयुअर्ट मिल आणि त्यांची मैत्रीण हॅरिएट टेलर यांनी पुढचा विचार मांडला. मिलने 1967 मध्ये ब्रिटिश पार्लमेंटमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळण्याची मागणी केली. त्याचा 'द सबजेक्शन ऑफ विमेन' Subjection of women' हा ग्रंथ 1869 साली प्रकाशित झाला. हॅरिएट टेलरचे विचार मिलपेक्षा अधिक क्रांतीकारी होते. शिक्षणाची प्रत्येक शाखा स्त्रीला उपलब्ध झाली पाहिजे. उत्पन्नाच्या उद्योगांच्या क्षेत्रात तिला भागीदारी मिळाली पाहिजे असे तिचे म्हणणे होते. गरज असो वा नसो प्रत्येक स्त्री स्वतः कमावणारी असलीच पाहिजे म्हणजे ती आर्थिक दृष्टया नवऱ्याची गुलाम राहणार नाही असे तिने स्वच्छ मांडले. 1919 साली प्रसिद्ध झालेला या ग्रंथानेही स्त्रीला पुरुषसत्ताक समाव्यवस्थेत कसलेही स्थान कसे मिळत नसते हे दाखवून दिले. तथापि स्त्रीवादी विचारसरणीचा सुसूत्र प्रारंभ करून देणारा महत्वाचा ग्रंथ म्हणजे सिमॉन द बुव्हा यांचा 'The second sex' हा ग्रंथ. 1949 साली प्रसिद्ध झालेल्या या ग्रंथातला महत्वाचा विचार म्हणजे स्त्री आणि पुरूष या भिन्न लिंगी व्यक्तीमध्ये असणारी /दिसणारी विषमता ही जीवशास्त्रीय नसून ती एक सांस्कृतिक निर्मिती आहे. स्त्री ही जन्माने स्त्री नसते तर तिला तशी घडविली जाते हे सिमॉनचे वाक्य विश्वविख्यात आहे. पुरूषप्रधान समाजरचनेने स्त्रीला नेहमीच The other (इतर) मानले, पुरूष हा प्रथम तर स्त्री ही दुय्यम पुरुष केंन्द्रस्थानी तर स्त्री परिघावर अशीच व्यवस्था ठरविण्यात आली आणि स्त्रीने ती स्वीकारली. स्त्रीच्या विशिष्ट शरीररचनेमुळे, गर्भधारणा, अपत्यजन्म आणि त्यांचे पोषण या जबाबदाऱ्या निसर्गाने स्त्रीकडे सोपविल्यामुळे तिच्याकडे पत्नी, माता या भूमिका आल्या आणि त्या तिने नीटपणे पार पाडाव्या यासाठी या भूमिकांचे महत्व वाढविले गेले. तसे संस्कार स्त्रीवर बालपणापासूनच करण्यात आले घर हेच तिचे खरे कार्यक्षेत्र आहे असे म्हणून तिला 'स्वातंत्र्य' नाकारले गेले. सिमॉन द बुव्हा यांनी मांडलेल्या या विचारांचा स्त्रियांवर गाढ प्रभाव पडला.

पाशात्य स्त्रीवादी चळवळ ही दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात जगभर पसरली. स्त्रीवादी विचारसरणीच्या आरंभीच्या पाऊलवाटा रूळून त्याचे महामार्ग बनले. स्त्रियांच्या दमनाची, शोषणाची कारणे स्त्रियांनी शोधली. अमेरिका, इंग्लड, फ्रान्स या देशांमध्ये स्त्रीविषयक अभ्यास आणि संशोधन विद्यापीठांच्या पातळयावर सुरू झाले. समाजाने स्त्रीचे दमन केले आहे आणि अनेक वर्षे प्रयत्न करूनही ते पूर्णतः थांबविता आलेली नाही. या प्रखर जाणिवेतून या दमनामागची कारणे स्त्रियांनी शोधली. मुळात सर्वत्र आढळणारा भेद, अलगपणा (difference) अणि इतरपणा (otherness) यांच्यावर त्यांनी अधिक लक्ष केंद्रित केले.

पाशात्य स्त्रीवादी चळवळ 1960 ते 1970 या काळात अधिक प्रभावी होत गेली. 1963 साली प्रकाशित झालेल्या बेटी फ्रीडन च्या 'The Feminine Mystique' या ग्रंथामुळे अमेरिकन स्त्री आणि युद्धोत्तर समाजात तिच्या वाटयाला आलेल्या भागधेयाने ती कीती त्रस्त आणि असमाधानी आहे हे दाखवून दिले आरंभी स्त्रियांच्या हक्कासाठी सुरू झालेली राजकीय चळवळ साठच्या दशकाच्या अखेरीपर्यंत 'स्त्री मुक्ती' चळवळीत रूपांतरित झाली होती. रॉबिन मार्गन संपादित 'Sisterhood is Powerful' (1970) हया ग्रंथात स्त्रीमुक्ती चळवळीशी संबंधीत लेख एकत्रित करण्यात आले. त्यावरून अमेरिकेत स्त्री मुक्ती चळवळ 60 ते 70 या दशकात चांगलीच प्रस्थापित झाल्याचे दिसून येते. 1966 साली प्रसिद्ध झालेले कॅथारिन रॉजर्सचे 'The Troublesome Helpmate' 1968 मधले मेरी एलमतचे 'Thinking about women' आणि 1969 साली प्रकाशित झालेले केट मिलेटचे 'Sexual Politics' हे तीन पुस्तके पुढील काळातल्या स्फोटक अशा ॲग्लो अमेरिकन स्त्रीवादी समीक्षेचा पाया मानली जातात. 'स्त्रीवादी समीक्षा' ही वाङ्मयीन सिद्धातांशी निगडीत नसून, स्त्रीवादी चळवळीचाच तो एक उपयुक्त घटक आहे. असा आग्रह धरण्यात आला आणि स्त्रीवादी समीक्षेने आपले अस्तित्व वाङ्मयीन सिद्धांतापुरते मर्यादित नसून व्यापक अशा स्त्रीविषयक चळवळीचा तो अविभाज्य भाग आहे हे दाखवून दिले 1970 ते 1980 या काळात प्रकाशित झालेल्या स्त्रीवादी समीक्षा ग्रंथातील सर्वात प्रभावी ग्रंथ हा केट मिलेट चा 'सेक्युअल पॉलिटिक्स' मानला जातो स्त्रीवादी समीक्षेचा आणखी एक आधारभूत ग्रंथ म्हणजे 1971 साली प्रसिद्ध झालेला जर्मन ग्रीअरचा 'The Female Eunuch' (द फीमेल यूनक) हा होय. स्त्रियांचे शरीर, त्यांच्या अस्तित्वाच्या अवस्था आणि विवाह, कुटुंब इ. त्यांच्याशी निगडीत अशा घटनांसंबंधी पूर्वापार चालत आलेल्या, रूढ करण्यात आलेल्या कल्पना आणि वस्तुस्थिती यांचे प.रखड विश्लेषण या ग्रंथात ग्रिअरने केले आहे.

**स्त्रीवादी विचार प्रवाह :–** स्त्रीवादी समीक्षेकडे वळण्यापूर्वी स्त्रीवादातील काही मुख्य प्रवाह लक्षात घ्यावे लागतात. स्त्रीवादी चळवळ ही पुरूषसत्तेने स्त्रीवर सतत केलेल्या अन्यायाचे आमूलाग्र व मर्मग्राही विश्लेषण करते व त्याविरूद्ध कृती करून पूर्वापार समाजव्यवस्थेने स्त्रीला काही पातळयांवर कमी लेखले आहे. दुय्यम लेखले आहे ते दाखवून देणे. त्याला नकार देणे आणि स्त्री पुरूषांमध्ये समानता असणेच न्याय आहे यासाठी लढा देणे हे स्त्रीवादाचे मुख्य सुत्र आहे स्त्रीवादी चळवळ ही एक राजकीय चळवळ आहे. ती प्रतिकात्मक, मानसशास्त्रीय आणि नैतिक पातळयावर स्त्रियांचे होणारे दमन आणि पुरूषांचे वर्चस्व यांचा विचार करते.

स्त्रीवादी विचार प्रवाहातील सर्वात प्रखर विचारधारा जहाल कडव्या स्त्रीवादयांची आहे. जहाल स्त्रीवाद हा स्त्रीच्या शोषणाचे व दमनाचे मर्म मुख्यत्वेकरून पुरूषसत्तेच्या सर्वकषतेच्या संदर्भात उकलुन दाखवते. जहाल स्त्रीवादयांच्या मते स्त्रीचे शोषण हे केवळ आर्थिकच नसुन शारिरीक, लैंगिक, सामाजिक, सांस्कृतिक, ज्ञानात्मक आणि मानसिक असे आहे. जहाल स्त्रीवादाने स्त्रीच्या दमनाची कारणे शोधतांना स्त्री शरीर हे त्यामागचे मूळ कारण असे

म्हटले आहे. स्त्रीशरीराच्या विशीष्टतेमुळे स्त्रीची स्वतःकडे पाहण्याची दृष्टी, तिचा दुय्यम दर्जा, खाजगी आणि इतर भोवतीच्या जगात वावरतांना तिच्याकडे आलेल्या भूमिका आणि कर्तव्ये ही निश्चित होतात असे जहाल स्त्रीवाद म्हणतो राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था कुटुंबप्रणाली, हिंसाचार लैंगिक शोषण, घरघुती श्रम, प्रजोत्पादन त्यासंबंधीचे तंत्र,ग्यान समलिंगी व भिन्नलिंगी संबद्ध मूलगामी विचारांची मांडणी त्यांनी केली कुटुंबसंस्थेचा घडणीमागची सत्तासंरचना त्यांनी उलगडून दाखविली इतिहास, तत्वज्ञान, भाषा यांच्यातही असणाऱ्या पुरूषसत्तेचे राजकारण त्यांनी तपासले. जहाल स्त्रीवादाने स्त्री चळवळीला फार मोठी उर्जा दिली.

मार्क्सवादी स्त्रीवादयांच्या मते स्त्रियांच्या दडपणुकीचे व शोषणाचे कारण भांडवलशाही हेच आहे. आर्थिक परावलंबन हेच स्त्रीच्या दास्याचे प्रमुख कारण आहे असे तो मानतो. जहाल स्त्रीवादाचे लैंगिक शोषणावर अधिक भर दिला. त्यामुळे त्यांची चळवळ केवळ गौर, मध्यमवर्गीय स्त्रियांपुरतीच मर्यादित राहिली असा आक्षेप घेत कृष्णवर्णीय स्त्रीवादाची चळवळ उभी राहिली. 1973 मध्ये National Black Feminist organization ही संस्था निर्माण झाली. 'गौर स्त्रिया आमचा तिरस्कार करतात. आणि आमच्या पुरूषांना आम्ही फक्त मादया वाटतो'. म्हणून या चळवळीने वंशवाद आणि लिंगवाद या दोन्हीविरूद्ध लढा पुकारला. प्रश्न त्याच्यातही कृष्णवर्णीय स्त्रियांपुढचे प्रश्न, त्यांच्यात असणारी विविधता त्यांची स्वतंत्र अस्मिता व संस्कृती या सर्व बाबतीत आपण वेगळे आहोत हे सांगण्यासाठी स्त्रीवादाला Feminism ऐवजी Womanisim अशी संज्ञा Alice Walker ने योजिली. पुढे पोस्ट कलोनियल फेमिनिझम, इकोफेमिनिझम अशा काही शाखा या चळवळीला फुटल्या.

या विश्वात आपले स्थान काय आहे. याचा शोध घेत स्त्रीचे स्वत्वभान, आत्मभान जागवीत, पितृसत्तेने चालविलेल्या सर्वांगीण दमनाचे स्वरूप सर्वांपुढे ठेवणाऱ्या या चळवळीने स्त्रीचा अनुभव हा पुरूषाच्या अनुभवापेक्षा सर्वथैव भिन्न असतो. असे आग्रहाने मांडले.

1975 नंतर भारतातही स्त्रीवादी चळवळीने आकार घेतला स्त्रियांच्या स्थितीची पाहणी करणाऱ्या स्त्रीवादी संघटना जोमाने कार्यरत आहेत स्त्रीवादाने शोषणाची मर्यादा स्त्रीपुरती सीमित ठेवली नसून सर्व अनुत्पादक मानल्या जाणाऱ्या घटकांचाही आपल्या विचारात समावेश करून घेतला आहे. स्त्रीवाद ही आज शोषणाचा सर्वंकष विचार करणारी व्यापक चळवळ ठरली आहे

जगातल्या सर्व स्त्रियांना एकमेकींना जगायला, प्रेम करायला, हसायला आणि स्वतःला स्त्री म्हणून कमी न लेखता आनंदाने जगायला स्त्रीवादी चळवळीने मदत केली आहे. आज तर केवळ स्त्रीविषयीच नव्हे तर जगातल्या सर्व शोषितांविषयी विचार करायला लावणारी व्यापक दृष्टी स्त्रीवादामुळे जगातल्या स्त्रियांमध्ये निर्माण झाली आहे. असे खात्रीने म्हणता येते.

**स्त्रीवादी समीक्षा**

स्त्रीवादी चळवळीचा एक भाग म्हणून स्त्रीवादी समीक्षा पद्धती विकसित झाली. 1949 साली सिमॉन द बोव्हाने आपल्या 'द सेकंड सेक्स' या ग्रंथात स्त्री हे सांस्कृतिक रचित कसे आहे हे साहित्यातील उदाहरणे घेवून ही स्पष्ट केले होते. स्त्रीवादी समीक्षेचा हा प्रारंभ होय. त्यानंतर केट मिलेटने आपल्या सेक्युअल पॉलिटिक्स या ग्रंथात शैक्षणिक अभ्यास क्षेत्रातल्या प्रतिष्ठीत अशा नवसमीक्षेला जबरदस्त आव्हान दिले. साहित्याचा अभ्यास करतांना साहित्य समजून घेण्यासाठी सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ अभ्यासलेच पाहिजे असे प्रतिपादन करीत तिने डी.एच लॉरेन्स, हेन्टी मिलर, नॉर्मन मेलर या मान्यवर लेखकाच्या साहित्यात स्त्रीची कोणती व कशी रूपे व्यक्त झाली आहेत त्याचे विश्लेषन केले या नंतर स्त्रीवादी समीक्षेचा ओघच सुरू झाला. 1970 साली एलेनशोवाल्टरचा 'A Literature

of their own' हा प्रबंध प्रकाशित झाला. स्त्रीवादी समीक्षेची पहिली सैद्धांतिक मांडणी या ग्रंथाने केली असे म्हणता येईल.

त्यानंतरच्या काळात 'समाज स्त्रीवादी' 'चिन्हार्थ स्त्रीवादी' 'मानसस्त्रीवादी' मार्क्सवादी स्त्रीवादी, लेस्बियन स्त्रीवादी, कृष्णवर्णीय स्त्रीवादी, अस्तित्ववादी, विरचनावादी, उत्तरसंरचनावादी अशा विविध प्रकारे स्त्रीवादी समीक्षा विकसित झाली ती होत असतांना कित्येकदा स्त्रीवादी समीक्षकांनी परस्परांच्या मतप्रवाहाचे खंडनही केले. सुरूवातीच्या समीक्षेने पुरूष लेखकांनी निर्मिलेल्या साहित्यकृतीतील स्त्रीचित्रणातील सांकेतिकता आणि विरूपीकरणावर हल्ले केले. नंतरच्या स्त्रीवादी समीक्षा मात्र स्त्रीकेंद्री झाली. स्त्रीची सृजनात्मकता, शैली, तिने हाताळलेले विविध वाङ्मय प्रकार त्यातील आशयसूत्रे, त्यातील प्रतिमा आणि वाङ्मयीन परंपरा यांचा कसोशीने शोध घेतला गेला. त्यातही अँग्लो अमेरिकन स्त्रीवादी समीक्षेत उदारमतवादी दृष्टिकोन आढळतो. राजकीय बांधीलकी आणि वाङ्मयीन व्यवस्थेला आव्हान दिलेले आढळते. परंतु भाषा व संस्कृतीत अनुस्यत असलेला लिंगभेदाचा विचार आढळत नाही. फ्रेंच स्त्रीवादी समीक्षा संहितेवर व भाषेवर लक्ष केंद्रित करते. स्त्रीवादी समीक्षा करतांना समीक्षेचे पारंपारिक निकष निरूपयोगी आहेत. स्त्री आणि पुरूष यांच्यातील सामाजिक, संस्थात्मक आणि व्यक्तीगत राजकारणाच्या अभ्यासाशी स्त्रीवादी समीक्षा आणि सिद्धांत यांचे नाते असले पाहिजे असे त्तेरील मुआ या समीक्षिकेने 'सेक्स्युअल पॉलिटिक्स' (1985) या पुस्तकात म्हटले आहे.

एलेन शोवॉल्टरच्या प्रबंधात स्त्रियांच्या लेखनाच्या संदर्भात काही महत्वपूर्ण निरीक्षणे होती. शोवॉल्टरने 1. स्त्रीजातीय Feminine 2. स्त्रीवादी Feminist आणि 3. स्त्री Female अशा तीन संज्ञा वापरल्या आहेत. पहिल्या अवस्थेत स्त्रिया पुरूषांनी स्त्रीविषयीच्या ज्या स्त्रीत्वसुचक प्रतिमा निर्माण केलेल्या असतात त्याचा स्वीकार करतात. दुसऱ्या अवस्थेत त्या स्त्रीप्रतिमा नाकारतात. एवढेच नव्हे तर पुरुषनिर्मित व्यवस्थेला दिलेला नकार त्यांच्या लेखनातून प्रगटतो. तर तिसऱ्या अवस्थेत अत्यंत प्रगल्भपणे पुरुषकेंद्री परिमाणे, परिप्रेक्ष्ये नाकारून 'स्त्री' च्या स्वतःच्या भोवतीच्या जगाविषयीच्या नात्याचा स्वतः घेतलेला अनुभव हा केंद्रस्थानी घेतात व स्वतःच्या रूपाचा शोध घेतात शोवॉल्टर यांनी स्त्रीनिष्ठ, स्त्रीकेंद्री, समीक्षेला 'गायनोकिटिक्स' ही संज्ञा वापरली आहे. स्त्रीकेंद्री समीक्षा पुरुषनिर्मित सिद्धांत नाकारते. स्त्रीवाङ्मयाचा इतिहास शोधणे, परंपरेने दुर्लक्षिलेल्या स्त्रीलेखकांचा शोध घेणे. स्त्री साहित्याची परंपरा निश्चित करणे ही स्त्री केंद्री समीक्षेची उद्दिष्टे आहेत.

एलेन शोवॉल्टर यांनी स्त्रीवादी समीक्षेचे Woman as Reader आणि Woman as Writer असे दोन प्रकार मानले आहेत. स्त्रियांचे लेखन वेगळे का ठरते याचाही विचार स्त्रीवादी समीक्षापद्धती करू शकते स्त्रीच्या देहविषयक जाणिवा, तिची विशिष्ट भाषा तिची मानसिकता आणि सांस्कृतिक स्थान यांचा स्त्रीच्या लेखनावर कसा प्रभाव पडला याचा शोध कसा घेतला जात आहे याचे सविस्तर विश्लेषण शोवॉल्टर यांनी Feminist Criticism in Wilderness या निबंधात केले आहे आणि त्याच बरोबर स्त्रियांच्या लेखनासंबंधिच्या वेगळया सिद्धांताच्या आवश्यकतेवर भर दिला आहे.

फ्रेंच स्त्रीवादी समीक्षेने देरीदाच्या विरचनावादाचा तसेच मनोविश्लेषणाचा स्वीकार केला आहे. हेलन सिक्सू या फ्रेंच समीक्षकांनी सुद्धा पुरूष आणि स्त्री या द्वंद्वातून सारी द्वंद्वे निर्माण होतात असे म्हटले आहे हेलन सिक्सूनंतर ल्यूसी इरिगेरे यांनी स्त्रीवादी समीक्षेला आणखी एक नवे परिमाण दिले. इरिगेरे याच्या मते स्त्रीविषयी आजपर्यंत जे सांगितले गेले आहे ते पुरूषी दृष्टिकोनातून स्वत्व आणि भाषा यांच्याकडे पुरूषाच्या माध्यमातून जाण्याऐवजी दुसरा मार्ग स्त्रीने शोधला पाहिजे तर ज्युलिआ ख्रिस्तेवा यांच्या मते स्त्री ही असत नाही ती सतत घडत त्यांनी

चिन्हात्मकतेचा स्त्रीत्वाशी संबंध जोडला आहे. सिझ्रू, इरिगेरी, ख्रिस्तवा यांचे सिद्धांत हे समजायला फार क्लिष्ट असेच म्हणावे लागतील.

**समारोप**

स्त्रीवाद ही सुमारे एका शतकाच्या कालावधीत सतत उत्क्रांत होत गेलेली चळवळ आहे. 1990 नंतरच्या काळातली स्त्रीवादी चळवळ ही Post Feminism या नावाने ओळखली जाते. पोस्टमॉडर्नोझम, पोस्ट स्ट्रक्चर लिझम, पोस्ट कलोनिॲलिझम अशा इतर चळवळीप्रमाणेच ही चळवळही बदलाची मागणी करीत स्वतःला इतर तात्विक आणि राजकीय विचारप्रणालींशी जोडून घेत आहे. पोस्टफेमिनिझमनेही आधीच्या अवस्थांमधील स्त्रीवादी चौकट स्वीकारलेलीच सूचित होते. 1980 च्या दशकात स्त्रीवादी चळवळ अपयशी ठरल्याचे किंवा समतेचे उद्दिष्ट ती गाठू शकली नाही तिला ओहोटी लागली आहे असा आरोप प्रसारमाध्यमांनी सुरू केला. स्त्रीवादयांनी आता हे थांबवावे, माघारी फिरावे अशा प्रकारचे दडपण त्यांच्यावर येवू लागले होते. अशावेळी Post Feminism चा उदय होवून तिने समानतेसंबंधीच्या चर्चेचा मोहरा अलगतेच्या 'Difference' चर्चकडे वळविला म्हणूनच Post Feminism ही चळवळ स्त्रीवादाच्या मूळच्या संकल्पनात्मक आणि सैद्धांतिक कार्यक्रमापासून वेगळा असा राजकीय पवित्रा होते. असे म्हटले जाते. Post Feminism ही चळवळ अधिक व्यापक आणि बहुमुखी संकल्पनांचा शोध घेत स्त्रीवादाचे पुर्न व्यवस्थापन करते पोस्ट फेमिनिझमने विरचना आणि भेद या अत्याधुनिक संकल्पनावर भर दिला आहे. अर्थात या गोष्टींच्या चर्चचा आरंभ कृष्णवर्णीय स्त्रीवादयाकडूनच झाला. शोषणाच्या तऱ्हांमध्ये आणि संघर्षाच्या प्रकारामध्येही फरक असु शकतो. हे श्वेत वर्णीय स्त्रीवादयांनी ध्यानात घेतले नाही असा त्यांचा आक्षेप होता. तेथूनच स्त्रीवादाच्या अंतर्गत असणाऱ्या संकल्पनात्मक मर्यादांची चर्चा सुरू झाली. पोस्ट फेमिनिझम हा त्याची परिणती होय.

**संदर्भ ग्रंथ**


- Millet Kate : Sexual Politics : 1970
- Humm Maggie : Feminist Criticism : 1986
- Moi Toril : Sexual / Textual Politics : 1985
- Moder Criticism and Theory : Edi. David Lodge : 1980
- स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना व उपयोजन : मंगला वेरखेडे
- समीक्षेतील नव्या संकल्पना – संपादक मनोहर जाधव
- आधुनिक समीक्षा सिद्धांत – मिलींद मालशे – अशोक जोशी –2007

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**International E-Research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

December-2019 Special Issue – 211

## Role & Nature of Media
## प्रसार माध्यमांचे स्वरूप आणि भूमिका




**Guest Editor:**
Dr. R. G. Tale,
Principal,
Bar. Sheshrao Wankhede College of
Arts & Commerce, Khaperkheda
Dist. Nagpur, Th. Saoner . Maharashtra

**Executive Editor of the issue:**
Dr. Jyoti Selukar
Dr. Anjali Pande

**Chief Editor:**
Dr. Dhanraj Dhnagar

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

ISSN : 2348-7143
December-2019

**Impact Factor – 6.625** **ISSN – 2348-7143**

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

December-2019 Special Issue – 211

## Role & Nature of Media
## प्रसार माध्यमांचे स्वरूप आणि भूमिका

**Guest Editor:**
Dr. R. G. Tale,
Principal,
Bar. Sheshrao Wankhede College of
Arts & Commerce, Khaperkheda
Dist. Nagpur, Th. Saoner . Maharashtra

**Executive Editor of the issue:**
Dr. Jyoti Selukar
Dr. Anjali Pande

**Chief Editor:**
Dr. Dhanraj Dhnagar

**Peer Review Committee of the Issue**
Dr. R. G. Tale
Dr. B. K. Swain
Dr. Vijay Shingnapure
Dr. Sharyu B. Taywade

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-

ISSN : 2348-7143
December-2019

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
**Assist. Prof. (Marathi)**
**SPH Mahila Mahavidyalaya,**
**Malegaon, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, **Kinwat (Hindi)**
Mrs. Bharati Sonawane-Nile, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

Co-Editors -
- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

Advisory Board -
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

Review Committee -
- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali** , HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal*
**Impact Factor - (SJIF) – 6.625**
Special Issue 211 Role & Nature of Media
**Peer Reviewed Journal**
**ISSN : 2348-7143**
**December-2019**


| | | | |
|---|---|---|---|
| 35 | सामाजमाध्यमांच्या विळख्यातील युवावर्ग | डॉ. प्रीती उमाठे | 149 |
| 36 | भारतामध्ये ई-कॉमर्स प्रणाली प्रवेगीत करण्यात प्रसारमाध्यमांची भूमिका | डॉ. दामोधर मेंढे | 153 |
| 37 | प्रसारमाध्यमांचे व्यापारीकरण | डॉ. राजेंद्र कांबळे | 161 |
| 38 | प्रसार - माध्यमांचे व्यावसायीकरण | डॉ. विद्या चन्ने | 163 |
| 39 | प्रसारमाध्यमे आणि साहित्य यांची भूमिका | प्रा. संजय सिंगनजुडे | 167 |
| 40 | प्रसारमाध्यमांचा युवा वर्गावर पडणारा प्रभाव | डॉ. उल्हास राठोड | 173 |
| 41 | प्रसारमाध्यमे आणि पत्रकारितेची सामाजिक भूमिका | प्रा. संगीता उमाळे | 176 |
| 42 | प्रसारमाध्यमांतील अर्थकारण | डॉ. एस. एस. हृवारे | 182 |
| 43 | प्रसारमाध्यमे आणि स्त्रिया | डॉ. साधना लांजेवार | 186 |
| 44 | प्रसारमाध्यमे : नाटक - चित्रपट - खेळ | डॉ. विजया राऊत | 189 |
| 45 | स्मार्ट फोनचा महाविद्यालयीन मुलींच्या सामाजिक जीवनावर पडणारा परिणाम | डॉ. सुरेश सोमकुंवर | 193 |
| 46 | प्रसारमाध्यमे आणि बदलते ग्रामीण जीवन | प्रा. प्रमोद शेन्डे | 200 |
| 47 | आधुनिक प्रसार माध्यमांचे प्रकार | डॉ. सोपानदेव पिसे | 206 |
| 48 | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप | प्रा.मोनाली बहादुरे | 211 |
| 49 | प्रसारमाध्यमे आणि समाज | डॉ. स्नेहप्रभा गावंडे | 216 |
| 50 | विवाहसंस्थेवर प्रसार माध्यमांचा प्रभाव | प्रा. राखी तुरस्कर | 218 |
| 51 | प्रसारमाध्यमे आणि समाज | प्रा.संतोष यादव | 221 |
| 52 | प्रसारमाध्यमांच्या दर्पणातील समाज | डॉ. कमलकिशोर इंगोले | 224 |
| 53 | प्रसारमाध्यमे आणि समाज | प्रा.श्रीरंग लभाने | 228 |
| 54 | प्रसारमाध्यमे आणि युवा पिढी | मनीषा सोनटक्के | 233 |
| 55 | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप | डॉ. मंगला कांबळे- डाहाट | 236 |
| 56 | प्रसारमाध्यमे आणि स्त्रियांची बदलती भूमिका | डॉ. भारती मस्के | 240 |
| 57 | प्रसारमाध्यमे आणि समाज | प्रा. बाळकृष्ण रामटेके | 243 |
| 58 | प्रसारमाध्यमांचे व्यापारीकरण | डॉ. अमिता रघटाटे | 247 |
| 59 | प्रसारमाध्यमे आणि समाज | डॉ. समृद्धी टापरे | 251 |
| 60 | प्रसारमाध्यमांचा आढावा व बदलती जीवनशैली | डॉ. प्रवीण काळे | 255 |
| 61 | प्रसारमाध्यमे आणि समाज | डॉ. अशोक शहाणे | 258 |
| 62 | प्रसारमाध्यमांची आजची स्थिती व व्यावसायिक समाजकार्य | डॉ. चंदु पाटील | 261 |
| 63 | प्रसारमाध्यमांचे व्यापारीकरण | प्रा. पंढरी मोरे, डॉ. डी. डी. सांबारे | 265 |
| 64 | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप | कविता राजभोग | 269 |
| 65 | प्रसारमाध्यमे आणि समाज | डॉ. अनुराधा बाडे | 275 |
| 66 | मुद्रित प्रसारमाध्यमांमध्ये अग्रलेखाचे महत्त्व | प्रा. अमृता डोरलीकर | 277 |
| 67 | प्रसारमाध्यमांची भूमिका व आजचे सामाजिक वास्तव | डॉ. मनीषा नागपुरे | 284 |
| 68 | प्रसारमाध्यमे आणि स्त्रियांची बदलती भूमिका | डॉ. स्वाती वाकोडे | 289 |
| 69 | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप | प्रा. रीता बाळके -डंभाळे | 292 |
| 70 | प्रसारमाध्यमे आणि साहित्य | डॉ. साधना जिचकार | 297 |
| 71 | प्रसारमाध्यमे आणि समाजिक परिवर्तन | डॉ. स्वर्णलता वारके | 301 |
| 72 | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप | प्रा. लीना यादेवार | 305 |
| 73 | समाजमाध्यमे आणि तरुण पिढीतील परिवर्तनाचे अध्ययन | कु.मधुरी ठाकरे | 311 |
| 74 | प्रसार माध्यमे आणि समाज | डॉ.राखी जाधव | 315 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 211 Role & Nature of Media
Peer Reviewed Journal

ISSN : 2348-7143
December-2019

# प्रसार माध्यमांची भूमिका व आजचे सामाजिक वास्तव

प्रा. डॉ. मनीषा नागपुरे
म.वा.पी.डब्ल्यु.एस. महा.
नागपूर.
भ्रमणध्वनी क्र.९८२३१५३००२

## प्रास्ताविक

प्रसारमाध्यमांचे मानवी जीवनात अत्यंत महत्वाचे आणि मोलाचे स्थान आहे. खरे तर, गरजांच्या पोटांत बदल सामावलेले असतात. बदल हे स्थित्यंतर दर्शवितात. पुढे जाण्याचे ते लक्षणच असते. मोडतोड ही बदलाची पूर्वअट आहे, हे आपण आधी लक्षात घेतले पाहिजे. भाषा, समाज, संस्कृती, व्यक्ती, काल स्थिती, देश, वस्तू, व्यवहार, वर्तन यांच्यात बदल होणे, ही काळची गरज आहे अशा बदलांमुळेच काळचा आवाज बदलल्याचे कळते. परिवर्तनाची ती एक तयारी असते. आज आपल्याला दिसते की, प्रसारमाध्यमांमध्ये विशाल स्वरूपाची क्रांती झालेली आहे. केवळ प्रबोधन करण्याचाच हेतू या माध्यमांनी धरून ठेवलेला आज दिसत नाही, तर लोकांच्या एकंदर गरजा, त्यांचे प्रश्न यांना पूर्णत्वास नेण्यासाठीही माध्यमे एकजूट झालेली आहेत, ही गोष्ट बदलांच्या कसोटीवर महत्त्वाचीच आहे. 'ज्ञान, माहिती, रंजन' हे तीनपदरी मूलभूत सूत्र प्रसारमाध्यमांनी जपले तरीही, त्या पलीकडे प्रसारमाध्यामांची आगेकूच झालेली आपण पाहतो. 'आरोग्य' हा विषय जगाच्या अजेंड्यावर आलेला आहे. हक्क, सुरक्षा, भष्ट्राचार यासंबंधाने सक्रिय पद्धतीने माध्यमांनी रान उठविल्याचेही आपण बघतो.

प्रसारमाध्यमांचा जनतेवरील प्रभाव अनन्यसाधारण अशा स्वरूपाचा आहे. एकेकाळी वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी आणि नभोवाणी हीच प्रसारमाध्यमे म्हणून ओळखल्या जात असे. व याच माध्यमांची चर्चा होत असायची. परंतु अलीकडच्या काळात मोबाईल, इंटरनेट या माध्यामांनी देखील महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. फेसबुक, ब्लॉग विश्व, व्हॉट्सॲप, ट्विटरच्या माध्यमातून तो आपले मतप्रदर्शन करीत असतो. त्यामुळे वृत्तपत्र आणि दूरचित्रवाणी याबरोबरच या माध्यमांनी सुद्धा संपूर्ण मानवी जीवन आपल्या कवेत घेतलेले दिसते. सोबतच या प्रसारमाध्यमांना आज व्यावसायिक स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे त्यांच्या भूमिकाही बदलत आहेत. असे असले तरी प्रसारमाध्यमांनी चांगला व्यवहार व चांगली प्रतिमा ठेवतांना आपल्यावरील वाढती जबाबदारी विसरून चालणार नाही. कारण मानवी जीवनाच्या जवळजवळ सर्व क्षेत्रांना व्यापणारी ही माध्यमे आज समाजाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनलेली आहे. ज्ञान माहिती, शिक्षण, मनोरंजन अशा अनेक भागांनी कार्य करत प्रसारमाध्यमांनी जनमनात स्थान निर्माण केले आहे. म्हणूनच डेनिल मेकवेल या संवाद तज्ञाने 'प्रसारमाध्यमांना संवादाची व परिवर्तनाची शक्ती' म्हटले आहे. त्यामुळे स्वाभाविकच प्रसारमाध्यमांनी आपल्या भूमिका पार पाडून आपल्यावरील वाढत्या जबाबदारीचे भान ठेवणे, त्याबाबतचे आपले उत्तरदायित्व स्वीकारणे आवश्यक आहे. पण आज प्रसारमाध्यमाकडून याबाबतीत अपेक्षाभंग होतांना दिसतो आहे.

महाराष्ट्रातील वृत्तपत्रांना ऐतिहासिक अशी परंपरा आहे. १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' सुरू करून वृत्तपत्राचा पाया घातला. या कालखंडात सुरू झालेल्या वृत्तपत्रांचा हेतू जनजागरण हा होता. तर इंग्रजीविरूद्धच्या लढाईत वृत्तपत्रांचा शस्त्र म्हणून वापर केला गेला. इंग्रजाविरूद्धच्या मोहीमेमध्ये वृत्तपत्राची फार मोठी भूमिका राहलेली आहे. समाजाचा आवाज बुलंद करणारे 'वॉच–डॉग' म्हणून या काळात वृत्तपत्रांकडे पाहिल्या जात असे. मूल्याधिष्ठित समाज निर्माण करणे, समाजाचे मूल्यभान तीव्र करणे आणि प्रस्थापितांच्या

ISSN : 2348-7143
December-2019

मुलूखगिरीला सुरूंग लावणे हा या काळातील वृत्तपत्रांचा मुख्य उद्देश होता. आर्थिक नफा मिळविणे किंवा व्यवसाय म्हणून या माध्यमांकडे बघणे ही भूमिका या कालखंडात दूरपर्यंत दिसून येत नाही. 'लोकहितवादीची शतपत्रे' गोपाळ गणेश आगरकर यांचे 'सुधारक' प्रामाणिकपणे समाजात भूमिका वठवित होते. ''आमच्या समाजव्यवस्थेत अनेक दोषस्थळे आहेत. ही दोषस्थळे वारंवार लोकांच्या नजरेस आणावी, ती दूर करण्याचे उपाय सूचवावे आणि युरोपीय सुधारणेत अनुकरण करण्यासारखे काय आहे, ते पुनः पुनः दाखवावे, यास्तव हे सुधारक पत्र काढले आहे.''[१] आगरकरांनी अशी स्पष्ट भूमिका घेणे चांगले आहे. त्याची मलावण व जे वाईट आहे त्यावर कडक शब्दात आसूड ओढला आहे. प्रबोधन आणि परिवर्तन हे आगरकरांच्या वृत्तपत्रांचे कळीचे मुद्दे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची तर वृत्तपत्रामागची भूमिका मोठीच उदात्त होती. गावकुसाबाहेर फेकल्या गेलेल्या आणि जनावरापेक्षा हिन वागणूक मिळत असलेल्या दलित–अस्पृश्य बांधवात नवे आत्मभान निर्माण करण्यासाठी 'मुकनायक' बहिष्कृत भारत', 'जनता' प्रबुद्ध भारत' चा जन्म झालेला दिसून येतो. समाजहित, राष्ट्रहीत हा त्यांच्या वृत्तपत्रांचा स्थायी भाव होता.

प्रसारमांध्यमांचे मानवी जीवनातील स्थान अढळ आहे. लाखो करोडो लोकांपर्यंत विचार पोहचविण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करीत असल्यामुळे प्रसारमाध्यमांनी अतिशय जबाबदारीने जनतेसमोर स्वत:ला सिद्ध केले पाहिजे. जनजागृती करण्यासोबतच सत्य–असत्यातील फरक प्रसारमाध्यमांनी जनतेला समजावून सांगितला पाहिजे. परिवर्तन हा जगण्याचा मुलाधार मानून समाजसुधारणेचे व्रत प्रसारमाध्यमांनी मोठ्या निष्ठेने धारण केले पाहिजे. वास्तवाशी इमान राखत सर्वसामान्यांचे प्रश्न, दु:ख समजावून घेत आपली भूमिका पार पाडायला पाहिजे. पण प्रसारमाध्यमांच्या जगात असे घडते का? हा आजचा खरा प्रश्न आहे. प्रसारमाध्यमांना 'लोकशाहीचा चौथा खांब' मानले गेले आहे. यावरून प्रसारमाध्यमांची काय ताकद असते याचा अंदाज आपण करू शकतो.

जनमत प्रभावी करण्याची प्रचंड ताकद प्रसारमाध्यमांमध्ये आहे. वस्तुनिष्ठ बातम्या हा वृत्तपत्रांचा मुख्य गाभा तर अग्रलेख हा आत्मा असतो. समाजात जिथे जिथे कोणावर अन्याय होत असेल, अनाचार होत असेल तर तो उघडकीस आणणे आणि विधायकतेचा पुरस्कार करणे हा वृत्तपत्राचा धर्म आहे. त्यापासून वृत्तपत्र ढळले, तर त्याची विश्वासार्हता संपुष्टात येऊ लागते. सर्व काळ सर्व लोकांची विश्वासार्हता टिकविणे ही सोपी गोष्ट नाही. आजचे वास्तव बघता बहुतेक वृत्तपत्रे समाजात नकारात्मकताच पसरविण्याचे कार्य करीत असल्याचे दिसते. एकेकाळी वर्तमानपत्राकडे गांभीर्य होते. पण आज वर्तमानपत्रांनी स्वत:ला हलके फुलके करून घेतले आहे. आज वृत्तपत्राला धंद्याचे स्वरूप आलेले आहे. दर्जा, गुणवत्ता, मूल्य यांना आता वर्तमानपत्राच्या लेखी काहीही किंमत उरलेली नसून सवंगपणा, भडकपणा यांना वर्तमानपत्राने आपलेसे केले आहे. यात दूरचित्रवाणी देखील मागे राहिली नाही. आज चॅनेल्सचे इतके प्रचंड प्रमाण वाढलेले आहे की, कोण जास्त मनोरंजन करतो, कोण जास्त पैसा कमावतो आणि कोण जास्त जनतेची जास्त दिशाभूल करतो याची जणू स्पर्धाच लागली आहे. कधी काळी टि.व्ही. कडे प्रबोधनाच्या अंगाने पाहिले जायचे. परंतु सरकारी धोरणेच जेथे बाजार बनतात. तिथे खाजगी चॅनेल्सने मागे कसे राहायचे, टाकाऊ भावना आणि विकृत विचारधारा रोगट समाजाची निर्मिती करण्यासच हातभार लावतांना दिसते.

जाहिराती तर प्रसारमाध्यमांचा जीव की प्राण झाल्या आहेत. जाहिराती दाखवितांना त्याचा समाजावर काय विपरीत परिणाम पडत असेल या विचाराच्या कितीतरी पल्याड आता वाहिन्या गेलेल्या आहेत. असंख्य जाहिरातीचा नुसता रतिब वाहिन्यांवर सुरू असतो. ज्याचा वास्तवाशी सुतराम संबंध नसतो. वर्तमानपत्रामध्ये आजकाल ज्या जाहिराती येतात त्या उत्पादनाचा सत्या–असत्याशी आमचा कुठलाही संबंध नाही. अशा

ISSN : 2348-7143
December-2019

आशयाचे विधान वर्तमानपत्रात यायला लागलेले आहे. वाचकांकडे वर्तमानपत्र वाचक म्हणून कमी आणि ग्राहक म्हणून अधिक बघते. ''वृत्तपत्रे प्रॉडक्ट झाली, विक्रीची वस्तू झाली, वाचक नागरिक राहिला नाही, तो ग्राहक झाला. माहितीचा ग्राहक, मनोरंजनाचा ग्राहक, बातम्यांचा ग्राहक, वस्तूंचा ग्राहक, राजकीय पक्षाचा ग्राहक, नेते, पुढारी नारे, खेळाडू यांच्या प्रतिमांचा ग्राहक, कंपन्यांच्या ब्रँडचा ग्राहक, स्वप्नांचा, आशांचा, आकांक्षाचा ग्राहक''.[२] मार्केटचा स्वभाव मोठा विचित्र असतो. तिथे मूल्यांना कुठलाही थारा नसतो. नफा हेच मार्केटचे धोरण असते व अनेक वृत्तपत्रांनी नफाखोरी करणे हेच धोरण अवलंबिले आहे. आर्थिक हित डोळ्यासमोर ठेवून जी वृत्तपत्रे चॅनेल्स धोरणे आखतात त्यांच्याकडून चांगल्याची अपेक्षाच करू शकत नाही. प्रसारमाध्यमांनी कुठल्याही घटनेकडे तटस्थतेने बघितले पाहिजे. केवळ कुठल्याही घटनांची पार्श्वभूमी विशद करणे किंवा पत्रकार परिषदांना हजेरी लावून बातमी लिहणे याला पत्राकरिता किंवा माध्यमांचे उद्दिष्ट म्हणता येणार नाही. पत्रकाराला लोकांमध्ये मिसळून काम करता आले पाहिजे. वर्तमानपत्रात नुसते वृत्त देवून भागत नाही तर चांगल्या—वाईटांची परिणीती समाजाला समजावून सांगावी लागते. पी. साईनाथासारखे काही पत्रकार धरणग्रस्त, टंचाईग्रस्त, दुष्काळग्रस्त यांची बाजू लावून धरतात. फार थोडे पत्रकार शेतकऱ्यांच्या भावजीवनाशी हक्क सांगू शकतात आणि समस्येची उकल होतपर्यंत रणांगणातून जराही हटत नाही. काही अपवाद सोडले तर आज प्रसारमाध्यमे लोकांच्या भावना चाळवत मनोरंजनाचा पाऊस पाडण्यातच गुंतलेली दिसतात.

'प्रसारमाध्यमे समाजाचा आरसा आहे' या विधानाची खोली पार नाहीशी होवून आज हा आरसा इतका तडकला आहे की, त्यात कोणत्याही चेहऱ्याचे खरे प्रतिबिंब पहायला मिळत नाही. अनेक नट—नट्यांचे घरगुती प्रश्न, त्यांचे कौतुक, त्यांची जीवनशैली यावर वर्तमानपत्रात मोठमोठ्या बातम्या येतात. देशातले अनेक प्रश्न मात्र तसेच निरूत्तर. या प्रश्नांकडे गांभीर्याने बघणे, त्यावर तोडगा सुचविणे, यावर लक्ष न देता निरर्थक गोष्टीवर भर देवून वाचकांच्या आणि श्रोत्यांच्या भावनांच्या उत्सुकतेचा कडेलोट करायचा ही प्रसारमाध्यमांची नैतिकता झाली आहे. अर्थहीन बातम्यांना कव्हरेज देण्यातच ही माध्यमे स्वत:ला धन्य समजतात.

लोकमत तयार करण्याचे अत्यंत प्रभावी कार्य प्रसारमाध्यमे करू शकतात. माणसामाणसांत मैत्रीचे संबंध दृढ करण्याचे आणि वास्तवाला थेट भिडून समाजातील कचरा उपडून काढण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करू शकतात. परंतु अनेकदा भडक बातम्या देणे, खऱ्या बातम्या दडपणे असे कार्य प्रसारमाध्यमांच्या हातून आज सर्रास होत आहे. आजची प्रसारमाध्यमे ही राजकीय झाली आहे. अत्यंत टाकाऊ अशी पत्रकारिता आज मोठ्या राजरोसपणे सुरू आहे. पत्रकारीते संदर्भात बोलतांना निखिल वागळे म्हणतात, ''समाजात लाचारी आहे, तशी पत्रकारितेतही आहे. संपादक व्हायला व बड्या भांडवलदाराकडे लाचारी करायला अनेक पत्रकार गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत''.[३] पत्रकारांचे नितीमत्तेशी, विचारधारेशी काहीही देणेघेणे उरले नाही. बहुतेक वृत्तपत्र आणि न्यूज चॅनेल्समध्ये आज हे चित्र आपल्याला दिसून येते. संपादक या पदाची प्रतिष्ठा समाजाच्या लेखी फार मोठी असते, परंतु अलीकडे मात्र हे पद कसे भांडवलशाहीचे अपत्य आणि धनलोभी झाले आहे. याचीच प्रचिती येतांना दिसते. आज माध्यमांना सार्वजनिक हितापेक्षा खाजगी हित महत्त्वाचे वाटायला लागले आहे. लोकांच्या विश्वासार्हतेपेक्षा व्यवसायाच्या हिताला अधिक प्राधान्य दिल्या जाते. सामर्थ्याचा अभाव आणि सामाजिक मूल्यांची गळती प्रसारमाध्यमातून सारखी होतांना दिसते. ''एकेकाळी माध्यमात काम करणारे लोक हे ज्ञानमार्गी होते. आता ही जमात नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. माध्यमाच्या क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणावर भरती होऊ लागली आहे. हे क्षेत्र आता बुद्धीजीवीचं आहे, असे छातीठोकपणे म्हणता येणार नाही''.[४] असे विधान

3. वागळे निखिल — सद्यस्थितीत माध्यमांची भूमिका काय असावी? २६ जुलै २०१४, साधना सामाजिक, पुणे, पृष्ठ–२९
4. कुबेर गिरीश — 'मूल्य शून्य माध्यमे', लोकसत्ता दिवाळी, अंक–२०१८, पृष्ठ–४८
5. डुम्बरे सदा — अनि, संदर्भासहित संवाद, पृष्ठ–५०१
6. डॉ. घोर उज्वला — प्रसारमाध्यमांची भूमिका व वाढती जबाबदारी 'शब्दालय', मासिक दिवाळी अंक–२०१५, पृष्ठ–१५५

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277-5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II / Hindi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai

**Dr. P. A. Koli**
Professor & Head (Retd.),
Department of Economics,

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | सावित्रीबाई फुले व समाज परिवर्तन<br>प्रा. डॉ. केंद्रे तातेराव एकनाथ | १-३ |
| २ | अर्थशास्त्रीय संशोधन पद्धतीचा - प्रवाह<br>प्रा. डॉ. अवचरे जयेश मो. | ४-११ |
| ३ | बँकांचे राष्ट्रीयीकरण : श्रीमती इंदिरा गांधी यांचा एक ऐतिहासीक निर्णय<br>प्रा. नितेश आर रामटेके | १२-१५ |
| ४ | संस्कृत साहित्य आणि निसर्ग<br>सौ. प्रिया पेंढारकर | १६-२१ |
| ५ | मराठी (आदिवासी) कादंबरीतील निवडक स्त्री व्यक्तीरेखा आणि संविधान<br>प्रा. डॉ. राजेश बवरे | २२-२५ |
| ६ | संगीत आणि संपादन प्रेरणा या घटकांचा भावनिक अस्थिरतेवर होणारा परिणाम<br>डॉ. गजानन रमणेराव रत्नापारखी<br>डॉ. शंकर डी. वाकोडे | २६-३७ |
| ७ | स्त्री स्वातंत्र्य<br>सह. प्रा. बळीराम किसन राऊत | ३८-३९ |
| ८ | प्राथमिक आरोग्य केंद्रातील महिला परिचारिकांचा चिकित्सक अभ्यास<br>राजश्री विष्णू पांचाळ | ४०-४२ |
| ९ | १६ व्या लोकसभेतील प्रसार माध्यमांचा प्रभाव<br>गजानन सहादेव उपरीकर | ४३-४७ |
| १० | भारतीय संविधान व स्त्री<br>डॉ. मनीषा नागपुरे | ४८-५२ |
| ११ | स्त्रीवादी साहित्य : संकल्पना व स्वरुप<br>प्रा. कविता चंद्रकांत लोहाळे/ताटे | ५३-५४ |
| १२ | विदर्भातील आदिवासींची शासकीय योजनांविषयीची जागरुकता आणि लाभाचे अध्ययन<br>कु. निता प्रभाकरराव राऊत<br>डॉ. संध्या एस. देवळे | ५५-६५ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १०. भारतीय संविधान व स्त्री

डॉ. मनीषा नागपुरे
सहयोगी अधिव्याख्याता, म.वा.पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय, नागपूर.

**प्रस्तावना**

पूर्व वैदिक काळात स्त्रियांना समाजात मानसन्मान होता. महिलांचे समाजातील स्थान उच्च होते. परंतु उत्तर वैदिक काळात महिलांच्या स्थितीत परिवर्तन होवून स्त्रियांचे स्वातंत्र्य कमी झाले. स्त्रियांना मानसन्मान दर्जा उत्तरोत्तर कमी होत गेला. स्त्रियांना अनेक बंधने आली. पण पुढे भगवान गौतम बुद्धांनी समतेचा विचार रुजवून या देशात मानव मुक्तीच्या लढयाला सुरुवात केली. त्यानंतरच्या कालखंडातही अनेक महापुरुषांना या संदर्भात लढे उभारावे लागले. महाराष्ट्रात महात्मा ज्योतीबा फुले यांनी मानव मुक्तीच्या व समतेच्या लढयाचे रणशिंग फुंकले. स्त्रियांना आपले अधिकार मिळवून देण्यासाठी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्त्री शिक्षणाची चळवळ त्यांनी हातात घेतली. इ.स.1890 मध्ये महात्मा फुलेंचा मृत्यू झाला आणि इ.स.1891 मध्ये डॉ.आंबेडकरांचा जन्म झाला हा योगायोगच म्हणावा लागेल. फुले युगानी सुरु केलेले परिवर्तन भावी काळात डॉ.आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून पूर्णत्वाला नेण्योच काम केले आहे. स्त्रियांमध्ये निर्माण झालेली गुलामीची भावना दूर करण्याचा प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी केला ज्या देशामध्ये पन्नास टक्के स्त्रिया स्वतंत्र नाही तो देश अर्धा गुलाम असतो. कोणत्याही देशाचा विकास साध्य करावयाचा असेल तर स्त्रियांचा विकास होणे गरजेचे आहे. हे बाबासाहेबांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी भारतीय संविधान लिहितांना प्रथम स्त्री मुक्तीसाठी प्रयत्न केले. स्त्रीची प्रगती म्हणजेच समाजाची प्रगती असे बाबासाहेब म्हणतात. स्त्रियांच्या संघटनेवर त्यांचा फार मोठा विश्वास होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मंत्रीमंडळात मजूर मंत्री असतांना त्यांनी खाण कामगारांना प्रसुती लाभ कायदा 1941 मध्ये सुधारण घडवून समस्त स्त्री कामगारांना त्यांचा लाभ मिळवून दिला तसेच कोळसा खाणीत स्त्री–पुरुष कामगारांना समान मजुरी तत्वाला मान्यता देवून स्त्री–पुरूषांना समान देण्याची तरतूद करवून घेतली एवढ्यावरच बाबासाहेब थांबले नाही तर 1948 मध्ये समस्त स्त्री वर्गाच्या हक्कासाठी, उन्नतीसाठी, विकासासाठी अत्यंत परिश्रम पूर्वक हिंदू कोड बील संसदेत सादर केले व स्त्री वर्गाला एक सन्मानाचे जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त करून दिला व पुढे भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून तिचे स्थान अधिक बळकट करण्याच्या हेतूने मुलभुत हक्क व अधिकार तिला मिळवून दिलेत. कलम 14 नुसार स्त्रीला समान दर्जा प्राप्त करून दिला याचा परिणाम म्हणजे पुढे स्त्री वर्ग मोठ्या प्रमाणात पुरूषांबरोबर शिक्षण, नोकरी अधिकारी, मंत्री, राजकारण, न्यायधिश, कलेक्टर या सर्वच पदापर्यंत आज तिचा वावर होतांना दिसतो. तर कलम 16 नुसार समान संधी देवून कलम 23 ने तीला संरक्षण देण्यात आले. कलम 395 नुसार स्त्री कल्याणाच्या विविध योजना अंमलात आणून स्त्रीला सन्मानाने जगण्याच्या सर्व संधी संविधानाने उपलब्ध करून दिल्या.

भारतीय संविधान 26 नोव्हेंबर 1949 रोजी घटना समितीत मंजूर होवून 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय जनतेसाठी सर्वांगीण स्वातंत्र्याचा पुरस्कार करीत दुमदुमत सामोरे आले. या स्वातंत्र्याच्या मुळाशी समतेची आधारशीला बांधली गेली होती कारण व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करतांना न्यायाची जाणीव पार मरगळूनच गेलेली होती. प्राचीन स्मृती–कायदे परंपरेने आजही जनमानसिकतेमध्ये मजबूतपणे पाय रोवून बसलेले आहेत. धर्म, जात, वंश, लिंग,

जन्मस्थान इत्यादींद्वारे व्यक्तीचे केलेले मूल्यामापन जाचक, अन्यायकारक व भेदभावपूर्ण होते आणि त्यामुळे मुलभुत अधिकारांमध्ये 14, 15 कलमांद्वारे असे भेदभावपूर्ण वर्तन स्वतंत्र भारताच्या कोणत्याही व्यक्तीबाबत घडू नये याचा निकराने प्रयत्न केला. 26 नोव्हेंबर 1949 रोजी घटनेच्या संदर्भात बाबासाहेबांनी केलेले भाषण या दृष्टीने महत्वाचे ठरते. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर "संविधान चांगले व निर्दोष असले तरी त्याला अमलात आणणारे जर नालायक व निरूपयोगी असले तर तेच वाईट ठरेल. तसेच संविधान कितीही वाईट असले तरी त्याला राबविणारे जर चांगले असेल तर ते चांगले ठरेल." बाबासाहेबाच्या मनात मेहनतीने तयार केलेली ही राज्यघटना टिकेल काय याबद्दल सतत अस्वस्थता होती. लोकशाहीचा अर्थ सांगतांना बाबासाहेब म्हणतात स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तीन तत्वे वेगवेगळी नाहीत या तिघांचा मिळून एक संच आहे. त्यांना एकमेकांपासून अलग करण्याचा प्रयत्न केला तर लोकशाहीचा मूळ हेतूच नष्ट होवून जाईल स्वातंत्र्य समतेपासून वेगळे करता येणार नाही किंवा स्वातंत्र्य व समता यांची बंधुतेपासून ताटातूट करता येणार नाही. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे बहुसंख्याकांवर अल्पसंख्यकांचे प्रभुत्व होय.

संविधानात समतेच्या अधिकारामुळे स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले स्वातंत्र्याच्या कक्षा देखील वाढल्या. पारंपारिक समाज संस्कृतिने दिलेल्या व विषमतेवर आधारलेल्या नैतिक मूल्यांनी घडविलेली सामाजिक व कौटुंबिक चौकट स्त्रियांना बंदिस्त करण्यासाठीच निर्माण झाली होती. परंतु भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकारांचा निश्चितच स्त्री लोकसंख्येवर परंपरागत प्रतिमा बदलण्याइतपत परिणाम झालेला दिसून येतो. यासाठी अंमलबजावणीसाठी शासकीय माध्यमांपेक्षा अशासकीय स्वयंसेवी संस्थाचा रेटा अधिक प्रभावी ठरला 1975 हे वर्ष राष्ट्र कुटुंबाने महिला वर्ष ठरविले. महिला वर्षाची नांदी घोषित झाल्याबरोबर स्त्रियांमध्ये बरीच जागृती झाली. स्त्रियांच्या अनेक संघटना निघाल्या. स्त्री प्रबोधनाचे अनेक कार्यक्रम झाले. क्रियाशीलता स्त्रियांच्या विकासाच्या बाबतीत वाढली आणि परिणामी संपूर्ण देशात स्त्रियांच्या संघटनांचे आवाज अन्यायाविरुद्ध दुमदुमू लागले. रचनात्मक कार्यक्रमांमध्ये भर पडून स्त्रियांच्या सर्वांगीण जाणिवा समृद्ध झाल्या. महाविद्यालयीन उच्च शिक्षण घेवून गुणवत्तेमध्ये मुली मुलांच्या बरोबरच नव्हे तर मुलांना मागे देखील टाकू लागल्या. विकासाच्या समान संधी मिळाल्याबरोबर आपले सर्वांगीण प्राविण्य स्त्रियांनी दाखविले. परंपरागत कायद्यांनी दडपून ठेवलेली स्त्री संविधानाच्या कायद्यांनी बळकट होवून सक्षम झाली आणि स्वयं निर्णयाच्या क्षमतेने युक्त होवून सशक्तीकरणाच्या दिशेने वाटचाल करु लागल्याचे दृश्य भारतीय समाजात स्पष्टपणे आकाराला येत असल्याचे दिसून येत आहे. सशक्तीकरणाची महत्त्वाची विशेषता स्वावलंबनात आहे आणि त्यासाठी स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य आपल्याला विचारात घ्यावेच लागेल. कारण आर्थिक विषमता असलेल्या आपल्या भारतीय समाजात ज्या घटकाची आर्थिक बाजू कमकुवत त्याची सामाजिक प्रतिष्ठा कमकुवत असते. परंपरेने स्त्रियांना आर्थिक गुलाम केले. तिला कोणाच्या तरी आश्रयाने जगायला बाध्य केले होते. परंतु भारतीय संविधानोन दिलेल्या कायदेशीर अधिकाराने नोकरी व व्यवसायातून स्त्री संख्येची वाढ झालेली दिसते. उदा. शिक्षक, उच्चशिक्षण विद्यापीठ महाविद्यालय व तांत्रिक शिक्षण यातून आढळणारी आकडेवारी 1947–1772, 1957–4608, 1967–11262 व पुढे 1975 पासून ही संख्या देखील तिप्पट चौपटीने वाढलेली दिसते. संविधानाने स्त्रियांमध्ये आमुलाग्र बदल झाल्याचे चित्र पुढच्या कालखंडातून दिसायला लागले हे निश्चितपणे, परंतु हा बदल भौतिक वास्तवापुरता मर्यादित राहिलेला नाही. डॉक्टर्स, इंजिनिअर्स, पी.एचडी. प्राध्यापक व बुद्धिवादाचा उदघोष करणाऱ्या स्त्रिया देखील जेव्हा अंधश्रद्धेने गणपतीला दूध पाजताना दिसतात, तेव्हा खऱ्या खोटयाचा निर्णय करणारी शक्ती स्त्रियांमध्ये खरोखरीच निर्माण होऊ शकते काय हा प्रश्न पडतो. भारतीय संविधानाने स्त्रियांना समतेचा व स्वातंत्र्याचा अधिकार जरुर दिला. त्यामुळे तिच्या

विकासाची गतीही तेज झाली. परंतु हा विकास निर्णायक बुद्धीचा नव्हता, तर पोटापाण्याचा व चंगळ करणाऱ्या वृत्तीचा होता असे म्हणावेसे वाटते. स्वतंत्र नागरिक म्हणून ती आपल्या स्वातंत्र्याचा किती विचार करते? स्वातंत्र्याच्या अर्थ तो 'मनःपूत समाचरेत' असा घेताना दिसते. कोणतेही स्वातंत्र्य बंधनाच्या मर्यादांची लेणी लेवूनच अधिक भक्कम होते. एखाद्याचे स्वातंत्र्य दुसऱ्याचे पारतंत्र ठरु नये यासाठी कुटुंब, समाज, देश व जग याचे लिखित–अलिखित नियम असतात. दुसरे असे की, स्त्री स्वातंत्र्याचा विचार मानवी समतेतून केला पाहिजे. एक माणूस आपल्या अधिकाराच्या जोरावर दुसऱ्या माणसास डांबू शकत नाही. कुटुंब प्रमुख म्हणून एखादा पुरुष कुटुंबातील स्त्रियांना जाचक बंधनात ठेवू शकत नाही तसेच एखादी स्त्रीही कुटुंबातील पुरुषासाठी हुकुमशहा ठरु शकत नाही. समताधिष्ठित स्वातंत्र्याचा आवाका सर्वव्यापी आहे. त्याला संकोच केला जाऊ नये. स्त्रियांनी हे समजून घेतले पाहिजे. भारतीय संविधानाने दिलेले समता, स्वातंत्र्याचे मूलभूत अधिकार जाणिवेने समजून घेतले पाहिजेत. त्या स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार किंवा काहीबाही वागणे अथवा स्वार्थप्रेरित वृत्तीने प्रवृत्त होणे असा कधीही घेतला जाऊ नये.

आम्ही जर आम्हाला समानतेने वागवा अशी मागणी करतो तर आम्ही देखील दुसऱ्यांना समानतेने वागवण्याचे स्वीकारले पाहिजे. स्त्रिया पारंपारिक संस्कारांना जोजवताना धर्माचा, वंशाचा, जातीचा वारसा सांगतात आणि आधुनिक संस्कृतीतील माणूस–घाणपणा विभक्त परकेपणा किंवा घरातील व समाजातील माणसांचा दुरावा सोयीच्या दृष्टीने सहज अंगवळणी पाडताना दिसतात हे वाईट होय. ज्या संस्कृतीने आम्हाला दास्य दिले त्या संस्कृतीचे दुष्ट विषम संस्कार आम्ही का जपावेत? मागासवर्गीय पुरुष आणि सर्वसामान्य हिंदू स्त्रियांची जी नगण्य स्थिती होती तिचे उच्चाटनच संविधानाद्वारे केले गेले. परंतु संविधानाबरोबरच स्त्रियांची दुःस्थिती निवारण्यासाठी हिंदू कोड बिलाची निर्मिती केली.

बाबासाहेबांच्या या अनन्यसाधारण निर्मितीचे स्त्रियांसाठी जे मोल आहे हे हिंदू स्त्रियांनी आपल्या चामडयाचे जोडे करुन बाबासाहेबांना घातले तरीही ते ऋण न फिटण्यासारखे आहे. भारतीय संविधानानंतर म्हणजे भारतीय स्वातंत्र्योत्तर नजीकच्या काळात, हिंदू कोड बिलाची घडण झाल्यामुळे स्त्री मुक्तीच्या दृष्टीने याचे महत्व असाधारण आहे. परंतु या बिलाच्या निर्मात्याला हे पारित होताना किती कष्ट पडत होते हे प्रत्यक्ष बाबासाहेबांच्या शब्दातून वाचताना अंतरी भिडते. हे विधेयक पारित होण्यात वारंवार अडथळे आणले जात होते. त्यामुळे बाबासाहेब कमालीचे अस्वस्थ होत. विधी मंत्रीपदाचा राजीनामा दिल्यावर त्या राजीनाम्याची कारणावरील यादी प्रसिद्ध झाली. त्यानंतर हे सिद्ध होते "अंतिमतः ज्या बाबीने मला त्याग पत्र देण्याचा निश्चय करण्यास भाग पाडले तिच्याबद्दल....... हिंदू कोड बील आचके देत जगले, पंतप्रधानांनी एक नीवन प्रस्ताव मांडला. त्यावेळी त्यांचा ठराव असा की, संपूर्ण बिलालाच सोडून देण्यात यावे. म्हणजे लग्न आणि घटस्फोटाच्या विभागासह हे माझ्यासाठी वज्रघाताप्रमाणे होते. या बिलामुळे मला फारच मानसिक ताण सहन करावा लागला." बाबासाहेबांची मानसिक अवस्था किती तणावग्रस्त होती याचा प्रत्यय येतो. परंतु आज किती हिंदू स्त्रिया आहेत ज्यांना हे ठाऊक आहे की आमच्या सन्मानपूर्वक अस्तित्वासाठी आणि आमच्या सामाजिक व कौटुंबिक प्रतिष्ठेसाठी तसेच आमच्या मुक्तीसाठी या महामानवाने जीवाच्या जोखमीने प्रयत्नांची पराकाष्ठा केली? आधीच रोगजर्जर, शरीराला न झेपणारे शारीरिक परिश्रम सोसून, स्त्रियांसाठी मानसिक व बौद्धिक शक्ती पणाला लावून, जहाल निर्बंधाच्या कचाटयातून तत्काळ त्यांना मुक्ती मिळावी म्हणून अपार मेहनत केली. विषमतावादी हिंदुत्ववाद्यांचे प्रखर प्रहार झेलले. ज्यांच्याकरिता हे सर्व करायचे होते त्या स्त्रियांचा (अजाण) देखील विरोध पत्करला. परंतु हिंदूंच्या अन्यायी समाजव्यवस्थेविरुद्ध दंड थोपटले. परंतु स्वतःला पुरोगामी समजणाऱ्या काँग्रेस पक्षीय मंडळींनी देखील कोलाहल माजविण्यास प्रारंभ केला आणि पंडित नेहरुसारख्या आंग्लप्रदेश प्रशिक्षित

समतावादी मूल्य पद्धतीचा वारंवार घोष करणाऱ्या पंतप्रधानांनी देखील जेव्हा माघार घेतली तेव्हा मात्र बाबासाहेबांना नैराश्य आले. हिंदू कोड बील हे त्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे होते. कारण हिंदू कुटुंबाची समता व न्यायाच्या मूल्यावर पुनर्रचना होणे अतिशय महत्वाचे होते. ते म्हणता, ''हिंदू कोड बिलासाठी मंत्रिमंडळात राहणे मला आवश्यक होते. वर्गावर्गात चालणाऱ्या असतानतेला आणि स्त्री–पुरुषामधील असमानतेला जो हिंदू समाजाचा प्राण आहे, हात न लावता आर्थिक प्रश्न सोडविण्याच्या नावावर कायदे घडवीत बसणे हे आपल्या संविधानाचा खेळखंडोबा आहे आणि त्याला शेणाच्या ढिगाऱ्यावर महाल उभारण्याचा प्रयत्न असेच म्हणावे लागेल. मी हिंदू कोड बिलाला इतके महत्वाचे मानत आलो की, माझे मतभेद असूनही या बिलाच्या हितासाठी मी मंत्रीमंडळातच राहिलो.''

भारतीय संविधानात मूलभूत अधिकारात जे समतेचे तत्त्व अंगीकारले होते. ज्यामुळे स्त्रियांना समानतेचा कायदेशीर अधिकार दिलेला होता, त्या तत्त्वाशी सुसंगत असेच हिंदु कोड बील होते. कारण स्त्री पुरूष समानतेचा विचार मानवी समतेच्या तत्त्वावर करताना कुटुंबात पुरूषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांची होणारी गळचेपी बाबासाहेबांना प्रत्यही दिसत होती. जी मुस्कटदाबी दलितांची, सवर्ण समाज वंश व जातीच्या आधारावर करत होता त्याचे दुःख बाबासाहेब स्वतःह पीडित, शोषित समाजातले असल्यामुळे अनुभवतच होते. त्यामुळे पीडेच्या सहवेदनेने त्यांनी स्त्रियांचे दुःख जाणले आणि हिंदू स्त्रीला पीडामुक्त करून न्याय हक्क मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाची निर्मिती केली. परंतु हे बील हिंदूत्ववाद्यांच्या पक्षातील विरोधी भूमिकेमुळे रेंगाळत गेले आणि नंतर खंडाखंडाने पारित झाले. बाबासाहेबांनी ते एकत्र एका दमात पारित व्हावे यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली. परंतु पं. नेहरूंच्या ऐनवेळी पडखाऊ धोरणामुळे त्यांना माघार घ्यावी लागली. बॅ. सुनीती पुंगलिया म्हणतात, ''डॉ. आंबेडकरांनी तर हिंदू कोड बिलाचा आग्रहच धरला, दलित समाजाचा हा नेता हिंदू स्त्रियांच्या हक्कांसाठी निर्धाराने उभा राहिला. हिंदू स्त्रियांच्या कौटुंबिक जीवनातील दर्जा उंचावणारे हे चार कायदे (जे 55–56 मध्ये पारित झाले)

1. हिंदू विवाह कायदा 1955,
2. हिंदू वारसा हक्क कायदा1956
3. हिंदू अज्ञान व पालकत्वाचा कायदा, 1956
4. हिंदू दत्तक आणि पोटगी कायदा.

या चार कायद्यांनी परंपरागत रुढी–धर्माच्या बेडयांनी जखडलेली हिंदू स्त्री मुक्त झाली. स्वातंत्र्याला निरनिराळे घुमारे फुटले ते नवीन कायद्याचे अधिकार मिळाल्यामुळे. हजारो वर्शाच्या पारतंत्र्यातून (कौटुंबिक–भावनिक) ती मुक्तीकउे जात होती. सामाजिक रुढींच्या श्रृंखला धार्मिक नियमबंधनांच्या खिळयांनी अधिकच मजबूत करुन ठेवलेल्या होत्या. त्यांना खिळखिळे करणे देखील समाजसुधारकांना महत्प्रयासाचे कार्य ठरलेले होते. त्यासाठी फक्त कायदाच ठोस घण होता. सगळयाच गोष्टी केवळ कायदा करुन चालत नाहीत असे म्हणणाऱ्यांना कायद्याचा बडगा काय करु शकतो याचे प्रात्यक्षिक दाखविण्याची देखील प्रसंगी गरज पडते. सध्याच्या स्त्रियांच्या बाबतीत 498 अ कलमी कायदा हा अतिशय प्रभावी ठरलेला असूनही पुरुष अंमलबजावणीकर्ते असताना हे कलम लावताना अतिशय त्रास होतो. किंवा अस्पृश्यांसाठी अत्याचाराचा कायदा हा देखील तशाच प्रकारचा म्हणता येईल.

या चार कायद्यांव्यतिरिक्त स्त्रियांच्या हिताच्या दृष्टीने व त्यांना स्वतंत्र होण्याच्या दृष्टीने काही कायद्यांचा उल्लेख करणे जरुरीचे ठरते. कारण देश स्वातंत्र्यानंतरच खऱ्या अर्थाने स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्यात आला आणि अनेकविध कार्यक्रमाद्वारे व कृतीशीलतेतून स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीला गतिमानता आली. अशा महत्वाच्या कायद्यांपैकी गर्भपाताचा कायदा एक होय. याचे कारण पारंपारिक समजुतींना जोरदार धक्का देण्याचे काम या

कायद्यांमुळे झाले. ज्या मातृत्वाच्या हव्यासापायी ती शोषणाची बळी ठरते ते मातृत्वच तिला तिच्या इच्छेनुसार नाकारता येऊ शकते. प्रजननार्थ महगभागः पूजार्हा गृहदीप्तयः। स्त्रियः श्रियश्छगेहेपु ग विशेषोस्ति कदाचन।। (संतती उत्पन्न करणाऱ्या स्त्रिया भाग्यशाली, पूजनीय आणि घरातील प्रदीपाप्रमाणे आहेत. स्त्री आणि लक्ष्मी यात काहीही फरक नाही) हा गर्भपाताचा कायदा 1 एप्रिल 1972 पासून लागू झाला. यापूर्वी गर्भपात पाप आणि गुन्हा मानला जात होता आणि त्यासाठी कारावासाची शिक्षा होती. परंतु कायद्याने पूर्वीचे सर्व नियम व समज धाब्यावर बसविले, व स्त्रिया आपल्या शरीराच्या व आपल्या मनाच्या पूर्ण मालकिणी बनल्या. नको असलेले मातृत्व देखील मनाविरुद्ध स्वीकारुन जोपासत ठेवणे त्यांनी नाकारले. कुटुंबनियोजनाच्या बाबतीत लोकसंख्या नियंत्रणाच्या दृष्टीने प्रस्तुत कायदा शासनाला उपकारक ठरला. पण स्त्रिया मात्र या कायद्यामुळे अधिक स्वतंत्र झाल्या. कारण शास्त्रप्रतिपादित संतानोत्पत्तीचा दबाव कमी झाला आणि त्या मानसिक दडपणातून शिथिल झाल्या. हे शिथिल होणे गरजेचे होते. कारण पावलोपावली येणारा ताण स्त्रीच्या शरीराला व मनाला देखील सोसवणारा नसतो. संतती उत्पादन करणारे यंत्र म्हणून पिढयान्पिढया शेकडो वर्षापासून असलेली तिची प्रतिमा या कायद्याच्या द्वारे तिला नष्ट करता आली हे काय कमी झाले!

भारतीय संविधानातून सुचविल्या गेलेल्या अनेक तरतुदीनुसार स्त्रियांच्या शोषणमुक्तीचे व विकासाचे अनेक कायदे करण्यात येतात. त्यांच्या अंमलबजावणीसाठी भारतीय अशासकीय स्त्री संघटना अतिशय जागरुक आहेत. स्त्री स्वातंत्र्याच्या हक्कासाठी सजग असलेल्या स्त्रियांही आपल्या मानवी हक्क संघर्षासाठी युगुत्सु प्रवृत्तीच्या बनलेल्या आहेत. एवंच भारतीय स्वातंत्र्यानंतर बाबासाहेबांनी केलेल्या भारतीय संविधानाने व संविधानाच्या समता, स्वातंत्र्य व न्याय या मूल्यांना धरुन तयार केलेल्या हिंदू कोड बिलाने स्त्रियांमध्ये आपल्या अस्तित्वाच्या समानतेच्या व स्वातंत्र्याच्या हक्कासाठी आणि न्यायासाठी विचार करण्याचे सामर्थ्य निर्माण केले व त्यांना कार्यप्रवृत्त केले. सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाच्या दिशेने ही कृती अतिशय महत्वाची होय.

**संदर्भ ग्रंथ**

1. भारताचे संविधान, भारत सरकार
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड–6, संपा. मा.फ.गांजरे
3. स्त्री आणि कायदा, सुनीती पुंगलिया
4. स्त्रीचे समाजजीवनातील स्थान आणि भूमिका, अनुसुया लिमये
5. स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री, डॉ.चंद्रकला हाटे

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-IV
October - December - 2019
Part - III

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com



ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - IV October - December - 2019

PART - III

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

# CONTENTS OF PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | वैदर्भीय संत आणि त्यांचे साहित्य<br>**डॉ. सौ. शुभांगी परांजपे** | १-५ |
| २ | टोला : कादंबरी की आत्मकथन ?<br>**प्रा. डॉ. अरूण व्ही. लाडे** | ६-९ |
| ३ | वैदर्भीय दलित काव्याचे अग्निप्रलयी उन्मेष<br>**डॉ. राष्ट्रपाल मेश्राम** | १०-१८ |
| ४ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यातील मनोविश्लेषकता<br>**डॉ. मनीषा नागपुरे** | १९-२२ |
| ५ | विदर्भातील राष्ट्रसंत व तुकडोजी महाराज, ग्रामदैवत संत गाडगेबाबा व सत्यपाल महाराजांचे समाजसुधारणेचे विचार<br>**प्रा. अंजली एस. वारकड** | २३-२५ |
| ६ | आदिवासी लोकसाहित्य आणि पर्यावरण : एक अवलोकन<br>**डॉ. माया वानखडे** | २६-३१ |
| ७ | पूर्व विदर्भातील दंडार लोकनाट्य<br>**डॉ. शरद जे. मेश्राम** | ३२-४० |
| ८ | वैदर्भीय मराठी आत्मकथनात्मक कादंबरी 'होरपळ' : एक लक्षवेध<br>**राजेंद्र विश्वनाथ कुळमेथे** | ४१-४५ |
| ९ | विदर्भातील आदिवासी साहित्य : समाज, संस्कृती आणि जीवन दर्शन<br>**प्रा. विठ्ठल शामराव आत्राम** | ४६-५५ |
| १० | वऱ्हाडी बोलीतील म्हणींची अर्थवत्ता<br>**प्रा. अमृता डोरलीकर** | ५६-६४ |
| ११ | वैदर्भीय काव्यप्रवाहातील कवी लोकनाथ यशवंत यांचे निराळेपण<br>**कु. शितल वासुदेव निमगडे** | ६५-६८ |
| १२ | वैदर्भीय कवी रंगनाथजी रायपूरे यांच्या 'वादळवाट' या कविता संग्रहाचे मूल्यमापन<br>**प्रा. एन. एस. चापले** | ६९-७३ |
| १३ | मुकुंदराजाची महत्ती<br>**डॉ. सोपानदेव पिसे** | ७४-७७ |
| १४ | प्रा. शंकर सखाराम यांच्या 'भूक' कादंबरीचे मूल्यमापन<br>**कु. प्रणिता कचरुजी गेडाम** | ७८-८१ |

# ४. आशा बगे यांच्या कादंबऱ्यातील मनोविश्लेषकता

**डॉ. मनीषा नागपुरे**
म.वा.पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय, नागपूर.

कादंबरी हा वाड्.मयप्रकारच विशाल आणि सखोल जीवनपटाची मागणी करणारा आहे. पात्रे कमी की जास्त यापेक्षा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन किती जटिल—व्यामिश्र स्वरुपाचा आहे हे तिथे महत्वाचे ठरते ते अनुभवाचे फक्त यथातथ्य रुप नसते, त्या अनुभवरुपाला अनेक परिमाणे असू शकतात. महाकाव्यासारखा विस्तीर्ण आणि मनोगाहनाच्या दृष्टीने सूक्ष्म होत जाणारा हा वाड्.मयप्रकार निसर्ग, काळ, समाज आणि संस्कृती अशा कोनामधून व्यक्ती आणि व्यक्तीपल्याडचे जग न्याहाळीत असतो. त्यामुळे बहुविधतेकडे जाण्याची मुभा कादंबरीकाराला अनेकदा मिळत असते. व्यक्तिगत जीवनाशी न बांधल्या गेलेल्या कोणत्याही वास्तवाचे कोणतेही रुप चितारण्याचे सामर्थ्य त्या वाड्.मयप्रकारात उपजतच असते. उषा हस्तक म्हणतात त्याप्रमाणे, ''महायुद्धासारख्या व्यापक ऐतिहासिक घटनेपासून तो व्यक्ती—व्यक्तीमधील नाजूक भावसंबंधाचा अंतर्भाव करणारे कोणतेही अनुभवविश्व कादंबरीच्या पटावर चित्रित करता येते''[१] कादंबरीत अनुभवक्षेत्राची निवड विविध तऱ्हेने करता येते. तिचे तंत्र ही भिन्नभिन्न असू शकते. या पार्श्वभूमीवर आशा बगे यांच्या कादंबरीचा अभ्यास केला तर त्यांच्या कादंबरीविश्वात कादंबरीच्या निमित्ताने संगीत, साहित्य, अभिनय यांचे आकर्षण तर दिसतेच पण त्याचबरोबर चिंतनशीलता आणि आत्मशोध घेणारी प्रश्नात्मकता यातून एक अद्‌भूत रसायन सिद्ध झालेले दिसते. त्यांच्या कादंबरीलेखनातील प्रेरणांचा शोध घेतला तर जीवनजाणिवांच्या नव्या आकलनाच्या दृष्टिने त्यांच्या पात्रांना आत्मशोधाचा ध्यास जडलेला दिसतो. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांची सरंचना बांधीव नाही. त्यातील माणसाचा शोध, मनाचा शोध जीवनाच्या आणि अनुभवाच्या बहुपेडीपणातूनच साकारलेला आहे.

मन ही मानवी आयुष्यातील गूढ अशी बाब आहे. मनाचा वेध घेणे बऱ्याच जणांना जमत नाही पण आशा बगे यांनी आपल्या कादंबऱ्यातून स्त्रियांच्या मनातील मानसिक कल्लोळांचे आंतरिक वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यामधल्या कादंबरीलेखिकेला साहित्य अकादमीनेही पुरस्कृत करुन दाद दिलेली आहे. १९७८ साली 'मनस्विनी' ही त्यांची पहिली कादंबरी त्यानंतरच्या तीन दशकात पुढच्या कादंबऱ्या पुस्तकरुपाने वाचकांपुढे आल्या. झुंबर (१९८४), त्रिदल (१९९४), धर्मक्षेत्रे—कुरुक्षेत्रे (१९९६), सेतू (२०००), भुमी—२००४ आणि 'भूमिका व उत्सव' (२०११) तर मुद्रा ही आगामी कादंबरी

विविध मानवी नात्यांचा शोध घेणे, त्यातील गुंतागुंत मांडणे, त्या गुंतागुंतीतून कादंबरीतील व्यक्तिरेखांमध्ये टोकाचे बदल घडणे याचे अचूक चित्रण करणे हे आशा बगे यांच्या सर्वच कादंबऱ्याचे प्रधान व प्रमुख असे वैशिष्टय आहे. या मानवी संबंधांना महत्व देवून बगे या नात्यांचा असा काही गोफ विणतात की या संबंधावरच जणुकाही जगण्याचे सार्थक अवलंबून आहे असे वाचकाला वाटते.

'मनस्विनी' ही त्यांची पहिली कादंबरी प्रेमाचा त्रिकोण साकार करणारी असली तरी वेगळया वाटेवरची आहे. लेखिकांना आवडणाऱ्या अनेक संकेतांना ही कादंबरी स्वीकारते. त्यांच्या या कादंबरीत कलावंतप्रवृत्तीची संगीतलुब्ध नायिका आणि कादंबरीतील वातावरणनिर्मिती यांचे वेगळे नाते आहे ही नायिका संगीतनिष्ठ प्रतिमांच्या आधाराने आपले मन व्यक्त करते. आणि तिच्या भोवतालच्या जगाला सामोरे जाण्याकरीता सतत संगीताचा आधार घेत राहाते. कादंबरीतील नायिका सौदामिनीला कलात्मक संगीतमय संवाद हवा आहे. तिच्या आत्म्याशी नाते सांगणारा तोच संवाद तिच्या आयुष्यात मिळत नाही म्हणून ती आपल्या मनातील विचार चिंतनातून व्यक्त करते. सौदामिनीला संगीताची आवड आहे. तिच्या पतीला संगीत माहित नाही. त्यातून तिची गाठ संगीतवेडया यशोधनशी पडते तेव्हा तो संवाद तिला हलवून जातो यशोधनाच्या सहवासात एकमेकांच्या मनातील भावना, विचार एकमेकांना न सांगता कळतात. तेव्हा सौदामिनीच्या चिंतनातून मनोविश्लेषकता जाणवते. ''असल काही समजून घेण्याचीही अमरची ताकद नाही. यश आपल्या जातीचा आहे. पण आपल्याला अमर वाटयाला यावेत आणि यशला त्याच्या पांगळया मुलीत बुडालेली त्याची पत्नी, भाईसारख्या कलाकाराला दमयंती! असं का व्हावं? आपल्याच जातीची संवादाची माणसं आपल्याला का भेटत नाही? कां?''२ नायिकेने आपल्या अंतर्मनातील भावना सांगीतिक भाषेतच व्यक्त केलेल्या आहेत. प्रत्येक स्त्रीला आपल्या मनासारख्या जोडीदार मिळावा अशी इच्छा असते. पण तिच्या मनासारख तिच्या आयुष्यात घडत नाही. तिचे अनावरपण तिला प्रश्नांच्या आवर्तात झोकुन देते आत्मशोध घ्यायला प्रवृत्त करते.

''मनाच्या गुंतण्याचे काहीच माप नाही. कुठलेच गणीत नाही'' अशा अवस्थेत यशोधन समोर ती उमलत राहते. कादंबरी छोटया छोटया प्रसंगामधून सौदामिनी आंतरिक वास्तव आणि तिच्यातील व यशोधनमधील अलवार नाते पिंजत राहते. नायिकेच्या मनातील विचार चिंतनातून व्यक्त होत राहते. अमरजवळ आपण फक्त शरीरानेच गेलो. मनाने कधी त्याच्यापर्यंत पोहोचताच आलं नाही. आपल्या मनातील भावना न सांगताही यशोधनला कळतात संगीतमय संवाद साधणारा यशोधन मिळाल्यानंतर नायिका कल्पनेच्या राज्यात रममाण होते व सगळं चिंतनातून व्यक्त करते.

''मग सारं सरळ आखलेल्या रस्त्यानं का गेलं नाही? नको असलेल्या वळणाचा रस्ता का लागला? का भेटला यशोधन? आणि भेटायचाच होता तर थोडा आधी का नाही? कदाचित हाच यशोधन आधी भेटता तर .... मी आजचा म्हणून त्याला ॲक्सेप्ट केला असता का?[३]

आशा बगे यांची 'झुंबर' ही दुसरी कादंबरीही तशी रुढ अर्थाने प्रेमाच्या त्रिकोणाचीच. पण इथे प्रत्येक कोण एकेकटा नाही तो सापेक्ष आहे त्याचे अस्तित्व इतर दोन कोनांच्या संदर्भातच मोलाचे आहे. वसुमती नावाच्या वैद्यकीय क्षेत्रातील स्त्रीच्या मनाची घालमेल यात आलेली आहे. ऋषिकेश नावाच्या वेद्यकीय तज्ञांशी म्हणजे तिच्या गुरुशीच तिचे लग्न होते. मनाने निवडलेल्या प्रियकरांबरोबर जीवनाची सुरुवात केल्यानंतर संसाराची झालेली वाताहत, तिच्या मनाच्या झालेल्या चिंधडया सगळं अंतर्मुख करणार आहे. डॉ. ऋषिकेश अधिकारींच्या संदर्भात नायिका विचार करते आपल्याला त्यांच्या जगात पत्नी म्हणून, एक मैत्रीण म्हणून कधी पोहोचताच आलं नाही. मग कुठल नातं असावं आपलं अधिकारीशी?'' अशा अनेक प्रसंगामध्ये

नायिकेचे मन गुरफटले आहे. तिच्या मनात वेगवेगळे प्रश्न निर्माण झाले आहेत. "स्त्रीच्या एकांतातले ऋषिकेशचे स्पर्श कुठल्या नात्याने होतात.... फक्त पती म्हणून? की एक अटळ शारीरिक गरज म्हणून?५ अधिकारींच्या जगात आपण फक्त शरीरानेच गेलोत का? मनाने आपल्याला कधी पोहोचताच आलं नाहीं का? मग आपलं या माणसाशी कोणत नातं असावं? गुरु–शिष्याचं की पती–पत्नीच? याचा उलगडला वसुमतीला होत नाही. याच्यातुन तिच्या अस्तित्वासंबंधात स्वतःच्या मनाला प्रश्न विचारत राहते. येथे तिच्या मनातील विचार मनोविश्लेषकतेच्या दृष्टीने अभिव्यक्त होतात.

'त्रिदल' मधुन लहाणपणीच आईचं छत्र हरपल्यानंतर बालमनाला होणाऱ्या यातना शारदेच्या व्यक्तिरेखेतून व्यक्त होतात. नागपूरला शिक्षण घेत असतांना शारदा समूहापासून नेहमी दूर राहते. तिला सतत वाटत असते आपण यांच्या गोतावळयात मिसळू शकत नाही. स्वतःचे एक स्वतंत्र विश्वच ती तयार करते. आपला आत्मशोध घेत राहते. आपल्या मनातल आंतरिक शल्य आपली मैत्रीण मंजुजवळ बोलताना नायिका शारदा म्हणते– "मंजू मला माझं नि श्रीचं घर हवं होतं पण माझ्या मनासारखं मला ते कधी उभं करताच आलं नाही गं। म्हणजे ते घर कसं हवं आहे, हेच मुळी नजरेसमोर कधी स्पष्ट येत नव्हत आणि आता...आता मला माझं आमचं घर अगदी स्पष्ट दिसतं आहे.... माझ्या पुढच्या घराला कुठलाही आकार नाही. भिंतीच नाहीत. चौकटी नाहीत. तर ते माझं–आमचं घर आहे. घराचे कुठलेही संदर्भ नसलेलें घर" ६ शारदा आपल्या मनातील विचार खऱ्या अर्थाने चिंतनातून व्यक्त करतांना दिसते. जीवनात तिच्या मनासारख घडत नाही. म्हणून तिच्या विचारातून मनोविश्लेषकता जाणवते.

'सेतू' कादंबरीतून गंगेच्या तिरावर असलेल्या गावातील ब्रिजमोहनची जीवनकहाणी आलेली आहे. उच्चविद्याविभुषित होवून सुचारिता या आपल्या पत्नीबरोबर तो अमेरीकेला जातो पण गंगेला मात्र विसरुशकत नाही या कादंबरीतील गंगा ही नदी न राहता एक व्यक्तिस्वरुप घेवून आलेली आहे. सूचीता, नीरजा, अर्पिता भाभी आपल्या भावना विचारांतून चिंतनातून व्यक्त करतांना दिसतात. 'भूमी' या कादंबरीत एका अनाथ मुलीच्या जीवनाचा आलेख चित्रीत झाला आहे. कोवळया मनावर झालेले संस्कार तिला प्रगल्भ बनवत जातात. मैथीलीच्या मनोविश्वात छोटसं 'कडलूंर' गाव तेथील समुद्र किंनारा, नारळाची झाडं, होड्या यांच्याशी तिची मैत्री झाली होती. तिच्या बालमनावर सगळया गोष्टींचा परिणाम होतो. आपले निसर्गरम्य गाव सोडून आत्यांकडे आल्यावर सगळे तिच्या मानसपटलावर तरळू लागतं. जीवनात अनेक प्रसंगांना मैथिली समर्थपणे तोंड देते. शंतनूशी लग्न ही तिच्या आयुष्यातील तडजोड असते. मैथीलीच्या चिंतनातून अंर्तमनातल्या भावनांचा अविष्कार होतांना दिसतो.

आशा बगे यांच्या जवळजवळ सर्वच कादंबऱ्यातून आलेल्या व्यक्तिरेखांच्या अंर्तमनातल्या भावनांचा अविष्कार मनोविश्लेषणात्मक पद्धतीने केलेला आहे. आशा बगे यांच्या कादंबरीसंदर्भात प्रभा गणोरकर म्हणतात– "नात्यांचे धागे एकमेकांत विणले जातात ही नाती आणि त्यांचे आणि एकमेकांत गुंतलेले धागे हा आशा बग यांच्या जिव्हाळयाचा आणि आस्थेचा भाग आहे. व्यक्ती या नातयांसह जगत असते. ती नाती कधी तिला नको ही असतात, त्यांचे धागे परस्परांना खेचतात, आवळतात, त्यांच्यातून सुटावेसेही वाटते. ही नाती

अवघड, गुंतागुंतीची असू शकतात ती व्यक्तीला धीर, आधार देतात किंवा त्यांच्यातले पीळ ताण, व्यक्तीला त्रस्त करतात. मानवी नात्यातले हे पीळ गुंतागुंत किंवा ती असण्यातली निभावण्यातली सार्थकता आशा बगे अतीशय बारकाईने रंगविली आहे''[७]

आशा बगे यांच्या सर्वच कादंबऱ्या आधुनिक किंवा अतिआधुनिकतेचा हव्यास न करता निखर माणूसकीचे दर्शन घडवितात. माणूस कधी आकलनीय असतो तर क्षणात अनाकलनीय होतो हे मानसिक रचनेचे वास्तव त्या फार हळूवारपणे सांगतात केवळ स्त्रीवादी भूमिका धारण न करता आधुनिक आणि परंपरागत जीवनधारेत वाढलेल्या स्त्रीला मुळापासुन समजून घेण्याचा तिच्या मनाला सर्वांगाने न्याहाळण्याचा प्रयत्न कलावंत या नात्याने अशा बगे करतात. त्यांनी आपल्या कादंबरीला आपण विस्तृत कॅनव्हासवर न्याहळू बघतो असे म्हटलेले आहे. आत्मप्रतिमांचा शोध घेत त्यांना विस्तारित रुपात मांडत राहणाऱ्या त्यांच्या कादंबऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वैशिष्टयपूर्ण अविष्कार करतात.

संदर्भग्रंथ

१. हरलक उषा – 'कादंबरी' साहित्य : अध्यापण आणि प्रकार संपादक–श्री. पु. भागवत सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर मौज प्रकाशन मुंबई १९८५ पृ. २६४

२. बगे अशा – 'मनस्विनी' कादंबरी मेनका प्रकाशन पुणे १९७८, पृ. १५२

३. तत्रैव – पृ. १५४

४. सावेदकर आशा – काही शोधनिबंध 'आशा बगे यांचे कादंबरीविश्व', पृ. ११४

५. बगे आशा – 'झुंबर' 'कादंबरी– मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई पहिली आवृत्ती १९८४ पृ. ५५

६. बगे आशा – 'त्रिदल' कादंबरी मौन प्रकाशन मुंबई पहिली आवृत्ती १९८४ पृ. १२६–१२७

७. ढेरे अरुणा – स्त्रीलिखित मराठी कादंबरी (१९५० ते २०१०) लेख–प्रभा गणोरकर, पद्मगंधा प्रकाशन २०१३

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका
# (MPSP)

Peer Reviewed Annual National Research Journal as per UGC Guidelines
VOL 5 ISSUE 2 January 2020
वर्ष पाचवे, अंक दुसरा, जानेवारी २०२०
URL:
www.indiramahavidyalaya.com/IssuesFolder.php?q=MPSP%202020%20Vol.%205%20Issue%202

**मुख्य संपादक**
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद तसेच प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब
**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Chairman, DBM Research Centre
President, Sant Gadge Baba Amravati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad, Amravati
Address: Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: marathipradhyapak@gmail.com Mobile No: +91-9422867658

**सहसंपादक व प्रकाशक**
डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
**Associate Editor & Publisher**
**Dr. Mrs. Veera Mandavkar**
Director, DBM Research Centre
Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: veeramandavkar18@gmail.com Mobile No: +91-9403014885

## संपादक मंडळ Editorial Board

**डॉ. राजू आदे, प्रा. रेखा वाठ, डॉ. गणपत उरकुंदे, प्रा. नीलकंठ नरुले, प्रा. सरोज लखदिवे**

1. **Dr. R.T. Ade,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rajuade2512@gmail.com Mobile No.: 9422608715
2. **Prof. R.M. Wath,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rekhawath23@gmail.com Mobile No.: 9422153353
3. **Dr. G.P. Urkunde,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: urkundeganpat@gmail.com Mobile No.: 9765034097
4. **Prof. N.V. Narule,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: narulenilkantha3@gmail.com Mobile No.: 9923909296
5. **Prof. S.Y. Lakhadive,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: saroj20lakhadive@gmail.com Mobile No.: 9420199479

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | संपादकीय | डॉ. पवन मांडवकर | 4 |
| 1 | बबन सराडकर यांची गझल | प्रा. ममता राऊत | 5-10 |
| 2 | वसंत पुरुषोत्तम काळे आणि त्यांचे लोकप्रिय साहित्य | सौ दिप्ती अतुल सातपुते | 11-14 |
| 3 | पेटलेला गणा कथेमधील नापास गणाचे चित्रण | डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | 15-18 |
| 4 | अनिल बर्वे यांची नाट्यसंहिता-विषय वेगळेपण | डॉ. दीपाली गावंडे | 19-21 |
| 5 | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री व्यथा | डॉ. प्रेमा लेकुरवाळे (चोपडे) | 22-24 |
| 6 | मूल्यांची पेरणी करणारी कविता - 'तुर्तास एवढेच....' | प्रा.डॉ. राजकुमार किशनराव यल्लावाड | 25-27 |
| 7 | मध्ययुगीन कालखंडातील विद्रोहाचे स्वरूप | डॉ. भूमिका वानखडे | 28-31 |
| 8 | बालकवींच्या काव्यातील स्त्रीरूपे | प्रा.डॉ. राकेश कभे | 32-35 |
| 9 | म्हणी : लोकसाहित्यातील अंत:प्रवाह | प्रा.डॉ. श्याम मु. जाधव | 36-38 |
| 10 | रावजी राठोड यांच्या 'मुक्तिनामा' मधील विचारदर्शन | डॉ. भास्कर पाटील | 39-42 |
| 11 | श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या ललित निबंधातील निसर्गचिंतन | प्रा.डॉ. राजाभाऊ भाऊसाहेब धांयगुडे | 43-44 |
| 12 | दलित कवितेतील पहिला स्फोटक विद्रोही कवी नामदेव ढसाळ | प्रा.डॉ. गजानन रा. लोहवे | 45-48 |
| 13 | बलुतेदारी व्यवस्थेची रचना - एक अध्ययन | प्रा.डॉ. अपर्णा पाटील | 49-51 |
| 14 | संत तुकारामांच्या अभंगातील लोकजीवन व लोकसंस्कृती | प्रा.डॉ. अनिल गर्जे | 52-54 |
| 15 | ग्रामीण जीवनातील वास्तवदर्शी अनुभवाची शब्दरूपी कलाकृती 'फेसाटी' कादंबरी | डॉ. जयदेवी पवार | 55-57 |
| 16 | 'सावित्री' नाटकातील स्त्री व्यक्तिरेखांचा अभ्यास | डॉ. सुलभा खर्चे | 58-61 |
| 17 | अण्णाभाऊ साठेंच्या कादंबरीतील नायक-नायिकांची नैतिकता - एक चिकित्सा | प्रा.डॉ. शोभा रोकडे | 62-65 |
| 18 | मराठी लेखिकांच्या ग्रामीण कथा साहित्यातील स्त्रीजाणिवा | डॉ. मनीषा नागपुरे | 66-68 |
| 19 | मराठी दलित कथेचे तीन महामेरू | डॉ. कैलास सुदामराव वानखडे | 69-72 |
| 20 | दलितांच्या अंतर्मनाचा वेध घेणारे विद्रोही कवी नामदेव ढसाळ | डॉ. अत्तार अमजद हारूण | 73-76 |
| 21 | बहिणाबाईंच्या गुरुपरंपरेतील तीन 'चैतन्य' | डॉ.सौ. वीरा मांडवकर | 77-81 |
| 22 | साठपूर्व व साठोत्तर प्रथम दशकातील कादंबरीची निवडक वैशिष्ट्ये | डॉ. पवन मांडवकर | 82-86 |
| 23 | स्त्रीवादी साहित्य आणि आंबेडकरी चळवळीतील स्त्री - वास्तववादी तुलना | प्रा.डॉ. अनिता अर्जुन कांबळे | 87-90 |

# मराठी लेखिकांच्या ग्रामीण कथा साहित्यातील स्त्रीजाणिवा

डॉ. मनीषा नागपुरे
सहयोगी प्राध्यापक
डॉ.म.वा.पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय, नागपूर, महाराष्ट्र (India)
प्रमणध्वनी : ९८२३१५३००२

## प्रास्ताविक –

मराठी साहित्यामध्ये १९६० नंतर वेगवेगळे वाङ्मय प्रवाह उदयास आले. त्यात प्रामुख्याने दलित साहित्य, ग्रामीण साहित्य स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य, आदीवासी साहित्याचा समावेश होतो. त्यातील ग्रामीण साहित्य प्रवाह हा एका वेगळ्या मार्गाने वाटचाल करणारा आहे. भारत हा शेतीप्रधान देश असल्यामुळे शेतीवर उपजिवीका भागवणारे शेतकरी आणि शेतमजूर यांची संख्या जास्त आहे. त्यामुळे हा वाङ्मय प्रकार देखील इतर वाङ्मय प्रकारापेक्षा मोठा म्हटले तरी काही चुकीचे ठरणार नाही या साहित्य प्रकारातील जीवन हे वास्तव जीवन आहे. जे जगले, अनुभवले, भोगले तेच ग्रामीण साहित्यकांनी ग्रामीण साहित्यातुन शब्दबद्ध केलेले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील गांधीवाद, मार्क्सवाद आणि समाजवाद यांच्या विचारणीच्या प्रभावातून ग्रामीण कथालेखन झाले असले तरी शेतीसंस्कृती व ग्रामसंस्कृतीशी सूतराम संबंध नसलेल्या उच्चवर्णीय मंडळींनी ग्रामीण कथालेखन केलेले आहे. परंतु खेडयात जन्मलेली व वाढलेली बहुजन शेतकरी समाजातील सुशिक्षित तरुण पिढी १९६० नंतर आपले ग्रामीण जीवनानुभव व्यक्त करु लागली यात ग्रामीण कथाकारांची संख्या लक्षणीय असून कथालेखिकांनीही आपला सहभाग नोंदविला आहे. मराठी लेखिकांनी आपल्या ग्रामीण कथांतून स्त्रीकेंद्रित अनुभव अधिक व्यक्त केले आहे.

ग्रामीण स्त्री ही कनिष्ठ स्तरातील कष्टकरी स्त्री आहे. ती कुटुंबाबाहेर पतीबरोबर राबत असूनही पराधीन आहे. कुटुंब आणि समाज तिच्याकडे अजूनही पारंपारिक दृष्टिकोनातून पाहतात. त्यामूळे तिच्या वाटयाला दुःख आणि वेदना झालेल्या दिसतात. सरोजिनी बाबर यांच्या बव्हंशी कथांतून स्त्री निवेदिका कथानिरुपण करते. त्या निवेदिकेच्या कुटुंबातील, समाजातील, नात्यातील आणि संबंधित स्त्रियांची कर्मकहाणी ती सांगते. त्यांच्या कथांना लोककथेची लय साधली गेल्याने लोकसाहित्यातील स्त्रीचे आधुनिक रुप त्यातून प्रकट होतांना दिसते. चांगल्या स्वभावाची हसून खेळून मोकळी असलेली नववधु, सांसरिक जीवनाची स्वप्ने पाहणारी आदर्श शिक्षिका, कामाच्या रगाडयात पिळून निघणारी, मोठया कुटुंबाचा भार उचलणारी कष्टाळू स्त्री, निराधार व प्रामाणिक मोलकरीण शिक्षणाची आवड असल्याने प्रौढ साक्षरता वर्गात जाऊन शिकणारी, जिद्दी, कष्टाळू, स्वाभिमानी, वाकबगार, कामाचा उरक असलेली, सासुबरोबर शेतावर राहून आत्मविश्वासाने वागणारी, हालअपेष्टा सहन करणारी स्त्री, मिळेल त्यात समाधान मानणारी, शांत स्वभावाची, कुंकु हे सौभाग्याचे लेणे मानणारी, न्युनगंड बाळगणारी विधवा, मुलांकडून उपेक्षिलेली अशा कितीतरी स्त्रियांची जीवनचरित्रे लेखिकेने सुंदर रीतीने साकार केली आहे. त्यांचा कथांमधील स्त्रिया या सधन कुटुंबातील असुन त्यांच्या कोणाविषयीही तक्रार नाहीत. कारण त्यांच्या व्यथा—वेदनांना त्यांची माणसे कारणीभूत आहेत. याचबरोबर त्यांच्या कथांतील स्त्रिया खेडयातील असल्या तरी, सुडौल बांध्याच्या, देखण्या आणि आकर्षक रंगरुपाच्या आहेत. म्हणून लेखिका त्या स्त्रियांचे रुपसौंदर्य आपल्या कथांतून वर्णन करून सांगतात, "मी, पीठासारखी गोरी नसले तरी सावळया रंगाचा तजेला आहे म्हणावं, गोल गरगरीत वाटोळा चेहरा नसला तरी उभट देखणा आहे म्हणावं. लालसर ओठांची ठेवण नाजूक आहे. माझे टपोरे बोलके डोळ आहे." सरोजीनी बाबर यांनी ग्रामीण स्त्री ही तिच्या कुटुंबात नाडलेली व भरडलेली असतांनाही सोशीकपणे व उत्साहीपणाने आलेल्या दुःखाला पचवत आपले आयुष्य चालवणारी, अशी चिवट स्त्री साक्षात वाचकांच्या डोळ्यासमोर उभी केली आहे.

अनुराधा गुरव यांच्या कथांमधून जिद्दीने संसार करणाऱ्या विधवेच्या स्वभावगुणांचे दर्शन घडविले आहे. पुरुषाच्या अतिप्रसंगाला बळी पडलेली स्त्री, तसेच स्त्रीमुक्त चळवळीत सामील झालेल्या शहरी व ग्रामीण स्त्रियांच्या भावनेतील अंतरही त्या प्रकट करतात. 'बये कुक्कु लेवून जा' या कथेतील हिराबाई ग्रामीण स्त्रीची परिस्थिती स्त्रीमुक्ती चळवळीतल्या स्त्रियांना सांगते त्यातून ग्रामीण स्त्रीच्या वास्तव जीवनातील सत्य आपणासमोर येते. जातीभेद मानणारी कर्मठ विचाराची म्हातारी, खंबीर, धाडसी, कष्टाळू व उत्साही स्त्री, पापपुण्याचा अर्थ लावणारी

दलित स्त्री, संयम, स्त्रीमर्यादा, सभ्यता व लज्जा बाळगणारी विवाहिता, साध्याभोळ्या नवऱ्याला सांभाळणारी धीरची व कष्टाळू संसारी स्त्री, श्रीमंताच्या वासनेला बळी गेलेली दरिद्री मुलगी, असे विविध पातळीवर खेडूत स्त्रियांचे चित्रण त्यांच्या कथांतून दिसून येते.

प्रतिमा इंगोले यांचे कथालेखन विपुल प्रमाणात असल्याने त्यांच्या सुरुवातीच्या कथांतील स्त्रीविषयक जाणिवा नंतरच्या कथांतील स्त्रीविषयक जाणिवा यात अंतर आहे. प्रारंभीच्या कथांमधून भोळ्याभाबड्या, अज्ञानी, अंधश्रद्धाळू स्त्रिया साकार झालेल्या आहेत. त्या स्त्रियांच्या ठिकाणी असलेल्या श्रद्धा व समजुती यातून त्यांची मानसिकता त्यांनी प्रकट केली आहे. लोकपरंपरेचा स्वीकार करणारी स्त्री व तिची भावावस्था त्यांनी दर्शविली आहे. सासु सुनेतील व नणंदेतील नाते, त्यांच्यातील बेबनाव यावर प्रकाश टाकलेला असून सुनेचा छळ कसा होतो हे ही सांगितले आहे. शिक्षणापेक्षा लग्नाला तयार केलेल्या मुलीचे भावविश्व, मुलाच्या जीवनासाठी भिंगरी होऊन फिरणाऱ्या स्त्रीचे दुःखही सांगितले आहे. प्रतिमा इंगोले यांनी आपल्या कथांतून वऱ्हाडी ग्रामीण स्त्रीचे जीवन साकार केले असले तरी या स्त्रियांच्या व्यथा वेदनांचे स्वर अखिल स्त्रीजातीच्या दुःखापेक्षा वेगळे नाही.

ललिता गादगे यांच्या कथांतील स्त्रियांना स्त्री म्हणून सोसाव्या लागणाऱ्या दैहिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. स्त्रीच्या मनातील दुःख, तिची व्यथा तिचे प्रश्न याचे प्रकटन त्यांच्या कथांमधून येते. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीकडे उपभोग्य वस्तू म्हणून पाहिले गेल्याने स्त्रीच्या वाट्याला आत्यंतिक दुःख कसे येते याचे चित्रण गादगे यांच्या कथेतून येते. 'बोलाई' या कथासंग्रहातील 'दुःख आणि अश्रू' या कथेत केवळ अपत्य झाले नाही, म्हणून स्त्रीनेच स्त्रीचा मांडलेला हा छळ आणि त्यातून वंध्यत्व आलेल्या स्त्रीच्या वाट्याला येणारे दुःखभोग जाणवतात. आपल्याच कुटुंबातील माणसाकडून आलेले हे दुःख तिच्या अस्तित्वाला नाकारणारे आहे. तिचे सांसारिक स्वप्न आणि पतीसहवासाची आशा भंग पावून तिच्या जीवनाची राख झालेली आहे. ती मनाचा कोंडमारा सहन करण्यापलिकडे काही करू शकत नाही. परंतु याचबरोबर सांसारिक जीवनातील ओढग्रस्तता, दारिद्र्य आणि असहायतेने दुःखी—कष्टी बनलेल्या स्त्रियांचे चित्रण ललिता गादगे यांच्या कथांतून येते.

अनुराधा वैद्य यांनी कुटुंबातील सासऱ्याच्या तर कधी नवऱ्याच्याच लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रियांच्या प्रतिमा साकार केलेल्या आहेत तर मधु सावंत यांच्या कथेतून प्रेमविवाह करणाऱ्या तरुणीचे, गरीब स्त्रीवर होणाऱ्या अत्याचाराचे चित्र साकार केलेले आहे. परंतु त्यांच्या अलिकडच्या कथांतून बदलत्या काळानुसार आत्मभान झालेल्या ग्रामीण स्त्रियांच्या प्रतिमांना उजाळा दिलेला आहे. राजकीय क्षेत्रातील स्वयंभू, निर्णयक्षम व स्वाभिमानी स्त्रीला स्वतःच्या हक्काची जाणीव झालेली दिसते.

'झेडपीनबाई' या कथासंग्रहातील 'तिची वाट वेगळी' या कथेतून सरकारने स्त्रियांसाठी तेहतीस टक्के जागा राखीव ठेवल्याने त्यावर आपला हक्क बजावण्यासाठी शिक्षणाचा निर्धार करणारी व आत्मविश्वास जागृत झालेली स्त्री प्रतिमा यातून साकार झाली आहे. याशिवाय पतीच्या राजकीय कारकीर्दीला स्थान न देता स्वतःचे राजकीय अस्तित्व अबाधित ठेवणाऱ्या पतीच्या विरोधात संघर्ष करणारी, राजकीय सत्तेची हौस असलेली, महानगरपालिकेची निवडणूक लढविणारी, राजकीय सत्तेपासून वंचित असलेली सामान्य कार्यकर्ती अशा वेगवेगळ्या स्त्रीप्रतिमा प्रकट करून राजकारणात हिरिरीने भाग घेणाऱ्या स्त्रियांच्या भावभावनांचा ठाव लेखिकेने घेतलेला आहे. आजची स्त्री स्वाभिमानी, समतेच्या व हक्काच्या बाबतीत जागृत, घराबाहेर पडणारी आणि आपले कर्तृत्व सिद्ध करणारी कशी आहे, याचे भावस्पर्शी चित्रण त्यांनी केले आहे.

मधु सावंत यांनी पाण्यासाठी बळी गेलेली गर्भवती स्त्री 'पाणबळी' या कथेतून आपल्या डोळ्यासमोर उभी केली आहे. त्यातील प्रसंग असा 'पाण्याबरोबर काढलेल्या मासळीसारखी नागम्मा तळमळत होती. घडी—दोघडीच्या तळमळीनंतर नागम्माची सुटका झाली. ती बाळंत झाली. तिला मुलगी झाली. एका वेदनेनं दुसऱ्या जन्मभराच्या वेदनेला जन्म दिला नागम्माने डोळे मिटले ते कायमचे''२

पाण्यासाठी बळी गेलेल्या नागम्माची जिवंत व्यक्तिरेखा लेखिकेने यातून साकार केलेली आहे. स्त्रियांच्या जीवनातील विविध घडामोडींबरोबर त्यांच्या समस्यांचेही भान त्यांनी राखले आहे. त्यांच्या कथांतून राजकीय क्षेत्रातल्या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा जशा साकार झालेल्या आहेत त्याचप्रमाणे सर्वसामान्य ग्रामीण स्त्रीचे दुःख तिचे दारिद्र्य, शोषण आणि तिच्यावरील अन्याय यावरही प्रकाश टाकला आहे.

सरोज शिंपाळे यांच्या कथांतून खानदानीपणे वागणाऱ्या विवाहितेचा भंगलेला संसार, तिच्यावर होणारा अन्याय, लग्नात हुंडा न दिला गेल्याने माहेरी टाकून दिलेली विवाहिता, चारित्र्याच्या संशयावरून टाकून दिलेली नववधू अशा अनेक स्त्रियांच्या जीवनावर त्यांनी प्रकाश टाकलेला आहे. विवाह स्त्रीजीवनातील अटळ आणि आवश्यक अशी बाब मानली गेली आहे. परंतु वैवाहिक जीवनात स्त्रियांना सुखापेक्षा दुःखच जास्त वाट्याला येते.

तरीही त्या दु:खाने खचून न जाता संसाराचा भार वाहतात. 'नानी' या कथेतील एक उत्तम उदाहरण – 'अशीच मोहना नानी जीवनभर खंबीरपणे जगली. ती कधी कुणाची वारी उसणपासण मागायला गेली नाही. मेहनत केली कष्ट आणि कष्टच. जणू ती उपसण्यासाठी जन्माला आली, म्हणून की काय, सून आल्यावर देखील तिने आपलं काम टाकलं नाही.''३ अशी ही कणखर वृत्तीची स्त्री वाचकमनाचा ठाव घेणारी आहे. तर कुमुद मंडलेकर यांच्या कथेतील स्त्रिया आधुनिक विचारांच्या, आत्मबळ असलेल्या व निग्रही स्वभावाच्या आहेत. त्यांच्या जीवनात निर्माण होणारे संघर्ष आणि प्रश्न यातून मार्ग काढण्यासाठी त्या स्वत:मध्ये बळ निर्माण करणाऱ्या आहेत. त्यांच्या कथांतून स्त्रीची विविध रुप साकार झालेली आहेत.

उर्मिला पवार यांच्या कथांतून ग्रामीण स्त्रीच्या प्रतिमा फारशा साकार झालेल्या नसल्या तरी खेडयातील जुन्या परंपरेला चिकटून असलेली म्हातारी, आपल्याच माणसांकडून अव्हेरली गेलेली विवाहित तरुणी, स्वत:च्या कमी उंचीमुळे न्यूनगंड बाळगणारी खेडयातून शहरात येवून नोकरी करणारी तरुणी अशा स्त्रियांचे व्यक्तिचित्रण त्यांच्या कथांतून आलेले आहे. मात्र अपत्य प्राप्तीशिवाय स्त्रीच्या स्त्रीत्वाला परिपूर्णता कशी लाभत नाही. याचे मार्मिक चित्र 'फुटे सावरीला बोंड' या कथेतून रेखाटले आहे. यमुना काकीचा नवरा नपुंसक असूनही तो बायकोलाच दोषी ठरवितो. मारझोड करुन सोडून देतो. तिचा दुसरा घरोबा होतो तेव्हा तिला मुलं होतात. तिच्याविषयी भावना व्यक्त करतांना तिची जाऊ म्हणते की–''अगं, पण तिनं आई झालचं पाहिजे असा आग्रह का होता? ती.... ती एक स्त्री..... काकासारखीच माणूस.........एक व्यक्ती नव्हती?''४ अर्थात स्त्रीला माणूस म्हणून भारतीय समाजात व कुटुंबात स्थान प्राप्त झालेले नाही. तिच्याकडून कुटुंबाच्या आणि समाजाच्या अपेक्षा पूर्ण न झाल्या तर तिचे स्त्रीत्वच पणाला लागते आणि तिचे सांसरिक जिवन उद्ध्वस्त होते. कारण ती पुरुषाधीन आहे. याची जाणीव यातून होते. पण लेखिकेने यमुनाचा दुसरा विवाह दाखवून ती वांझ नाही असा बोध करुन दिला आहे आणि स्त्रीत्वचा मान उंचावला आहे.

एकूणच मराठी स्त्रीलेखिकांनी आपल्या ग्रामीण कथांतून खेडूत स्त्रियांच्या प्रतिमा साकार करतांना त्यांचे कौटुंबिक जीवन किती संघर्षमय आहे याची जाणीव करुन दिली आहे. विवाह, संसार, सांसरिक जीवनात छळास कारणीभूत ठरलेले नातेसंबंध, विशेषत: सासु व नवरा यांचे मार्मिक दर्शन घडवून विवाहितेचे दु:खभोग सांगितले आहे. काही स्त्रिया वाटयाला आलेले दु:खभोग सहन करणाऱ्या आहेत. काही निग्रही मनाने त्यावर मात करणाऱ्या आहेत. शिवाय अलिकडच्या काळात सरकारी धोरणानुसार स्त्रियांना त्यांचे अधिकार मिळाल्याने त्यांच्यात जागृती निर्माण होवून आत्मभान आले आहे. म्हणून त्या शैक्षणिक, सामाजिक आणि नोकरीच्या क्षेत्रात व राजकीय क्षेत्रात मुक्तपणे वावरत असल्याचे या कथालेखिकांनी आपल्या कथांतून दाखवून दिले आहे. खेडूत स्त्री ही शिक्षित असो की अशिक्षित मात्र ती अजूनही पुरुषाधीन आहे. आज ही स्त्रीला सामाजिक रुढी संकेताला बळी पडावे लागल्याचा जाणीवही काही कथांतून झालेली आहे.

भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीने निर्माण केलेली स्त्रीविषयक दुटप्पी भूमिका आजच्या सामाजिक परिस्थितीही फारशी बदललेली नाही हेच या लेखिकांच्या स्त्री व्यक्तिरेखाटनातून सिद्ध झालेले आहे.

## संदर्भ ग्रंथ :–


१. बाबर सरोजिनी – 'रेशीमगाठ' पृ. ४१, ''मुक्तांगण'' कथासंग्रह कृ.भा बाबर, समाजशिक्षण प्रकाशन पुणे.

२. सावंत मधु 'पाणबळी पृ. १५ ''पाणबळी'' कथासंग्रह जयप्रकाश सूरनर, संगत प्रकाशन, नांदेड प्र. आवृत्ती २००६

३. शिंपाळे सरोज – 'नानी' पृ.क्र. ९१ ''अनोरस'' कथासंग्रह निर्मलकुमार सूर्यवंशी, निर्मल प्रकाशन, नांदेड

४. पवार उर्मिला– 'फुटे साविरला बोंड' पृ. १४३ ''हातचा एक अक्षर'' प्रकाशन मुंबई.


❖❖❖

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

# AJANTA

ISSN 2277 - 5730

## AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

Volume - IX, Issue - I,
January - March - 2020
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

MARATHI PART - I

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जागतिकीकरण आणि मराठी कविता<br>प्रा. डॉ. अशोक मामदेव पकवेकर | १-६ |
| २ | डिजीटल जाहिराती मधील चित्रफलाने जागतिकरण<br>प्रा. रामचंद्र नारायण धीरे | ७-१० |
| ३ | जागतिकीकरण आणि महानगरीय मराठी कविता<br>प्रा. डॉ. हिरालाल सोभा पाटील | ११-१५ |
| ४ | जागतिकीकरणामुळे जाहिरातींच्या डिजीटल माध्यमांमध्ये होत आलेला बदल यांचा मागोवा<br>प्रा. इंद्रजित नितीनराव बंगाळे | १६-१९ |
| ५ | जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत महिला लघुउद्योजकांची व्यावसायीक स्थिती : संदर्भ कन्नड तालुका<br>डॉ. कालिदास मारूती भांगे | २०-२६ |
| ६ | भावनांचा वापर करून बनविलेल्या जाहिरातीचा समाजावर होणारा सकारात्मक प्रभाव<br>प्रा. कृष्णा गणपत सावंत | २७-३३ |
| ७ | जागतिकीकरण आणि भाषा, साहित्य व संस्कृती<br>डॉ. लक्ष्मण गिते | ३४-३६ |
| ८ | जागतिकीकरण आणि भारतीय संविधान<br>प्रा. मदन कचरू मगरे | ३७-४० |
| ९ | मराठी साहित्यावर जागतिकीकरणाचा परिणाम<br>प्रा. डॉ. मनीषा नागपुरे | ४१-४७ |
| १० | Covid-19 जागतिक महामारीमध्ये प्रशासनाची भूमिका<br>डॉ. आर. पी. गावंडे | ४८-५१ |
| ११ | जागतिकीकरण आणि भारतीय राजकीय व्यवस्था<br>प्रा. डॉ. राजेंद्र सदाशिव मुरमवार | ५२-५५ |
| १२ | समर्थ संप्रदायातील कवी व अभिजात परंपरा<br>डॉ. संजय रा. पाखमोडे | ५६-६१ |
| १३ | आदिवासी भिल्ल जमातीच्या धर्म संकल्पनेतील सांस्कृतिक देव-देवता<br>प्रा. बळवी कविता सिपू | ६२-६५ |

कॉर्पोरेट घराण्यांनी घेतली. याच कालखंडात आर्थिक मुद्यांबरोबर धार्मिक मुद्यांचेही आणि कौटुंबिक पातळीवरही बदल घडून आले. गावगाड्यात उदरनिर्वाह करणे कठीण जाऊ लागले. शेती परवडेनाशी झाली. शेतीसाठी लागणारे बियाणे व इतर उत्पादने बहुराष्ट्रीय कंपन्याच्या हातात गेले. देशीवाण नष्ट झाले त्यांची जागा बहुराष्ट्रीय कंपन्याच्या हातात गेले. देशीवाण नष्ट झाले त्यांची जागा बहुराष्ट्रीय कंपन्याच्या हायब्रिड बियाण्यांनी घेतली. पुढेपुढे शेतमालाला भावही मिळेणासा झाला आणि जागतिकीकरणाच्या विळख्यात येथील शेतकरी सापडला. त्यातून शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरू झाले. खेड्यातील शेतमजुरांचे स्थलांतर शहरात होवू लागले. शहरात नव्या झोपडपट्ट्या उद्यास आल्या. एकदंरीतच नव्वदनंतरच्या कालखंडात दलित, शोषित, पीडित, शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि स्त्रियांच्या जीवनातही फार मोठे बदल घडून आले. कुटुंबातील नातेसंबंध पैश्यावर मोजले जावू लागले. मानवी भावभावना, प्रेम, सहानुभूती आणि बंधुभाव यांची जागा स्वार्थकेंद्रिदता, अर्थकेंद्रिदता चैन आणि व्यक्तीचे वस्तुकरणात रूपातरीत झाले. शहरात मोठेमोठे माल्स, हॉटेल्स, उद्योगधंदे, उभारले गेले आणि गावखेड्यात अंगावर धड कापड सुद्धा मिळणे दुरापास्त झाले. या बदललेल्या जगाचे चित्रण साहित्यात अधोरेखित होणे क्रमप्राप्तच होते मराठी साहित्यामध्ये या बदललेल्या जगाचे चित्र मराठी साहित्यीकांनी अधोरेखीत केले आहे.

साहित्यिक ज्या काळात जगत असतो. लिहीत असतो त्या काळाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असा प्रभाव त्यांच्या साहित्यनिर्मितीवर होत असतो. हा काळ लेखकाला साहित्य निर्मितीसाठी आवश्यक असणारे लेखनद्रव्य पुरवित असतो. समाजात सतत होणारी स्थित्यतरे, साहित्याचे युगभान आणि त्याचा अन्वयार्थ लावणे आवश्यक असते म्हणून त्या त्या कालखंडाचा निकष साहित्याच्या मूल्यमापनासाठी उपयुक्त ठरविला जातो यातूनच साहित्याचे युगभान निश्चित करता येते. साहित्यिकांनी कलेशी प्रामाणिक राहून बदलत्या समाजजीवनाला समर्थपणे सामोरे जायला हवे. समकालीन लेखकांच्या साहित्यातून समकालीन वास्तव कसे व्यक्त झाले आहे याची पाहणी करणे गरजेचे आहे. लेखकाची सामाजिक बांधिलकी या सर्वाबरोबरच महत्त्वाची आहेच पण बांधिलकी बरोबरच लेखकाला त्या वास्तवाचा सखोल अभ्यासही असणे महत्त्वाचे आहेच. सामाजिक बांधिलकी आणि सामाजिक वास्तव यांचे प्रखर जाण असणारा लेखक ते वास्तव आपल्या साहित्यकृतीतून प्रभावीपणे मांडतो. त्यामुळे जागतिकीकरणाचे समाजजीवनावर जे बरे वाईट परिणाम झाले आहेत, त्याचे प्रतिबिंब साहित्यात कसे आणि कितपत उमटले आहेत हे पाहणे महत्त्वाचे ठरते.

आज ज्या विविध पातळ्यावर आपण मराठी माणसाचा विचार करतो त्यातील साहित्याच्या पातळीवर चित्रित होणारे माणसांचे जीवन, त्याच्या जीवनातील स्थित्यतरे, मूल्यांतरे याचा विचार करणे गरजेचे ठरते जागतिकीकरणाचे हे पडसाद वसंत आबाजी डहाके (कविता) रंगनाथ पठारे (कांदबरी) या मराठीतील प्रस्थापित लेखकांनी ओळखले यांच्या आधीच्या लेखकांना ह्या पडसादाची जाणीव झालीही असेल पण त्यांना त्यांच्या जाणिवेच्या कक्षेबाहेर पडायचे नव्हते. पण नव्वदनंतरची लिहायला लागलेली पीढी मात्र या वास्तवाचा आणि त्या वास्तवातून जन्मणाऱ्या जाणिवांचा अधिक खोलात जाऊन विचार करू लागली. असे मूल्यबदल आणि त्या मूल्यबदलांचे परिणाम साधारणतः कवितेत अधिक तिव्रतेने भावात्म पातळीवर दिसू लागले. मराठीतील दलित–ग्रामीण आणि स्त्रीवादी कविता त्यातील मूळ जाणिवांचे चित्रण करता करता या पिढीत कशी जागतिकीकरणाच्या रूपांचा–परिणामांचा विचार करायला सन्मुख झाली ते कळले सुद्धा नाही आता केवळ दलित केवळ ग्रामीण बदलत्या ग्रामसंस्कृतीचे चित्रण वा केवळ स्त्रीवादी या

पातळ्यांवरच विचार करून चालणार नाही कारण आता आपले जीवन या जाणिवांना ओंलाडून नव्या, मोठ्या वर्तुळात प्रवेश करू पाहते आहे याची जाणिव झाली तेव्हा कळत नकळत सामाजिक वास्तव म्हणून हे सगळे ताण पुढे आले आणि आजच्या समकाळातला कवी–लेखक त्या त्या जीवानुभवाशी झटू लागला. कविता, कथा, नाटक, कादंबरी या वाङ्मयप्रकारात हे जाणिवांच्या–अनुभवांच्या पातळ्यांवरील बदल जाणवू लागले तेव्हा आपल्याला जाणवले की, आपण नवीन विश्वात वावरतो आहो हे विश्व आपल्या आधीच्या पिढीपेक्षा अनेककार्थाने बदललेले आहे, झपाट्याने बदलते आहे. मॉल्स संस्कृती, कॉम्प्युटर, इंटरनेट, फेसबुक, पब्ज, मोबाईल, केबल्स, इंटरनेट कॅफे अशा अगदी नव्या संस्कृतीत आपण फेकलो गेलो. याची जाणिव कादंबरीतून प्रथम रंगनाथ पठारे यांनी 'दु:खाचे श्वापद' मधून मांडली. त्रिधा, कुंठेचा लोलक किंवा अलीकडची भर चौकातील अरण्यरूदन या कादंबऱ्या वाचतांना हे जाणवू लागते. तर नाटकाच्या क्षेत्रात प्रशांत दळवीचे 'चाहूल', किरण पोत्रेकरचे 'कळा' ज्या लागल्या जीवा, रसिका जोशीचे 'व्हाइट लिलि' आणि 'नाइट रायडर' या नाटकांच्या निमित्ताने हे तपासून पाहता येते तर कथा कवितेच्या संदर्भात अनेक नावे घेता येइल. कथेच्या क्षेत्रात प्रामुख्याने सतीश तांबे, जयंत पवार, आसाराम लोमटे, प्रज्ञा दया पवार, सानिया तर कवितेच्या क्षेत्रात आज कविता लेखन करणाऱ्या बहुतांश कवींची नावे या संदर्भात विचारात घ्यावी लागेल. आजच्या समाजवास्तवचा विचार करतांना या पिढीच्या लेखकांना जागतिकीकरणाच्या या अटळ वास्तवाला सामोरे जाण्याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. कारण लेखक, कवी, कलावंत या सर्व स्थित्यंतराला उघड्या डोळ्यांनी बघत आहे, अनुभवते आहे त्याचा अन्वयार्थ लावते आहे. या साहित्यिकांनी समाजातील ही गुंतागुत आपल्या अभिव्यक्ती माध्यमातून कशी आणि कितपत व्यक्त केली. हा अभ्यासाचा विषय आहे. पण मराठी साहित्यात या बदलांचे चित्रण कथा, कादंबरी, कविता, नाटक या सर्वच साहित्यप्रकारातून झाल्याचे दिसते. प्रत्येक लेखक आपल्या क्षमतेनुसार या बदलाला सामोरा गेला व अभिव्यक्त झाला आहे.

कादंबरीच्या संदर्भात विचार करायचा झाल्यास कादंबरी हा सामाजिकतेशी अतुटपणे जोडलेला निगडीत असलेला साहित्य प्रकार आहे. मराठी कादंबरीत सामाजिकता वेगवेगळ्या रूपांनी प्रकट झालेली आहे. मराठी कादंबरीत जागतिकीकरणाच्या संदर्भात प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष झालेले. परिणाम दाखविणाऱ्या चित्रित करणाऱ्या कादंबऱ्या संख्येने मोजक्या पण आशयाने समृद्ध अशा आहेत यात नामुष्कीचे स्वगत (रंगनाथ पठारे) रौदाळा (कृष्णा खोत) इळनमाळ (अशोक पवार), बहात्तर मैल (अशोक व्हटकर),निशाणी डावा अंगठा (रमेश इंगळे – उत्रादकर), भिरूड (गणेश आवेर) चाळेगत (प्रविण बांदेकर), बारोमास, तहान (सदानंद देशमुख), गौतमची गोष्ट (अनिल दामले), ब–बळीचा (राजन गवस), 'ब्र' (कविता महाजन), नातिचरामी (मेघना पेठे)आदी कादंबऱ्यातून जागतिकीकरण व एकूणच सामाजिक वास्तव प्रकटले आहे.

जागतिकीकरणाने देशी–परदेशी खाजगी भांडवल भारतात आले त्यातून फायदेशीर ठरणाऱ्या उपक्रमांना प्रामुख्याने उठाव आला उद्योग व सेवा क्षेत्राची भरमसाठ वाढ झाली व पारंपारिक शेती मागे पडत गेली त्याचे खेड्यावर, खेड्यातील अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम झाले या साऱ्यांचे चित्रण सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' मध्ये सुक्ष्म तपशीलासह आले आहे तर 'चाळेगत' या कादंबरीतून प्रविण बांदेकरांनी कोकणच्या जनजीवनावर जागतिकीकरणाने निर्माण केलेली माणसांची अगतिकता विस्तृतपणे मांडली आहे. इथले मच्छीमार, त्यांच्या जीवनावर

जागतिकीकरणाच्या गतीमान प्रक्रियेने जीवन, भाषा, संस्कृती, अभिरुची सारे काही तळागाळातून बदलले आणि त्याचा एक परिणाम म्हणजे कथेचा भाषिक अवकाश आशयद्रव्य, रचना हे सारे बदलले जयंत पवार यांची कथा या संदर्भात लक्षणीय ठरली आहे. आजच्या काळात अगदी वळणावरची मराठी कथा लिहिणारा हा लेखक आहे. जयंत पवार याच्या कथेविषयी डॉ. रणधीर शिन्दे लिहतात, "नव्या मराठी कथेची घडण करणारा कथालेखक म्हणून जयंत पवार यांची ओळख निर्माण झाली आहे."

जागतिकीकरणाचे बरेवाईट परिणाम सर्वप्रथम महानगरात जाणवू लागल्याने अशा स्वरूपाची कविता आधी महानगरीय कवींनी लिहिण्यास प्रारंभ केला आणि त्यानंतर हे वारे जसजसे खेड्यापाड्यापर्यंत घुसत गेले तसतशी ग्रामीण भागात राहणाऱ्या कवींनीही याच पद्धतीने आपल्या भावना व्यक्त करायला सुरूवात केली. 'जागतिकीकरणाच्या अपरिहार्य परिणामामुळे बदललेली मूल्यसंवेदना व्यक्त करणारी कविता असे या कवितेला म्हणता येइल प्रा. अविनाश सप्रे म्हणतात, "त्याप्रमाणे जागतिकीकरणाच्या संदर्भाच्या स्विकार व नकारापेक्षाही त्यातूनही निर्माण होणाऱ्या सर्वकष पेच प्रसंगाशी ही कविता झुंज घेत आहे. हा नवा चक्रव्यूह कसा भेदायचा हे तिच्या पुढचे आव्हान आहे आणि आजवरच्या व्यूहरचना त्या दृष्टीने निरूपयोगी आहेत हे तिच्या लक्षात आले आहे."

जागतिकीकरणामुळे विखंडीत झालेल्या वास्तवाचा, जाणिवांचा संवेदनांचा तशाच समांतर विखंडीत शैलीत घेतलेला वेध हेच प्रमुख सूत्र या कवितेचे होते. या नव्या जाणिवांनी लिहिल्या असलेल्या आजच्या कवीमध्ये बाजारकेंद्री अर्थव्यवस्थेशी संबंधित विविध उद्योगव्यवसायाशी थेटपणे निगडीत असलेले कवी दिसून येतात त्यामुळे साहजीकच ही व्यवस्था त्यांच्या दैनदिन जगण्याशीच संबंधित अनुभव विश्वाचा एक अपरिहार्य घटक बनली आहे बाजारकेंन्द्री व्यवस्थेत समकाळाची जाणीव असल्यामुळे या काळाने निर्माण केलेल्या आव्हानांना कवितेच्या माध्यमातून सामोरे जाण्याचा प्रयत्न हे कवी करीत आहे. या कवींना 'जागतिकीकरणाची संवेदना मांडणारे 'बहुजनवादी आवाजाचे' कवी असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल' असे प्रवीण बांदेकर आपल्या 'जागतिकरण व आजची मराठी कविता' या लेखात म्हणतात या बहुजनवादी आवाजात अरूण काळे, प्रज्ञा पवार, महेंद्र भवरे, श्रीधर तिळवे, हेमंत दिवटे, मंगेश काळे, वर्जेश सोंळकी, मन्या जोशी, सलील वाघ, प्रवीण बांदेकर, अजय कांडर, वीरधवल परब, श्रीकांत देशमुख, इंद्रजीत भालेराव, संतोष पवार, गणेश विसपुते, नितीन रिंढे, आनंद विंगकर, अरूणचंद्र गवळी, प्रफूल्ल शिलेदार, दासू वैद्य, अजीम नवाझ राही, रमेश इंगळे, अशोक कोतवाल, दिनकर मनवर, नीरजा, प्रज्ञा दया पवार, कविता महाजन आदी कवी आणि कवयित्रींचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. या सर्वच कवींमध्ये समान असलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे सर्व आपापल्या अनुभवक्षेत्रांची प्रामाणिक राहत आजच्या वर्तमानाच्या भाषेत स्वतःच्या जगण्याच्या अनुषंगाने आपल्या काळाविषयी, काळाने उभ्या केलेल्या विविध प्रश्नांविषयी, सामान्य माणसाचे अस्तित्व ओरबडणाऱ्या नव्या व्यवस्थेविषयी बोलतांना दिसतात.

जागतिकीकरणातून आलेली अर्थशून्यता, रितेपणा, अस्थिरता, संवेदनाहीन जगणं एकाकीपण या साऱ्यांचा अन्वयार्थ कवींना आपल्या कविता मधून लावला आहे. यात श्रीधर तळवे म्हणतात –

'तुमच्या हायटेक संस्कृतीत माझी लोटेक कविता
तुम्ही करताय सर्वत्र स्लोपायझनिंग

आणि मी कवितेच्या अमृतानं
आयुष्य गोड करण्याचं स्वप्न पाहतोय.'

जागतिकीकरणाने व्यवस्थेत निर्माण केलेला असमतोल, विसंगती येथे दिसून येते. तर ईश्वराच्या पारंपारिक प्रतिमेकडे पाहण्याचा नव्वदच्या दशकातील कवींचा आधुनिक दृष्टिकोन आणि ज्या भाषेत ते मांडत आहे ती भाषा आजच्या जागतिकीकरण्याच्या काळाला साजेशी अशी आहे. वर्जेश सोळंकी ईश्वराचे अस्तित्व शोधाविषयी लिहितात–

'कुठला आयकॉन क्लिक केला तर भस्सकन
समोर येणारेय तुझं रूप,
विश्वाच्या हार्डडिस्कमध्ये किती बाईटस्‌मध्ये पसरला गेलायस तू.
कितीएक तुझी रूपं सॉफ्टवेअरमधल्या रोज नव्या
येणाऱ्या ई–लॅंग्वेजसारखी
की खोलून बसला आहेस तूही ऑनलाईन
सर्विस्‌च ग्लोबल दुकान'

जागतिकीकरणामुळे बदललेल्या अवकाशामुळे कवितेच्या आशयद्रव्यात व भाषेत कसे बदल झाले हेच ही कविता सांगते. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतीव्यवसायावर होवू घातलेले जागतिकीकरणाचे परिणाम दाखवून देणाऱ्या कविताही उल्लेखनीय आहेत. श्रीकांत देषमुख, संतोष पवार, केशव देशमुख, एकनाथ पाटील, ऐश्वर्य पाटेकर इ. कवीच्या कवितांमधून कृषीसंस्कृतीची जागतिकीकरणाच्या लाटेत होवू लागलेली परवड नेमकेपणाने मांडलेली दिसून येते. शेतीच्या दुरवस्थेच भविष्यकालीन चित्र रेखाटतांना एकनाथ पाटील म्हणतात –

कधी पिंकावर रोग पडेल,
हातातोंडाशी आलेला घास नाहीसा होईल
शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळणार नाही
रासायनिक खतांचे कीटकनाषकांचे दर आभाळाला टेकतील........
शेवटी गुराढोरासह, शेतीवाडीसह सामुहिक आत्महत्या करील तो...

जागतिकीकरणातून बोकाळलेला चंगळवाद, नव्यामूल्यांची रूजवण, अनैतिकता नातेसंबंधाची मोडतोड, जगण्यातील आंतर्विरोध संवेदनांचे बधीर होत जाणे, आर्थिक सुबत्तेतून मध्यमवर्गीय जगण्यात आलेली बेफिकीरी इ. समकालीन जीवनाचे चित्रेही कवींनी कवितेतून मांडली आहे. तर दुसरीकडे जागतिकीकरणामुळे खेड्यापाड्यात पोचलेल्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे एकीकडे जग ग्लोबल व्हीलेज होत जवळ आल्यासारखे दिसत असले तरी माणसं मात्र एकमेकांपासून दुरावत चालली आहेत. आत्मकेंद्रीत व संवेदनाहीन होत चालली आहेत हे सांगताना अजय कांडर म्हणतात –

का जे साधा शब्दही बोलत नाहीत गरिबांशी
ते इमेल धाडतात मित्रांना
का एक निरोपही देऊ शकत नाही शेजाऱ्यांना

ते मोबाईल टू मोबाईल राहतात संपर्कात दररोज
- का जे स्वतःशी साधू शकत नाही सुसंवाद
ते इंटरनेटवर जग पाहतात?

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील सामान्य माणसांच्या जगण्यात झपाट्याने होत गेलेले बदल यातून दिसून येते. जागतिकीकरणामुळे समकालीन जीवनव्यवहारात जाणवू लागलेली पडझड, सामाजिक व सांस्कृतिक जीवनातली विसंगती व मूल्यव्यवहारातील घुसळण वर्तमानाच्या परिभाषेत पकडू पाहणारी आजच्या पिढीची ही कविता 'जागतिकीकरणाच्या संवेदनाची कविता' म्हणता येते.

जागतिकीकरणाच्या नाटकांवर सुद्धा परिणाम झालेले दिसते नव्वदनंतरच्या नाटकांतून एकूणनच याचे पडसाद उमटलेले आपणास पहायला मिळतात. अजित दळवीचे 'डॉक्टर तुम्हीसुद्धा' 'गांधी विरूद्ध गांधी' प्रशांत दळवीचे 'चारचौघी', 'चाहूल', शफाअत खान यांचे 'शोभायात्रा' इ. नाटकातून हे पडसाद उमटलेले दिसतात. मराठी नाटकातून मोठ्या प्रमाणात ही सर्व गुंतागुंत येणे अपेक्षित होती पण ती आलेली नाही ही मराठी नाट्यासृष्टीसाठी खेदाची बाब आहे असेच म्हणावे लागते.

एकूणच जागतिकीकरणाच्या या वादळाला मराठी साहित्याने ताकदीने प्रतिसाद दिल्याचे दिसते. साहित्यिकांनी आजुबाजूच्या पर्यावरणाचे स्वीकार–नकार पचवून या साऱ्यांचा अन्वयार्थ लावून आपली कलात्मकता जोपासत मराठी साहित्याला प्रवाही ठेवले आहे. ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे. असे मला वाटते.

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. शोमणे रवींद्र (संपादक)– 'जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य' विजय प्रकाशन, प्रथमावृत्ती २०११, नागपूर.
२. 'सर्वधारा' नव्वदोत्तर मराठी कथा विशेषांक, एप्रिल, मे, जून २०१७, अमरावती.
३. प्रा. कराडे जगन – 'जागतिकीकरण : भारतासमोरील आव्हाने' डायमंड पब्लिकेशन, पुणे.
४. गवस राजन – 'ब बळीचा', पाप्युलर प्रकाशन, २०१२, मुंबई.
५. शिंदे रणधीर – जयंत पवार यांची कथा, प्रतिष्ठान, संपादक आसाराम लोमटे, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, सप्टेंबर २०१५, पृ. ४०.
६. देशमुख सदानंद – बारोमास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, २०१२, पुणे.
७. सप्रे अविनाश – केंद्र नाकारणारी कविता, अभिधानानंतर, दिवाळी विशेषांक, 2006
८. सोंळकी वर्जेश – 'ऑयकॉन' सोंळकीच्या कविता, पृ. ४८.
९. पाटील एकनाथ – खुंट्यावर टांगलेली दुःखे, पृ. ७७.
१०. कांडर अजय –आवानओल, पृ. ५३.

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX | Issue - II | APRIL - JUNE - 2020

MARATHI PART - I

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A (Mktg.), M.B.A (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | कायदेतज्ञ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. सतिश मस्के** | १३१-१३४ |
| २८ | पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. फड सुदाम पंढरीनाथ** | १३५-१३८ |
| २९ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेविषयीचा दृष्टिकोन : एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. सुनिल भावराव देसले** | १३९-१४२ |
| ३० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय कृषी विकास विषयक कार्य : एक अध्ययन<br>**प्रा. डॉ. सुरेश ल. पंडित** | १४३-१४५ |
| ३१ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक तत्वज्ञान<br>**डॉ. सौ. स्वाती नागोराव कुलकर्णी** | १४६-१४८ |
| ३२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन<br>**प्रा. डॉ. देवकते उत्तम शेषराव** | १४९-१५३ |
| ३३ | शिक्षणतज्ञ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. वसंत पांडूरंग सरवदे** | १५४-१५६ |
| ३४ | बालहक्क आणि सद्यस्थिती<br>**डॉ. पंडित शेषराव नलावडे** | १५७-१६२ |
| ३५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय भूमिका आणि आजची परिस्थिती<br>**प्रा. डॉ. मनीषा नागपुरे** | १६३-१६९ |

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# ३५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय भूमिका आणि आजची परिस्थिती

**प्रा. डॉ. मनीषा नागपुरे**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालय, कामठी रोड, नागपूर.

**प्रास्ताविक**

भारतीय संविधानाच्या निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मौलिक व अतुल्य योगदान राहिले आहे. त्यांनी दिलेल्या योगदानाची चर्चा रोजच आपल्या भारत देशात झडत असते. कुठल्याही पक्षाचा नेता असो तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी गौरवपूर्ण वाणीतून अभिव्यक्त होत असतो. भारतीय स्वातंत्र्य त्र्याहत्तर वर्षाचे व प्रजासत्ताक सत्तर वर्षाचे झालेले असून डॉ. आंबेडकर यांनी पाहिलेली स्वप्ने व भारतीय लोकशाहीला दिलेली जीवनदृष्टी यांची अमंलबजावणी व वंचितांच्या विकासासाठी आखलेल्या गतीमान योजनांची स्थितीगती पाहिली तर लक्षात येते की, भारतीय लोकशाहीचे चित्र फारसे आनंददायी व आशावादी वाटावे अशी आजची राजकीय परिस्थिती नाही त्यामुळे नव्या संविधानानुसार नवा भारतीय समाज निर्माण करण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची, राजकीय धोरणाची गरज असते, तो धोरणे राबविणारा राजकीय पक्ष जोपर्यंत क्रियाशीलपणे सत्तेत येत नाही तोपर्यंत नवीन समाजाची स्वप्ने पाहणे हे एक स्वप्नच बनून राहते असेच म्हणावे लागेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या काळात जो पक्ष सत्तेत होता त्यावर सतत नियंत्रक व वचक म्हणून त्यांनी शेतकरी, कामकरी, अनु.जाती–जमाती व सर्वच वंचिताच्या उत्थानासाठी बलाढ्य अशा विरोधी पक्षाची निर्मिती करावी असा विचार केला होता. भारतीय समाजमन लक्षात घेवून त्यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया अशा राजकीय पक्षाच्या नावाने संसूचनही केले होते. या पक्षात देशातील अग्रगण्य बुद्धीवंत, विचारवंत व नव्या भारतीय समाज जीवनात आकार देवू पाहणारे कार्येकर्ते असावेत अशी त्यांची भूमिका होती. भारतीय समाज जीवनातील असंख्य धर्म, अनेक चालीरीती, रूढी–प्रथा, परंपरा, बहुभाषिकता, बहुसांस्कृतिकता अशा सर्व बाबी डोळ्यापुढे ठेवून ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, विवेकशीलता, याद्वारे जाती व वर्ग अंताचे स्वप्न पाहिले. परंतु नव्या समृद्ध भारताचे स्वप्न पाहणाऱ्या या संविधानाच्या शिल्पकाराने 6 डिंसेबर 1956 रोजी भारतीय भूमिचा अखेरचा निरोप घेतला व एक कुशल प्रशासक संघटक बनून नविन समृद्ध भारताचे स्वप्न बघणारा असा नेता या भारतभूमीवर पून्हा नव्याने निर्माण झाला नाही. ही या देशाची खंत आहे.

कार्ल मार्क्स यांच्या विचारांनी आणि तत्त्वज्ञानांनी जसे निष्ठावान शिष्य उदयास आलेत तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाने व विचारांनी अनेक शिष्यही उदयास आलेत परंतु हे शिष्य पुढे आंबेडकर भक्तीत एवढे रममाण झालेत की अवतीभवतीच्या घडणाऱ्या प्रसंगाचे, घटनांचे, बदलणाऱ्या समाजजीवनाचे व बहुरंगी अर्थव्यवस्थेचे अत्याधुनिक पद्धतीने विश्लेषण करण्याची क्षमताच गमावून बसलेत असेच म्हणावे लागते.

भारत हा वेगवेगळ्या जातींच्या जनतेचा श्रेणीबद्ध देश आहे. आणि ही श्रेणी जन्माने, कर्तृत्वाने ठरली नसून ती धर्माने ठरलेली आहे. म्हणूनच ही श्रेणीबद्धता डॉ. आंबेडकर नाकारतात. ते म्हणतात "जातिव्यवस्था ही श्रेणीबद्ध पद्धती आहे, की जिच्यात प्रत्येक जातीला सर्वात वरची व सर्वात खालची जात नसल्याने, श्रेष्ठत्व व प्राधान्य असते, पण हे श्रेष्ठत्व वा वर्चस्व व कनिष्ठत्व हे धार्मिक नियमांनी निश्चित होते."[1] हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार खोलवर अभ्यासल्यास एक जात दुसरीवर सत्ता गाजवते व ही सत्ता धर्माने निश्चित झालेली असते. धर्मशास्त्रांनी ब्राम्हणांना उच्च अधिकार प्राप्त होतात. ते त्यांच्यातील पात्रतेमुळे नाही तर त्यांचा जन्म ब्राम्हणजातीत झाला या कारणाने! हे वास्तव डॉ. बाबासाहेब बदलू पाहतात. त्यासाठी त्यांनी लोकशाहीची आधुनिक आणि अपूर्व व्याख्या केली. "Democracy is a form of Government where revolutionary changes occur without bloodshade." म्हणजेच लोकशाही ही अशी एक शासन यंत्रणा आहे, की जिच्यामुळे रक्तपाताशिवाय क्रांतिकारी बदल घडू शकतात. अशी व्यापक लोकशाहीच्या व्याख्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केली आहे.

भारतीय संविधानाचे लोकार्पण केल्यानंतर अवघा सहा वर्षाचा काळ त्यांच्या वाट्याला आला. योग्यपणे, व्यवस्थितपणे व सक्रियपणे संविधानाची अंमलबजावणी शासकीय यंत्रणा, कार्यपालिका करीत नसल्याची खंत त्यांनी अनेकदा व्यक्त केली. शासनावर प्रभाव व दबाव टाकण्यासाठी व लोकांपर्यंत आपली भूमिका पोहोचविण्यासाठी त्यांना राष्ट्रीय स्तरावर रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेची गरज व्यक्त केली.

कोणत्याही घटनेला एक पार्श्वभूमी असते तशीच पार्श्वभूमी रिपब्लिकन पक्षालाही आहे 1924 सालच्या बहिष्कृत हितकारिणी सभेच्या स्थापना पासूनची परंपरा आहे. या पार्श्वभूमीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनेक राजकीय संदर्भ पुरविले आहे. या संदर्भानुसार विसाव्या शतकाच्या मध्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजात परंपरा, रूढी, धर्मांधता, अंधश्रद्धा, जातीगंड, धर्मद्वेष, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक इ. दारिद्र्यातून मुक्त करून आधुनिक विवेकी व विज्ञानवादी जगाशी संवादी करायचे होते. त्यासाठी देशातील जनसामान्यांची, प्रजेची वैचारिक कुवत वाढविण्याचा त्यांनी अखंड ज्ञानसाधनेतून आणि चिरंतर चिंतनातून प्रयत्न केला कारखान्यात काम करणाऱ्या मजूरांच्या हक्कासाठी, त्यांच्या उन्नयनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजकीय आयुधे वापरली होती. 'सप्टेंबर 1938 साली इंडस्ट्रिअल ट्रेड डिस्प्यूटस बिल मुंबई असेंब्लित सरकारच्या वतीने सादर करण्यात आले. त्या बिलाला डॉ. आंबेडकरांनी प्रखर विरोध केला व त्या बिलाची काळा कायदा अशी संभावनाही केली. मा. गृहमंत्री मुंशी व बाबासाहेब यांचा या बिलावरील चर्चेच्या वेळी अनेक वेळा खटका उडाला. 'आपल्या मागण्यासाठी संप करणे हा मजूरांचा मूलभूत हक्क आहे' अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळे या बिलाने 'संप' हा बेकायदेशीर ठरविणे त्यांना मुळीच पसंत नव्हते. कामगारांच्या हक्कांचा बळी घेणारे हे बिल आहे. असे त्यांचे मत होते."[2] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय भूमिकेवर आणखी प्रकाश टाकता येईल 'मजूर बिलाविरोधी 7 नोव्हेंबर 1938 ला ऐतिहासिक संप घडून आला. या बिलाविरोधी मुंबईत वातावरण अधिकच तापले. या संपात संघटना यांच्याबरोबर सामील होत्या. डॉ. बाबासाहेब या संपात आघाडीवर होते. त्यातच परुळेकर, डांगे, मिरजकर, रणदिवे, निमकर आणि मजूर पुढारीही आघाडीवर होते. इंडस्ट्रियल ट्रेड डिस्प्युट बिलाविरोधी जमनादास मेथा यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले."[3]

भारतीय समाजव्यवस्थेत अस्पृश्य वर्गाची परिस्थिती फार हलाखीची होती. अस्पृश्यांसाठी भरीव कार्य करण्याचा मानस डॉ. बाबासाहेबांनी व्यक्त केला. अनेक जाती–पोट जातींनी अस्पृश्य समाज बनला होता त्यांच्यात उन्मेश फुंकण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. "डॉ. आंबेडकर राजकारणाच्या आखाड्यात अखिल भारतीय अस्पृश्यांचा उद्धार करण्याच्या इर्षेनेच उतरले होते. अस्पृश्य समाजातील सुमारे 429 जाती आहेत. एकट्या मुंबई राज्यात अस्पृश्य समाजात 49 आदिवासी समाजात 32 व इतर मागासलेल्या समाजात 136 अशा जाती आहेत. 1930 साली अखिल भारतीय डिप्रेस्ड क्लासच्या परिषदेत त्यांनी अस्पृश्यांच्या हक्काची मागणी केली. लंडन येथील गोलमेज परिषदेत त्यांनी अस्पृश्यांच्या हक्काची मागणी केली. लंडन येथील गोलमेज परिषदेत अस्पृश्य वर्गाच्या हक्कांचा मसुदा मांडला होता. 1942 मध्ये अ.भा.शे.का. फेडरेशनची स्थापना बाबासाहेबांनी केली. ही संस्था प्रामुख्याने भारतीय अस्पृश्य वर्गाच्या प्रातिनिधीक होती. एखाद्या विशिष्ट जातीची नव्हती. एखाद्या जातीच्या उन्नतीसाठी कार्य करावे असे त्यांच्या मनाला कधी शिवलेही नाही. अखिल भारतीय अस्पृश्य जमातीच्या उन्नतीसाठी त्यांनी आपला प्राण आयुष्यभर फुंकला.[4] परंतु त्यांच्या कार्याकडे आपल्याला व्यापक दृष्टीने पाहता आले नाही.

बाबासाहेबांनी सर्वच पोटजातीवर जीवापाड प्रेम केले मांतग समाजातील श्री. दोंदे हे बाबासाहेबांचे एक चाहते व विश्वासू मित्र होते. ते निवडणूकीत उभे होते त्यांनी जिंकून यावे याकरिता डॉ. बाबासाहेबांनी अथक प्रयत्न केले त्यांच्याबद्दलची तगमग जिव्हाळा त्यांनी लिहलेल्या पत्रातून व्यक्त झाली आहे. सर्वच अस्पृश्य जातीविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राजकीय जाणीव व त्या जाणीवांच्या मुळाशी असलेले वंचितांचे, अस्पृश्य बांधवाचे व अल्पसंख्याकांच्या जीवनसंवर्धनाचे स्वप्न व सूत्र आखून द्वितीय महायुद्धाच्या काळात त्यांनी स्वतःलाच अधिक दक्ष केले. ब्रिटीश सरकारच्या कार्यशैलीवर व योजनांवर सुध्दा लक्ष केंद्रीत करून त्या योजनांचा त्यांनी सूक्ष्मपणे व गांभीर्याने अभ्यास केला. उदा. 'स्टॅफोर्ड क्रिप्स योजना'. "क्रिप्स योजना म्हणजे अल्पसंख्याकांच्या हक्कावर हल्ला असून बहुसंख्याकाची मर्जी संपादन करण्यासाठी एक शरणागतीच आहे आपला जीव वाचविण्यासाठी दुसऱ्याचा बळी देणे ही वृत्ती या योजनेत मुख्यत: आहे. भारतीयांनी क्रिप्स योजना मान्य केली नाही म्हणून ब्रिटीश व अमेरिकन भारतीयावर नाराज झालेले आहेत. अमेरिकनांची दृष्टी सोडा, पण ब्रिटीश सरकार व सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांना याची अधिक चांगली जाणीव पाहिजे. ब्रिटीश सरकारने जी आज उत्तम योजना म्हणून पुढे केलेली आहे तीच काही महिन्यापूर्वी अगदीच टाकवू म्हणून संबोधली होती हेच या योजनेच्या बुडाशी विकृत आहे."[5]

अल्पसंख्याकांच्या व अस्पृश्यांच्या म्हणजेच ज्या मानवी समुहाकडे संपत्ती, सत्ता, सामाजिक प्रतिष्ठा याचा कमालीचा अभाव आहे. अशा भारतातील विशाल समुदायावर आंबेडकरांनी आपले लक्ष केंद्रीत केले आहे. क्रिप्स सारख्या विकृत योजनेमुळे आंबेडकरांनी "शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन" सारख्या राष्ट्रीय स्तरावरील राजकीय संघटनेची गरज भासू लागली दिल्ली येथे 30 व 31 मार्च 1942 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या प्रश्नावर लढा देणाऱ्या पुढाऱ्यांची एक परिषद आयोजित केली. ते स्वतःच या पुढारी परिषदेचे अध्यक्ष होते. या नेत्यांच्या परिषदेला श्री मलिक, आर.एल. विश्वास, श्री जे.एन. मंडल, रावसाहेब रामसहाय, रावसाहेब श्यामलाल धोबी, श्री गोपालसिंग, एन. शिवराज, पी.एन. राजभोज असे प्रातिनिधिक अस्पृश्य नेते हजर होते. या परिषदेत क्रिप्स योजनेचा धिक्कार करण्यात आला.

दिनांक १८, १९, २० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे भारतीय अस्पृश्यांचे प्रातिनिधिक स्वरूपाचे अधिवेशन मिरवणुकीसह थाटामाटात पार पडले. या परिषदेचे अध्यक्ष एन.शिवराज (मद्रास) हे होते. या नागपूर अधिवेशनापूर्वी डॉ. बाबासाहेब यांनी दिनांक २ जुलै १९४२ रोजी लार्ड वेव्हेल यांच्या कार्यकारी कौन्सिलमध्ये झाली होती. त्यामुळे नागपूर अधिवेशनाला अधिक उत्साह संचारला होता. या अधिवेशनात त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना डॉ. आंबेडकर म्हणाले "अस्पृश्यांनी आपली सर्वांगीण उन्नती केली पाहिजे. राजकीय ज्ञान प्राप्त करून घेण्यास त्यांनी आपली चांगली प्रगती केली आहे. आपण जी काही प्रगती करू शकतो ती आपण आपल्या कर्तृत्वावर आणि संघटनेवर करू शकतो. आज आपल्या पुढील सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे सर्वांगीण उन्नतीचा. पण आपणाजवळ आर्थिक बळ नाही व सामाजिक सामर्थ्य नाही. याकरिता आपल्याला राजकीय सत्ता पाहिजे ही राजकीय सत्ता आपण आपल्या संघटनेच्या बळावर हस्तगत केली तरच आपण आपली प्रगती करू शकतो हा आपल्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. यास्तव आपण सारे लक्ष केंद्रित केले पाहिजे." हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय विचार सार्वकालीक व वैश्विक स्वरूपाचा म्हणावा लागेल. विश्वातील कुठल्याही वंचित समूहांना हा राजकीय विचार नवीन बळ देणाराच ठरतो.

आर्थिक व सामाजिक सामर्थ्य स्थिर उभे करायचे असेल तर राजकीय सत्तेची प्रबळ गरज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केलेली आहे. अधिवेशनामध्ये बाबासाहेबांनी जे काही ठराव मांडले होते ते आजही लक्षवेधक आहेत –

१. अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी प्रत्येक प्रांताच्या बजेटमध्ये स्वतंत्र तरतूद करावी.
२. अस्पृश्यांना मध्यवर्ती व प्रांतिक मंत्रिमंडळात योग्य प्रतिनिधित्व मिळावे.
३. अस्पृश्यांना सरकारी नोकऱ्यात राखीव जागा मिळाव्यात.
४. अस्पृश्यांना वस्तिसाठी शेतीला लायक असी पडीक जमीन मिळावी.

'शेड्युल कास्ट फेडरेशन' असा अखिल भारतीय स्तरावरील राजकीय पक्षाच्या स्थापनेतून त्यांनी वरील प्रश्नावर लढे उभारण्याचे सुतोवाच केले होते. परंतु २७ जुलै 1942 रोजी एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलमध्ये मजूर मंत्री म्हणून त्यांनी पदभार स्वीकारला त्यामुळे राजकीय पक्षाची जबाबदारी त्यांनी भा. दादासाहेब गायकवाड या सहकाऱ्याकडे सोपविली. मजूरमंत्री असतांना त्यांनी श्रेष्ठ व गुणवत्तापूर्ण अशा परंपरा निर्माण केल्यात या काळातील बाबासाहेबांचे कार्य उल्लेखनीय आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्यमूल्य

मानवी इतिहासात स्वातंत्र्यासाठी व अभिव्यक्तीसाठी अनेक विचारवंतांनी कार्यकर्त्यांनी आपल्या प्राणाचे बलीदान दिलेले आहे. बाबासाहेब म्हणतात "आमचे राजकारण बनियावृत्तीचे नाही, तर ते मनापासूनचे आहे. मला ते दिखावू राजकारण नको, पैसा नको आणि मानही नको, मला हवा स्त्री पुरुषांच्या उन्नतीबद्दलचा आत्मविश्वास, हिंदू लोकांना माझे एकच सांगणे आहे. तुमचे राजकारण जसे स्वतंत्र होण्याचे आहे तसेच आमचेही राजकारण आमच्या मानेवरील गुलामगिरीचे पाश तोडण्याचे आहे."[7] केवळ सत्ता मिळविणे हा बाबासाहेबांचा विचार नसून मानवमुक्तीसाठी मानवी स्वातंत्र्यासाठी सत्तेचा व राजकारणाचा वापर करणे असा व्यापक राजकीय दृष्टीकोन डॉ. आंबेडकर यांच्या अभ्यासू, सहिष्णू व क्रांतीकारी व्यक्तिमत्वात असल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्य या मूल्याने ते अधिकच चिंतनशील होतात व भारतीय समाजमनाला नवा आयाम देवू पाहतात. "आम्हावर आता हिंदू लोकांचे राज्य नको आहे. दोन हजार वर्षे जी गुलामगिरी आम्ही उपभोगली त्याच्या बेड्या आता तोडल्या गेल्याच पाहिजेत. ज्या दिवशी हे पाश नाहिसे होतील त्याच दिवशी आम्हाला स्वातंत्र्य लाभले असे आम्ही मानू. आमच्या शरीराभोवती एका अजस्त्र अजगराचा विळखा आहे हा अजगर इंग्रज नसून हिंदू लोकच आहे. हा अजगराचा विळखा नाहीसा झाला तरच आम्ही मुक्त होवू व स्वतंत्रता उपभोगू."[8] इथे व्यक्ती स्वातंत्र्याच्या किती मोठा आर्जव स्वर डॉ. बाबासाहेबांनी उंच उंच छेडला आहे. स्वातंत्र्याला मानवी मूल्याचा एक मानसिक व मूलभूत आधार व उर्जास्त्रोत त्यांनी मानले.

भारतीय समाजजीवनातील 'जात' हिचे वास्तवही फार वेगाने बदलत आहे. एकेकाळी विशिष्ट जातीची विशिष्ट कामे होती त्यावर त्या जाती समुहांचा उदरनिर्वाह व प्रतिष्ठा जोखली जायची परंतु जागतिकीकरणानंतर हे सारेच वर्गीय वास्तव वेगाने बदलत गेले. या वास्तवाचा वेध, त्या वास्तवाच्या अंतःस्तरातील काही सुक्ष्म बारकावे समजून घ्यावे लागतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्शाने व प्रेरणेने चालणाऱ्या काही संघटना 'रिपब्लिकन पक्षा'च्या नावाने महाराष्ट्रात कार्यरत आहेत त्यातील काहीच संघटना खऱ्या अर्थाने काम करीत असल्याचे चित्र मात्र आज दिसते त्यातही राजकीय सत्ता प्राप्त करणे व राजकीय दबावाने काही पदरात पाडून घेणे हाच या संघटनांचा उद्देश आहे.

"डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या निधनानंतर लगेच 1957 सालच्या सार्वत्रिक निवडणूका संयुक्त महाराष्ट्राच्या समितीच्या नावाने लढविल्या गेल्या तिच्यातील शेड्युल कास्ट फेडरेशनची ताकद ही रिपब्लिकन पक्षाचीच ताकद होती या पक्षाला मुंबई विधानसभेत 13 आणि लोकसभा मुंबई प्रांतातून 5 आणि अन्य प्रांतातून तीन अशा आठ जागा मिळाल्या होत्या. त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा, चळवळीचा, आंदोलनाचा प्रभाव होता"[9] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराचा प्रभाव आजही कायम असला तरी नेत्याच्या दुहीमुळे, फाटाफुटीमुळे मतांचे विभाजन हे चिंतेचे व चिंतनाचे भेदक वास्तव विचारात घ्यावेच लागेल.

विसाव्या शतकातील 1960 च्या दशकाचे राजकीय वास्तव्य डॉ. रावसाहेब कसबे या विचारवंताने मांडले आहे. "1960 च्या दशकाचा पूर्वार्ध रिपब्लिकन चळवळीच्या दृष्टीने व्यापक चळवळीचा होता आणि उत्तरार्ध हा कॉंग्रेस रिपब्लिकन युतीचा आहे. उत्तरार्धाचा परिणाम राजकीय सत्ता स्पर्धेला सुरूवात होण्यात झाला. ही स्पर्धा कधी कॉंग्रेसच्या सहाय्याने तर कधी अनुनयाने खेळली गेली. महाराष्ट्र विधानपरिषदेवर रा.सू. गवई यांचे तर राज्यसभेवर बॅ. राजाभाई खोब्रागडे यांची स्थान निश्चिती झाली. 1990 नंतर राजकीय चित्र पालटले रिपब्लिकन पक्षात नेत्यागणीक फूट कोणीही टाळू शकले नाही त्यामुळे पक्षाच्या जनाधारात प्रचंड असंतोष पसरला."[10] 2014 च्या लोकसभेत झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीत पक्षात असलेले अनेक पक्षी वेगवेगळ्या पक्षाच्या फांदीवर बसलेत सत्तेची नशा ज्यांना चढली ते सत्तेशिवाय जगूच शकत नसल्यामुळे रामदास आठवलेसारख्या बंडखोर व्यक्तीमत्वाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रणीत भाजपाशी घरोबा केला व केंद्रात मंत्रीपदही मिळविले. बाकीचे रिपब्लिकन गटातील समाज मात्र त्यांना विरोध करीत आहे. तर दुसरीकडे भा.रि.प. बहुजन महासंघाचे नेते ॲड प्रकाश आंबेडकर यांनी मात्र शेतकरी, कष्टकरी, महिला, आदिवासी, कम्युनिस्ट पक्षासोबत आणि समविचारी संघटनेसोबत आघाडी करून विविध प्रश्नांवर राजकीय शक्ती वाढविण्याचे प्रयत्न सुरू केलेले आहेत. पुरोगामीत्व, डावी विचारसरणी, वैज्ञानिकता, शालेय शिक्षण, आरोग्य सेवा,



298

वंचितांना जमीनीचे पट्टे इ. प्रश्नांवर विधायक आंदोलन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक अधिष्ठानावर राजकीय पक्ष बळकट करण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत. त्यांच्याकडे त्यांच्या ध्येयधोरणाकडे व भूमिकेकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे जातीच्या चौकटीत कुठलाच पक्ष वाढू शकत नाही व सत्तास्थानेही प्राप्त करू शकत नाही हे त्यांनी अनुभवले. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले व्यापक व प्रभावी राजकारण, वेळोवेळी घेतलेल्या बदलत्या परिस्थितीनुसार बदलणाऱ्या राजकीय भूमिका ॲड प्रकाश आंबेडकरांच्या राजकारणाच्या दिशानिश्चितच दिसते.

21 व्या शतकात जाती संस्थेने प्रचंड धुमाकुळ घातलेला आहे लोकशाहीपुढे जातीव्यवस्थेचे संकटच उभे राहिले आहे. "जातीव्यवस्थेने केवळ अस्पृश्य वर्गच निर्माण केलेला नाही. अस्पृश्यासारख्याच सवर्णांच्या शेकडो जाती निर्माण केल्यात समाजात फक्त दलितांची गुलामगीरी या व्यवस्थेने निर्माण केलेली नाही, तर सर्वांची मनेच गुलाम करून टाकली आहेत सर्वच प्रश्नाविषयी कमालीचे औदासीन्य निर्माण करून परंपरेच्या प्रवाहात जिवंत राहणे व टिकून राहणे एवढाच एक पुरूषार्थ जातीसंस्थेने शिल्लक ठेवलेला आहे. नवनिर्मितीची सर्व उर्मी व एकात्मता समाप्त करून टाकणारी, राष्ट्राचा घात करणारी ही चमत्कारिक संस्था आहे. या संदर्भात चिवटपणे टिकून राहणे महत्त्वाचे नाही, कसे टिकलो याला महत्त्व आहे. हे बाबासाहेबांचे मत आपण समजून घेतले पाहिजे."[11] विख्यात विचारवंत व थोर समीक्षक डॉ. नरहर कुरूंदकर यांच्या विचाराचा परीघ विचारवंताना, भारतीय राज्यकर्त्यांना व तमाम चळवळीतील कार्यकर्त्यांना, नेत्यांना विस्तारता आला तरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पाहिलेले भारतीय लोकशाहीचे स्वप्न वास्तवात येण्यात मदत होइल.

जागतिक राजकीय यंत्रणांचा अभ्यास केल्यानंतर भारतातील जटील समस्यांच्या सोडवणूकीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य पणास लावले. अस्पृश्यउद्धारापासून चळवळीस प्रारंभ करून आयुष्याच्या उत्तरार्धात राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने स्वतःला गुंतवून घेतले. राजकीय सत्ता ही सर्वोच्च नसली तरी एक मानवी कल्याणाची महत्त्वाची शक्ती आहे. या शक्तीच्या आधारे त्यांनी बरेचसे सांसदीय राजकारण केले. परंतु भारताच्या एकात्मतेला व अंखडतेला तडा जावू देणार नाही अशी कठोर भूमिकाही घेतली. गोलमेज परिषदेतील (1932) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील कायदा तज्ञ डॉ. आंबेडकर यांचा विचार किती महान व प्रगल्भ होता. हे त्यांच्या कृती व उक्तीवरून दिसून येते. "मी प्रथम भारतीय आहे, शेवटी ही भारतीय राहील भारतीय असल्याखेरीज अन्य कोणीच नाही."[12] प्रत्येकांनी आपला संकुचितपणा बाजूला ठेवून राष्ट्रीयतेचे संवर्धन, संगोपन केले पाहिजे राष्ट्र भावनेला तडा देणारी दुसरी कोणतीही निष्ठा जोपासणे हा डॉ. आंबेडकरांच्या मते अपराधच मानावा लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या वरील राजकीय भूमिकांचे निट अध्ययन व संशोधन केल्यास त्यांच्या राजकीय विचारांची मार्मिकता व गार्भिय लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

**निष्कर्ष**

- राजकीय सत्तेला सर्वोच्च सत्ता म्हणून डॉ. आंबेडकर मान्यता देत नाही.
- राजकीय सत्तेतून आर्थिक विकास व सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होते.
- भारताच्या एकात्मतेला जाती, धर्म इत्यादी संस्थाच्या टोकाच्या भूमिका धोक्याचे संकेत आहेत.

- मानवी स्वातंत्र्य हा समृद्ध लोकशाहीचा प्राण आहे.
- अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी राजकीय सत्ता हे एक प्रभावी साधन आहे.
- विवेकनिष्ण, विज्ञाननिष्ठा व समग्र मानवी विकास हे राजकीय सत्तेचे त्रिसूत्र असावे.
- व्यापक व समग्र राजकीय विचारांना जाती, धर्म, प्रदेश इ. चौकटीत कोंबता येत नाही.
- राजकीय सत्ता ही मानवी कल्याणाची महत्त्वाची शक्ती आहे.

## संदर्भ टिपा

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्धृत सुधारक गायकवाड : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची समाजरचनेची सैद्धांतिक मांडणी.
2. शंकरराव खरात : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रे प्रकाशन – श्री. ज.ल. ठोक, पुणे 1961, पृ. 195.
3. तत्रैव : पृ. 196.
4. तत्रैव : पृ. 198.
5. तत्रैव : पृ. 211.
6. तत्रैव : पृ. 212, 213.
7. तत्रैव : पृ. 222.
8. तत्रैव : पृ. 22.
9. रावसाहेब कसबे : रिपब्लिकन पक्ष : ऐक्य : वास्तव आणि भवितव्य : सुगावा प्रकाशन, पुणे 1998, पृ. 16.
10. तत्रैव : पृ. 18.
11. नरहर कुरूंदकर : इंद्रायणी साहित्य, पुणे 12 ऑक्टोबर 2000, पृ. 13.
12. बी.आर आंबेडकर : राईटिंग्स ॲण्ड स्पिचेस : खंड 2, महाराष्ट्र शासन, मुंबई 1982, पृ. 195.

An International Multidisciplinary Quarterly Research Journal

ISSN - 2277 - 5730

Volume - IX, Issue – I, January - March - 2020

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

# AJANTA

Impact Factor 2019 - 6.399 (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. डॉ. मनीषा नागपुरे

In Recognition of the Publication of the Paper Titled

मराठी साहित्यावर जागतिकीकरणाचा परिणाम

Ajanta Prakashan
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

Editor : Vinay S. Hatole

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME : I ISSUE II JULY- SEP.2020




ART'S I COMMERCE I SCIENCE I SOCIAL SCIENCE I
EDUCATION I MANAGEMENT I MEDICAL I ENGINEERING & IT I
LAW I PHARMACY I PHYSICAL EDUCATION I AGRICULTURE I
JOURNALISM I MUSIC I LIBRARY SCIENCE I

Editor: **Dr. Sadashiv H. Sarkate**

E-mail

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC
ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

*SVolume : 1, Issue : II*
*July to Sept. 2020*
Editorial Officer
**Kranti Publication**
Georai Dist.Beed
Beed -431 127
Contact : 7875827115
E-mail : Sarkatelata@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Ex.Vice Chanciler Y.C.M.U. Nasik
& Professor of Mass Communication
& Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. V. B. Bhise**
Ex-Professor, Dept. of Economics
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

EDITOR

***Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed.

EDITOR BOARD

**Dr. Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage
Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr. Kadam Mangal S.**
PG. Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad'

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College,
Mantha. Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science
College, Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member
**Dr.B.A.M.U.Aurangabad**

PEER REVIEW / REFERECS

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

MANGING EDITORS

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Gholshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**

**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Thangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**

**Assit.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

अनुक्रमणिका



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Overview of Pranayama in the Hatha Yoga texts: Hatharatnavali and Siddha-Siddhatnt -Paddhati | Dr.Dipak Bhagwanrao Dirange | 1-6 |
| 2 | Internet Banking and Its Impact on Customers Behavior Special Reference to Aurangabad District in Maharashtra. | Dr.Waghmare M.S. | 7-13 |
| 3 | Significance Of Digital Education Resource During Covid-19 Pandemic Period :A Conceptual Approach | Dr. Alpna Jyoti | 14-19 |
| 4 | Primary Teacher's Perception On Dysnomia In Papum Pare District Of Arunachal Pradesh. | Dai Haring | 20-30 |
| 5 | A Study Of Groudwater Quality In Selu City Dist Parbhani ( M.S.) | Devidas U. Thombal | 31-34 |
| 6 | " A Study Of Challenges Faced By Small And Medium Women Entrepreneurs Development In The Rural Area" | Prof.Dr.Dattatraya S. Tambe | 35-41 |
| 7 | Molecular Characterization of Fusarium species from seeds of Legumes. | Ram S. Bajgire | 42-45 |
| 8 | Violence and Misogyny in Anuradha Roy's Sleeping on Jupiter | Sashi Bhushan | 46-52 |
| 9 | "A Critical Analysis of Digital Marketing in India" | Dr. M. S. Waghmare<br>Surekha Bhimrao Wahule | 53-58 |
| 10 | Role of Parliament in Decriminalization of Politics | Patil Vaishali Ganeshrao, | 59-65 |
| 11 | Gandhiji's Perspectiv E On Child Marriage,Sati,Widow Remarriage:The Triple Social Evils And Injustices Inflicted On Women | Dr. Aneesa Iqbal Sabir, | 66-72 |
| 12 | A Study On Recent Developments Towards Merchant Banking In India | Surbhi Tiwari | 73-78 |
| 13 | Role Of Electronic Media During Covid-19 Pandemic | Pratima Sudam Bansod<br>Dr. Aparna Kottapalle | 79-85 |
| 14 | Correlation between level of HDI and Migration stream in India : A Geographical Analysis | Dr. Sita Ram Pandit | 86-89 |
| 15 | Dimensions of Deprivation among the people of Bihar and Programms for their Development : A Geographical Approach | Dr. Sita Ram Pandit | 90-95 |
| 16 | मुजफरपुर जिला में अनुसूचित जाति एवं जन जाति में लिंगानुपात एवं आर्थिक पिछड़ापन का एक भौगोलिक अध्ययन : (मुजफरपुर जिला के वर्ष 2011 जनसंख्या के संदर्भ मे) | डॉ. सीताराम पंडित | 96-99 |
| 17 | An Analytical Study On The Conditions And Problems Of Hiv/Aids Infected Women In Rural Areas | Dr. Rama Achyut Pande | 100-102 |
| 18 | साठोत्तरी दलित–आंबेडकरी कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा | अमित वासुदेव गजभिये<br>डॉ. मनीषा नागपूरे | 103-107 |
| 19 | आत्मनिर्भर भारत अभियान - मे २०२० | डॉ.दत्ता एम. तंगलवाड | 108-111 |

# साठोत्तरी दलित–आंबेडकरी कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा

अमित वासुदेव गजभिये
संशोधक विद्यार्थी
डॉ. म. वा. वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

डॉ. मनीषा नागपूरे
मार्गदर्शक
डॉ. म. वा. वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय,नागपूर

**प्रस्तावना**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय समाजामध्ये घडून आलेली विविध स्थित्यंतरे, वैज्ञानिक प्रगती, समाजातील विषमता, आर्थिक दुरावस्था आणि धार्मिक संस्कृती यातून दलित–आंबेडकरी कादंबरी उदयास आली. दलितांचे दुःख येथील संस्कृतीत असल्यामुळे त्यांचे दुःख त्यांनीच मांडले पाहिजे असा विचार पुढे आला. दलितांविषयी बाबुराव बागूल १७ व १८ जानेवारी १९७६ रोजी नागपूर येथे दलित साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन करताना म्हणतात,'' दलित म्हणजे वर्णव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उद्‌ध्वस्त करू बघणारा, दलित म्हणजे हे जग आणि जीवन नव्याने मांडू बघणारा, दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत, प्रलयकारी केलेली आहेत आणि ज्याच्यासाठी आधुनिक शास्त्रे आणि शस्त्रे उपलब्ध करून दिली आहेत ते. आपल्या या दलितांच्या व्याख्येत अमेरिकेतील काळा, गोरा, तांबडा, आफ्रो आशियाई देशातील अस्पृश्य, आदिवासी, शोषित, पीडित येतात.''[१](डॉ. नाझरेथ मिस्टिका: बाबूराव बागूल यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, प्रथमावृत्ती २००६, पृ. क्र.२१) या प्रकारच्या समुहातील लोकांनी लिहिलेल्या, त्यात दलित जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबरीलाच दलित कादंबरी असे म्हणतात.

दलित कादंबरीतून दलितांचे दुःख, त्यांची भारतीय समाजामध्ये होत असलेली उपेक्षा, या समाजव्यवस्थेमधून बाहेर पडण्यासाठी ते करत असलेली तळमळ दिसून येते. त्यामुळे दलित–आंबेडकरी कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांमधून येणारी नायक आणि नायिकेंची व्यक्तिचित्रणे वैशिष्ट्यपूर्ण आणि विविधांगी स्वरूपाची आहेत. मराठी कादंबरीतील स्त्री व्यक्तिचित्रणाचा विचार केल्यास सामान्यतः तरूण आणि सुंदर स्त्रियांनाच नायिकेचे स्थान प्राप्त झाले आहे. क्वचित प्रसंगी एखाद्या कादंबरीकाराने कुरूप नायिका रेखाटलेली असेलही तर ती गुणाने नक्कीच देवी आहे. परंतु दलित–आबेडकरी कादंबरीमध्ये रेखीव, देखण्या स्त्रियांपेक्षा कर्तबगार स्त्रियांना अधिक महत्त्व देण्यात आल्याने दलित–आंबेडकरी कादंबरीतील स्त्री पात्रे प्रभावी ठरली आहेत. विशेष व्यक्तिमत्त्व आणि बंडखोरीचे जीवन जगणाऱ्या या स्त्रियांना परिस्थितीने बंडखोर केले आहे. स्त्री आणि स्त्रियांवर होणारे अन्याय आणि अत्याचार, स्त्री बद्दल असणारा अभिमान आणि तिचे दुहेरी पातळीवर होणारे शोषण अशा विविधांगी स्वरूपाचे स्त्री दर्शन दलित–आंबेडकरी कादंबरीकारांनी रेखाटले आहे. स्त्री जीवन आणि स्त्री सौंदर्याबद्दल मनात निर्माण झालेली घृणा दूर करून, स्त्री जन्म झुगारून पुरुष जीवन जगण्याची इच्छा व्यक्त करणारी बाबुराव बागूलांच्या 'सूड'मधील जानकी दलित स्त्रियांना आत्मभान देऊन जाते. आपल्या शीलाचे रक्षण करण्यासाठी अघोरी बाबाच्या विरोधात हातात तलवार घेऊन लढण्यास सिद्ध होणारी बागूलांच्या 'अघोरी'मधील पार्वती वाचकांना अंतर्मुख करते. पारंपरिक मनोवृत्तीला छेद देणारी नामदेव ढसाळांच्या 'हाडकी हाडवळा'मधील बायजा

सखाबाबाचे प्रेत उचलायला गावकऱ्यांना सांगते. दारिद्र्य काय असते? स्त्रीच्या वाट्याला येणारे भोग काय असतात? भूक काय असते? हे सांगणारी अशोक व्हटकर यांच्या '७२मैल'मधील राधाक्का जीवनाचे एक वेगळे तत्त्वज्ञान सांगते. हिंदू धर्मातील परंपरेला आणि देवाला नाकारणारी उत्तम बंडू तुपे यांच्या 'झुलवा'मधील जगन दलित स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण करते. कुटुंबासाठी स्त्रिनेच झिजावे, कष्ट उपसावे असे जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारी 'राघववेळ','ऊनसावली', 'सांजरंग' मधील वालंबी वाचकांच्या मनावर वेगळा ठसा उमटवून जाते. दलित—आंबेडकरी कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा ह्या वाचकांना अंतर्मुख करतात. त्यांच्या मनावर प्रभावी ठसा उमटवून दलित स्त्रियांमध्ये अनोखा आत्मविश्वास निर्माण करतात म्हणून 'साठोत्तरी दलित—आंबेडककरी कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा' या प्रस्तुत शोध निबंधात या कादंबरीकारांच्या कादंबऱ्यातील स्त्री व्यक्तिरेखावर प्रकाश टाकण्यात आला असून त्यांची स्त्री विषयक भूमिका समजून घेणे हा या शोध निबंधाचा उद्देश आहे.

बाबुराव बागूल यांच्या 'सूड' या कादंबरीची नायिका जानकी असून तिचे जीवन विविधांगी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. जानकी ही शोषित, पीडित असल्यामुळे तिचे स्त्रीत्त्व अनेकांकडून लुबाडले गेले आहे. स्वत:चे स्त्रीपण अनेक पुरुषांकडून लुबाडले गेल्यामुळे ती स्वत:चे स्त्रीत्त्व नाकारते. अनेकांकडून होणारी स्त्री देहाची विटंबना पाहून ती पुरुष वेश धारण करून हिमालयात जाते. पुढे ती अलखनिरंजन साधूच्या सहवासात आल्यानंतर तिच्या स्त्रीत्त्वाच्या वृत्तीत आंतरबाह्य बदल होतो. जानकीचा स्त्रीत्त्वाबद्दलचा तिरस्कार संपून जीवनातील खरा आनंद तिला मिळतो आणि शेवटी ती मृत्यूला सामोरी जाते. यासंदर्भात रा. ग. जाधव म्हणतात, "या आदिम प्रकृतिरम्य जगाकडे जानकीची जीवनकथा अगदी सहजपणे वाटचाल करते. कारण जानकीला संस्कृतीचे कसलेच लाभ जसे लाभले नाहीत; तसे संस्कृतीचे तोटेही तिला अडवू शकले नाहीत. संस्कृतीचा गाभा स्त्री पुरुषसंबंधाच्या काही एका प्रतिष्ठित नात्यावर अधिष्ठित असतो. कन्या, पत्नी या जानकीच्या भूमिकांना कसलीच प्रतिष्ठा, कसलेच संरक्षण संस्कृती देऊ शकली नाही. तिची आई तिला व्यभिचाराला लावते, नवरा व्यभिचाराला लावतो. प्रत्यक्ष तिचा सासरा तिच्यावर अत्याचार करतो. संस्कृतिहीनतेचे हे सगळे जुलूम जानकीवर कडाडतात व म्हणूनच संस्कृतीचाच सूड घेण्यास ती उद्युक्त होते."[२] ( रा. ग. जाधव : निवडक समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००६, पृ. क्र. ४२) त्यांच्या 'अघोरी' या कादंबरीची नायिका पार्वती ही पाटलाची लाडकी सून आहे. पार्वती ही पद्मनी असल्याने अघोरी पाटलाकडे पार्वतीची मागणी करतो. परंतु पाटील त्यास विरोध करून अघोरीशी संघर्ष करण्यास तयार होतो. त्यामुळे स्वत:च्या शीलाचे रक्षण करण्यासाठी ती अघोरीच्या विरोधात हातात तलवार घेऊन लढण्यास सिद्ध होते.

नामदेव ढसाळांनी 'हाडकी हाडवळा' या कादंबरीतून दलित स्त्रीची व्यथा व्यक्त केली आहे. या कादंबरीतील प्रमुख पात्र बायजा आहे. बायजा दिसायला सुंदर असल्यामुळे गावातील सवर्ण तिच्याकडे आकर्षित होतात. त्यांच्या मनात तिच्या शरीराचा भोग घेण्याची इच्छा निर्माण होते. पण कुणीही तशी हिंमत करत नाही कारण बायजा स्वाभिमानी आहे. बायजाचे संपूर्ण जीवनच संघर्षमय आहे. हा संघर्ष तिला अनेक पातळ्यांवर करावा लागतो. ती बामनाच्या नाह्यारात जावून शेंगा तोडते तेव्हा राखनदार तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ती त्याच्याशी झुंज देते. स्वत:च्या चुलत सासूशी तिला संघर्ष करावा

लागतो. एवढेच नव्हे तर बायजाचा मुलगा सावळाहरी आणि महारवाड्यातील इतर मुले विष्णूपंताच्या विहिरीत आंघोळ करतात. त्यामुळे विष्णूपंत सावळाहरी आणि इतर मुलांना मारतो तेव्हा बायजा विष्णूपंताशी संघर्ष करते. बायजा शिलवान आहे पण तिचा दिर मनबा झोपेत तिच्यावर बलात्कार करतो तेव्हा ती पूर्णपणे बदलते आणि सूडाने पेटून उठते. यासंदर्भात डॉ. कमलाकर गंगावणे म्हणतात,''बायजाच्या माध्यमातून दलित स्त्रीचे जीवनदर्शन घडविले. अनेक दलित स्त्रियांना बायजासारखे जीवन जगावे लागते. बायजा ही दलित स्त्रीची प्रतिनिधी आहे.''[३] (डॉ. नंदा मेश्राम : दलित कादंबरी स्वरूप व समीक्षा, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, प्रथमावृत्ती २००६,पृ. क्र. १६८)

अशोक व्हटकर यांनी '७२ मैल' या कादंबरीतून ढोर आणि महार या दोन्ही जातीचे समाजातील नगन्य स्थान अधोरेखित केले आहे. या कादंबरीची नायिका राधाक्का आहे. या कादंबरीत राधाक्का आणि अशोक अचानक एकमेकांना प्रवासात भेटतात. राधाक्काला बायजी, भीमा, राणू, चंदर, सुंदर आणि विठ्ठल अशी सहा मुले आहेत आणि ह्या सहा मुलांसोबत तिचा शिरवळपासून ते पन्हाळ्यापर्यंतचा शंभरएक मैलाचा पायी प्रवास सुरू आहे. ह्या प्रवासात राधाक्का आणि अशोक यांची अडचण एकच आहे ती म्हणजे त्यांची आर्थिक परिस्थिती आणि हीन जात. ह्या कारणामुळे त्यांना पायी प्रवास करावा लागतो आणि ते एकमेकांचे सहप्रवासी होतात. या प्रवासात त्यांना अनेक अडचणींना समोर जावे लागते. त्यांना भीक मागून आपली भूक भागवावी लागते. राधाक्काच्या दारिद्र्यामुळे तिच्या तीन मुलांचा रस्त्यात मृत्यू होतो. कादंबरीच्या शेवटी अनेक संकटांना तोंड देणाऱ्या राधाक्काला स्वत:जवळ जपून ठेवलेले चारिष्याचे रत्न ओंजळभर शेवेसाठी मोडीत काढावे लागते तेव्हा ती म्हणते, ''आस्सुक्या, पोरांची मी निस्ती वज्जी घेटली, पर दुकन्यांचं वज्जं न्हाई घेता आलं...... आता तुमच्या पोटाच्या भुकेचं वज्जं घेती मी.... तू डोक्याचा हायीस...... कळता हायीस..... मला बोल लावू नगं.''[४] ( अशोक व्हटकर: ७२ मैल, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९८९, पृ. क्र. १०७) या कादंबरीतील राधाक्का ही अशिक्षित, अडाणी स्त्री आहे. तिच्या जीवनाचे तत्त्वज्ञान तिने कोणत्याही शाळेतून किंवा विद्यापीठातून शिक्षण घेऊन मिळवले नाही तर ते तत्त्वज्ञान तिने तिच्या अनुभवातून प्राप्त केले आहे. त्यातून तिची जीवनाविषयीची जाणीव निर्माण झाली आहे. ते अगदी साध्या शब्दात व्यक्त करण्याचे सामर्थ्य तिच्या ठिकाणी आहे. त्यामुळे ती जे वाक्य बोलते ते सामोरच्या व्यक्तीला विचार करायला लावणारे आहे.

उत्तम बंडू तुपे यांची 'झुलवा' ही कादंबरी जगन जोगतिणीच्या जीवनावर आधारित आहे. या कादंबरीची नायिका जगन जोगतिण आहे. जगन ही पारंपरिक मनोवृत्तीला छेद देणारी आहे. तिला जोगतिण म्हणून जीवन जगणे पसंत नाही. देवी यल्लम्मावर तिची श्रद्धा नाही आणि विश्वासही नाही. यल्लम्मा देवीमुळेच आपल्या आयुष्याची वाताहत झाली आहे हे तिला माहीत आहे. त्यामुळे या दु:खाचा भोगवटा आपल्या नशिबी नको असे तिला वाटते. आईसारखा झुलवा लावला तरी आपल्याला बायकोचा दर्जा प्राप्त होणार नाही तर उपभोग्य वस्तू म्हणून वावरावे लागेल हे तिला माहीत आहे. तिला शिक्षणाची आवड आहे. तिला एस.एस.सी. होऊन शिक्षिका किंवा नर्स व्हायचे आहे. परंतु तिच्या या स्वप्नाला सुरूंग लावण्याचे काम स्वत:ला प्रतिष्ठित म्हणवून घेणारे शाळेतील हेडमास्तर, जयंता यांच्याकडून

होते. त्यामुळे जगनला इच्छा नसतानाही पुढे जोगातिण बनावे लागते. समाजातील सर्व पुरुष तिच्या शरीराचे लचके तोडण्यास तयार होतात. ज्यामुळे तिला अमानुष अत्याचाराला आणि बलत्काराला तोंड द्यावे लागते. ज्या पब्यापासून तिचा जन्म होतो तो सुद्धा तिच्याकडे शरीर सुखाची मागणी करतो तेव्हा ती अस्वस्थ होते. आपल्याला या भोगवादी संस्कृतीपासून वाचता येत नाही आणि आपल्या सर्व दु:खाचे कारण देवी यल्लम्मा आहे हे तिला कळते तेव्हा ती देवी यल्लम्माचा मुखोटा माण नदीच्या पुरात फेकून देते. जगन ही धार्मिक साहित्य वाचणारी असली तरी ती एकदम बंडखोर बनते कारण परिस्थितीने तिला बंडखोर बनविले आहे. जोगतिणीच्या हीन जगण्याला कंटाळून जगन जोगतिणीचे जगणे नाकारते आणि देवीचा जग डोक्यावर घेऊन माण नदीच्या पुरात फेकून देते. देवीचे जग वाचविण्यासाठी येलू नदीच्या पुरात उडी घेते, पण येलू आणि देवाचे जग पुराच्या पाण्यात गडप होतात. या कादंबरीतील जगनच्या संदर्भात डॉ. नंदा मेश्राम म्हणतात, "आवडणाऱ्या व्यक्तीवर जीवापाड प्रेम करून, प्रामाणिक भावजीवन जगण्याचा प्रयत्न करूनही, आपल्या समाजातून आपली सुटका होत नाही किंवा होऊ देत नाही. आई यल्लम्मा तिचा मुखोटा, परंपरा हे काही खर नाही. याची सत्यासत्यता पटल्यामुळे जगन प्रस्थापित परंपरेला नकार देते. एक अनोखा बदल घडविते. या सगळ्याची गुंफण काथानकामध्ये वास्तववादीपणाने केलेली आहे. तसे पाहता या कादंबरीचा शेवट सेंद्रिय एकात्मता पूर्ण करतो. कथानकाचे एक वर्तुळ पूर्ण करतो. तसेच पारंपरिक वर्तुळाला छेदही देतो. चक्रव्यहातून बाहेर पडण्याचा एक मार्ग, कादंबरीकार उत्तम बंडू तुपे यांनी देऊन कथानकाचा शेवटही प्रभावी केला आहे. पारंपरिक पद्धतीच्या कथानकाचा शेवट डावलून ठोस निर्णय देऊन, एक नवी दिशा दिली आहे. एकूणच तुपे यांनी सामाजिक प्रश्न दुहेरी पातळीवर हातळला आहे.'"[५] ( डॉ. नंदा मेश्राम : दलित कादंबरी स्वरूप व समीक्षा, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, प्रकाशन, प्रथमावृत्ती २००६,पृ. क्र. २६७–२६८)

नामदेव कांबळे यांची 'राघववेळ','ऊनसावली' ही कादंबरी मांग समाजातील वालंबी या विधवेच्या जीवनावर आधारित आहे. वालंबी कष्ट करून आपल्या मुलांना वाढवते. तिला कौशी, रघू आणि सिताराम अशी तीन मुलं आहेत. वालंबी, कौशी आणि रघू या तीन मुख्य पात्राभोवती ही कादंबरी फिरताना दिसते. दारिद्र्य, उपासमार आणि परावलंबित्व यांच्याशी सतत झगडणाऱ्या वालंबीची ही कथा आहे. या कादंबरीची नायिका वालंबी दारिद्र्याशी झगडत आपल्या मुलाला रघूला मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण देते. रघू खूप मोठा शिकून साहेब होईल हे स्वप्न बघून ती नवऱ्यांच्या माघारी खूप कष्ट सोसणारी असल्यामुळे तिची इच्छा, जिद्द, सोशिकपणा आणि समजूतदारपणा रघूतही उतरला आहे. 'राघववेळ' या कादंबरीतील व्यक्तिरेखेचे आणि तिच्या जमातीचे मूल्यमापन करताना चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "राघववेळ ही वालंबी नावाच्या मांग जातीतील मातेची जीवनकथा आहे. तिची जीवनसरणी तिच्या जीवनातील व्यथांचा अविभाज्य भाग आहे, म्हणून ती मांग राहाटीचीही चित्रकथा आहे."[६] (चंद्रकांत बांदिवडेकर: देशी वाण, अक्षय प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २००२,पृ. क्र.४४२)

सारंश, साठोत्तरी दलित–आंबेडकरी कादंबरीकारांच्या कादंबरी लेखनातून आलेले स्त्री चित्रण हे वैशिष्ट्यपूर्ण आणि विविधांगी स्वरूपाचे आहे. या कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांमधून आलेली स्त्री चित्रणे केवळ मनोरंजन म्हणून आलेली नाहीत तर स्वत:च्या

व्यक्तित्वाचे आणि कर्तृत्वाचे ह्या सर्व व्यक्तिरेखा प्रभावी ठरल्या आहेत. भावना आणि बुद्धी या दोहोंचा वापर या स्त्री व्यक्तिरेखांची प्रभावीपणे केल्य आहे. या कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांमधून येणारी स्त्री रूपे असाहाय्य म्हणून आलेली नाहीत तर असाहाय्य परिस्थितीवर मात करून स्वतःचे भविष्य घडवू पाहणारी आहेत. त्यामुळे कादंबरीच्या यशस्वीतेत या स्त्री चित्रणाचा वाटा महत्त्वाचा आहे. म्हणूनच दलित—आंबेडकरी कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखांविषयी डॉ. सुशील्म डवे यांनी केलेले विधान अतिशय मार्मिक आहे. त्या म्हणतात, ''दलित कादंबरीतील स्त्री पात्रे विशेष प्रभावी दाखवलेली आहेत. विशेष व्यक्तिमत्त्व आणि बंडखोरीचे जीवन जगणाऱ्या या स्त्रियांना परिस्थितीने बंडखोर केले आहे.''७ (डॉ. सुशील्म डवे : मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००४,पृ. क्र. १९१)

**निष्कर्ष**

१) साठोत्तरी दलित—आंबेडकरी कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा ह्या आंबेडकरी विचाराने प्रभावित झालेल्या आहेत.

२) साठोत्तरी दलित—आंबेडकरी कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा स्वतःच्या जीवनाची व्यथा मांडून सामाजिक परिवर्तनाचा आणि नवीन मूल्यांचा स्वीकार करतात.

३) साठोत्तरी दलित—आंबेडकरी कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा प्रस्थापित व्यवस्थाविरूद्ध विद्रोह करतात आणि आत्मसंरक्षणासाठी खंबीरपणे लढा देतात.

४) साठोत्तरी दलित—आंबेडकरी कादंबरीतून साकार होणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा पारंपरिक मूल्यव्यवस्थेला छेद देणाऱ्या आहेत.

**संदर्भग्रंथ सूची**

१) डॉ.महेश खिरटकर: बाबूराव बागूल यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, प्रथमावृत्ती २००६, पृ.क्र.२१
२) रा. ग. जाधव : निवडक समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती,२००६, पृ. क्र. ४२
३) डॉ. नंदा मेश्राम : दलित कादंबरी स्वरूप व समीक्षा, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, प्रथमावृत्ती २००६,पृ. क्र. १६८
४) अशोक व्हटकर: ७२ मैल, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८९, पृ. क्र. १०७
५) डॉ. नंदा मेश्राम : दलित कादंबरी स्वरूप व समीक्षा, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, प्रथमावृत्ती २००६,पृ. क्र. २६७—२६८
६) चंद्रकांत खांदिवडेकर: देशी वाण, अक्षय प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती,२००२,पृ. क्र. ४४२
७) डॉ. सुशील्म डवे : मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००४,पृ. क्र. १९१

◆◆◆

# विद्यावार्ता



MAH/MUL/ 03051/2012

ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

**Oct. To Dec. 2020**
**Issue 36, Vol-02**

Date of Publication
01 Oct. 2020

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

13) सध्या परिस्थितीतले शिक्षण व शिक्षक आणि पालकांची भूमिका — एक ...
डॉ. शितल दिनकरराव अडगावकर, वर्धा ||59

14) झुलवा : जोगतिणींच्या जीवनाची ससेहोलपट
अमित वासुदेव गजभिये & डॉ. मनीषा नागपूरे, नागपूरे ||60

15) परंपरेचा ज्ञानदेव आणि ज्ञानेश्वरीतील ज्ञानदेव : समन्वय-अन्वय
प्रा.डॉ. वसंत रघुनाथ शेंडगे, जि.अहमदनगर ||64

16) इंग्रजी सुधारण्यासाठी खास टिप्स..
श्री. बाळासाहेब रघुनाथ चव्हाण, जिल्हा— पालघर ||68

17) समकालावर अचूक भाष्य करणारी विवेकी कविता: 'म्हणूनच शब्द हिंसक होतात'
डॉ. प्रतिभा जाधव, नाशिक ||73

18) "माझी शाळा — माझी टेकडी" या उपक्रमातून पर्यावरणीय मूल्यांची रुजवणुक ...
सुनील दत्तात्रय लोळगे & डॉ.चेतना सोनकांबळे, औरंगाबाद ||80

19) "प्राथमिक शिक्षण गुणवत्ता विकास अभियान" एक दिशादर्शक उपक्रम
सुनील दत्तात्रय लोळगे & डॉ.चेतना सोनकांबळे, औरंगाबाद ||83

20) भारत में समाजवादी आन्दोलन के इतिहास में जयप्रकाश नारायण की भूमिका
डॉ० गीता कुमारी, गया ||86

21) वेदकालीन स्त्रियों में कात्यायनी का महत्व
डॉ० कुमारी सुषमा सिन्हा, बोधगया ||90

22) प्राचीनकालीन भारतीय शिक्षण विधि : एक दृष्टि
डा० निर्भय कुमार, पटना ||93

23) प्रथम एवं द्वितीय विश्वयुद्ध के मध्य भारतीय कृषिकी स्थिति : एक ऐतिहासिक ...
डॉ० नूनू रजक, जिला — समस्तीपुर, बिहार ||95

24) शिक्षा का बदलता स्वरूप : ऑनलाइन शिक्षण
डॉ. नरेन्द्र पाल सिंह & डॉ. सुनील पंवार, मसूरी (उत्तराखंड) ||98

25) बिहार: 1942 ई० से आजादी तक
डा० नीलिमा कुमारी, बोधगया ||103

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

Oct. To Dec. 2020
Issue-36, Vol-02



घेत, त्याप्रमाणे आज प्रत्येक पालकांचे काम ते आपल्या मुलांना शिकवू शकतात आजच्या ह्या परिस्थितील सर्वात मोठी आणि महत्वाची भूमिका जर कोणाची असेल तर ती पालकांचीच आहे. आज जे मुलं आपल्या गावाकडे आहेत त्यांनी त्यांच्या शेतात काम करावं, किंवा त्यांच्या पालकांचा जो व्यवसाय आहे तो शिकून घेणे महत्वाचे ठरेल. पालकांनी मुलांना आपल्या व्यवसायातील खुबी शिकवाव्यात.

**१.८ मिळालेले शिक्षण स्वत:बरोबरच, कुटुंब, समाज व देशाच्या उपयोगी**

● सामाजिक विचारांची पेरणी करण्याची जबाबदारी शिक्षक— तंत्रज्ञानाद्वारे, तर पालक— प्रत्यक्ष करून घेऊ शकतात. सामाजिकरित्या आपसात अंतरे ठेवून जेव्हा आज आपण घरी आहोत तेव्हा ते अशा पद्धतीनं देणं, हे शिक्षण मुलांना भविष्यात नक्कीच उपयोगी ठरेल.

● कारण परिस्थिती बदलणार आहे. पुन्हा एकदा परिस्थिती पुर्ववृत होईल ही पण त्यातही आत्ता मिळवलेल्या, आपल्या जवळ असलेल्या ह्या ज्ञानाचा उपयोग नक्कीच होईल हे एकवीसावं शतक आपल्याला पुन्हा आपल्या घराण्यातील कला—कौशल्यांना आत्मसात करण्याची एक संधी देते आहे, असे संशोधीकेला वाटते. कारण जर असं शिक्षण घेतल्याने प्रत्येक जण गावात राहून, कौशल्यपूर्ण उत्पादन करून कुटूंब, समाज व देशाला उपयोगी ठरला तर शहरावरील अतिरिक्त ताण ही कमी होईल. तंत्रज्ञानाची जोड तर असेलच पण त्याचबरोबर कौशल्य आणि कौटुंबिक, सामाजिक स्वास्थही जोपासले जाईल.

**संदर्भग्रंथ सुची:—**

१) रघुवंशी, एल. एस. २००६ 'शिक्षण आणि समाज' पुणे, संपादक डॉ. चित्रा नाईक, इंडियन इंस्टीटयुट ऑफ एज्युकेशन, ३ एप्रिल २००६.

२) करंदीकर सुरेश (२००१) शैक्षणिक मानसशास्त्र कोल्हापूर, फडके प्रकाशन.

□□□



# झुलवा : जोगतिणींच्या जीवनाची ससेहोलपट

**अमित वासुदेव गवांगे**
संशोधक विद्यार्थी,
डॉ. म.वा. पी. डब्ल्यू. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

**डॉ. मनीषा नागपूरे**
मार्गदर्शक,
डॉ. म.वा. पी. डब्ल्यू. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

**प्रस्तावना**

उत्तम बंडू तुपे हे आपल्या साहित्यातून उपेक्षित आणि ग्रामीण जीवणाचे चित्र रेखाटणारे साहित्यिक म्हणून मराठी साहित्यविश्वाला ज्ञात आहेत. १९८० च्या कालखंडात दलित, शोषित, पीडित, वंचित आणि उपेक्षित समाजातील व्यथा, वेदनांना आपल्या साहित्याच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने उत्तम बंडू तुपे यांनी वाचा फोडली. त्यांनी तेरा कादंबऱ्यासह अनेक लघुकथांचे लेखन केले, परंतु त्यांची 'झुलवा' ही कादंबरी मराठी साहित्यविश्वात प्रचंड गाजली आणि ते झुलवाकार म्हणून ओळखले जाऊ लागले. याशिवाय त्यांच्या इजाळ (१९८४), झावळ (१९८४), झुलवा (१९८६), काळासी (१९८८), खाई (१९८८), चिपाड (१९८९), खुळी (१९९१), शेवंती (१९९१), भस्म (१९९१), लांबलेल्या सावल्या (१९९२), नाखारी (१९९३) आणि काळा (२००५) इत्यादी कादंबऱ्याही प्रसिद्ध आहेत. त्यांच्या अनेक कादंबऱ्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले. त्यांनी आंदण (१९८६), कोंबारा (१९९१), माती आणि माणसं (१९९३) आणि पिंड (१९९५) इत्यादी कथासंग्रहाचे लेखन केले. त्यांचे आत्मकथन 'काटयावरची

पेठ' या नावाने प्रसिद्ध आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून उपेक्षित, वंचित समाजाच्या व्यथा, वेदना चित्रित केल्या आहेत.

उत्तम बंडू तुपे यांची 'झुलवा' ही कादंबरी मराठी साहित्यविश्वात खूप गाजली. मला येगळ्या वाटेनं जायाचंय, ही मळल्याली वाट सोडून चालायचंय म्हणणाऱ्या यल्लम्मा देवीच्या कीर्तीचा बाजार मांडणाऱ्या आणि खोट्या दुनियेविरूद्ध प्राण पणाला लावून बंड करणाऱ्या जगण जोगतिणीची ही गोष्ट वाचकांना अंतर्मुख करणारी आहे. या कादंबरीचे चेतन दातार यांनी 'झुलवा' या नावाने नाटक लिहिले. वामन केंद्रे हे या नाटकाचे दिग्दर्शक व निर्माते होते. 'झुलवा: जोगतिणींच्या जीवनाची ससेहोलपट' या प्रस्तुत शोध निबंधात जोगतिणीच्या, देवदासीच्या जीवनाची होणारी ससेहोलपट समजून घेणे हा या शोध निबंधाचा उद्देश आहे.

**झुलवा : जोगतिणींच्या जीवणाची ससेहोलपट**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय समाजात शिक्षणाचा प्रसार फार मोठ्या प्रमाणात झाल्याने वैज्ञानिक युगात वाटचाल करत असताना धर्मश्रद्धेतून आणि अंधश्रद्धेतून अनेक समस्या निर्माण झाल्या. देवदासींच्या समस्येची बीजे भारतीय समाजामध्ये असलेल्या धर्मश्रद्धेत आणि अंधश्रद्धेत आहेत. भावीण, जोगतीण, मुरळी, जोगत्या, देवदासी या प्रकारात मोडणारे स्त्री–पुरूष देवाच्या नावावर जगत असतात. त्यांना देवाला सोडलेले असल्यामुळे गावगाड्यात आणि समाजात त्यांना कोणतेच महत्त्व राहत नाही त्यामुळे त्यांची आणि त्यांच्या जीवनाची वाताहत होते. देवदासीपणमुळे ज्यांच्या वाट्याला विविधांगी स्वरूपाचे दुःख येते. याच दुःखाचे स्वरूप उत्तम बंडू तुपे यांनी झुलवा या कादंबरीतून साकार केले आहे.

उत्तम बंडू तुपे यांच्या 'झुलवा' या कादंबरीचे कथानक जगण जोगतिणीच्या जीवनावर आधारित आहे. जगनची आई येलू ही गावाची जोगतिण असल्यामुळे तिला यल्लम्मा देवीची पूजा अर्चा करण्यासाठी सोडलेले असते. या येलूशी गावातील प्रतिष्ठित आणि उच्चवर्णीय असलेला पब्या झुलवा लावतो. पब्या आणि येलू यांची मुलगी जगन होय. जगन ही पारंपरिक मूल्यांना छेद देणारी आहे. तिला जोगतिण म्हणून जीवन जगणे पसंत नाही. देवी यल्लम्मावर तिची श्रद्धा नाही आणि विश्वासही नाही. यल्लम्मा देवीमुळेच आपली वाताहत झालेली आहे असे तिला वाटते. या दुःखाचा भोगवटा आपल्या नशिबी नको असे तिला मनोमन वाटते. आईसारखा झुलवा लावला तरी आपल्याला बायकोचा दर्जा प्राप्त होणार नाही तर उपभोग्य वस्तू म्हणून वावरावे लागणार आहे हे तिला माहीत आहे. तिला शिक्षणाची आवड आहे. तिला एस.एस.सी होऊन शिक्षिका किंवा नर्स व्हायचे आहे. तिला जोगतिणीच्या दारिद्र्यातून आणि दुःखातून मुक्त व्हायचे आहे. त्यामुळे ती आपल्या आईला येलूला म्हणते, "आये खरं सांगू? तुझी देवी जर इतकी सतपणानं वागती, तर आपल्याला भीक का मागाय लावती?"[१] **(उत्तम बंडू तुपे : झुलवा, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती १९९२, पृ. क्र. ४–५)** आपण जर देवीचे भक्त असू तर आपल्याला दारिद्र्यात का खितपत पडावे लागते असा प्रश्न जगन आपल्या आईला विचारते. ती पुढे म्हणते, "आये ज्या देवीसंगट तुझं लगीन झाल, देवीला तू अर्पण झाली, त्या देवीसंगट माझं बी लगीन लावणार? आये, जो तुझा न्हवरा, त्यो माझा हुणार. माय लेकीचा एक न्हवरा कसा गं?"[२] **(उत्तम बंडू तुपे : झुलवा, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती १९९२, पृ. क्र. ५)** जगनला पडणारे हे प्रश्न सनातनी समाजव्यवस्थेवर ताशेरे ओढणारे आहेत. त्यामुळे तिला एस. एस.सी होऊन शिक्षिका किंवा नर्स व्हायचे आहे पण तिच्या या स्वप्नाला सुरूंग लावण्याचे काम शाळेतील हेडमास्तर करतात. जगन शिकत असताना शाळेतल्या नाटकात भाग घेते म्हणून गावातील सभापतीचा मुलगा जयवंत जगनला नाटकात स्त्रीची भूमिका करण्यास आग्रह करतो. जगनने नाटकात काम केल्यानंतर हेडमास्तरची वाईट नजर जगनवर पडते. हेडमास्तरने जगनच्या पाठीवर ठेवलेला हात खाली खाली सरकत जातो. हेडमास्तर जगनला घरी बोलावतात याविषयी जगन म्हणते,'हेडमास्तरने घात केला. पुस्तक देतो, म्हण बोलावून घिटलं. त्याच्या मनासारखं झालं न्हाय. जयंताच्या माझ्या सलगीचा फायदा घेऊन त्यानं माझं नाव शाळंतनं काढलं"[३] ( **उत्तम बंडू तुपे : झुलवा, मॅजेस्टिक प्रकाशन,**

मुंबई, द्वितीयावृत्ती १९९२, पृ. क्र. ७१) याठिकाणी जगनचे शाळा शिकून शिक्षिका किंवा नर्स होण्याचे स्वप्न उद्ध्वस्त होते. शाळा सुटल्यामुळे ती जयंताबरोबर माळ्यात काम करू लागल्यामुळे तिची जयंताशी असलेली जवळीक वाढते. जयंताकडून ती गरोदर राहते. पण जयंता तिला नकार देतो त्यामुळे ती गर्भपात करून घेते. याठिकाणी तिचे पहिले प्रेम उद्ध्वस्त होते.

शिक्षण आणि प्रेम या दोन्ही ठिकाणी जगनची फसगत झाल्यानंतर तिला इच्छा नसताना पुढे देवदासी बनावे लागते. ज्या जयंतावर ती निस्सीम प्रेम करते तो तिला सोडून दिल्यानंतर तिच्या आयुष्याच्या वाताहतीला सुरुवात होते. पुढे तिच्या आयुष्यात किश्या येतो. तो तिला झुलव्या लावतो. पण बायकोचा दर्जा देत नाही त्यामुळे तिला देवदासीचे आयुष्य जगावे लागते. समाजातील सर्व पुरुष तिच्या शरीराचे लचके तोडण्यासाठी तयार होतात त्यामुळे तिला अमानुष अत्याचाराला आणि बलात्काराला तोंड द्यावे लागते. ज्या पम्यापासून तिचा जन्म होतो तो सुद्धा तिच्याकडे शरीर सुखाची मागणी करतो तेव्हा ती खूप अस्वस्थ होते. आपल्याला या भोगवादी समाजापासून वाचता येत नाही आणि आपल्या सर्व दुःखाचे कारण यल्लम्मा आहे हे तिला कळते त्यामुळे ती यल्लम्मा देवीचा मुखोटा मंदिरातून उतरवून माण नदीच्या पुरात फेकून देते. देवीचा मुखोटा वाचविण्याच्या प्रयत्नात येलूचा मृत्यू होतो. या संपूर्ण कादंबरीचे कथानक जोगतिणीच्या जीवनावर आधारित असले तरी त्याला दुसरे एक पैलू आहे आणि ते म्हणजे स्त्री शरीर होय. मुळात स्त्री असणे हीच जगनची समस्या आहे. तिला शिक्षण घेऊन शिक्षिका किंवा नर्स व्हायचे आहे पण समाजातील शोषक व्यवस्था तिला या दास्यातून मुक्त होऊ देत नाही. ती धर्मश्रद्धेची बळी ठरते म्हणून ती आपल्या आईला म्हणते, "आये तुझी यल्लमा घाल हागणदारीला! आये तिनं आपला नास केलाय"४ (उत्तम बंडू तुपे : झुलवा, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती १९९२, पृ. क्र. १४७) असे आईला सांगते. प्रस्थापित समाजव्यवस्थेतील धर्मश्रद्धेमुळे आपले जीवन उद्ध्वस्त झाले आहे याची तिला जाणीव आहे म्हणून ती यल्लम्माला नाकारते, पण तिला स्वतःचे स्त्रीपण नाकारता येत नाही. त्यापासून तिला मुक्त होता येत नाही. याचे तिला दुःख आहे. समाजातील लोक जोगतिणीचा, देवदासींचा शरीर सुखासाठी वापर करतात म्हणून येलूच्या आणि जगनच्या वाट्याला हे दुःख आले आहे. परंतु हे दुःख परशूच्या वाट्याला येत नाही. येलूच्या आणि जगनच्या वाट्याला येणारे हे दुःख धर्मश्रद्धेतून आलेले आहे. हा सामाजिक आशय तुप्यांनी आपल्या 'झुलवा' या कादंबरीतून कलात्मक शैलीने साकार केला आहे. परसू, रेणूका, पम्या, जयंता, किश्या, दारसी, दास्या या पात्रांच्या वास्तव चित्रणामुळे कादंबरी लक्षणीय झाली आहे. यासंदर्भात डॉ. किशोर सानप म्हणतात, "तुप्यांची प्रत्येक कृती वास्तवाचे दाहक दर्शन मांडणारी; परंतु कलात्मकतेची बांधिलकी स्वीकारून प्रवास करणारी आहे. वास्तव आणि कलात्मकता यांचा उचित समन्वय, तुपेंच्या झुलवाचे वैशिष्ट्य आहे."५ (डॉ. किशोर सानप : मराठी कादंबरीतील नैतिकता, बजाज पब्लिकेशन्स, अमरावती, प्रथमावृत्ती १९९८, पृ. क्र. ४२) या कादंबरीतील जगन जोगतिणीच्या हीन जगण्याला कंटाळून जोगतिणीचे जगणे नाकारते आणि देवी यल्लम्माचा जग डोक्यावर घेऊन माण नदीच्या पुरात फेकून देते. देवीचे जग वाचविण्यासाठी येलू नदीच्या पुरात उडी घेते; पण येलू आणि देवीचे जग पुराच्या पाण्यात गडप होतात. या कादंबरीच्या संदर्भात डॉ. नंदा मेश्राम लिहितात, "आवडणाऱ्या व्यक्तीवर जीवापाड प्रेम करून, प्रामाणिक भावजीवन जगण्याचा प्रयत्न करूनही, आपल्या समाजातून आपली सुटका होत नाही किंवा होऊ देत नाही. आई यल्लम्मा, तिचा मुखोटा, परंपरा काही हे काही खरे नाही. याची सत्यासत्यता पटल्यामुळे जगन प्रस्थापित परंपरेला नकार देते. एक अनोखा बदल घडविते. या सगळ्याची गुंफण कथानकामध्ये वास्तववादीपणाने केलेली आहे. तसे पाहता या कादंबरीचा शेवट सेंद्रिय एकात्मकता पूर्ण करतो. कथानकाचे एक वर्तुळ पूर्ण करतो. तसेच पारंपरिक वर्तुळाला छेदही देतो. चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचा एक नवा मार्ग कादंबरीकार उत्तम बंडू तुपे यांनी देऊन, कथानकाचा शेवटही प्रभावी केला आहे.

पारंपरिक पद्धतीच्या कथानकाचा शेवट डावलून ठोस निर्णय देऊन; एक नवी दिशा दिली आहे. एकूणच तुपे यांनी सामाजिक प्रश्न दुहेरी पातळीवर हाताळला आहे.'"(डॉ. नंदा मेश्राम: दलित कादंबरी स्वरूप व समीक्षा, डिंपल प्रकाशन, ठाणे, प्रथमावृत्ती २००६, पृ. क्र.२६७–२६८)

उत्तम बंडू तुपे यांच्या झुलवा या कादंबरीच्या केंद्रस्थानी जगन आहे. तिला जोगतिणीचे जीवन टाकून देऊन माणसासारखे जीवन जगायचे आहे. यासाठी ती प्रस्थापित समाजातील धार्मिक रूढीविरुद्ध बंड करताना दिसते. जगनला किष्णापासून मुलगी होते. ती आजारी पडते तेव्हा जगनची आई येलू तिला देवीचा भंडारा लावण्यास सुचविते पण जगन त्यास नकार देते कारण देवीच्या भंडाऱ्यामुळेच तिच्या आयुष्याचे वाटोळे झाले आहे त्यामुळेच ती देवीचा मुखोटा नदीत फेकून देते. जगन ही धार्मिक साहित्य वाचणारी असली तरी ती एकदम बंडखोर बनते कारण तिला परिस्थितीने बंडखोर बनविले आहे.

उत्तम बंडू तुपे यांनी झुलवा या कादंबरीमध्ये अनेक प्रतिमांचा, प्रतीकांचा आणि रूपकांचा वापर केला आहे त्यामुळे त्यांच्या कादंबरीमधील प्रतिमांचा, प्रतीकांचा आणि रूपकांचा वापर हा वेगळ्या अभ्यासाचा विषय होऊ शकतो. 'तुटून पडलेली बकऱ्या–कोंबड्यांची मुंडकी गोळा करून भरावित, तसं सगळं मुखोटं घमेल्यात भरलं' (पृ.क्र.६), 'परसूच्या अंगातली देवी कर्णाच्या हातानं सगळ्यांना दान वाटत हुती.'(पृ.क्र.१९), 'सोन्याचं अंडं देणारी कोंबडी जवळ आसता उपाशी मरायचं, म्हंणी काय?'(पृ.क्र.) अशा अनेक वाक्यांमुळे तुपेंचे लेखन प्रत्ययकारी झालेले आहे.

सारांश: उत्तम बंडू तुपे यांच्या झुलवा या कादंबरीतील सवर्ण पुरुषांचा जोगतिणींकडे पाहण्याचा दृष्टिकोन भोगवादी आहे. जोगतिणी या स्वैर स्त्रिया आहेत त्यामुळे कुणीही त्यांचा उपभोग घेतला पाहिजे अशी त्यांची वृत्ती आहे. त्या जोगतिणींना झुलवा लावणारे पुरुष हे सवर्ण आहेत. त्यात एकही दलित पुरुष नाही त्यामुळे सवर्ण पुरुषांची जोगतिणींकडे पाहण्याची भोगवादी वृत्ती आणि जोगतिणीच्या जीवनाची होणारी ससेहोलपट यांचा परस्पर संबंध उलगडून दाखवणारी ही कादंबरी आहे.

निष्कर्ष

१) उत्तम बंडू तुपे यांची झुलवा ही कादंबरी जोगतिणीच्या जीवनावर आधारित आहे.

२) 'झुलवा' या कादंबरीची नायिका जगन ही जोगतिण असली तरी ती पारंपरिक मनोवृत्तीला छेद देऊन विज्ञानवादी दृष्टिकोन बाळगणारी आहे.

३) 'झुलवा' या कादंबरीतील सवर्ण पुरुषांचा जोगतिणींकडे पाहण्याचा दृष्टिकोन भोगवादी आहे.

४) जोगतिणी या स्वैर स्त्रिया आहेत त्यामुळे कुणीही त्यांचा उपभोग घेतला पाहिजे अशी सवर्ण समाजातील पुरुषांची वृत्ती आहे.

५) 'झुलवा' या कादंबरीतून सवर्ण समाजाच्या बुरसटलेल्या विचारांचे दर्शन घडते.

संदर्भसूची

१) उत्तम बंडू तुपे : झुलवा, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती १९९२, पृ. क्र. ४–५

२) उत्तम बंडू तुपे : झुलवा, पृ. क्र. ५

३) उत्तम बंडू तुपे : झुलवा, १९९२, पृ. क्र. ७३

४) उत्तम बंडू तुपे : झुलवा, १९९२, पृ. क्र. १४७

५) डॉ. किशोर सानप : मराठी कादंबरीतील नैतिकता, बजाज पब्लिकेशन्स, अमरावती, प्रथमावृत्ती १९९८, पृ. क्र. ४२

६) डॉ. नंदा मेश्राम: दलित कादंबरी स्वरूप व समीक्षा, डिंपल प्रकाशन, ठाणे, प्रथमावृत्ती २००६, पृ. क्र.२६७–२६८

□□□

# समकालीन स्त्रीवादी साहित्य प्रवाहातील नव्वदोत्तर स्त्रीवादी कथा

**डॉ. मनीषा नागपुरे**

*सहयोगी प्राध्यापक (मराठी विभाग), डॉ. म.वा.पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय, नागपूर.*

*भ्रमणध्वनी ९८२३१५३००२*

**प्रस्तावना**

स्त्रीवादी साहित्याचा एक स्वतंत्र प्रवाह मराठीत विसाव्या शतकात साठोत्तर कालखंडात नव्याने रूजल्यावर स्त्री लेखिकांना अस्सल स्त्रीवादी शैली आणि स्त्रीचे अस्सल जगणे मांडण्यासाठी स्त्रीवादी चळवळींनी आत्मबळ आणि पाठबळ पुरविले स्त्रियांच्या लेखनाकडे स्वतंत्रपणे पाहण्याची वाचक आणि टीकाकारांची दृष्टीही विकसित झाली. स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह स्त्रीवादी चळवळीतून स्वतंत्रपणे आकाराला येवू लागला. विभावरी शिरूरकरांनी पहिल्यांदा स्त्रीलेखनाच्या पारंपारिक अभिजात गृहिणीपणाला शह देत समाजातल्या स्त्रियांच्या वाट्याला येणारा अन्याय—अत्याचार मानसिक गुलामगिरी पुरूष वर्चस्व इत्यादींचा वास्तव समाचार घेणारे साहित्य समाजासमोर ठेवले येथूनच पुढे स्त्रियांनाही आपल्या जीवनाचे वास्तव आणि सत्य मांडण्याची प्रेरणा मिळाली. परिणामी स्त्रीवादी साहित्याचे वास्तववादी आणि स्वतंत्र स्त्री प्रतिमाविश्व स्वयंभाषा आणि शैलीसह मराठीच्या साहित्य आणि संस्कृतीच्या प्रातांत साकार होवू लागला. कथा—कादंबरी, आत्मचरित्र आणि कवितेच्या माध्यमातून स्त्रीवादी साहित्यात आपल्या स्वतंत्र प्रतिभा दृष्टिचा आणि भिन्न स्त्रीवादाचा स्त्रीवादी स्वयंभू शैलीचा प्रत्यय देणाऱ्या अनेक लेखिका निर्माण होवू लागल्या. यामध्ये गौरी देशपांडे, मेघना पेठे, सानिया, प्रिया तेंडुलकर, कविता महाजन, अनुराधा पाटील, मलिका अमर शेख, नीरजा, प्रतिभा जोशी, प्रज्ञा दया पवार, मोनिका गजेन्द्रगडकर, प्रतिमा इंगोले, अनुराधा गुरव, माधुरी शानबाग यासारख्या अनेक लेखिकांनी आपल्या साहित्यातून समकालीन वास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. बदलत्या परिस्थितीचा अविष्कार स्त्री लेखनातून प्रकट होवू लागला. साहित्याच्या प्रत्येक प्रांतात स्त्रियांनी आपला वेगळा ठसा उमटविला आहे. कथेच्या प्रांतात ही विपूल लेखन करून त्यांनी आपल्या विविध अनुभवांना वाट मोकळी करून दिलेली आहे.

नव्वदोत्तर कालखंडात सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पातळीवर बदल घडून आले त्याचबरोबर स्त्रियांच्या विश्वातही प्रचंड बदल घडून आले. जीवनमूल्यांपेक्षा, मानवी मूल्यांपेक्षा अर्थव्यवस्थेला केंद्रस्थानी ठेवले जाऊ लागले. या कालखंडात ग्रामीण स्त्री, शहरी स्त्री, उच्चशिक्षित स्त्री, कामगार स्त्री, शेतकरी स्त्रिया, दलित स्त्री या सर्वच स्त्रियांच्या जीवन

जाणिवा स्त्री कथाकारांच्या कथांमधून व्यक्त झालेल्या आहेत. नव्वदोत्तर कालखंडातील जीवन जाणिवा घेवून लेखन करणाऱ्या कथा लेखिकामध्ये विशेषत्वाने मेघना पेठे, नीरजा, प्रज्ञा दया पवार, उर्मीला पवार, माधुरी शानबाग, रेखा बैजल, प्रतिभा इंगोले, प्रतिमा जोशी, सानिया, मोनिका गजेन्द्रगडकर यांच्या कथांमधून ग्रामीण, शहरी, दलित, कामगार, उच्चशिक्षित, अल्पशिक्षित स्त्रियांच्या भावविश्वात घडून आलेले बदल प्रामुख्याने चित्रित झाले आहे.

नव्वदोत्तर कालखंडात जी विशिष्टता आहे. ती म्हणजे अर्थकेंद्रित समाजव्यवस्था या अर्थकेंद्रिततेमुळे व्यक्तीचे मुल्य कमी व्हायला लागले व स्त्रीकडे एक भोगवस्तू किंवा प्रदर्शनातील वस्तू म्हणूनही बघण्याचा एक दृष्टीकोन नव्याने जन्मास आला आधीच्या धर्मांधतेची जागा नवधर्मांधतेने घेतली विविध पातळ्यावर स्त्रीचे भावविश्व बदलत असतांना कधी हतबल झालेली स्त्री, कधी निराश झालेली स्त्री, तर कधी आपले अस्तित्व शोधणारी स्त्री यांचे चित्रण संदर्भित कथा—लेखिकांच्या कथांमधून आले. नव्वदोत्तर कालखंडातील मेघना पेठे या अत्यंत महत्त्वाच्या कथालेखिका आहेत. 'हंस अकेला' आणि 'आंधळ्याच्या गायी' हे दोन कथासंग्रहातील त्यांच्या कथा या स्त्रीकेंद्री आशय बीजाच्या आहेत. स्त्रीच्या शरीर आणि मानसिक अनुभवविश्वाचे धीट, धाडसी आणि मोकळे वर्णन—चित्रण—निवेदन या कथांमध्ये आहेत. आजच्या काळात स्त्री—पुरूषांच्या वाट्याला येणारे उदास, भकास, एकटेपण, तुटलेपण त्यांच्या कथात येत राहते पुरूषी सत्ता नाकारणाऱ्या आणि स्त्री आहे म्हणूनच स्वतंत्रपणे जगणाऱ्या पारंपारिक चौकटीत न वावरणाऱ्या नायिका मेघना पेठे यांच्या कथेत येतात, मेघना पेठे याची कथा माणसातील विविध प्रवृत्तीच्या शोध घेण्याचा प्रयत्न करते 'समुद्री चोहीकडे पाणी', 'हो आवे लागे' 'आएँ कुछ' 'अब्र' 'आस्था आणि गवारीची भाजी' या कथांमधील स्त्रिया धीट आहेत. विवाहसंस्थेला, कुटुंबसंस्थेला नकार देत आपल्या शारीरिक गरजा पूर्ण करीत एकटेपणाने, निर्भयपणे जगणे स्वीकारणाऱ्या आहेत या कथांमधून लेखिका पारंपारिक भारतीय विवाहसंस्था, कुटुंबसंस्था याविषयीची साधक—बाधक चर्चा—चिकित्सा करीत राहते तर स्त्री—पुरूषांमध्ये लिंगभाव निरपेक्ष आत्मियतेचे संबंध का असू नये असा सवाल अप्रत्यक्षरित्या काही कथात येतो. मेघना पेठे यांची कथा बंडखोर आहे. स्त्रीच्या नव्या मुक्त निर्भय आणि स्त्रीला माणूस म्हणून स्वीकारणाऱ्या नव्या व्यवस्थेचा ध्यास त्यांच्या कथेला आहे.

जागतिकीकरणातील संपर्क क्रांतीचा, माध्यमक्रांतीचा अभिरूचीतील बदलांचा, लैगिंग सुख विकत घेण्याच्या लालसेचा कामपिपासू विकृतींना आलेल्या जीवनधारणांच्या रूपांचा फार मोठा परिणाम वेश्यावस्ती, देहविक्रय व्यवसाय, वेश्यांचे जीवन यावर झाला वेश्यांच्या वेश्यावस्तीच्या, देहविक्रयाच्या व्यवसायाच्या एकूणच पर्यावरणाचे चित्रण एखादा अपवाद वगळता आजच्या मराठी कथेत आढळतच नाही. पण स्त्री कथाकारांमध्ये प्रतिमा जोशी यांच्या जहन्नम, 'तेरावी गल्ली', 'नग्नसत्य', 'सत्यकाम जाबाली' या कथांमध्ये मात्र वेश्यांच्या

जीवनाचे वास्तव चित्र रेखांकित झाले आहे. त्याच्या जहन्नम या कथेत देहविक्रयाच्या बाजारात अल्पवयीन तरूणींना कसे विकल्या जाते त्यांचे कसे शोषण होते याचे वास्तवदर्शी चित्रण आहे. तर त्यांच्या 'दरी' या शीर्षकाच्या कथेत वेश्या व्यवसायाचा अखील भारतीय पातळीवरचा भव्य पट आला आहे. वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचे जग त्यांनी कुशलतेने चितारले आहे आणि त्या स्त्रियांच्या मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न त्या करतात.

जागतिकीकरणाच्या एकूणनच प्रक्रियेचा गंभीर परिणाम कामजाणिवा, कामविचार, कामविकृती यावर झाला कामसंबंधाचे व्यावयायिकरण नव्हते असे मुळीच नाही. वेश्या आणि देहविक्रयाची प्राचीन परंपरा येथे आहेतच परंतु स्त्रीला मादी समजून तिच्यावर लैगिंग अत्याचार करण्याच्या घटना गेल्या दशकभरापासून संवेदनशील मनांना अस्वस्थ करणाऱ्या हादरून सोडणाऱ्या आहेत. तर दुसरीकडे मुक्त लैगिकतेचे स्त्रोत माजले आहेत. तर प्रज्ञा दया पवार यांची 'तिघाडा' ही कथा यासंदर्भात महत्त्वाची ठरते. एकाहून अनेक जणांसोबत लैगिक सुख घेण्याच्या आजच्या विचित्र मानसिकतेचे चित्रण या कथेत केले आहे. बदलेली समाजव्यवस्था उच्चभ्रू, उच्चशिक्षित समाजातील नैतिकतेचा पाश प्रज्ञा दया पवार यांनी सैल केला. आंबेडकरी विचारांच्या चौकटीबाहेर निघून त्यांची कथा व्यापक अशा स्त्रीप्रश्नांचा वेध घेते. नव्वदोत्तरी कालखंडातील महानगरीय बदललेले जीवन, सुशिक्षित, मध्यमवर्गीय माणसातही कायम असलेल्या व खोल रूजलेल्या भयाण जातजाणिवा आणि समकालीन सामाजिक वास्तव प्रज्ञा पवार प्रखरपणे मांडते. महानगरातले समकालीन वास्तव इंटरनेट, सोशल मिडिया, नेटसर्फिंग, चॅटिंग यातून आकारास आलेले तरूण—तरूणीचे नवे भावविश्व चितारणारी 'टग्ट् अगेन' ही कथा आहे. इंटरनेटवर चॅटिंग करणाऱ्या स्त्री—पुरूषांने एकमेकांना समजून घेतांना श्लील—अश्लीलतेच्याही पलीकडे जाण्याची मानसिक तयारी ठेवावी लागते. ही कथा समकालीन सामाजिक—सांस्कृतिक पर्यावरणाच्या एक वेगळा पैलू दाखविणारी आहे.

प्रतिमा इंगोले या ग्रामजीवनावर लेखन करणाऱ्या सक्षम कथालेखिका त्यांनी आपल्या कथांमधून सक्षम कथालेखिका त्यांनी आपल्या कथांमधून प्रामुख्याने ग्रामजीवनाचा शोध आणि वेध घेतलेला आहे. त्यांचे आयुष्य हे ग्रामजीवनाशी निगडीत असल्यामुळे ग्रामीण बोलीभाषेचा समर्पक वापर करीत त्याची कथा ग्रामव्यवस्थेवर भाष्य करते. ग्रामजीवनातील आजचे राजकारण, समाजकारण, धर्म, संस्कृती आणि कृषीजीवन यांचा मागोवा प्रतिभा इंगोले आपल्या सशक्त लेखणीतून चितारतात.

अनुराधा गुरव यांनी सुद्धा आपल्या कथांमधून नवदोत्तर कालखंडात कृषीव्यवस्थेची आणि कृषीजीवनाची जी वाताहात झाली त्याचे चित्रण आपल्या कथांमधून मांडले तर रेखा बैजल या कथालेखिकेने ग्रामीण कुटुंबाची झालेली वाताहात आणि त्याच्या वाट्याला आलेल्या

समस्या अधोरेखित केल्या आहे. त्याची कथाही ग्रामजीवनाचा, तेथील पर्यावरणाचा व त्यात झालेल्या बदलांचा सुक्ष्मपणे वेध घेतांना दिसते.

निरजा या सुद्धा अलीकडच्या काळातील महत्त्वाच्या कथाकार आहेत त्यांचे 'जे दर्पणी बिंबले' 'ओल 'हरविलेली माती' 'पावसात सूर्य शोधणारी माणसे' हे तीन कथासंग्रह आहेत. निरजा यांच्या कथेचे एक वैशिष्ट्य असे की समकालीन वास्तवाच्या पार्श्वभूमीवर स्त्री—पुरूष संबंधाचे विविध पैलू, स्तर, अत:स्तर त्या सारे काही संयमाने व धाडसीपणे तपासतात निरजा यांची 'सुशांतचा सोळावा वाढदिवस' ही कथा समकालीन वास्तवाचा वेगळा पापुद्रा दाखविणारी आहे. आजच्या मुक्त वातावरणात आई, वडील, मुलगा, मुलगी या साऱ्यांचे संबंध अगदी मित्र—मैत्रिणीसारखे असावेत इंटरनेट, मॉल, पॉपरॉक, पफ, मल्टिफ्लेक्स या काळात मॉडर्न विचारांनी खुलेपणाने जगण्याचा प्रयत्न करतांना मागच्या पिढीच्या हातूनही कशा अक्षम्य चुका होतात त्याचेच दर्शन या कथेत घडते. आशयद्रव्याच्या दृष्टीने आजच्या मराठी कथेच्या प्रवाहात नीरजा यांच्या महत्वपूर्ण ठरतात. वाचकाला अस्वस्थ करीत विचार प्रवृत्त करण्याचे सामर्थ्य नीरजा यांच्या कथेत आहे. वैचारिकता व वैचारिक जाणिवेने संपन्न अशा नायिका हे नीरजाच्या कथेचे वैशिष्ट्य आहे. 'ओल हरवलेली माती' ही कथा वेगळ्या थाटणीची आशयपूर्ण कथा आहे. या कथेतील फातिमा बी ही स्त्री फार वेगळी आहे. ती दु:खी आहे मानसिक आणि शारिरीक पातळीवर तिचे दु:ख कुणाला कळलेले नाही. ही कथा वाचकाला अस्वस्थ करते पण ही अस्वस्थता शब्दात सांगता येत नाही या कथेविषयी संजय भास्कर जोशी लिहितात. "अभिव्यक्तीत गोंधळलेली वाटणारी ही कथा अशा तऱ्हेने नीरजाच्या अनाग्रही आणि अनिर्णायक शैलीमुळे वाचकाला विचारात टाकते. आव्हान देते नकळत फातीमा बीची कहाणी एखाद्या भव्य शोंकातिकेसारखी होते."[४]

नव्वदोत्तर कालखंडाच्या अवकाशाचा विचार केल्यास मध्यमवर्गीय स्त्रिया मोठ्या प्रमाणात रोजगार आणि नोकऱ्या करायला लागल्या. स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणाऱ्या नायिका सानिया यांच्या कथांमधून दिसून येते. सानियाची कथा स्त्रीकेंद्री आणि स्त्रीवादी आहे. आपल्यावर आलेल्या जबाबदाऱ्या पार पाडत कधी खिन्न होत कधी हताश होत पण पुढे निराशेतून बाहेर पडून आपली नवीन वाट चोखळण्याचा प्रयत्न करणारी नायिका त्यांच्या कथेत दिसते. सानिया यांनी स्त्रीची होणारी कुंचबना, दु:ख मनोव्यापाराच्या पातळीवर जावून चितारले आहे. नव्वदोत्तर कालखंडातील महत्त्वाच्या कथालेखिका म्हणून त्यांचा अंतर्भाव करावा लागेल.

मोनिका गंजेन्द्रगडकर या समकाळातील महत्त्वाच्या कथालेखिका आहे. 'भूप' 'आर्त' आणि 'शिल्प' हे तीन कथासंग्रह त्यांचे आहेत. मोनिका गजेन्द्रगडकर यांची कथा समकालीन मराठी कथेचा एक आश्वासक सूर आहे. त्यांच्या कथा वाचकांच्या मनावर खोल ठसा उमटविणाऱ्या आहेत. मानवी नातेसंबंधाची वीण या कथांतून उकलण्याचा प्रयत्न त्या करतात

त्यांच्या कथांची भाषा आशयद्रव्यास साजेशी अशी आहे. स्त्री अस्मितेचा आणि अस्तित्वाचा वेध आपल्या कथांमधून त्या घेतात. स्त्री–पुरुष नातेसंबंध त्यांचे भावजीवन, हळूवारता उत्कटता, नात्यातील घट्ट वीण ही सारी वैशिष्ट्ये त्यांच्या कथेतून दृग्गोचर होतात. स्त्रीच्या मनातील घालमेल, व्याकुळता, उत्कटता, भावनाशीलता याचा शोध त्या घेतात त्याच्या कथेविषयी अनंत देशमुख लिहितात, "मोनिका गजेन्द्रगडकर यांच्या अठरा दीर्घकथांमधून आणि 'उगम' या कादंबरी मधून एका प्रगल्भ, रसिक, जीवन–विषयक सूक्ष्म चिंतनवृत्ती असणाऱ्या, विविध कला प्रकारांविषयी जाणकारी असणाऱ्या एखाद्या शोभादर्शकाच्या वेगवेगळ्या कोनांतून कावचित्रे पाहावीत तसे जीवनाच्या अनेकानेक शक्यता आणि त्यातील प्रश्न जाणू शकणाऱ्या कथात्मलेखनावर निर्विवादपणे हकूमत असलेल्या रचना प्रकाराचे विविध प्रयोग करण्याची क्षमता असलेल्या आणि चित्रमय काव्यास व प्रवाहशैली ज्याला जन्मजात मिळाली आहे अशा कलावंताचे दर्शन आपल्याला होते."[५]

समकाळचे सजग भान ठेवून कथा लिहिणारी लेखिका म्हणून माधुरी शानबाग यांचा उल्लेख महत्त्वाचा आहे. बदलत्या विज्ञान दृष्टीचा विचार करून त्यांनी विज्ञानकथेचे दालन समृद्ध केले नव्वदोत्तर कालखंडाचे अत्यंत महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तंत्रज्ञानाचा विकास, संगणक व इतर तंत्रज्ञानाच्या विविध साधनांमुळे मानवी जीवनाला नवे आयाम व जीवन जगण्याची नवी दिशा प्राप्त झाली इंटरनेटच्या माध्यमातून माहितीचा स्फोट होवून सर्व माहिती माणसाला सहज उपलब्ध होवू लागली नव्या विचारांना सुरूवात झाली या साऱ्या गोष्टीचे पडसाद माधुरी शानबाग यांच्या कथेत उमटलेले दिसून येतात. तंत्रज्ञानाच्या प्रचंड झालेला विकास त्याने मानवी जीवनाच्या समृद्धतेत केलेली वाढ हे दाखवित असतांना इंटरनेटच्या अतिरेकी वापराचे दुष्परिणामही त्या चित्रीत करतात त्यांच्या विज्ञानकथा लेखन हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे मल्लीका अमर शेखनेही आपल्या कथांतून अस्पर्श विषयाला हात लावण्याचा प्रयत्न केला.

समकालीन स्त्रीकथाकारांनी दर्जेदार अशी लक्षणीय मराठी कथा लिहिल्याचे दिसते. प्रज्ञा दया पवार, नीरजा, मेघना पेठे, मोनिका गजेन्द्रगडकर, प्रतिमा जोशी, उर्मिला पवार या स्त्री कथाकारांनी आजच्या मराठी कथेला निर्णायक असे वळण दिले आहे. या कथालेखिकांनी आपल्या कथांमधून स्पर्धात्मक, स्वार्थकेंद्री आणि बदललेल्या मानवी दृष्टिकोनाचा शोध घेतला आहे. आजचे जग हे दिखावटीचे प्रदर्शनाचे आणि तितकेच स्वार्थकेंद्रिततचे आहे अशा जगाचे सशक्त चित्रण या कथालेखिकांनी आपल्या कथांच्या माध्यमातून केले आहे.

समकालीन वास्तवात स्त्रीची होणारी वेगवेगळ्या पातळीवरील कुचंबना या लेखिकांच्या कथांचा विषय झालेला आहेच पण स्त्रीकेन्द्री प्रश्नांच्या पलीकडे जावून व्यापकपणे बदलणारे सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण कवेत घेणारी नवी कथा या लेखिकांनी धीटपणे आणि

कलापूर्णरीतीने साकार केली आहे. या स्त्रियांनी कथेच्या माध्यमातून सिद्ध केलेली वाङ्मयीन प्रयोगशीलता देखील कथेला नवी उर्मी देणारी आहे. या लेखिकांच्या कथा समकालीन स्त्री प्रतिमेचे जसेच्या तसे दर्शन घडविण्यातही यशस्वी ठरल्या आहेत. वैशिष्ट्यपूर्ण निवेदनतंत्र, कथानकाच्या गरजेनुसार मांडणी, प्रभावी कथा—थाट आणि आशयाशी सुसंगत अशी शैली व भाषा यामुळे या काळातील कथालेखिकांनी कालच्या कथेपेक्षा वेगळी, वैशिष्ट्यपूर्ण अशी कथा लिहिली. समकालीन मराठी कथेच्या प्रवाहात या स्त्री कथाकारांचे योगदान मोठे आहे.

नीरजा या कथालेखिका समकालीन वास्तवाविषयी लिहितात, “या देशातल्या लोकांना अफूच्या गोळ्या घ्याव्यात तशा गोळ्या दिल्या जात आहेत. पैसा आणि समृद्धिची गोळी, धर्माची गोळी, आरक्षणाची गोळी या आणि अशा गोळ्या चघळत नशेत जगणारी माणसं जरा कुठ खुट्ट झालं की खळ्ळ खट्याक् करायला तयार असतात त्यांना नाही आवडल पुस्तक तर ते काढणाऱ्या हातांवर विस्तव ठेवतात ते पुस्तकाची होळी करतात, वस्तुची नासधूस करतात. नाही वाटल एखाद्या श्रद्धास्थान आपलं तर मूळापासून उखडून आपली वीट बसवतात घट्ट गाड्या जाळतात त्यातील माणसांना जिवंत जाळतात आणि मग त्यांचा बदला म्हणून ज्यांना जाळलंय त्याचे लोक जाळणाऱ्या लोकांच्या बायकाची गर्भाशयचं उखडून टाकतात. एकमेकांना जिवंत जाळण्याचा, एकमेकांना नेस्तनाबूत करण्याचा खेळ चालू आहे. अनेक वर्ष आणि प्रत्येक जण त्यात प्रत्यक्षपणे नाही अप्रत्यक्षपणे हिरिरीने भाग घेतो चांगले दिवस म्हणजे काय हेच न कळलेला माणूस आभासी जगात जगते आहे आणि त्या आभासाचा मागेच आहे. साऱ्या जगण्यातूनच हरवलेला माणुसकीचा ओलावा, विचार करण्याची आणि तारतम्य बाळगण्याची वृत्ती गमावत चालल्याने आलेल हताशपणे घेवून माझ्यातला लेखक मग साद घालत राहतो. काळजातून प्रत्येकाला माणसामाणसांच्या संबंधातला ओलावा हरवून जाईल अशी मनं घडत असण्याचा हा कठीण काळ आणि या काळातलं माझं जगणं मला अस्वस्थ करीत राहत”[६] ही अस्वस्थता थोड्याफार फरकाने आजच्या सर्वच साहित्यिक, कलावंताची आहे. समकालीन वास्तवाने दिलेले हे अस्वस्थपण या लेखक कलावंताना जीवनाकडे माणसांकडे, नात्याकडे, विचारांकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारे आहे. हे अस्वस्थपण नव्या सकस दर्जेदार लेखनाची उर्मी देणारे आहे आजची समकालीन स्त्रीवादी मराठी कथा देखील या प्रक्रियेला उपवाद नाही.

**संदर्भ ग्रंथ व टीपा**

*१) डॉ. महाजन वंदना — स्त्रीवाद आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती २०१३.*

*२) डॉ. शोभणे रविंद्र — जागतिकीकरण, समाज आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर.*

*३) डॉ. शोभा पाटील — स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.*

**Volume 13** (Issue.13),
April, 2022

ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

- A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS
IMPACT FACTOR

**7.26**

**Editor**
**Dr. R. V. Bhole**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email- rbhole1965@gmail.com Visit-www.jrdrvb.com

ISSN-2230-9578

**Journal of Research and Development**
**Volume 13 (Issue 13) April, 2022**

सम्पादक –
प्रा. डॉ. आर. व्ही. भोळे
संपादकीय कार्यालय
Journal of Research and Development
C/o Dr. V. J. Patil, 'Prajyot', Plot No. 8, Survey No. 101/2,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425002

१) सम्पादन – प्रकाशन एवं संचालन अवैतनिक
२) कला साहित्य संस्कृती समाज इतिहास राजनिती एवं आर्थिक विषयों पर केंद्रीत शोधपत्र आमंत्रित है।
३) जर्नल ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट में प्रकाशित शोध/विचार पत्रों में व्यक्त चिन्तन एवं दृष्टीकोन सम्बधित लेखकों के है। उससें जर्नल का सहमत होना आवश्यक नही है।
४) सदस्यता फार्म एवं नियमावली अंक के अंतिम पृष्ट पर देखे।
५) जर्नल ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट का प्रकाशन प्राध्यापकों को प्राध्यापकों के द्वारा, प्राध्यापकों के लिए एक अव्यावसायिक सहयोगी प्रयास।
६) सदस्यता शुल्क का भुगतान नगद मनी ऑर्डर व्दारा जर्नल ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट जलगांव के पतेपर भिजवाए।
७) मराठी भाषाके शोध पत्र प्रकाशित किए जाएगे।
८) इस शोध पत्रिका को प्रकाशित करते हुए पुर्ण सावधानी बरती गई है। फिर भी किसी प्रकारकी त्रृटि के लिए सम्पादक प्रकाशक मुद्रक जिम्मेदार नही होगा। समस्त विवादों का न्यायक्षेत्र जळगांव होगा।
९) जर्नल ऑफ रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट में प्रकाशनार्थ प्राप्त होने वाले शोधपत्रो का चयन एव उनकी स्वीकृती । अस्वीकृती का निर्णय सम्पादन मंडल द्वारा लिया जाता हैं।

**EDITORIAL BOARD**

1) Prof. Andrew Cherepanov, Detroit, Michigan (USA)
2) Dr. R. K. Narkhede, Nanded
3) Principal Dr. J. B. Anjane, Ainpur
4) Dr. Suresh Phule, Latur
5) Dr. G. S. Sao, Raigarh (C.G.)
6) Prof. R. J. Varma, Bhavnagar (Guj.)
7) Prof. P. P. Ladhe, Muktainagar
8) Dr. S. B. Gaikwad, Miraj
9) Dr. D. D. Sharma, Shimla (H.P.)
10) Dr. Venu Triwedi, Indore (M.P.)
11) Dr. Vandana S. Chaudhari, Jalgaon
12) Dr. Kaveri Dabholkar, Bilaspur (C.G.)
13) Dr. Jadhao Subhash P. (Washim)

## कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव

## सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपुर

ता. रावेर, जि. जळगांव

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑनलाईन

# राष्ट्रीय चर्चासत्र

# आधुनिक मराठी साहित्यातील बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा

दिनांक १६ मार्च २०२२

**संपादक मंडळ (विशेष अंकासाठी)**

प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने
प्रा. डॉ. रेखा पी. पाटील
प्रा. एम. के. सोनवणे

**प्रकाशक**

प्राचार्य, सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपुर

| Sr. No | Title | Page |
|---|---|---|
| 14 | बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट<br>प्रा. डॉ. संजय शांताराम पाटील | 78 |
| 15 | गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा<br>प्रा. उज्वला नामदेव जानवे | 83 |
| 16 | आधुनिक मराठी कादंबरीतील बदलते सामाजिक जीवन : मुल्ये आणि जाणिवा<br>डॉ. संदिप जोतीराम भुयेकर | 88 |
| 17 | आधुनिक मराठी कादंबरीतील बदलते सामाजिक जीवनमुल्ये आणि जाणिवा<br>विकास नामदेव लोंढे | 94 |
| 18 | आधुनिक मराठी कादंबरीतील बदलती सामाजिक मुल्ये आणि जाणिवा<br>साधना सुखदेव जाधव | 98 |
| 19 | कुसुमाग्रजांच्या कवितेतील सामाजिक मुल्ये आणि जाणिवा<br>डॉ. शकुंतला मिठाराम भारंबे | 100 |
| 20 | एक समाभिमूख लेवा साहित्यिक : अरविंद नारखेडे<br>डॉ. रेखा पाटील, डॉ. सिंधू भंगाळे, श्री. संदीप मोतीराम पाटील | 106 |
| 21 | आधुनिक मराठी नाटकातील बदलते सामाजिक जीवनमूल्ये व जाणिवा<br>रोहन सुखदेव आपटे, अभिषेक भास्कर पाटील | 113 |
| 22 | नव्वदोत्तर मराठी कथेतील नव जाणिवा<br>प्रा. डॉ. सौ. वीरा पवन मांडवकर | 117 |
| 23 | बनगरवाडी : ग्रामीण समाज जीवन<br>प्रा. पंकज रघुनाथ देवरे | 122 |
| 24 | आधुनिक मराठी साहित्यातील विविध प्रवाहानुसार बदलते सामाजिक जीवन मुल्य आणि जाणिवा<br>प्रा. वंदना महाजन | 126 |
| 25 | नव्वदोत्तर मराठी कथेतील बदलते सामाजिक जीवन मूल्ये आणि जाणिवा<br>डॉ. मनिषा नागपुरे | 130 |
| 26 | बा. सी. मर्ढेकरांच्या कादंबऱ्यातील सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा<br>डॉ. प्रज्ञा राजेश निनावे | 139 |
| 27 | सातपुड्यातील आदिवासी समाज जीवन आणि संस्कृती<br>साळवे कल्पना सुदास | 145 |

Journal of Research & Development
Vol. 13 (Issue 13), April, 2022
(ISSN-2230-9578)


# नव्वदोत्तर मराठी कथेतील बदलते सामाजिक जीवनमूल्ये आणि जाणिवा

डॉ. मनीषा नागपुरे
प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
डॉ.म.वा.पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय, नागपूर

**प्रस्तावना -**

कथा या वाङ्मयप्रकाराचे मूळ प्राचीन लोकसाहित्यात शोधता येते. महानुभव वाङ्मयातही कथा या वाङ्मय प्रकाराची सूत्रे गवसतात. कथा लेखन किंवा कथा सांगणे आणि कथा वाचन किंवा कथा ऐकणे या सांस्कृतिक प्रक्रिया आहेत. साधारणपणे नव्वदीच्या दशकाच्या प्रारंभी आधुनिक मराठी कथेची शताब्दी साजरी झाली. तत्पूर्वी म्हणजे 1986 मध्ये, प्रा.म.द. हातकणंगलेकर यांचे 'मराठी कथा रूप आणि परिसर' हे पुस्तक प्रकाशित झाले. त्यातील 'लघुकथा' या पहिल्या लेखात ते लिहतात, "लघुकथा या वाङ्मय प्रकाराचा जागतिक इतिहास जेमतेम शंभर दीडशे वर्षांचा आहे. तरी देखील आज जगातील सर्वात अधिक लोकप्रीय असा वाङ्मय प्रकार आहे." [1]मराठी कथेला फार प्राचीन अशी परंपरा लाभली आहे. त्यामुळे मराठी प्रातांत तर मराठी कथा लोकप्रीय असावी असे वाटणे स्वाभाविक आहे. 1980 च्या दशकापर्यंत मराठी कथेची स्थिती खरोखरीच उत्तम होती. पण जगात लोकप्रीय असणारा हा वाङ्मय प्रकार महाराष्ट्रात 1985 च्या पुढच्या काळात मृत्यू पंथाला लागला असे म्हटले गेले आणि ते काही प्रमाणात खरेही आहे. 1994 मध्ये म.सु.पाटील यांनी 'मृत्यु पंथाला लागलेली मराठी कथा' या लेखात या वाङ्मय प्रकाराबाबत बरीच चिंता व्यक्त केली आहे. ते लिहितात, "कथाकार भरपूर आहेत पण चांगल्या कथांचा मात्र तुटवडा आहे. आजचे बरेचसे कथा लेखन एकतर कच्चा मालासारखे आहे वा उपयोगाच्या मालासारखे आहे. वाचकाच्या सर्जक कल्पनाशक्तीला वाव देणारी आणि त्या प्रक्रियेत त्याला स्वरुपाचा आणि त्याच्या जीवनाचा साक्षात्कार घडविणारी कथा मात्र दुर्मिळ होत चालली आहे. चंगळवादी बनत चाललेल्या समाजाला अशा कथेचा अभाव भासण्याची शक्यताही कमी आहे. एखाद्या समाजाने संवेदनशीलतेच्या अंगाने बधीर होत जाणे हे जर एक प्रकारचे मरण असेल तर त्या समाजातील कला प्रकारही जिवंत राहू शकणार नाहीत, हे ओघानेच येते. पण ही चिंता फारशी कोणास दिसत नाही." 2

जागतिकीकरणाच्या प्रभावाच्या पहिल्या दशकात कथेच्या अस्तित्वाचीच काळजी वाटावी अशी स्थिती होती. आधुनिक काळात कथा या वाङ्मयप्रकाराला प्रतिष्ठा आणि लोकप्रियता मिळवून देण्याचे ऐतिहासिक कार्य महाराष्ट्रात नियतकालिकांनी केले. 1995 नंतर मात्र मराठी वाङ्मयीन नियतकालिकांची बरीच पडझड झाल्याचे दिसते. याच काळात अनेक सामाजिक चळवळी संथ झाल्याचे चित्र दिसते. एकूणच सामाजिक-सांस्कृतिक जीवन तळागाळातून बदलले त्याचा परिणाम काही प्रमाणात लेखन वाचन प्रक्रियेवर झाला.

परिवर्तनाच्या या गतीमान चक्रात कथा या वाङ्मय प्रकाराची बरीच पडझड झाली. 1985 नंतर सामाजिक सांस्कृतिकदृष्टया बदलाच्या गतीमान प्रक्रियेत कथा लेखन आणि कथा वाचन या दोन्ही प्रक्रिया मंदावल्या. जागतिकीकरणाची प्रक्रिया अर्थकारणासह एकूण सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणाला प्रभावित करीत होती. 2000 नंतरच्या काळातले चित्र फारच वेगळे आहे. 2000 नंतर नवी वाङ्मयीन नियतकालिके आली. अनेक दिवाळी अंकानेही कथेचे भरण पोषण केले. या दशकात जगातील व भारतातील विविध भाषांमधील दर्जेदार कथा मराठी भाषेत आणण्याचे कार्य जोमाने सुरू झाले. तर दुसरीकडे बदललेल्या सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणाला भिडणारी नवी मराठी कथा नियतकालिकांसह अन्य माध्यमातूनही वाचकापर्यंत पोहचत आहे. सदानंद देशमुख, जयंत पवार, मोनिका गजेन्द्र गडकर, प्रज्ञा दया पवार, निरजा, मेघना पेठे, प्रतिभा जोशी, जी.के. ऐनापुरे, सतीश तांबे, कृष्णा खोत, कृष्णा किंबहुने, उर्मिला पवार, अशोक कोळी, किरण गुरव, पद्माकर पाटील, संजय भास्कर जोशी, रविन्द्र शोभणे, संजीव लाटकर, मनस्विनी लता रविन्द्र, आसाराम लोमटे, गणेश आवटे, विजय पाडवळकर, प्रशांत बागड, अभिराम भडकमकर, मोहन पाटील, गणेश मतकरी, मधुकर धर्मा पुरीकर, सचिन कुंडलकर, पंकज कुरुलकर, सिद्धार्थ देवधेकर, मिलिंद बोकील, सुमेध वडावाला, यासारखे आणि असे कितीतरी कथाकार नव्या जीवजाणिवांचे पीळ आणि पैलू टिपणाऱ्या जागतिकीकरणानंतरचे महानगरीय, ग्रामीण आणि एकूनच सारे पर्यावरण कवेत घेणारी सशक्त आशय बीजाची कथा लिहित आहेत. 1990 नंतर मागच्या पीढीचे रंगनाथ पठारे, आशा बगे, विलास सारंग, राजन गवस, राजन खान, भारत सारगडे यासारख्या काही कथा लेखकांनीही आजच्या सामाजिक पर्यावरणाशी अनुबंध राखणारे दर्जेदार कथा लेखन केले आहे. नवे सांस्कृतिक पर्यावरण नवी कथा कवेत घेत आहे.

एखाद्या विशिष्ट काळातील साहित्याचे स्वरुप समजून घ्यायचे असेल तर त्या काळातील समाजवास्तवही समजून घ्यावे लागते. माणूस आणि त्याचा समाज यांना वेगळे करुन कोणत्याही साहित्याचा विचार करता येणार नाही. खरेतर साहित्याचा निर्माताच मुळी हा कोणत्यातरी समाजाचा घटक असतो तो ज्या समाजात जन्मतो, वाढतो, राहतो त्याचे

प्रतिबिंब त्याच्या आकलनानुसार दृष्टीनुसार कमीअधिक स्वरुपात उमटणे स्वाभाविकच असते म्हणून ज्या काळात तो असतो, निर्मिती करीत असतो, त्या काळातील सामाजिक राजकीय आर्थिक परिस्थिती आणि तत्कालीन सांस्कृतिक पर्यावरण त्याला स्वत:ला आणि समाजालाही काही संस्कारीत करीत असते. यातूनच त्याची मानसिकता तयार होत असते.

नव्वदोत्तर कालखंडात भारतातच नव्हेतर जागतिक पातळीवर अनेक स्थित्यंतर घडून आलीत. नवे आर्थिक धोरण भारताने स्वीकारले जागतिकीरणाच्या गतीमान प्रक्रियेत दोन दशकापेक्षा अधिक काळ आपण सारे जगत आहोत या प्रक्रियेने या देशातील सामाजिक राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक अशी सारी क्षेत्रे प्रभावित केली.

जागतिकीकरणाच्या गतीमान प्रक्रियेने जीवन, भाषा, संस्कृती, अभिरूची सारे काही तळामूळातून बदलले आणि त्याचा एक परिणाम म्हणजे कथेचा भाषिक अवकाश, आशयद्रव्य, रचना हे सारे बदलले. जयंत पवार यांची कथा या संदर्भात लक्षणीय ठरली आहे. जयंत पवार यांच्या कथा लेखनाच्या अनेक सामर्थ्यापैकी एक म्हणजे त्यांची सिनेमॅटिक शैली हे होय. 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर' चा कथा संग्रहातील काही कथा सिनेमॅटिक तंत्रशैलीने लिहिल्या गेल्या आहेत. या शिवाय अभिराम भडकमकर यांच्या 'चुडैल' या कथा संग्रहातील आणि गणेश मतकरी यांच्या 'इन्स्टॉलेशन्स' या कथा संग्रहातील काही कथा सिनेमॅटिक तंत्रशैलीने लिहिल्या आहेत. जयंत पवार यांचे आणखी एक सामर्थ्य असेकी, प्राचीन कहाण्यांचा भाषिक रुपबंध आणि आजचे व्यामिश्र जीवन यांचे अनोखे मिश्रण त्यांनी केले आहे. आशयद्रव्य आणि रचना या दोन्ही पातळयावर हे फ्युजन आजच्या मराठी कथेला उपकारक ठरणार आहे. आजच्या काळात अगदी वळणावरची मराठी कथा लिहिणारा हा लेखक आहे.

त्याच्या संदर्भात रणधीर शिन्दे लिहितात, "नव्या मराठी कथेची घडण करणारा कथा लेखक म्हणून जयंत पवार यांची ओळख निर्माण झाली आहे हे अगदी खरे आहे.

जयंत पवार यांची चंदूच्या लग्नाची गोष्ट ही कथा महानगरातल्या एका अलक्षित वास्तवावर प्रकाश टाकणारी आहे. चंदू हा मध्यमवर्गीय कामपिपासू तरूण राजेश्वरी नावाच्या एका वेश्येच्या प्रेमात पडतो आणि ती नको म्हणत असतांनाही तिच्याशी लग्न करतो. पण पुढे संसारात खटके उडतात एकदा तो तिला मारतो तेव्हा ती म्हणते, "ये मर्द है या हैवान, साली शादी कया कर ली भडवे का भगवान बन गया" पुढे ती त्याला लाथ मारून निघून जाते. बाईपण वैश्यापण यांची कारूण्य पूर्तता, लग्न संस्थेविषयीचे नवे प्रश्न, पुरुष असणे, पती असणे, म्हणजे स्वैराचार असा अर्थ असतो का ? या आणि अशा कितीतरी प्रश्नांची गुंतावळ या कथेत आहे. प्रथम वेश्या, नंतर पत्नी आणि नंतर परागंदा परित्यक्ता झालेल्या राजेश्वरीला साऱ्या जगाचे भल्या मोठया लिंगात रुपांतर झाले असते

वाटण्याचे आणि पर्यायाने तमाम वेश्यांचा वाटयाला आलेल्या देहभोगाचे वेदना व्याकुळ अनुभव अधोरेखित करणार आहे.

समकालातील संवेदनशून्य क्रूर राजकारण, समाजकारण, अर्थकारण आणि संवेदनहीन स्वार्थी समाज यांचे चित्रण जयंत पवार यांच्या 'फिनिक्सच्य राखेतून उठला मोर' या कथा संग्रहातून आले आहे.

एक दिवस फिनिक्स मिलला आग लागते आणि मिल बेचिराख होते मग तेथे उभा राहतो एक पंचतारांकित मॉल आणि कामगारांची पार दैनावस्था होते. श्याम या मॉलमधून एक पस्तिस रुपये किंमतीची अंडर विअर चोरतांना सापडतो आणि बेदम मार खावून प्राण गमावतो. जागतिकीकरणासोबत आलेले व्यावसायिक झगमगाटीचे चंगळवादी क्रूर जबडे आणि त्यात कचाकच खाल्ली जाणारी हताश, गरीब, भुकेली माणे असे अत्यंत भयावह करूण वास्तव या कथेत आले आहे.

जयंत पवार याच्या सर्वच कथा वैशिज्यपूर्ण आहे. भाषा, निवेदनतंत्र, संवाद, आशयद्रव्य, रुपबंध या साऱ्या घटकांचा समकालीन समाज वास्तवाच्या ऐरणीवर नवा विचार करणारा हा कथाकार आहे.

जागतिकीकरणाच्या एकूणच प्रक्रियेचा गंभीर परिणाम, कामजाणिवा, कामविचार, कामविकृती यावर झला हे नाकारता येणार नाही. कामसंबंधाचे व्यावसायिकरण नव्हते असे मुळीच नाही. वेश्या आणि देहविक्रयाची प्राचीन परंपरा येथे आहेच. परंतु पूर्वी कधी नव्हता एवढा क्रूर विचार आता निर्माण झाला आहे. स्त्रीला मादी समजून तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्याच्या घटना गेल्या दशकभरापासून संवेदनशील मनाला अस्वस्थ करणाऱ्या व हादरुन सोडणाऱ्या आहेत. दुसरीकडे मुक्त लैंगिकतेचे स्त्रोत माजले आहेत. कुटूंबाचा संस्कारशील चौकटीतील कामसंबंध समकालीन चंगळवादी, उपभोगवादी, वातावरणात मुक्त लैगिंकतेपर्यंत, समूह लैंगिक संबंधापर्यंत आणि त्याहीपुढे संवेदनशून्य, विचारशून्य, खरेदी विक्रिच्या हिडिस विकारापर्यंत पोहोचले आहे. या बदलाची गंभीर चर्चा एखाददोन अपवाद वगळता मराठी कथेला करता आली नाही.

प्रज्ञा दया पवार यांची 'तिघाडा' ही कथा या संदर्भात महत्त्वाची ठरते. एकाहून अनेक जणांसोबत लैगिक सुख घेण्याच्या आजच्या विचित्र मानसिकतेचे चित्रण या कथेत केले आहे. सतीश तांबे यांची 'माझी लाडकी पुतना मावशी' ही कथा देखील हिडीस चंगळवादाची आणि आसूरी लैगिंक विकृतीचे चित्रण करणारी आहे.

जागतिकीकरणातील संपर्क क्रान्तीचा, माध्यम क्रांतीचा, अभिरूचीतील बदलांचा लैंगिक सुख विकत घेण्याच्या लालसेचा, कामपिपासू विकृतींना आलेल्या जीवन धारणांच्या रूपांचा मोठा परिणाम वेश्या वस्ती, देह विक्रय व्यवसाय, वेश्यांचे जीवन या वर झाला.

प्रतिमा जोशी यांच्या जहन्नम, तेरावी गल्ली, नग्न सत्य, सत्यकाम जबाली या काही कथांमध्ये मात्र वेश्यांच्या जीवनाचे वास्तव चित्रित झाले आहे. देहविक्रयाच्या बाजारात अल्पवयीन तरूणींना कसे विकल्या जाते, त्यांचे कसे शोषण होते याचे वास्तवदर्शी चित्रण जहन्नम या कथेत आले आहे. प्रतिमा जोशी यांच्या 'दरी', वितळलेली उन्हे' 'तेरावी गल्ली' रस्त्यावर या कथा या संदर्भात महत्त्व पूर्ण ठरतात.

जी.के.ऐनापुरे यांचे 'खगोल' आणि 'कांदाचिर' हे दोन कथासंग्रहातून जातिवास्तव कीती भिषण व भयावह आहे यांचे चित्र उभे राहते. ऐनापुरे यांची कथा महानगराला चिकटून असणाऱ्या गावातील, वस्त्यातील दरिद्री माणसांचे जगणे, त्यातील साऱ्या ताण्याबाण्यासह चित्रित करते. ऐनापुरे यांची कथा पांढरपेशा समाजाला न दिसलेले वास्तव मांडतात.

निरजा या आजच्या काळातील महत्त्वाच्या कथाकार आहेत. त्याचे 'जे दर्पणी बिंबले' "ओल हरवलेली माती' 'पावसात सूर्य शोधणारी माणसे' हे तीन कथासंग्रह आहे. समकालीन वास्तवाच्या पार्श्वभूमीवर स्त्री-पुरुष संबंधाचे विविध पीळ, पैलू, स्तर, अंतस्तर सारे काही संयमाने पण धाडसीपणे तपासते.

मनस्विनी लता रविन्द्र यांच्या कथा देखील आजच्या परिस्थितीत वेगळया ठरल्या आहेत. समकालीन समाज वास्तवाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या सर्व कथा फार बोलक्या ठरल्या आहे. प्रज्ञा दया पवार यांच्या कथासंग्रहातील 'तिघाड', 'विहार', 'एक्झिट टॉड अगेन', 'अ-संवाद' या काही कथा समकालीन वास्तवाची निरनिराळी रूपे थेट जशीच्या तशी दाखविणाऱ्या आहेत. प्रज्ञा दया पवार यांची कथा आजची महत्त्वाची कथा आहे विषय, आशय द्रव्यरूप बंध आणि भाषा हे चारही घटक आजच्या वास्तवाशी नाते ठेवणारे आहेत. मोनिका गजेन्द्र गडकर या समकाळातील महत्त्वाच्या कथा लेखिका आहेत. 'भूप' 'आर्त' आणि 'शिल्प' हे तीन कथासंग्रह त्यांचे आहेत. 1996 ते 2020 या कालखंडातील अठरा कथा या तीन संग्रहामध्ये आहे. गजेन्द्र गडकरांच्या कथांचे मुख्य वैशिष्टये म्हणजे त्यांच्या कथामध्ये वाचकाला अस्वस्थ करण्याचे प्रचंड सामर्थ्य आहे. जात, धर्मसंस्कृती, नातेसंबंध, व्यवस्था, जगणे, रुढी, परंपरा या आणि अशा अनेक घटकांविषयीच्या अनुत्तरीत प्रश्नांचे मोहोळ या कथांमधून वाचकांच्या मन आणि मेंदूल शिरते. ही अवस्था वाचकाला माणूस म्हणून, वाचक म्हणून, रसिक आस्वादक म्हणून, अभ्यासक म्हणून समृद्ध करीत जाते.

मेघना पेठे यांचे हंस अकेला, आंधळया ॰ीचगायी हे दोन कथासंग्रह आहेत. या दोनही संग्रहातील बारा कथा स्त्री केन्द्री आशय बीजाच्या आहेत. स्त्रीच्या शरीर आणि मानसिक अनुभव विश्वाचे धीट, धाडसी आणि मोकळे वर्णन-चित्रण निवेदन, या कथांमध्ये आहे. आजच्या काळातील स्त्री-पुरुषाच्या वाटयाला येणारे उदास, भकास, एकटेपण,

तुटलेपण, त्यांच्या कथात येत राहते. पुरूषी सत्ता नाकारणाऱ्या आणि स्त्री आहे म्हणूनच स्वतंत्रपणे जगणाऱ्या पारंपारिक चौकटीत न वावरणाऱ्या नायिका पेठे यांच्या कथेत भेटतात. 'समुद्री चोहीकडे पाणी', 'हो आवे लागे' 'आएँ कुछ अब्र' 'आस्था आणि गवारीची भाजी' या कथांमधील स्त्रिया कुटुंबाची चौकट मोडून घर सोडून एकटे राहण्याचा निर्णय घेणाऱ्या आहेत. विवाह संस्थेला, कुटुंब संस्थेला नकार देत आपल्या शारीरिक गरजा पूर्ण करीत एकटेपणाने निर्भयपणे जगणे स्वीकारणाऱ्या आहेत. स्त्रीच्या नव्या मुक्त, निर्भय आणि स्त्रीला माणूस स्वीकारणाऱ्या नव्या व्यवस्थेचा ध्यास या कथेला आहे. म्हणूनच ही कथा रूढ प्रवाहापेक्षा वेगळी आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा गंभीर परिणाम पारंपारिक शेती, गावगाडा, यावरही झाला. समाजाचे अर्थ कारण बदलले की राजकारण, सांस्कृतिक परिस्थिती आणि समाजकारणही बदलते. याबदलाच्या आर्वतात तळपातळीवरची माणसे गरगरतच राहतात. त्यांचे जगण्याचे प्रश्न सुटतच नाहीत उलट ज्या जीवनधारणा मूल्ये त्यांनी आयुष्यभर सांभाळली असता ती देखील कोलमडून पडतात. जमीनदोस्त होतात. गावगाडयाच्या या पडझडीचे चित्रण आणि त्यातून माणूसपणाच्या संवर्धनाचे प्रयत्न करणारी कथा सदानंद देशमुख, आसाराम लोमटे, गणेश आवटे, अशोक कौतिक कोळी, रवीन्द्र शोभणे या आणि आणखी काही मोजक्या कथाकारांनी लिहिली आहेत.

सदानंद देशमुख यांचे लंचाड, उठवण, महालूट, रगडा, खुंदळघास, गाभुळगाभा हे सहा कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. या सहा संग्रहात एकूण 61 कथा आहेत. देशमुख यांची कथा 1990 नंतरच्या बदलल्या ग्रामीण वास्तवाची वेगवेगळी रुपे चित्रित करते. कोंडीत सापडलेल्या मुस्कटदाबी झालेल्या शेतकऱ्याला व्यापारीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, बाजारीकरण आदी संकल्पनाच्या परीघात येणाऱ्या यंत्रणा सतत लुबाडत राहिल्या. या स्थितीत सापडलेला अगतिक शेतकरी सदानंद देशमुख यांच्या काही कथांचा नायक आहे. बबन सातपुते, पंडितराव, भानुदास चिवटे, रम्श, शिवा, देवीदास, तुकारामबुवा, वामन आणि नर्मदा, जनार्दन आणि सिंधू, नारायण, सुनंदा, कैलास, राजू नकाते, ज्योती, निर्मळा, मदनराव या आणि अशा अनेक स्त्री पुरुष व्यक्तीरेखा देशमुखांच्या कथेत येतात. त्यात आत्महत्या करणारा शेतकरी, राजकारण्यांच्या मागे नोकरीसाठी फिरणारा शेतकऱ्यांचा मुलगा, लग्नाच्या खर्चाचा बोजा आपल्या गरीब बापावर पडू नये म्हणून आत्महत्या करणारी तरुणी. मालकाच्या अत्याचाराला बळी पडलेली शेतमजूर स्त्री, प्राध्यापकांच्या नोकरीसाठी भटकणरा शेतकऱ्यांचा मुलगा, शेतकऱ्यांच्या आर्थिक शोषणाविरुद्ध संघर्ष उभा करणारा शेतकरी अशी कितीतरी शेतकरी स्त्री पुरुषांची रुपे सदानंद देशमुखांच्या कथामध्ये येतात. व वाचकाला अस्वस्थ करीत राहतात.

आसाराम लोमटे हे आजचे आघाडीचे कथा लेखक आहेत. त्यांचे 'इडा, पीडा टळो' आणि 'आलोक' हे दोन कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. बदलत्या समाजवास्तवाशी लोमटे यांच्या कथेचे नाते आहे. 'इडा पीडा टळो' या संग्रहात सहा कथा आहेत. या सर्वच कथांना समकालीन राजकारण, अर्थकारण, समाजकारणाचा संदर्भ आहे. 'होरपळ' या कथेत दलित-सवर्ण संघर्षाचे चित्रण आहे. राजकारणाच्या सत्ताकेन्द्री खेळात सामान्य माणसांचे जीवन होरपळून कसे निघते, त्याचे चित्रण ही कथा करते. तर त्यांच्या आलोक या संग्रहात समूहाच्या जगण्याच्या कथा आहेत. आसाराम लोमटे यांच्या कथेला समाज वास्तवाचा भलामोठा कॅनव्हास लाभला आहे. माणसे समाजात जगतात, माणसाच्या जगण्याचे चित्रण करतांना लोमटे समाजाचेही सूक्ष्म चित्रण करतात. त्यामुळे त्यांची कथा समूहाच्या जगण्याची कथा होते. समकालीन कथेच्या प्रवाहात लोमटे यांची समूहकेन्द्र कथा वेगळी आणि महत्त्वाची ठरली आहे.

अशोक कोळी यांचे 'कूड' आणि 'आसूड' हे दोन कथासंग्रह आहेत. जागतिकीकरणाच्या नव्या प्रक्रियेतही शेतकरी आणि गावगाडा होरपळूनच निघतो आहे. या शेतकऱ्यांच्या होरपळण्याला, संघर्षला वेदनांना विद्रोहाचे गतिशील परीणाम देण्याचा प्रयत्न अशोक कोळी यांची कथा करते.

किरण गुरव यांच्या कथा ग्रामजीवनाची रुपे चित्रीत करणाऱ्या आहेत. विशेषत: ग्रामीण स्त्रीच्या जगण्याचा पोत व पदर ते सूक्ष्मपणे त्यातील ताण्याबाण्यासह टिपतात.

जयंत पवार, सदानंद देशमुख, आसाराम लोमटे, प्रज्ञा दया पवार, नीरजा, मोनिका गजेन्द्र गडकर, जी.के. ऐनापुरे, प्रतिमा जोशी, मेघना पेठे, मनस्विनी, लता रविन्द्र, किरण गुरव, अभिराम भडकमकर, गणेश मतकरी, अशोक कोळी या आजच्या आघाडीच्या काही कथाकारांसह अनेक कथाकार आज सशक्तपणे वेगळया आशयाचे चित्रण करणारी नवी उत्तम, दर्जेदार कथा लिहीत आहेत. एकूणच आजच्या मराठी कथेचे चित्र निराशाजनक नाही. निबंधाच्या मर्यादित अवकाशात प्रत्येकाच्या कथांचा स्वतंत्रपणे विचार करणे अशक्य आहे. म्हणून हा थोडक्यात आढावा घेतला आहे.

या कथेच्या संदर्भात काही नोंदी आणि निष्कर्ष पुढील प्रमाणे -

निष्कर्ष

1. नव्वदोत्तर कथाकारांचे एक सामर्थ्य असे की, ते समकालीन वास्तवात त्यांना गवसलेली चौफेर दृष्टी, समग्रजीवन व्यवहाराचे व्यापक ज्ञान, राजकारण, अर्थकारण, समाजकारण यासह सांस्कृतिक घडामोडी अशा सर्व घटकांविषयी साधंत माहिती, इतिहास व समकालाचे भान, समाज व्यवस्था, जातधर्म या विषयीची जाण वकुतुहल, शेतीसह, एकूणच महानगरातील उद्योग विश्वास तळापासून वरपर्यंत असणाऱ्या बाजारूपणाची

ओळख, व भाषेची जाणही या सर्वच कथाकारांजवळ आहे.

2. नव्वदोत्तर मराठी कथेच्या ऐरणीवर नवे आणि अलक्षित विषय आणले जात आहेत. सशक्त कथाबीज आणि समाजवास्तवाची उत्तम जाण असणारा लेखक असा संयोग या कथेमध्ये दिसतो.
3. नव्वदोत्तर मराठी कथा प्रयोगशील आहे. भाषा, आशय आणि रूपबंध या साऱ्या घटकांमध्ये नवेनवे काल सुसंगत प्रयोग होत आहेत. हे प्रयोग मराठी कथेचे नवे रूप घडविण्यास उपकारक ठरत आहेत.
4. नव्वदोत्तर मराठी कथेत धीट मांणी आणि थेट अभिव्यक्तीचा प्रत्यय येत आहे. जसे जगणे तशी भाषा आणि तशीच कथा असे सूत्र मराठी कथा स्वीकारत आहे.
5. नव्वदोत्तर कथाकार वेगवेगळया पद्धतीने आणि बाजूंनी समकालीन समाज वास्तव पिंजून काढत आहेत. समाजवास्तवाचा शोध घेत आहेत.
6. 1990 नंतर स्त्री कथाकारांनी दर्जेदार अशी लक्षणीय मराठी कथा लिहिल्याचे दिसते. समकालीन वास्तवात स्त्रीची होणारी वेगवेगळया पातळीवर कुंचबना या लेखिकांच्या कथांचा विषय झालेली आहे.
7. स्त्रीकेंद्री प्रश्नांच्या पलीकडे जावून व्यापकपणे बदलणारे सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण कवेत घेणारी नवी कथा या लेखिकांनी धीटपणे आणि कला पूर्ण रीतीने साकार केली आहे.
8. उपभोग लक्ष्यी, जीवन शैली, बाजारु चंगळवाद आणि नैतिकतेचीही विक्री करण्याचे प्रकार मुक्त लैगिंक स्वैराचार, शोषण, अध:पतन या आणि अशा समकालीन वास्तवाचे आजचे सारे कथाकार अस्वस्थ झाले आहेत. हे कथाकार समकालीन जीवघेण्या प्रश्नांशी कथेच्या माध्यमातून संघर्ष पुकारत आहेत. ही बाब पुढच्या कथेसाठी आशादायी असे चित्र निर्माण करते.

संदर्भ टीपा :-

1. प्राहात कणगलेकर, म. द. - 'मराठी कथा : रुप आणि परिसर', श्री विद्या प्रकाशन पुणे, द्वितीय आवृती, पृ. 02
2. पाटील, म.सु. महाराष्ट्र टाईम्स, रविवार, 23-01-1994 लेख
3. लोमटे, आसाराम (संपादक) - रणधीर शिन्दे आणि जयंत पवार यांची कथा प्रतिष्ठान, संपादक, आसाराम लोमटे, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, सप्टेंबर ते ऑक्टोबर 2015, पृ. 40

4. देशमुख, अनंत - दशकातील साहित्यिक मोनिका गजेन्द्र गडकर, ललित, मुंबई, एप्रील 2017, पृ.28

5. ऐनापुरे, जी. के. - मराठी कथा मूल्य आणि ऱ्हास, ललित पब्लिकेशन, मुंबई, मे 2016, दुसरी आवृत्ती

7. लोमटै, आसाराम - आलोक, शब्द पब्लिकेशन, मुंबई, जानेवारी 2017, तिसरी आवृत्ती

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९० • मार्च २०२२ • पुरवणी मराठी विशेषांक ०७





इतिहासाचार्य वि. का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

## पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४४ ● वर्ष : ९० ● पुरवणीअंक : ७

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक :**

● डॉ. प्रमोद एस. मेश्राम ● डॉ.बळवंत टी. दाभाडे ● श्री.मनोहर आर. कोंडागुर्ले

**✻ प्रकाशक ✻**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-

वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

 ISSN No. 2394-5990


५५ **महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरुप** - प्रा.उमा पाटील, पन्हाळा, जि.कोल्हापूर --------- २४९

५६ **भारतीय शेती उद्योगाचे आधुनिकीकरण** - प्रा.नागोराव तारू, खालापूर, जि.रायगड -------- २५३

५७ **महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरुप** - डॉ.मनिषा नागपुरे, नागपूर ------------------ २५७

५८ **भारतीय स्वातंत्र्यानंतरचे बदलते शैक्षणिक धोरण** - प्रा.कविता मांजे, कल्याण, ठाणे ------- २६१

५९ **महिलांचा उद्योजकतेमधील वाढता सहभाग व महिला सबलीकरण** - प्रा.चंद्रप्रभा, नाशिक ---- २६६

६० **भारताची कायदा व्यवस्था** - डॉ.अरविंद पुनवटकर, सावनेर, नागपूर ---------------- २७१

६१ **स्वातंत्र्योत्तर आंदोलनों के विविध परिदृश्य** - डॉ.दत्तात्रय अनारसे, माढा, सोलापूर -------- २७४

६२ **पंडित नेहरूंच्या काळातील आर्थिक विकासाचे चिकित्सक मूल्यमापन**
- प्रा.विजय साळुंके, अमळनेर, जि.जळगाव. ------------------------------- २७७

६३ **इचलकरंजीची यंत्रमाग कामगार व्यवस्था आणि बदलते स्वरूप**
- श्री.कुबेर शेकाप्पा कट्टीमनी, इचलकरंजी, जि.सांगली ------------------------ २८०

६४ **भारताचे अलिप्ततावादी धोरण आणि अमेरिका सहसंबंधाचा आढावा (इ.स. १९४७ ते इ.स.२०००)**
- डॉ.डी.बी ताडेराव, फोंडाघाट, जि.सिंधुदुर्ग ---------------------------- २८४

६५ **अ. ब. वालावलकर यांचे इतिहास संशोधनविषयक कार्य-**
- डॉ.सोमनाथ कदम, कणकवली, सिंधुदुर्ग. ---------------------------- २८९

६६ **स्वातंत्र्योत्तर भारतीय परराष्ट्रीय धोरण** - डॉ.संजय बेंद्रे, म्हसळा, जि.रायगड ------------ २९२

६७ **माहितीची गरज आणि सोशल मिडिया** - सौ.स्मीता पाटोळे, सातारा; डॉ.सुधीर पाटील, जळगाव २९५

६८ **हवामान बदलाचा लांजा तालुक्यातील शेतीवर झालेला परिणाम**
- डॉ.काशिनाथ चव्हाण, लांजा, जि.रत्नागिरी. -------------------------- ३००

६९ **भारतीय स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रंथालय चळवळ** - डॉ.अनिता पाटील, बडनेरा --------- ३०५

७० **'गोडसे गांधी.कॉम - नाटक की रंगमंचीयता'** - विजय देवकर, राजापूर, रत्नागिरी -------- ३११

७१ **स्त्री सक्षमीकरणासाठी शिक्षण** - डॉ.संगीता पैकेकरी, माढा, जि.सोलापूर. ------------- ३१५

७२ **हिंदी उपन्यासों में चित्रित आदिवासी जीवन संघर्ष** - हिरामण पवार, राजापूर, जि.रत्नागिरी --- ३१९

७३ **सातारा जिल्ह्यातील शतकोत्तर ग्रंथालयाचा इतिहास** - सौ.आशा जिरगे, सातारा. --------- ३२५

७४ **महाराष्ट्र शासनाच्या जलसिंचन अधिनियमांचा चिकित्सक अभ्यास**
- कु. वनिता पाटील, कबनूर, कोल्हापूर ------------------------------ ३३०

७५ **स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दलित चळवळीतील क्रांतीनायक बॅरि.राजाभाऊ खोब्रागडे : एक ऐतिहासिक अध्ययन** - डॉ.पंकज मून, वडनेर, ता.हिंगणघाट, जि.वर्धा --------------- ३३५

७६ **भारतीय स्वातंत्र्यानंतरची राजकीय व साहित्यिक स्थिती** - डॉ.नामदेव शिंदे, माढा, जि.सोलापूर - ३४०

७७ **महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरूप** - डॉ.शर्मिला घाटगे, कोल्हापूर. -------------- ३४३

७८ **माहिती तंत्रज्ञानाचे मानवी समाजावर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन**
- प्रा. रेखा वाठ, कळंब, जि.यवतमाळ ------------------------------

ISSN No. 2394-5990

# महिला सक्षमीकरणाचे बदलते स्वरुप

डॉ मनीषा रंगराव नागपुरे
प्राध्यापक, डॉ मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
टेका नाका, कामठी रोड, नागपूर.
मोबाइल क्रमांक ९८२३१५३००२, Email : manishanagpure77@gmail.com

**सारांश :**

२१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जग प्रचंड प्रमाणात बदलत आहे. नवे संशोधन, नवे विचार, नवीन गोष्टी, आजुबाजुला स्थिरावत आहेत. हे स्पर्धेचे युग आहे आणि त्यात स्त्रियांचा सहभाग निश्चितच चांगला आहे. प्राचीन कालखंडापासून चालत आलेली चूल आणि मूल ही संकल्पना आज बरीच मोडकळीस आलेली आहे. शिक्षण, कला, क्रिडा, राजकारण, संशोधन आणि माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने स्त्रिया कार्य करीत आहेत. तरी सुद्धा महिला सक्षमिकरणाची चिंता भेडसावत आहे. आजच्या घडीला स्त्री भ्रूणहत्या महिलांवरील अत्याचारांच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. या परिस्थितीवरुन असे लक्षात येते की, महिला सुरक्षीत नाहीत. यासाठी अनेक घटक जबाबदार आहेत. युनोने १९७५ ला जागतिक महिला दिन जाहिर केला व तेव्हापासून महिला सक्षमीकरणासाठी जगात प्रयत्न सुरु झले जगाच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास ५० टक्के महिला आहेत. महिलांना आत्मनिर्भर व मानसन्मानाने जगता यावे यासाठी सरकारने अनेक कायदे व योजना अंमलात आणल्या तरीही मात्र समाजाची मानसिकता बदललेली नाही. २००१ मध्ये भारत सरकारने महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वाची भूमिका घेतली. स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीची समान विकासाची व प्रगतीची संधी उपलब्ध करून दिल्यावर स्त्रिया आज बऱ्याच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्य करतांना दिसत आहेत. आज सर्वच क्षेत्रात महिलांची कामगीरी गौरवास्पद अशी आहे. पण तरीही अजून स्त्री जीवनाचे असे अनेक कंगोरे आहेत की महिला सशक्त करण्यासाठी महिला सक्षमीकरणाची चळवळ ही तळागाळापर्यंत पोहचविण्याची गरज आहे व त्यासाठी प्रबोधनाचीही गरज आहे.

**की-वर्ड्स** (Keywords) :

महिला सक्षमीकरण, महिला, भारतीय समाज, स्त्रियांचे, समाज, पुरुषांच्या

**प्रस्तावना –**

सक्षमीकरण म्हणजे काय ? हा प्रश्न प्राथमिक, मूलभूत पण अत्यंत महत्त्वाचा वाटतो. सक्षमीकरण ही बहुआयामी प्रक्रियात्मक, सृजनशील, प्रवाही संकल्पना आहे. कोणत्याही समाजघटकाला समाजमान्यता, प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, समाता आणि न्याय मिळवून देण्यासाठी तसेच समाजातील विषमता, दारिद्र्य, लिंग, वर्ण, वर्ग, वंश, धर्म इत्यादि प्रकारचे भेद तसेच जातीभेदाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी जी क्षमता त्या अपेक्षीत, शोषित समाज घटकात आणावी लागते त्याला सक्षमीकरण म्हटल्या जाते असे मला वाटते. मग तो समाज घटक अस्पृश्य, दलित, पीडित, आदिवासी किंवा महिला कोणीही असु शकते.

कोणत्याही समाजात प्रबोधनाची सुरूवात ही त्या समाजात वावरणाऱ्या संवेदनशील व बुद्धीजीवी समुहाच्या कृती–उक्तीतून होत असते. १५व्या शतकात युरोपात तर १८ व १९ व्या शतकात भारतात तसेच, महाराष्ट्रात प्रबोधनाचे पडसाद उमटायला प्रारंभ झाला पाश्चिमान्य उदारमतवादी तत्त्वाचा प्रभाव येथील प्रबोधनावर निश्चितच पडला. समाज हा परिवर्तनशील, संवेदनशील आणि अनुकरणप्रीय असल्यामुळे या परिवर्तनाचे आयाम, प्रश्न, उपाय, भूमिका, निरनिराळे घटक हे देखील बदलण्यास सुरुवात झाली थोडक्यात तात्पर्य असे की, भारतीय स्त्री सुधारणेचा उत्क्रांतीवादी इतिहास हा महिला सक्षमीकरणाचा सुद्धा इतिहास राहिला आहे. कोणतीही सुधारणा ही निव्वळ राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक नसते तर त्यात आंतरसंबंध असतात. हाच धागा सक्षमीकरणाला गती देतांना समाजसुधारकांनी पकडला आहे.

आजच्या घटकेला समाज कितीही विकसित झाल्याचे आपण मानत असलो तरी त्याला साक्ष असणाऱ्या इतिहासाला आपण विसरू शकत नाही. प्रबोधनकाळातील सामाजिक, राजकीय, धार्मिक सुधारणांचा संबंध महिला सक्षमीकरण प्रक्रियेशी नक्कीच जुडलेला आहे. मुळातच सक्षमीकरण ही परिवर्तन सापेक्ष प्रक्रिया आहे. कोणतीही सुधारणा ही इतिहासाचाच परिणाम असते. हे आपल्याला विसरुन चालणार नाही. जनजागृतीतूनच समाजप्रबोधन शक्य असते. म्हणूनच राजाराम मोहन रॉय, महात्मा ज्योतीबा

फुले, बाबा पद्मजी, राजर्षी शाहू महारा, महर्षी धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, न्यायमूर्ती रानडे, ई.व्हीरामस्वामी (पेरियार), डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक समाज सुधारकांनी निरनिराळया समाज प्रबोधनाच्या मार्गाचा अवलंब करून स्त्री प्रश्नांची मांडणी केली.

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होत आहे पण तरीही भारतीय समाजतील एक मोठा घटक असलेल्या महिलांना स्वातंत्र्याच्या पूर्णपणे लाभ मिळतांना दिसत नाही. या महिलांच्या संरक्षणासाठी व सबलीकरणासाठी आतापर्यंत अनेक कायदे करण्यात आले. पण तरीही महिलांवर विविध प्रकारे अन्याय हा होतच असल्याचे दिसून येते. त्यामुळे महिलांच्या या प्रश्नांकडे अधिक गांभिर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. महिलांचे प्रश्न कोणते आहेत ते सोडविण्यासाठी स्वातंत्र्योत्तर कालखंडात कोणी कशाप्रकारचे प्रयत्न केले आहे व त्याला कितपत यश आले या सर्वांचा या शोधनिबंधाच्या माध्यमातून येथे अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्ट्ये -**

१. महिला सबलीकरणाचा अर्थ समाजवून घेणे. भारतीय समाजातील स्त्रियांचा दर्जा व भूमिकांचा आढावा घेणे.
२. महिला सबलीकरणासाठी विविध कालखंडात झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.
३. महिला सबलीकरणामधील अडथळयांचा अभ्यास करणे.
४. महिला सबलीकरणावर उपाययोजना सूचविणे.
५. महिला सक्षमीकरणातील बदलांच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. तसेच शोध निबंधासाठी तथ्य संकलनाकरिता अनेक ग्रंथ, अहवाल, संकेत स्थळे, शोधनिबंध, गॅझेट, चर्चासत्र, महिलांच्या समस्यांवर आधारित चर्चासत्र, कार्यशाळा, यातील सहभाग, दैनिक वर्तमानपत्रातील अग्रलेख याचा आधार घेतलेला आहे. प्रस्तुत शोध निबंधासाठी तथ्यांचे आशय विश्लेषण वस्तूनिष्ठपणे केलेले आहे. ज्याद्वारे महिलांच्या सक्षमीकरणातील विविधांगी पैलूंची वास्तविकता स्पष्ट करण्यास मदत झालेली आहे.

प्राचीन काळापासून तर आजपर्यंतचा स्त्रियांच्या बदलत्या दर्जाचा मागोवा घेतल्यास स्त्रियांचे स्थान जगात मान्यता पावलेल्या मूल्यांच्या आधारे व लोकशाही व्यवस्थेच्या संदर्भात लक्षात घेतल्यास स्त्रियांमध्ये आमुलाग्र बदल घडून आलेले आहे. स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललेला आहे. स्त्रियांना स्वतःच्या आत्मप्रतिष्ठेची जाणीव झाली. तीला कार्यकर्तृत्वाची नवी दृष्टी मिळाली. संगीत, लेखन, शिक्षण, राजकारण, चित्रपट, नाटक, अशा विविध क्षेत्रात स्त्रियांनी पदार्पण केलेले आहे. स्त्री म्हणून कोणतेच क्षेत्र वर्ज्य राहिलेले नाही. स्त्रीने स्वतःला सिद्ध करुन दाखविले की, ती कोणत्याही क्षेत्रात अत्यंत सक्षमपणे काम करू शकते.

महिलांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाच्या आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करुन देणे हे महिला सक्षमीकरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात शतकानुतके स्त्रियांना पुरुषांपेक्षा कनिष्ठ दर्जा दिलेला आढळून येतो. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात पुरुषप्रधान संस्कृतीतील लिंगभेदावर आधारित महिलांच्या शोषणाची ही प्रक्रिया नष्ट करुन स्त्री-पुरुष समानतेवर आधारित व्यवस्था निर्माण करण्यासाठी स्त्रीवादी संघटना कार्यशील बनल्या.

स्त्री-पुरुष समानता, स्त्रीला न्याय मिळवून देणे, स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे, स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढविणे, शैक्षणिक विकास करणे, इ. उद्दिष्टये महिला सक्षमीकरणाची ठेवण्यात आली.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारत सरकारने स्त्री पुरुष समानतेचे तत्व मान्य करून जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात प्रवेश करण्याचे स्त्रीला स्वातंत्र्य दिले भारतीय राज्यघटनेतील तत्वानुसार स्त्री-पुरुष भेदभाव न मानता स्त्रियांना समानतेचा अधिकार मालमत्तेचा अधिकार, स्थानिक स्वराज्य संस्थेत सहभागी होण्याचा अधिकार दिला रोजगाराचा मोफत व सक्तीचे शिक्षण, आरोग्य संवर्धन इ. अधिकार प्राप्त झाले तसेच १९९२ मधील ७३ व्या घटनादुरुस्तीने राजकारणात स्त्रियांना आरक्षण देण्यात आले त्यामुळे भारतीय स्त्रियांच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन घडून आले १९९४ च्या धोरणात महिलांच्या मूलभूत प्रश्नांना हात घालण्यात आला उदा मालमत्तेत तिला हक्कदार बनविण्यात आले वडिलांबरोबर आईचे नावही बंधनकारक झाले त्यामुळे महिलेला सामाजिक दर्जा प्राप्त झाला. महाराष्ट्र शासनाने आखलेले महिला धोरण हे महिला विकासाच्या दिशेने टाकलेले प्रथम पाऊल होते ही एक क्रांतीकारी पर्वाची आणि प्रक्रियेची व महिलांच्या विकासाच्या क्षेत्रातील सुरुवात होती यानंतरचे महिलांच्या संदर्भातील महत्वपूर्ण पाउल म्हणजे महिला बचत गटाची

ISSN No. 2394-5990

संकल्पना उदयास आली प्रथमतः याचे स्वरुप आर्थिक विकासापुरतेच मर्यादित होते परंतु कालांतराने या संकल्पनेचा विकास होत गेला आर्थिक विकास आणि सामाजिक अभिसरण या कल्पनांचा विकास होवून ग्रामविकासात महिला सहभागी होऊ शकतात व नियोजन तसेच निर्णयप्रक्रियेत भाग घेवून त्या नियोजनाची दिशा बदलू शकतात हे सिद्ध झले आता तर प्रत्येक योजनेत स्वयंसहायता बचत गट हा महिला विकासाच्या कार्यक्रमाचा पायाच ठरलेला आहे बचत गटाचे अनन्य साधारण महत्व लक्षात घेवून महिला धोरण २००१ चा आराखडा तयार करतांना स्वयंसहायता बचत गटावर आधारित विकासांच्या योजनांना ठळक महत्व देण्यात आले.

**स्त्रियांचे स्थान व दर्जा बदलविण्यास उत्तरदायी घटक –**

(१) शिक्षणाच्या संधी, (२) सुधारणावादी चळवळ, (३) संविधानात्मक तरतुदी, (४) आर्थिक स्वातंत्र्य, (५) राजकारणातील सहभाग, (६) स्त्री–पुरुष समानतेचे तत्व, (७) औद्योगीकरण व जागतिकीकरण, (८) कौटुंबिक अधिकार, (९) विविध क्षेत्रात मिळणाऱ्या संधी, (१०) कायद्याचे पाठबळ, (११) स्त्रीमुक्ती आंदोलन, (१२) स्त्रीभ्रूण हत्या विरोधी आंदोलन इ. सर्व योजना, संविधानिक तरतुदी आणि कायदे, चळवळी, महिला सक्षमीकरणाच्या दिशेने वाटचाल करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण ठरतात.

आज भारतीय स्त्री आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहे. समाजाने स्त्रियांना प्रदान केलेले अधिकार यावरुन तीचे स्थान व दर्जा निश्चित होतो. रॉबर्ट लोवी यांनी स्त्रियांचा दर्जा ठरविण्यासंबंधी चार आधार सांगितले आहे.

१. प्रत्यक्ष वागणूक, २. कायदेशीर दर्जा, ३. सामाजिक कार्यात भाग घेण्याची संधी, ४. कामाचे स्वरुप.

वरील आधाराचा विचार करतांना स्त्रियांना आज विविध क्षेत्रातील दारे मुक्त झालेली आहेत. आज स्त्रियांची स्थिती बदललेली आहे. समाजाच्या विविध बंधनात अडकलेली स्त्री सक्षम होवून तिच्या कामाचा सर्वत्र गौरव होत आहे. स्त्री ही समाज परिवर्तनाचा महत्त्वाचा घटक आहे. म. गांधीजींनी म्हटले आहे की, सर्वागीण शोषणाविरुद्धच्या लढ्यास स्त्रियांना तयार करणे म्हणजे स्त्री सक्षमीकरण' होय.

**स्त्री सक्षमीकरणाचे बदलते पैलू –**

महिलांच्या सक्षमीकरणात नवनवीन पैलूंची भरत पडत आहे. त्या घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडत आहे. ती स्वतः शाळा, कॉलेज, ऑफीस व व्यवसायामध्ये सहभागी होतांना दिसत आहे. स्त्रीभ्रूण हत्येबाबत सरकारने कठोर कायदे बनविले आहेत. मुलगी मुलांपेक्षा कुठेच कमी नसल्याची जागृती समाजात होतांना दिसत आहे. आई वडिलांचा अंतीम संस्कार आज धाडसी पाऊल उचलून समाजात मुली करतांना दिसत आहे. स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून आहे. आर्थिक क्षेत्रातील तिची प्रगती नैत्रदिपक असल्याच्या नोंदी आर्थिक सक्षमीकरण दर्शक सारणीतून पाहायला मिळते. सामाजिक आणि सांस्कृतिक बंधनातून ती पूर्णपणे मुक्त होवू पाहते आहे पण ती आजही समाजात सुरक्षीत नाही असे दुर्देवाने म्हणावे लागते. कठोर कायदा व पोलीस प्रशासनाच्या नियमावलीमुळे स्त्रियांचे होणारे अत्याचार थांबू शकत नाही. स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने या संदर्भात महत्त्वाचे पाऊल उचलने आज फार गरजेचे आहे.

ज्या समाजात स्त्रियांची सामाजिक स्थिती पुरुषांच्या बरोबरीने आहे ती स्त्री कुठलेही क्षेत्र काबीज करु शकते. हे आजच्या भारतीय स्त्रीने दाखवून दिले आहे. घर आणि नोकरी दोन्ही बाजू साभांळत ती स्वतःसाठी एक नवीन विश्वाची निर्मिती करतांना दिसत आहे. स्वतःची अस्तित्वाची लढाई स्वतः लढायला ती शिकली आहे. नव्या मूल्यव्यवस्थेत ती स्वतःचे स्थान निर्माण करते आहे. पूर्वीपेक्षा तिच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थितीत सुधारणा झाल्या आहेत. व शासकीय पातळीवर बऱ्याच योजनांतर्गत तिला सक्षम बनविण्याचे अविरत प्रयत्न सतत सुरु आहेत. महिलांना सक्षम केले तरच आपला भारत देश बळकट होवून राष्ट्रांची उन्नती करू शकतो हे निर्विवाद सत्य आहे. त्याला कोणीही नाकारू शकत नाही. त्यासाठी काही उपाययोजना सामाजिक पातळीवर तसेच शासकीय स्तरावर होणे फार गरजेचे आहे.

उदा.१. महिलावर्गामध्ये स्वतःच्या अस्तित्वाविषयी प्रभावीपणे जाणीव जागृती निर्माण करणे फार आवश्यक आहे.

२. उच्चशिक्षणात महिलांचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे.

३. स्त्री–पुरुष समानतेचे तत्त्व त्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित करुन बालपणापासूनच तसे संस्कार देणारी व्यवस्था तयार करणे गरजेचे आहे.

४. महिला वर्गांनी आपला आर्थिक स्तर उंचावून स्वावलंबी बनले पाहिजे. व त्याकरिता सरकारी विविध योजनांचा

लाभ त्यांना घेता आला पाहिजे.

५. महिलांना त्यांच्या घटनात्मक अधिकाराची जाणीव करुन देण्यासाठी व त्यांच्यात आत्मविश्वास वाढविण्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत.

६. भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांकडे त्यांच्या अधिकारांकडे, व्यक्तिस्वातंत्र्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आजही संकुचित आहे तो दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. त्याअनुषंगाने विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे गरजेचे आहे.

७. अधिकार गाजविणारी पुरुषी मानसिकता बदलवायची असल्यास महिला सक्षमीकरणाची चळवळ ही तळागाळापर्यंत पोहचविण्याची गरज आहे.

**निष्कर्ष -**

१. विविध कालखंडानुसार महिलांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलत असून स्त्री-पुरुषामधील विषमता कमी होत असल्याचे दिसून येते.

२. विविध क्षेत्रातील विविध पदावर महिला नोकरी करीत असून दिवसेंदिवस त्याचे प्रमाण वाढत आहे.

३. राजकारणातही महिलांचा सहभाग वाढल्याचे दिसून येते.

४. अजूनही महिलांच्यामध्ये अपेक्षीत असे सबलीकरण झाले नसल्याचे दिसून येते. त्यामागे पारंपारिक मानसिकता व आर्थिक कमतरता हे प्रामुख्याने अडथळे असल्याचे आढळून आले.

५. शहरी भागातील स्त्रियां मात्र पुरुषांच्या बरोबरीने विभिन्न व्यवसायात सहभाग घेतांना दिसून येतात.

६. जागतिकीकरण, नागरीकरण, शिक्षणाचा प्रसार, कायद्याच्या तरतुदी, व्यक्ती स्वातंत्र्य या सर्वांचा परिणाम महिलांच्या दर्जा उंचावण्यावर झाल्याचा दिसून येते.

७. आधुनिक स्त्री पुरुषी मानसिकतेच्या चौकटीतून बाहेर पडून स्वत:चे नवीन विश्व निर्माण करतांना दिसून येते.

८. बदलत्या काळानुसार व सामाजिक परिस्थितीनुसार महिलांसमोरील आव्हाने दिवसेंदिवस वाढत आहे.

९. महिलांवर होणारे अत्याचार विचारात घेता महिलांच्या संरक्षणासाठी विशेष उपाययोजना करणे गरजेचे आहे.

१०. केवळ कठोर कायदे करून महिलांवरील अत्याचार कमी होणार नाही त्यासाठी महिलांबद्दल स्वाभिमान, सन्मान, आदर निर्माण करणे व त्यापद्धतीची मानसिकता निर्माण करणे काळाची गरज आहे.

११. समाजाचा एक परिपूर्ण घटक म्हणून महिलांना समान संधी व सन्मान प्राप्त व्हावा यासाठी समाजातील सर्वच घटकांनी कटिबद्ध असावे तसेच समाजात मुलींच्या जन्माचे स्वागत होवून भविष्यात मुलींची संख्या वाढेल ही बाब निश्चितच महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी उपयुक्त ठरेल.

**संदर्भ सूची :**


१) गर्गे, स.मा. (संपादक) : 'भारतीय समाजविज्ञान कोश' प्रकाशन मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

२) भोळे, लक्षमण भास्कर : विचारवेध समेलन अध्यक्षीय भाषणे' खंड-२, भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीचे बदलते आयाम' डॉ. छाया दातार, पृ.२२२.

३) डॉ.गोटे, गव्हाणे शुभांगी : महिला सबलीकरण स्वरुप व समस्या, वरद पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

४) डॉ. पाटील, हेमलता : स्त्रियांची आर्थिक व सामाजिक स्थिती, गोदा प्रकाशन, औरंगाबाद.

५) डॉ. भागवत विद्युत : सक्षमीकरण : संकल्पना आणि व्यवहार' महिला सबलीकरण विशेषांक, पुणे विद्यापीठ वार्ता, कार्यकारी संपादक, डॉ. धनंजय लोखंडे, फेब्रु. २००२-मार्च २००३.

६) पेंडसे, शरयू शांताराम : भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान, पाप्युलर प्रकाशन, मुंबई.

७) साने, गीता : भारतीय स्त्री जीवन, मौज प्रकाशन, मुंबई, १९९७.


●●●

SJIF Impact Factor - 5.54

E- ISSN 2582-5429

# AKSHARA

Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
Vol. 5 Special Issue 02, August 2021

# Dr. Ambedkar in the Global Context



- Guest Editor -
Dr. Mrs. M.V. Waykole
Principal,
Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College Bhusawal

- Executive Editor -
Dr. A. D. Goswami
Vice Principal,
Bhusawal Arts, Science &
P. O. Nahata Commerce College Bhusawal

- Associate Editor -
Dr. P. H. Ingole
Head, Dept. of History,
Bhusawal Arts, Science &
P. O. Nahata Commerce College Bhusawal

Chief Editor : Dr. Girish S. Koli, AMRJ

For Details Visit To.- www.aimrj.com

Akshara Publication

**Akshara Multidisciplinary Research Journal**
**Peer-Reviewed & Refereed International Research Journal**

**Volume 5, Special Issue 2**

**August 2021**

# *Dr. Ambedkar in the Global Context*

**Guest Editor**
**Dr. Mrs. M.V. Waykole**
Principal,
Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College Bhusawal

**Executive Editor**
**Dr. A. D. Goswami**
Vice Principal,
Bhusawal Arts, Science &
P. O. Nahata Commerce College Bhusawal

**Associate Editor**
**Dr. P. H. Ingole**
Head, Dept. of History,
Bhusawal Arts, Science &
P O Nahata Commerce College Bhusawal

**Akshara Publication**
Plot No 143 Professors colony,
Near Biyani School, Jamner Road, Bhusawal Dist Jalgaon (Maharashtra) 425201
Website:www.aimrj.com Email:aimrj18@gmail.com

E- ISSN 2582-5429

**Akshara Multidisciplinary Research Journal**

Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54

*Dr. Ambedkar in the Global Context* Vol. 5 , Special Issue 02 , August 2021

# Index


| Sr.No | *Title of the Paper*& Author's Name | Pg.No |
|---|---|---|
| 1 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार- **डॉ. मिनाक्षी एम. वायकोळे / प्रा.हर्षवर्धन अशोक भालेराव** | 05 |
| 2 | शेती व्यवसायातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान- **प्रो. डॉ. ए. डी. गोस्वामी** | 09 |
| 3 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विचार- **प्रा. डॉ. के. सी. केंद्रे** | 13 |
| 4 | दलित-आंबेडकरवादी कवयित्रींच्या काव्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर-**प्रो. डॉ. के. के. अहिरे** | 16 |
| 5 | दलित-आंबेडकरी कादंबरीतील राजकीय जाणिवा-**अमित वासुदेव गजभिये /डॉ. मनीषा नागपुरे** | 25 |
| 6 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर:वाङ्मयीन लेखनशैली -**डॉ. विशाखा संजय कांबळे** | 31 |
| 7 | डॉ. भीमराव रामजी आंबेडकर – एक अर्थतज्ञ-**प्रा. डॉ. किरण अमृत वारके** | 33 |
| 8 | डॉ. बाबासाहेब आबेडकर यांचे आर्थिक विचार-**डॉ. मनोज उत्तमराव पाटील** | 36 |
| 9 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विषयक विचार **- प्रा. डॉ. दत्तात्रय एम. टेकाडे / प्रा. राजीव मधुकर पवार** | 40 |
| 10 | आंबेडकरवादी साहित्याची संकल्पना आणि स्वरुप- **प्रा. मोरे पंडित किशनराव** | 42 |
| 11 | ग्रंथप्रेमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर - **प्रा. अंभोरे ए.जी.** | 45 |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार-डॉ. ज्योती इंगळे | 49 |
| 13 | लोकशाहीबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार-**डॉ. राजेंद्र सुभाष नाडेकर** | 51 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार-प्रा. डॉ. **धनंजय रमाकांत चौधरी** | 55 |
| 15 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार- प्रा. डॉ. **धनराज सुभाष हाडुळे** | 61 |
| 16 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार-प्रा. **भालेराव डी. एम** | 65 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि तत्त्वज्ञान -**डॉ. सचिन राजपूत** | 68 |
| 18 | ग्रंथप्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर -**प्रा. डॉ. किशोर शेषराव चौरे** | 74 |
| 19 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कुटुंब कल्याण विषयक विचार-**प्रा.तळणीकर एस.जी.** | 79 |
| 20 | डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाहीविषयक विचार-**प्रा डॉ. प्रफुल्ल हरिष इंगोले** | 82 |
| 21 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर - एक निष्णात अर्थतज्ञ-**प्रा. डॉ. पी. के. पाटील** | 85 |
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या संघटना:कार्य आणि नेतृत्व – **डॉ.मनीषा जगदीशलाल वर्मा** | 88 |
| 23 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातील अर्थकरणाचे संघर्षतत्व- **प्रा. विलास अंकुशराव सोळुंके** | 93 |
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमधील : अर्थशास्त्र -**प्रा. डॉ. जयश्री पुरूषोत्तम सरोदे** | 96 |
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कायदाविषयक विचार – **एक अभ्यास- प्रा. इंदिरा अशोक लोखंडे** | 100 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार-**प्रा. डॉ. स्वाती काशिनाथ महाजन** | 104 |
| 27 | आंबेडकरवाद आणि मराठी साहित्य-**प्रा.भारती तोताराम सोनवणे** | 107 |
| 28 | स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामा- हिंदू कोड बिल- **डॉ. संजीवनी चंद्रशेखर बारहाते** | 112 |
| 29 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मराठी वैचारिक लेखन- **प्रा. डॉ. आनंदा बाबुराव सोनवणे** | 115 |
| 30 | भारतीय संविधान आणि महिलांचे सक्षमीकरण- **प्रा.रमेश एम. भगत** | 119 |

E- ISSN 2582-5429

**Akshara Multidisciplinary Research Journal**

Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54

Dr. Ambedkar in the Global Context Vol. 5 , Special Issue 02 , August 2021

05

# दलित-आंबेडकरी कादंबरीतील राजकीय जाणिवा

**अमित वासुदेव गजभिये**
पीएच.डी.संशोधक विद्यार्थी मराठी विभाग
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला
आणि वाणिज्य महाविद्यालय कामठी रोड, नागपूर
भ्र. क्र. ९६७३४५६४८४

**डॉ. मनीषा नागपुरे**
मार्गदर्शक / सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस.
कला आणि वाणिज्य महाविद्यालय कामठी रोड,नागपूर

---

कादंबरी हा साहित्यप्रकार पाश्चात्य साहित्य प्रकारातून मराठी साहित्यमध्ये उदयास आलेला आहे. इंग्रजीमध्ये कादंबरीला नॉवेल किंवा नावल असे म्हटल्या जाते. नॉवेल किंवा नावल या शब्दावरूनच मराठीमध्ये कादंबरी हा साहित्य प्रकार रूढ झाला आहे. खरं म्हणजे पाश्चात्य साहित्य प्रकाराच्या संपर्काने आपल्याला कादंबरी या साहित्य प्रकाराचे भान आले. सुरुवातीच्या काळात आपण फक्त इंग्रजी कादंबऱ्यांचे अनुवाद आणि भाषांतर करत होतो. बाराव्या शतकात मराठीमध्ये 'लीळाचरित्रा'सारखा अव्वल दर्जाचा गद्य ग्रंथ लिहिला गेला. या ग्रंथाकडे कादंबरी म्हणून पाहणे नक्कीच शक्य झाले असते. कादंबरी हा साहित्य प्रकार पाश्चात्य साहित्याच्या अनुकरणातूनच मराठीमध्ये विकसित झालेला दिसून येतो. या साहित्यप्रकाराचा घाट विस्तीर्ण आहे. कथानक, उपकथानक, व्यक्तिरेखा, वातावरण निर्मिती, संवादशैली व भाषाशैली इत्यादी घटकांनी कादंबरी हा वाङ्मय प्रकार विकसित झालेला असला तरी कुसुमावती देशपांडे यांनी "एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला कादंबरी हे नाव मराठीमध्ये बऱ्याच आधीपासून रूढ असावे"[१] असे म्हटले आहे.

कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे प्रकार पाडताना सर्वप्रथम त्याची वर्गवारी करावी लागते. ही वर्गवारी काही गृहीतके समोर ठेवून करावी लागते. सामान्यपणे ही वर्गवारी कालखंडानुसार, विषयानुसार, प्रेरणा-प्रणालीनुसार, प्रवाहानुसार, भौगोलिक विषयानुसार, प्रयोगानुसार आणि भूमिकेनुसार इत्यादी निकषाच्या आधारे केली जाते. त्यामुळे त्या त्या वर्गातील कादंबरीचे गुणविशेष निश्चित केल्यानंतर तिचे मूल्यमापन करणे शक्य होते. ही वर्गवारी सामान्यपणे आणि ढोबळमानाने केलेली आहे. याहीपेक्षा अधिक किंवा कमी वर्ग करून या साहित्य प्रकाराचे मूल्यमापन करणे शक्य आहे. काही जाणकार अभ्यासकांनी कादंबरी या वाङ्मय प्रकाराची वर्गवारी करून कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे साहित्यशास्त्र मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने वा. म. जोशी, वा. ल. कुलकर्णी, श्री. के. क्षीरसागर, द. भि. कुलकर्णी, कुसुमावती देशपांडे, भालचंद्र नेमाडे, नरहर कुरुंदकर, उषा हस्तक, विलास खोले, राजन गवस, चंद्रकांत बांदिवडेकर, गो. मा. पवार, नागनाथ कोत्तापल्ले, हरिश्चंद्र थोरात इत्यादींची नावे विचारात घ्यावी लागतात. या अभ्यासकांनी मराठी कादंबरीचे सखोल चिंतन करून मराठी कादंबरीचे साहित्यशास्त्र मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

कोणताही लेखक हा आपल्या कल्पनाशक्तीप्रमाणे कादंबरी लेखन करत असतो. विविध अनुभवातून व स्वतःच्या प्रकृती धर्मानुसार विषयाची निवड, मांडणी याकडे लक्ष देऊन तो कादंबरी निर्माण करतो. यामुळेच पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, ग्रामीण, प्रादेशिक, दलित अशा वेगवेगळ्या स्वरूपाच्या कादंबऱ्या पहावयास मिळतात. लेखकाने मांडलेल्या विषयाकडे पाहून वाचत ती कादंबरी कोणत्या स्वरूपातील आहे हे सांगत असतो. कादंबरीतील विषय हा पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय असा कोणताही असू शकतो. वेगवेगळ्या स्वरूपातील कादंबरीचे पैलू वेगवेगळे असतात. त्यामुळे कादंबरीची विभागणी पौराणिक कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, सामाजिक कादंबरी, राजकीय कादंबरी, प्रादेशिक कादंबरी, दलित कादंबरी, चरित्रात्मक कादंबरी, आत्मचरित्रात्मक कादंबरी इत्यादी प्रकारात करता येते.

राजकीय परिस्थिती ही बाब राजकारणा पुरतीच मर्यादित नसून साहित्यावरही राजकारणाचा प्रभाव पडत आहे. कादंबरी या वाङ्मय प्रकार यावर सुद्धा राजकारणाचा प्रभाव पडला असून मराठी साहित्यामध्ये राजकीय कादंबरी लिहिल्या जात आहे. अनेक समीक्षक राजकीय कादंबरीचे स्वरूप स्पष्ट करताना ऐतिहासिक कादंबरीचा आधार घेतात. काही समीक्षकांनी राजकीय कादंबरीला ऐतिहासिक कादंबरीचा एक उपप्रकार मानले आहे तर काहींनी तिचे वेगळेपण मान्य केले

राजकीय कादंबरीचे ऐतिहासिक कादंबरी पेक्षा असलेले वेगळेपण स्पष्ट करताना ल. ग. जोग म्हणतात, "ऐतिहासिक... आहे. राजकीय कादंबरीचे ऐतिहासिक कादंबरी पेक्षा असलेले वेगळेपण स्पष्ट करताना ल. ग. जोग म्हणतात, "ऐतिहासिक म्हटल्या जाणाऱ्या कथा भागाला भविष्यकाळ नसतो. त्या ठिकाणी मनोरचना, घटना, तत्त्वज्ञान यात एक प्रकारची पूर्णता व त्यामुळे गतिशून्यता असते. 'राजकीय' कादंबरीत अर्थपूर्ण, गतिमानता व भविष्यकाळातील विकसन क्षमता आढळते.... जो लेखक राजकीय कादंबरी लिहू इच्छितो; तो अपूर्ण गतिमान, विकासक्षम अशा जीवनाचे शासनांतर्गत चित्र रेखाटीत असतो."[२]

ऐतिहासिक कादंबरी आणि राजकारण यांचा संबंध स्पष्ट करताना वा. ल. कुलकर्णी म्हणतात, "जोपर्यंत राजकारणामुळेच इतिहासाला दिवसेंदिवस वेगवेगळा रंग चढत आहे, तोपर्यंत कुठल्याही ऐतिहासिक कादंबरीत राजकारणाला प्राधान्य मिळणार, हे उघड आहे. ह्यामुळे ऐतिहासिक कादंबरी व राजकारण हे जवळजवळ एक समीकरण होऊन बसले आहे"[३] वा. ल. कुलकर्णींच्या मते, इतिहासातून राजकारण वजा करणे कादंबरीला तरी शक्य नाही असे असतानाही जर राजकीय कादंबरीला ऐतिहासिक कादंबरी पेक्षा वेगळे करायचे असेल तर तिचे व्यवच्छेदक लक्षण निश्चित केले पाहिजे. ते निश्चित करताना वा. ल. कुलकर्णी म्हणतात, "जी कादंबरी केवळ एखाद्या राजनैतिक तत्त्वप्रणालीचे खंडन व मंडन करण्यासाठी जन्माला येते, जिच्यातील पात्रांचा प्रचलित व ऐतिहासिक कालांतील राजकीय घडामोडींशी प्रत्यक्ष संबंध नसतो तर जिच्यातून वावरणाऱ्या पात्रांचा स्वभाव-परिपोष, त्यांचे परस्पर संबंध, ते ज्या प्रसंगातून वावरतात ते प्रसंग ह्या सर्व गोष्टी या विशिष्ट राजनैतिक तत्त्वप्रणालीच्या खंडणार्थ व मंडनार्थ उपयोजिलेल्या असतात; तीच कादंबरी केवळ राजकीय या नावाला साजेशी ठरते."[४]

**मराठीतील राजकीय कादंबरी**

मराठी कादंबरीमध्ये राजकीय जीवनाचे तपशील सर्वप्रथम गजानन त्र्यंबक माडखोलकर यांच्या 'मुक्तात्मा' (१९३३), या कादंबरीमध्ये पडल्याचे दिसून येते. पुढे श्री. ना. पेंडसे 'एल्गार' (१९५९), भाऊ पाध्ये 'डोंबाऱ्याचा खेळ' (१९५०), शंकर पाटील 'टारफुला' (१९६४), ना. सी. फडके 'उजाडलं पण सूर्य कुठे आहे' (१९७०), वसंत वरखेडकर 'प्रतिनिधी' (१९७१), अरुण साधू 'मुंबई दिनांक' (१९७३), 'सिंहासन' (१९७७), ग. प्र. प्रधान 'साता उत्तराची कहाणी' (१९८१), व्यंकटेश माडगूळकर 'सत्तांतर' (१९८२), 'वावटळ' (१९८४), रंगनाथ पठारे 'दिवे गेलेले दिवस' (१९८२), 'रथ' (१९८४), 'ताम्रपट' (१९९४), पुरुषोत्तम बोरकर 'मेड इन इंडिया' (१९८७), वासुदेव मुलाटे 'विषुववृत्ताच्या मुळ्या' (१९८९), रा. रं. बोराडे 'आमदार सौभाग्यवती' (१९९०), विश्वास पाटील 'झाडाझडती' (१९९१), राजन गवस 'धिंगाणा' (१९९२), 'तणकट' (१९९८), रवींद्र शोभणे 'कोंडी' (१९९२), 'पांढर' (२००९), विलास मनोहर 'एक नक्षलवाद्याचा जन्म' (१९९२), एकनाथ साळवे 'एन्काउंटर' (१९९८), बाबाराव मुसळे 'वारूळ' (२००४), बाबुराव बागूल 'कोंडी' (२००४) आणि कृष्णात खोत ' रौंदळा ' (२००८) इत्यादींचा समावेश होतो.

राजकीय कादंबरी ही संकल्पना ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या 'मुक्तात्मा' (१९३३) या कादंबरी पासून विचारात घेतली जात असली तरीही 'मुक्तात्मा' पूर्वीही अधूनमधून राजकीय संदर्भ, स्वातंत्रपूर्व काळातील लढ्याचे संदर्भ, चळवळीचे उल्लेख मराठी कादंबरीत येत असले तरी त्यांना निखळ राजकीय संदर्भ प्राप्त झाले नव्हते. याविषयी दिगंबर पाध्ये म्हणतात "स्वातंत्र्योत्तर काळात भारतात लोकशाही व्यवस्था आल्यामुळे राजकारणाचा अर्थ अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे. आजच्या या आधुनिक काळात अर्थकारण, समाजकारण व राजकारण ही अंगे एकमेकांमध्ये इतकी मिसळून गेली आहेत की त्यांना वेगळी स्वतंत्र क्षेत्रे मानण्याऐवजी एकंदर राजकीय व्यवहाराकडे पाहण्याचे हे दृष्टिकोण आहेत असेच म्हणावेसे वाटते. एखादा संप किंवा सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे आंदोलन हे एका अर्थी सामाजिक अंगाशी निगडित असले किंवा तसे वाटत असले तरी अंतिमतः त्याचा संबंध कोणत्या ना कोणत्या प्रकारे सत्तासंपादनाशी जुळत असल्यामुळे त्या घटनांना राजकीय म्हणता येते."[५]

साठोत्तरी दलित आंबेडकरी कादंबरीतील बाबुराव बागूल 'कोंडी', उत्तम कांबळे 'श्राद्ध', शरणकुमार लिंबाळे 'भिन्नलिंगी' आणि 'उपल्या' इत्यादी कादंबऱ्यांमधून राजकीय जीवनाचे तपशील साकार झाले आहेत.

E- ISSN 2582-5429
**Akshara Multidisciplinary Research Journal**
Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54
*Dr. Ambedkar in the Global Context* Vol. 5 , Special Issue 02 , August 2021

बाबुराव बागूल यांची 'कोंडी' ही राजकीय कादंबरी आहे. बागूलांच्या विचाराचा केंद्रबिंदू माणूस आहे आणि याच दृष्टिकोनातून त्यांनी कादंबरी लेखन केले आहे. त्यामुळे त्यांच्या कादंबरीतून वास्तवाचे अस्सल दर्शन घडते. याविषयी चंद्रकांत बांदिवडेकर लिहितात, "कादंबरी हा वास्तवाभिमुख वाङ्मय प्रकार असल्यामुळे या वास्तवाचा आभास अधिक गडदपणे यावा यासाठी कादंबरीतील पात्रे ज्या भूप्रदेशावर सक्रिय असतात त्याचा स्पष्ट ठसा वाचकांच्या मनावर उमटावा असा प्रयत्न कादंबरीकार करत असतो. माणसाचे पाय ज्या भूमीवर उभे असतात त्या भूमीचे स्वरूप स्पष्ट झाले की माणसाला अस्तित्वाचे भान अधिक भरीव होते."[६] बागुलांनी 'कोंडी' या कादंबरीतून मुंबईच्या लेबर कॅम्प मधील लोकांचे जीवन, त्यातून उभे राहणारे दलितांचे नेतृत्व आणि त्यांच्या जीवनातील दुःख यांची मीमांसा केली आहे. या कादंबरीचा नायक पावन पगारे दलितांच्या दुःखावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करतो परंतु तेथील कम्युनिस्टांची दादागिरी, गुंडगिरी आणि वस्तीतील लोकांचे अज्ञान यामुळे त्याला हे कार्य करणे शक्य होत नाही, तरीही पावन हा कार्यकर्ता म्हणून समाजसेवेचे काम करत राहतो. त्यामुळे त्याचा मित्र बाजीराव कांबळे त्याला म्हणतो,"पगारे तुम्हाला सांगतो तुम्ही इथे काही करू नका. ती हिंदूंची कल्पना आहे ना त्याप्रमाणे दुःख फार झाले म्हणून बाबासाहेब बुद्धानंतर आले. आता तितकीच वर्ष एखाद्या महापुरुषाची वाट बघा. हे राजकारणी तिरशिंगराव समाज पुढे नेण्यासाठी लढत नाहीत तर मागे नेण्यासाठी लढतात. माझ्या या तिन्ही चारी पार्टी वाल्यांवर आरोप आहे. ते साबोटायझर आहेत. दुःखाचे ठेकेदार आहेत."[७] या कादंबरीतून दलित लोकही दलित लोकांसाठी काही करत नाही ही खंत व्यक्त झाली आहे. मनूने जाती-जातीत वैर राहावे अशीच व्यवस्था निर्माण केली. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे एकमेकांच्या विरुद्ध आहे पण त्यांच्यात असलेल्या पोटजाती एकमेकांच्या विरोधात उभ्या आहेत. त्यामुळे दलितांच्या वाट्याला आलेले दुःख कसे नाहीसे होणार? हा पावन पगारेला पडलेला प्रश्न आहे. हे दुःख संपवायचे असेल तर बाबासाहेब आंबेडकरांसारखा एखादा महापुरुष पुन्हा जन्माला यावा लागणार असे या कादंबरीचा नायक पावन पगारेला वाटते. बागुलांच्या 'कोंडी' या कादंबरीवर आंबेडकरवादाप्रमाणेच मार्क्सवादाचा ही प्रभाव आहे. दलितांचे संघटन आणि कम्युनिस्टांचे मार्गदर्शन, त्यांच्या हालचाली बागुलांनी साम्यवादाच्या आधारे 'कोंडी'त मांडून कादंबरीवरील आंबेडकरवादाची पकड मजबूत केली आहे. याविषयी चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "मराठीच्या रोमॅण्टिक परंपरांना थोडाफार धक्का देण्याचे कार्य मार्क्सवादी प्रवाहाला दिले पाहिजे. अलीकडे मार्क्सवादाचा प्रवाह दलित साहित्यात मिसळून गेलेला दिसतो."[८] बाबुराव बागुलांनी 'कोंडी' या कादंबरीतून मुंबईच्या लेबर कॅम्पमधील खालच्या पातळीवरचे जीवन, तेथील राजकीय कार्यकर्ते, त्यांच्यातील ताणतणाव, स्पर्धा, असुरक्षिता, गलिच्छपणा आणि अनाचार यांचे चित्रण केले आहे.

उत्तम कांबळे यांच्या कादंबरीचे विषय समाजाला गंभीरपणे चिंतन करायला लावणारे आहे. 'श्राध्द'मध्ये दलितांमधील अंतर्विरोध आणि दलित चळवळीची पडझड याचे चित्रण आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवमुक्तीच्या लढ्याने दलित समाजात नवे आत्मभान निर्माण होऊन आत्मसन्मानाने जगण्याचे नवे बळ त्यांना मिळाले. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या लोकशाही मूल्यांच्या केंद्रस्थानी माणूस आहे याची जाणीव झाली. समाजातील दलित, शोषित समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी नवीन मूल्यव्यवस्था आणि त्यावर आधारित समाज व्यवस्था निर्माण करण्यात आली परंतु दलित समाजातील अंतर विरोधामुळे आणि त्यांच्यातील गटबाजीमुळे दलितांमधील संघर्ष वाढत गेला. त्यामुळे डॉ. आंबेडकरांना मान्य असणारे परिवर्तन घडून आले नाही. सवर्णांनी शोषितांना आणि उपेक्षितांना आपापसात लढवण्यासाठी षडयंत्र रचले आणि त्यात सवर्ण यशस्वी झाले.

'श्राद्ध' मधील आबा कांबळे हा आंबेडकरी विचाराने प्रेरित असलेला नायक दलित समाजातील सर्व शोषित घटकांना एकत्र करतो. महार, मांग, चांभार या दलित समाजातील सर्व लोकांना एकत्र करून त्यांची आर्थिक उन्नती करण्यासाठी 'भीमविजय सहकारी सोसायटी' स्थापन करतो. महार, मांग, चांभार यांना या निमित्ताने एकत्र करून शरणगुप्पीत प्रथमच आंबेडकर जयंती चांभाराच्या गल्लीत साजरी करतो. दलितांमधील सर्व जाती आबांच्या प्रयत्नामुळे एकत्र येतात पण सनातनी समाजव्यवस्थेतील गाव पुढाऱ्यांना ते सहन होत नाही. दलितांच्या प्रगतीमुळे आपल्या अस्तित्वाला धोका निर्माण होईल अशी भीती गावातील पाटील, सरपंच यांना वाटते. त्यामुळे ते आबाचा मुलगा भीमरावशी संधान साधून

आबा विरुद्ध कटकारस्थान करतात. ग्रामपंचायतीची निवडणूक व सोसायटीच्या निवडणुकीत षडयंत्र रचून दलितांमध्ये दुही निर्माण करतात आणि या संघर्षात ते यशस्वी होतात.

उत्तम कांबळे यांनी 'श्राध्द' या कादंबरीतून वास्तवाचे चित्रण संथगतीने घडवले आहे. या कादंबरीमध्ये मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या मागणीसाठीचे आंदोलन, आंतरजातीय विवाह, राजकारण, सुशिक्षितांची दलित चळवळीशी असलेली बांधिलकी, सवर्णांनी दलित मुलीवर केलेला अत्याचार, दलितांचा आवाज दडपून टाकण्यासाठी सवर्ण शेतकऱ्यांनी दलित मजुरांवर टाकलेला बहिष्कार हे या कादंबरीच्या कथानकाचे विशेष होय. दलित कादंबरी एका विशिष्ट आवर्तनात सापडली आहे असा आक्षेप दलित साहित्यावर जो घेतला जातो, तो 'श्राद्ध'च्या बाबतीत खरा नाही कारण या कादंबरीमध्ये उत्तम कांबळे यांनी वेगळा विषय मांडून अनेक विषयांना स्पर्श केले आहे. या कादंबरीच्या संदर्भात कृ. षी. पेडणेकर म्हणतात, "दलितांचा दलितेतेतरांशी चाललेल्या संघर्ष पेक्षा दलितांचा दलितांशी चाललेला संघर्ष येथे अधिक प्रमाणात चित्रित झालेला आढळतो. त्यामुळे दलितांच्या सुखदुःखारोबरच त्यांची विचारशून्यता आणि दुराचार या कादंबरीत आविष्कृत होतात."[१] आबा कांबळे ज्या ध्येयाने प्रेरित होऊन दलित समाजाला एकत्र आणतो तो विचार बाजूला पडतो आणि या संघर्षात सवर्ण यशस्वी होतात. हे सामाजिक व राजकीय वास्तव उत्तम कांबळे यांनी 'श्राद्ध' या कादंबरीतून मांडले आहे.

शरणकुमार लिंबाळे यांच्या 'भिन्नलिंगी' या कादंबरीमध्ये दंगल आणि परपुरुष या दोन लघु कादंबऱ्यांचा समावेश आहे. त्यातील दंगल ही कादंबरी त्यांनी १९८१ मध्ये लिहिली. त्यानंतर १९८८ मध्ये त्यांनी 'परपुरुष' ही दुसरी कादंबरी लिहिली. 'दंगल' आणि 'परपुरुष' या दोन्ही लघु कादंबऱ्या आशयाभिव्यक्तीच्या दृष्टीने वेगळ्या असून 'भिन्नलिंगी' या एकाच कादंबरी त्यांचा समावेश केलेला आहे. या कादंबरीची सुधारित आवृत्ती 'दंगल' या नावाने दिलीपराज प्रकाशनाने २००६ मध्ये प्रकाशित केली आहे.

'दंगल' या कादंबरीतून शरणकुमार लिंबाळे यांनी दलित चळवळ पुढे नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या 'दलित पँथर' या तरुणांच्या संघटनेचे चित्रण केले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली पण परिस्थिती आहे तशीच आहे. दलितांना शिक्षण मिळू लागले. नोकऱ्या मिळू लागल्या. त्यासाठी शासनाकडून सवलती मिळू लागल्या. दलित समाज प्रगती करू लागला परंतु जातीयता नष्ट झाली नाही. प्रत्येक जण आपापल्या जातीबद्दलचा अभिमान बाळगून आहे. त्यातून कसा संघर्ष निर्माण होतो याचे थोड्या वेगळ्या अंगाने चित्रण 'दंगल'मध्ये आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकद दिली. शिक्षणाची दारे उघडी करून दलितांना त्यांच्या स्वत्वाचे भान करून दिले. त्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून अन्यायाविरुद्ध पेटून उठणाऱ्या तळागळातील लोकांना जगण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागतो. मनामध्ये परिवर्तनाचे विचार असले तरी ते प्रत्यक्षात साकार होत नाहीत. एखाद्या विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन कोणतेही विधायक कार्य हाती घेतल्यास सत्ता, गटबाजीचे राजकारण आडवे येते आणि अपुऱ्या आर्थिक बळामुळे काहीही शक्य होत नाही. राम बगा हा या कादंबरीचा नायक आहे. तो बी. ए. झालेला असून सुशिक्षित बेरोजगार आहे. तो 'दलित पँथर'चा कट्टर कार्यकर्ता आहे. तो 'दलित पँथर'मध्ये तळमळीने काम करतो. सवर्ण दलितांवर अन्याय अत्याचार करतात तेव्हा त्यांना वाचा फोडण्याचे काम पँथरचे कार्यकर्ते करतात. धोंडू आणि रत्ना यांची मुलगी सुमीवर सरपंचाचा मुलगा बलात्कार करतो तेव्हा त्याविरुद्ध दलित पँथरचे कार्यकर्ते आवाज उठवतात. सवर्ण सावकाराच्या विहिरीवर हनम्या पाणी पितो. हनाम्याने विहीर बाटवली म्हणून सावकार तहानलेल्या हनाम्याला मारतो आणि त्यात त्याचा जीव जातो. या अन्याय अत्याचाराचा निषेध म्हणून पँथरचे कार्यकर्ते मोर्चे, आंदोलन करतात. दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरुद्ध कार्यकर्ते पेटून उठतात. पँथरचा अध्यक्ष स्वतःची प्राध्यापकी सांभाळून पुढारीपणाची हौस मिटवतो. 'दंगल' या कादंबरीमध्ये चौकात आंबेडकरांचा पुतळा उभारण्यावरून पँथर व सवर्ण यांच्यात होणारा वाद, पँथरचा अध्यक्ष महार जातीतीलच असावा तो अन्य जातीच्या नसावा या संदर्भातील चर्चा, सुमीवर पँथरमधीलच कांबळे सरांच्या भावाने केलेला बलात्काराचा अयशस्वी प्रयत्न, आंबेडकरांच्या पुतळ्याची केलेली विटंबना इत्यादी अनेक घटना प्रसंगातून 'दंगल'

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal SJIF Impact- 5.54
Dr. Ambedkar in the Global Context Vol. 5 , Special Issue 02 , August 2021

कादंबरीचे कथानक साकार झाले आहे. या घटना प्रसंगातून दलित चळवळीची नोंद शरणकुमार लिंबाळे यांनी घेतली असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व तत्त्वज्ञान चळवळीच्या माध्यमातून साकार केले आहे.

शरणकुमार लिंबाळे यांनी 'उपल्या' या कादंबरीच्या माध्यमातून आंबेडकरी चळवळीतील अंतर्गत गटबाजीचे चित्रण केले आहे. उपल्या ही वानराची एक जात आहे. ह्या वानराच्या टोळीचा नायक नर असतो त्यामुळे त्याच्या टोळीत एखादा नर जन्माला आला की तो त्याला मारून टाकतो कारण आपण एकटेच नर असावे अशी त्याची वृत्ती असते. दुर्दैवाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर आंबेडकरी चळवळीची स्थितीगती अशीच झाली आहे. डॉ. आंबेडकरांनी दलित समाजाची प्रगती व्हावी. सर्वांनी एकत्र यावे हा उदात्त हेतू समोर ठेवून 'रिपब्लिकन पक्षा'ची स्थापना केली परंतु आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर चळवळीचे अधिकारशाही आपणच असावे. आपणच सत्ता भोगावी. त्यात दुसरा प्रतिस्पर्धी होऊ नये असा अट्टाहास आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये निर्माण होऊन 'आर.पी.आय.', 'दलित पँथर' आणि 'भारतीय दलित पँथर' अशा विविध संघटना निर्माण झाल्या. काहींनी आंबेडकरी चळवळच ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. या सर्व घडामोडीचे चित्रण शरणकुमार लिंबाळे यांनी 'उपल्या' या कादंबरीतून केले आहे. खरं म्हणजे उपल्या वानराच्या टोळीच्या नायकाची वृत्ती ती सर्वसाधारणपणे सर्वच प्राण्यांमध्ये थोड्याफार प्रमाणात आहे. मनुष्यप्राणी ही त्याला स्वतःला वरची पायरी गाठायची असेल तर दुसऱ्याला दाबून ठेवून वर चढत असतो पण अशा प्रकारची स्थिती दलित समाजामध्ये होऊ नये असे लेखकाला वाटते.

'उपल्या' या कादंबरीचे कथानक चार प्रकरणात विभागले आहे. अनिरुद्ध, गौतम गांगुर्डे, मिलिंद, रोहिदास नागदेवे, पंडित कानडे, भीमा भोळे, विनया प्रधान, दयानंद किनकर या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या गोष्टींमधून कादंबरीचे कथानक पुढे सरकत जाते. प्रत्येक प्रकरणात यांच्यापैकी कुणीतरी एकजण निवेदन करतो आणि कादंबरीचे कथानक पुढे सरकत जाते. पहिल्या प्रकरणात ब्राम्हण वर्गातील मुलगा दलित कसा होतो याचे चित्रण आले आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये दलित चळवळ सर्व बाजूंनी ताकदीने उभी राहते याचे चित्रण आले आहे. तिसऱ्या प्रकरणात एका सनातनी कर्मठ ब्राह्मण कुटुंबातील मुलगी दलितांची पत्नी म्हणून जीवन सुरू करताना दिसते. चौथ्या प्रकरणात संघटित झालेली आंबेडकरी चळवळ खिळखिळी बनवून प्रस्थापित व्यवस्थेचा घटक भरताना दिसते. या प्रकरणात 'रिपब्लिकन पक्ष' आणि 'काँग्रेस पक्ष' यांची युती होऊन सर्वसामान्य कार्यकर्ता असलेला रोहिदास नागदिवे समाजकल्याण खात्याच्या मंत्री होतो. सामान्य कार्यकर्ता असलेला माणूस मंत्री झाल्यानंतर लवकर श्रीमंत होण्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकतो. त्याच्या वर्तणुकीमुळे चळवळ खिळखिळी बनते. त्यामुळे नवा कार्यकर्ता उभा करण्याची तळमळ कुणालाच राहत नाही. हे आपल्याला दलित चळवळीच्याच बाबतीत म्हणता येते असे नाही इतर राजकीय पक्षांची स्थिती हीच आहे. आंबेडकरी चळवळीतील नेत्यांना वास्तवाचे भान करून देणारी उत्तम राजकीय कादंबरी म्हणून या कादंबरीचा निर्देश करता येईल.

'कोंडी', 'श्राद्ध', 'दंगल' आणि 'उपल्या' या कादंबऱ्यामधून येणारे राजकीय जीवनाचे तपशील आंबेडकरी चळवळीतील नेत्यांना वास्तवाचे भान करून देणारे असून या कादंबऱ्यांचा उल्लेख उत्तम राजकीय कादंबरी म्हणून करता येईल. ह्या कादंबऱ्यांतून राजकीय जीवनाचे सूक्ष्म आणि तपशीलवार चित्रण आले आहे.

**निष्कर्ष**

१) १९६० नंतरची दलित-आंबेडकरी कादंबरी बहुआयामी आहे.
२) साठोत्तरी दलित-आंबेडकरी कादंबरीतून राजकीय जीवनाचे तपशील साकार झाले आहेत.
३) साठोत्तरी दलित-आंबेडकरी कादंबरीतून येणारे राजकीय जीवनाचे तपशील आंबेडकरी चळवळीतील नेत्यांना वास्तवाचे भान करून देणारे आहे.
४) साठोत्तरी दलित-आंबेडकरी कादंबरीतील राजकीय कादंबरीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव आहे.
५) साठोत्तरी दलित-आंबेडकरी कादंबरीतून दलित समाजाच्या अंतरविरोधाचे चित्रण प्रभावीपणे साकार झाले आहे.

**संदर्भ सूची**

१. भालचंद्र फडके: प्रदक्षिणा खंड पहिला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,२०१२ पृ. क्र. २०२
२. ल. ग. जोग : कादंबरी, चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९६६ पृ. क्र.५८
३. वा. ल. कुलकर्णी : वाङ्मयातील वादस्थळे : पाप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वितीय आवृत्ती १९६८, पृ. क्र. १
४. वा. ल. कुलकर्णी : वाङ्मयातील वादस्थळे : पृ. क्र. १२२
५. विलास खोले : (संपा) गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी, लोक वाङ्मय गृह, मुंबई, प्रथमावृत्ती २००२ ९८
६. चंद्रकांत बांदिवडेकर : मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीय आवृत्ती १९९१ १३१
७. बाबुराव बागुल : कोंडी, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २०००, पृ. क्र. १५१
८. चंद्रकांत बांदिवडेकर : मराठी कादंबरी चिंतन आणि समीक्षा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीय १९९१, पृ. क्र. ३५
९. डॉ. नंदा मेश्राम : दलित कादंबरी स्वरूप व समीक्षा डिंपल प्रकाशन ठाणे, प्रथम आवृत्ती २००६ पृ. क्र. ३

■ ■ ■

ISSN : 2249-5134



# PERSPECTIVES

( A National Interdisciplinary Annual Research Journal)

*Peer Reviewed National Researc Journal for Interdisciplinary Studies in Arts Commerce & Social Sciences*

*Special focus on*

**Buddhist Archaeology & Pali Literature**

**Vol- I, Issue (X) 2021**

**Dr. Madhukarrao Wasnik**
**P.W.S. Arts, Commerce & Science College**
Kamptee Road, Nagpur - 26
( Reaccreditated 'B' by NAAC)
**Official Website :** www.pwscollege.edu.in **Email :** principal@pwscollege.edu.in

| | | | |
|---|---|---|---|
| 17 | सर्वसमावेशक आर्थिक विकासाचे जनक : बुध्द | प्रा. डॉ. प्रज्ञा बागडे | 110-117 |
| 18 | सम्राट अशोकाच्या शिलालेखांचे बुध्द धम्मास योगदान | प्रा. वसुंधरा पाटील | 118-124 |
| 19 | साठोत्तरी दलित–आंबेडकरी कादंबरी आणि बौद्ध तत्त्वज्ञान | अमित वासुदेव गजभिये<br>डॉ.मनिषा नागपुरे | 125-131 |
| 20 | पुरातत्त्व संस्कृतीमध्ये पाली भाषेचे महत्त्व व बौद्ध तत्त्वज्ञान | अरविंद रामचंद्र टिकले | 132-137 |
| 21 | सम्राट अशोक व तृतीय बौध्द संगिती | डॉ. सीमा लालचंद गोलाईत | 138-140 |
| 22 | भगवान बुद्ध आणि त्यांचे आर्थिक तत्वज्ञान | कु. माधुरी रा. बोटरे | 141-143 |

# साठोत्तरी दलित-आंबेडकरी कादंबरी आणि बौध्द तत्त्वज्ञान

*अमित वासुदेव गजभिये*
*डॉ.मनिषा नागपुरे*

सारांश

बुद्ध धम्म हा भारताच्या मातीत रूजलेला धम्म आहे. त्यामुळे जगाच्या पटलावरील अनेक देश आजही गौतम बुद्धाच्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न करत आहेत. बुद्धाचे तत्त्वज्ञान हे सर्वसमावेशक असून बुद्धाने दुःखाचे कारण आणि त्यावरील उपाययोजना सांगिलल्या आहेत. जीवन दुःखमय आहे आणि त्याचे कारण तृष्णा आहे. त्यामुळे तृष्णेचा नाश केला तर माणसाची दुःखतून मुक्तता होऊ शकते. त्यावरील मार्ग म्हणजे अष्टांगिक मार्ग होय. माणसाची दुःखातून मुक्तता होऊ शकते हा प्रयत्नवाद बुद्धाने सर्वप्रथम सांगितला. बुद्ध धम्म मानवतेवर आणि समतेवर आधारित आहे. बुद्ध धम्मात ईश्वराला मुळीच स्थान नाही. बुद्धाने माणूस हा केंद्रबिंदू माणून माणसाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. या धम्मात मोक्ष नाही तर मार्ग असून बुद्धाचा धम्म विज्ञाननिष्ठ आणि शांतीच्या मार्गाचा आहे. दुःख निवारणासाठी बुद्धाच्या अष्टांगिक मार्गाचा अवलंब प्रत्येक माणसाने केला पाहिजे असे बुद्धाने सांगितले. बुद्धाच्या तत्त्वज्ञानात असे म्हटले आहे की, घडणाऱ्या घटनेमागे कारण असते. प्रत्येक कारण हे मानवी किंवा प्राकृतिक आहे. दैवी चमत्कृतिवादाचे खंडण करताना बुद्धाने तीन हेतू सांगितले आहेत. त्यातील पहिला हेतू माणसाला बुद्धिवादी बनविणे होय. दुसरा हेतू माणसाला स्वतंत्रपूर्वक सत्याचा शोध लावण्यासाठी सिद्ध करणे होय. शेवटचा आणि तिसरा हेतू ज्या भ्रामक समजूती माणसाचा शोध घेण्याची प्रवृत्ती मारतात. त्यांचे उगमस्थान नष्ट करणे होय. यावरून असे निदर्शनास येते की बुद्धाचा धम्म हा विज्ञाननिष्ठ आहे. पंचशीलाची तत्व जर सर्व माणसांनी आचरणात आणली तर माणूस दुःख निवारण करू शकेल. ही पंचशील तत्व म्हणजे कोणत्याही प्राणिमात्राला ठार करण्यापासून अलिप्त राहणे. चोरीपासून अलिप्त राहणे. असत्य भाषणापासून अलिप्त राहणे. कामवासनेपासून अलिप्त राहणे. मादक पदार्थापासून अलिप्त राहणे. ही पंचशील तत्वे बुद्धाने सांगितली.

सामाजिक सुधारणा करण्यासाठी माणसाने आपली मनोधारणा बदलावी असे सर्वप्रथम बुद्धाने सांगितले. सामाजिक, राजकीय, आर्थिक, आणि बौद्धिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करताना समतेचा परिपूर्ण विचार बुद्धाने केला. त्यामुळे आजच्या जटील आणि गुंतागुंतीच्या अनेक सामाजिक प्रश्नांची उत्तरे बुद्धाच्या शिकवणूकीत दडली आहेत.

बौद्ध तत्त्वज्ञानात कर्मकांडाला स्थान नाही. गौतम बुद्धाने त्यांच्या पहिल्या प्रवचनातच जगात दुःख आहे आणि दुःखातून माणसाला मुक्त करणे हे धम्माचे कर्तव्य आहे असे सांगितले. बौद्ध तत्त्वज्ञानात आत्म्याला स्थान नाही. आत्म्याचे अस्तित्व बुद्धाने नाकारले आहे. त्यामुळे आत्मा आणि ईश्वराच्या अंगाने येणाऱ्या कर्मकांडाला बुद्धाच्या तत्त्वज्ञानात स्थान नाही. दलित-आंबेडकरी साहित्यावर बौद्ध तत्त्वज्ञानाचा विशेष प्रभाव आहे. दलित-आंबेडकरी साहित्यातील 'सूड', 'अघोरी' आणि 'शूद्र' कादंबरीवर बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव आहे.

**बीज शब्द** : दलित-आंबेडकरी कादंबरी, आंबेडकरी विचार, बौद्ध तत्त्वज्ञान, सामाजिक समता

## प्रस्तावना

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने दलित समाजाला प्रभावी नेतृत्त्व लाभले. त्यांनी दारिद्र्या, अज्ञान, लाचारी आणि अपमान यांनी ग्रासलेल्या दलित समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण केला. डॉ. आंबेडकरांच्या मानवतावादी कार्यामुळे दलित समाजाला सत्वाची जाणीव झाली. हजारो वर्षे पशुपातळीवरचे जीवन जगणाऱ्या दलित समाजाला माणूसकीची जाणीव झाली. डॉ. आंबेडकारंचे आचार, विचार आणि त्याचे तत्त्वज्ञान हे 1960 नंतर उदयास आलेल्या दलित-आंबेडकरी साहित्याची मूळ प्रेरणा आहे. त्यामुळे त्यांच्या नेतृत्त्वाने आणि चळवळीने दलित समाजाला प्राप्त झालेले आत्मभान हा दलित-आंबेडकरी साहित्याचा आणि कादंबरीचा आशयभूत आविष्कार असल्यामुळे दलित-आंबेडकरी कादंबरीतून आंबेडकरी विचार प्रकट झाला आहे. दलित-आंबेडकरी कादंबरीचा केंद्रबिंदू आंबेडकरी विचार असला तरी या कादंबरीवर बौद्ध

तत्त्वज्ञानाचाही तितकाच प्रभाव आहे. 'साठोत्तरी दलित–आंबेडकरी कादंबरी आणि बौद्ध तत्त्वज्ञान' या शोधनिबंधात बौद्ध तत्त्वज्ञानावर प्रकाश टाकण्यात आला असून बौद्ध तत्त्वज्ञान समजून घेणे हा या शोध निबंधाचा मुख्य हेतू आहे.

**दलित–आंबेडकरी कादंबरी आणि बौद्ध तत्त्वज्ञान**

दलित–आंबेडकरी साहित्यातील बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव शोधत असताना आपल्याला त्याचे मूळ संत साहित्यात शोधावे लागते. महाराष्ट्राच्या तेराव्या शतकातील संत साहित्यावर बौद्ध तत्त्वज्ञानाचा विशेष प्रभाव आहे. ज्ञानदेव आणि नामदेवादी संतांनी समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, वैकल्य, वैफल्य, उच्च, नीच, लहान, थोर, स्त्री, पुरूष, यांना विरोध करून कुळ, जाती आणि वर्ण हे अवघेची अकारण असे सांगून आध्यात्मिक लोकशाहीचा पाया घातला. या संतांची कधी जातिव्यवस्थेमुळे तर कधी समाजातील सामाजिक प्रतिष्ठेच्या विकृत कल्पनांमुळे सतत उपेक्षा होत राहिली. परंतु त्यांनी सामाजिक विषमतेच्या विरोधात बंड करून भेदाभेद भ्रम अमंगळ अशी धारणा असणारा एक खेळ चंद्रभागेच्या तिरी मांडला. संत साहित्यातील चोखाममेळ्यांची पत्नी सोयराबाईचा काळ हा रूढी, प्रथा, परंपरा आणि कर्मकांड यांना जोपासणारा होता. त्यामुळे सामाजिक विषमतेची आणि अस्पृश्यतेची झळ सोयराबाईलाही सोसावी लागली. तेव्हा अशा अस्पृश्य माणसाच्या बायकोने चोख्याच्या महारीनने चक्क विटाळाचे अभंग लिहिले. या अभंगांनी जातीपातीची बंधने मानणाऱ्यांची थोपाडे रंगविली. अशावेळी सोयराबाईचा मृदू असलेला स्वर नकळत कडवा आणि कठोर होतो. त्यात ती म्हणते,

देहासी विटाळ म्हणती सकळ।
आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध।
देहिंचा विटाळ देहीच जन्मला।
सोवळा तो झाला कवण धर्म।।

ज्या काळात प्रस्थापित समाजातील लोक शूद्राच्या सावलीचाही विटाळ करत होते. त्या काळात सोयराबाईने चक्क विटाळाचे अभंग लिहून त्याविरूद्ध बंड केले. निदान भक्तीच्या क्षेत्रात का होईना संतांनी समाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राच्या अठरापगड जातीतील संतांवर बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव दिसून येतो.

दलित–आंबेडकरी साहित्याचा केंद्रबिंदू समाजव्यवस्था आणि माणूस आहे. बौद्ध धर्माच्या केंद्रस्थानी सुद्धा समाज आणि माणूस आहे. बौद्ध धर्मावर दलित–आंबेडकरी साहित्यिकांची प्रगाढ श्रद्धा आहे. त्यामुळे बौद्ध विचारात आणि दलित–आंबेडकरी साहित्यिकांच्या विचारात साम्य दिसते. बौद्ध धर्म हा माणसाला महत्त्व देतो. जीजस, महंमद आणि कृष्ण या तीन धर्म संस्थापकांनी आपापल्या परिने धर्माचे महत्त्व विशद करताना कुणी स्वतःचा उल्लेख ईश्वराचा पुत्र म्हणून करतो. कुणी ईश्वराचा प्रेषित म्हणून करतो तर कुणी प्रत्यक्ष ईश्वर म्हणून करतो. परंतु बुद्धाने आपला उल्लेख मानवाचा पुत्र म्हणून केला आणि मानवाची सेवा मला महत्त्वाची वाटते हा विचार मांडला. "माझा जन्म ईश्वरी सामर्थ्यानं झाला, अगर माझ्या अंगात मोठी दैवी शक्ती आहे, असा दावा बुद्धाने केला नाही. मार्गदाता व मोक्षदाता या दोन्ही शब्दामध्ये बुद्धाने फरक केला आहे. जीजस, महंमद आणि कृष्ण हे स्वतःला मोक्षदाता समजत होते. मी मार्गदाता आहे असे बुद्ध स्वतःला समजत होता." (डॉ. मालती इंगळे : बाबुराव बागूल व्यक्ती आणि वाङ्मय, देवयानी प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती 2009 पृ. क्र. 184) त्यामुळे बुद्धाचा धर्म सर्वोच्च आहे. त्यात ढोंगीपणाला व अंधश्रद्धेला स्थान नाही. त्यामुळे बौद्ध धर्माला उज्ज्वल भविष्यकाळ आहे. याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "बौद्ध जनाचे कर्तव्य फक्त चांगला बौद्ध म्हणून राहणे एवढेच नसून बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार करणे म्हणजेच मानवजातीची सेवा करणे होय." (तत्रैव, पृ. क. 184) बुद्धाचे चिंतन आणि तत्त्वज्ञान गती, प्रगती आणि क्रांतिवादी आहे. ते अनात्मवादी आहे. बुद्धाचे तत्त्वज्ञान उच्च स्वरूपाचे असून त्याच्या शिकवणूकीचा गाभा क्रांतिकारकत्त्व घेऊन आला आहे. मानवमुक्ती आणि मानवाचे कल्याण हा बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे.

भारतीय समाज जीवनात अनेक प्रकारचे सामाजिक स्तर असून हजारो जाती, पंथानी ते वेढलेले आहे. भारतीय समाज जीवनाची रचना जन्मावर आणि जातीवर आधारित आहे. बुद्ध धम्म हा "समाजातील विषम स्तर नष्ट करून समतेच्या दृष्टीने समाजाची निर्मिती करणारी शिकवण देणे." (डॉ. केशव मेंढे : आंबेडकरवादी साहित्यातील निबंधकार : डॉ. प्रकाश

खरात, वत्स विनायक प्रकाशन, पुणे–नागपूर, प्रथमावृत्ती 2019, पृ. क्र. 48) ही बुद्ध धर्माची शिकवण आहे. बुद्धाने ईश्वर, आत्मा, पाप–पुण्य, गरीब–श्रीमंत, स्वर्ग–नरक इत्यादी कल्पनावादी सिद्धांत नाकारले व सामाजिक जीवनातील वास्तव, परिस्थितीचे आकलन करून प्रज्ञा, शील, करूणा या मूल्यांवर समाज उभा करण्याचा प्रयत्न केला आहे. मानवाच्या प्रयत्नानेच त्याचे दुःख नष्ट होऊ शकते. त्यासाठी योग्य मार्गाने कष्ट केले पाहिजे असा प्रगतिशील विचार बुद्धाने दिला. या दृष्टिकोनातून दलित–आंबेडकरी कादंबरीकारांनी कादंबरी लेखन केले आहे. हे त्यांच्या कादंबरी लेखनावरून दृष्टीस पडते.

दुःख मानव निर्मित आहे, तेव्हा दुःख निवारण करणे हे माणसाच्याच हातात आहे. हे बौद्ध तत्त्वज्ञानाचे मुख्य सूत्र आहे. मानवी मनातील वासना, विकार आणि इच्छापूर्तीचा हव्यास हे दुःखाचे मूळ कारण असल्याचे बुद्धाने म्हटले आहे. भारतीय समाज जीवनातील वर्ण व जाती आणि जागतिक पातळीवरील वर्गव्यवस्था यांची निर्मिती वासना, विकार आणि इच्छापूर्तीच्या हव्यासातून झालेली आहे. हे आपण समजून घेतल्यास जगातील सर्व प्रकारची विषमता दूर करणारी पहिली व्यक्ती म्हणजे बुद्ध होय. हे आपल्या लक्षात येईल.

बाबुराव बागूलांच्या 'सूड' या दीर्घकथेतील जानकीवर तिच्या लहानपणापासून अनेक प्रकारचे पाशवी मानसिक, शारीरिक आणि लैंगिक अत्याचार झाले आहेत. या अत्याचाराची भीषणता एवढी भयावह आहे की, तिला आपण स्त्री असल्याची घृणा वाटू लागते. याचे मुख्य कारण म्हणजे तिच्या कोवळ्या वयात तिच्यावर अनेक पुरूषांनी लैंगिक अत्याचार केले आहेत. त्यामुळे तिच्या निरागसतेला तळे जातात. जानकी वेश्यागृहातून बाहेर पडते आणि संन्याशी वेश धारण करते. परंतु संन्याशी वेश धारण केल्यानंतर ही ती पुन्हा एकदा नरपशूकडून लुटली जाते. त्यामुळे तिला सर्वच पुरूषांबद्दल घृणा, चीड, तिरस्कार आणि संताप वाटू लागतो. तिच्यावर आणि तिच्या मनावर एवढे भीषण आघात झाले आहेत की पुरूषांच्या नजरेनेही आपल्यावर बलात्कार होत आहेत अशी जाणीव तिच्या मनात घर करून बसते. स्त्री जन्म हे आपल्या दुःखाचे कारण आहे म्हणून ती पुरुष वेश धारण करून अलखनिरंजन स्वामींना गुरू मानून त्यांच्या सोबत तपश्चर्या करण्यासाठी हिमालयात जाण्याचा निर्धार करते.

'सूड' या कथेतील अलखनिरंजन स्वामीवर बुद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव आहे. ते ज्वालाप्रसादला म्हणजे जानकीला आपल्याविषयी माहिती सांगताना म्हणतात की, "ज्वाला मी जगलो नाही. माणसे कशी जगतात हे मला माहीत नाही. मी एका ब्रम्हचाऱ्याकडे शिकत होतो. एकदा तिथे हरिद्वारला आताचे राहुल सांकृत्यायन आले. ते मला म्हणाले, "तू सारखा फिरतोस, तू काय पाहिलेस?", "काही नाही! फक्त हरिद्वार," "मग इतर कधी बघणार?", कधीही बघू! कधीही" पण स्वर्गाची वाट धरण्याआधी मी निघालो. विद्याचरण हा अनाथ मुलगा दिसला. संगती घेतला. आता तू भेटलास पण तू जे पाहिलं आहेस ते मी पाहिलेलं नाही. मला ते दाखवशील." (बाबुराव बागूल : सूड (कादंबरी), लोकवाङ्मय गृह, मुंबई, अकरावी आवृत्ती 2014, पृ. क्र. 47) या संवादावरून हे स्पष्ट की स्वामीला राहुल सांकृत्यायन या बौद्ध तत्त्वज्ञाचा सहवास लाभला होता आणि त्यांच्या सांगण्यावरून स्वामीजी भ्रमंती करण्यास निघाले. स्वामीजींच्या अंगी राग, द्वेष, वासना हे विकार नाहीत. यावरून त्यांनी बौद्ध तत्त्वज्ञान अंगीकारल्याचे दिसते. म्हणून ते कोणतेही सत्य विकारविरहित दृष्टीने स्वीकारतात. जानकी कोण आहे? तिने कोणते जीवन जगलेले आहे? हे कळल्यावरही त्यांना जानकीचा द्वेष व राग वाटत नाही. याउलट तिचे दुःख पाहून तिच्याविषयी त्यांच्या मनात करूणा निर्माण होते. बौद्ध तत्त्वज्ञानामधील क्षणभंगुरतावाद, अनित्यतावाद आणि विकारविरहित दृष्टीने सत्य स्वीकारणाचे तत्त्वज्ञान जानकीला स्वामीच्या सहवासात आल्यावर प्राप्त होते. त्यामुळे सूडाने पेटलेली, आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणारी जानकी आपण स्त्री आहोत व स्त्रीच राहणार हे सत्य स्वीकारते आणि स्वामीला आपले स्त्रीत्व बहाल करते. प्रत्येक गोष्ट ही अनित्य व क्षणभंगुर आहे हे जानकीला कळल्यानंतर ती हसत हसत मृत्यूलाही समोर जाते. यावरून बुद्धकालीन गणिका (वेश्या) असलेल्या व नंतर बौद्ध धम्म स्वीकारणाऱ्या आम्रपालीची आठवण होते.या कथेतील स्वामी म्हणजे प्रज्ञा, शील आणि करूणेचे प्रतीक आहे. बागूलांना या कथेतील स्वामीच्या माध्यमातून बुद्धाचे तत्त्वज्ञान सांगायचे आहे. "अन्याय अत्याचारावरील 'सूड' घेण्याचा मार्ग बुद्ध तत्त्वज्ञानात विध्वंसक, हिंसक ठरला आहे. प्रज्ञेने आणि करूणेने या सूड प्रवृत्तीला जिंकणे हीच खरी मानवमुक्ती आहे. म्हणून सूड भावनेतून जानकीला मुक्त करण्यासाठी स्वामी या पात्राचे उदात्तीकरण बागूल करतात." (डॉ. मालती इंगळे : बाबुराव बागूल व्यक्ती आणि वाङ्मय, पृ. क्र. 98)

बागूलांच्या 'अघोरी' या कादंबरीतील अघोरी पाटलाची सून पार्वतीची आणि सुखा भक्ताच्या मुलीची मागणी करतो. कारण पार्वती ही पद्मीनी असून सुखा भक्ताची मुलगी नागिणी आहे. पद्मीनी आणि नागिणीच्या योनीची एकत्र पूजा केली तर दिव्य सिद्धी प्राप्त होते. त्यामुळे अघोरी पाटलाकडे पार्वतीची मागणी करतो. परंतु आपल्या शीलाला महत्त्व देणारी पार्वती हातात तलवार घेऊन अघोरी बाबाच्या विरूद्ध लढण्यास सिद्ध होते. आपल्या शीलाला महत्त्व देणारी पार्वती आपले शील जपण्यासाठी कोवळी आणि कोमल स्त्री असून सुद्धा उग्र रूप धारण करते आणि आपल्या भेकड, धर्मनिष्ठ व भोळ्या पतीला पार बदलवून टाकते.

सुधाकर गायकवाड यांच्या 'शूद्र' या कादंबरीतील स्वतःच्या आयुष्यावर असलेला शूद्रत्वाचा डाग नाहीसा करणारा नागनाथ सूडाने पेटून उठतो आणि वत्तनीया नगराच्या दिशेने चालू लागतो. वाटेत त्याला दहा–बारा भिक्षू भेटतात. नागनाथ आणि सब्बबुद्ध भिक्खू या दोघांच्या प्रदीर्घ संवादातून बौद्ध तत्त्वज्ञानाचे दर्शन घडते. भिक्खु म्हणाले, "या धनुष्याला बाण लावून तो तू एखाद्या प्राण्याच्या दिशेने सोडलास तर काय होईल?"

भिक्खूंनी आपणास असा पोरकट प्रश्न विचारावा हे पाहून त्या पिंजलेल्या अवस्थेतही त्याला हसू आले. पण आपले हसू दडवत तो म्हणाला, 'तो बाण त्या प्राण्याच्या शरीरात घुसून त्या प्राण्याचा मृत्यू होईल'

'समज, असाच बाण कोणीतरी तुझ्या दिशेने सोडला तर तू छाती काढून त्या बाणासमोर उभा राहशील का?

भिक्खूंच्या प्रश्नाचा रोख लवकर लक्षात न आल्याने तो किंचितसा गोंधळला व नंतर म्हणाला; नाही, बाण माझ्या दिशेने येताच माझा जीव वाचविण्यासाठी मी आडोसा शोधून त्याच्या आड उभा राहीन.'

'म्हणजे तुझा जीव तुला प्रिय असतो, त्याचप्रमाणे इतर प्राणी, पक्षी, माणसे यांनाही आपला जीव प्रिय असतो. ज्याप्रमाणे तुला जगावेसे वाटते त्याचप्रमाणे इतर प्राणी, पक्षी, माणसे यांनाही जगावेसे वाटते. स्वतः जगणे व दुसऱ्यालाही जगू देणे हा सर्व प्राणीमात्रांचा मूलभूत नैसर्गिक अधिकार आहे. दुसऱ्या जीवांची हत्या करणारे असे हे भयानक शस्त्र तू जवळ का बाळगतोस?'

भिक्खूंच्या या अनपेक्षित उपदेशाने तो गोंधळला. त्याच्या तोंडून शब्द बाहेर येईना. त्याच्या उत्तराची अपेक्षा न करता भिक्खू सब्बबुद्ध पुढे म्हणाले, 'ज्या अर्थी तू शस्त्र बाळगतोस त्या अर्थी तुझ्या मनात राग, द्वेष, मत्सर, लालसा व भीती आहे. अरे हे सर्व दुःखाचे मूळ आहे. माणूस जन्मल्याबरोबर त्याच्यासंगे एखाद्या काळ्याा तिळाप्रमाणे दुःख त्याच्या आयुष्याला चिकटलेले असते. परंतु दुःख नाहीसे करीत मनुष्याला अंतिम निर्वाण मिळवायचे असते.'

बोलता बोलता भिक्खूंचे नागनाथच्य उजव्या खांद्यावर झालेल्या जखमेकडे लक्ष गेले. त्यांनी ती जखम धुवून त्यावर औषधी लेप दिला. आपले अंग वेदनेने ठणकते आहे असे त्याने सांगताच भिक्खूंनी त्याला दोन वनस्पती–मुळ्यांचा अर्क प्यायला दिला. नंतर त्याला जेवण देऊन विश्रांती घेऊ दिली.

भिक्खूंच्या ओल्या प्रेमाचा, त्याच्या पिचलेल्या मनास स्पर्श होताच आत सलत असलेले सर्व दुःख, व्यथा शब्द होऊन बाहेर आल्या. ते ऐकून भिक्खू म्हणाले, 'तुझ्या वस्तीच्या लोकांची झालेली हत्या ही खरोखरच क्लेशदायक आहे. उच्च व नीच या संकल्पनांतून घडलेले ते अकुशल असे कर्म आहे. ते पुन्हा घडून आपलीही त्यात हत्या होणार नाही याची तू दक्षता अवश्य बाळग. पण त्यांच्यावर सूड उगवून तू काय साधणार आहेस? समज दोन लाकडे आणून तू ती पेटविलीस तर त्याचा अग्नी कितीसा असेल?

'तो अग्नी लहान असेल' नागनाथ म्हणाला पण त्या अग्नीमध्ये तू लाकडे, वाळलेल्या गवताचे भारे टाकलेस तर तो अग्नी मोठा असेल की नाही? होय; तो अग्नी मोठा असेल.

'या अग्नीच्या सानिध्यात एखादे घर आले, त्यानंतर दुसरे, नंतर तिसरे, अशा तऱ्हेने तो अग्नी अनेक घरे भस्मसात करील की नाही?

'अनेक घरेच काय, एखादे मोठे नगरच तो अग्नी भस्म करू शकेल!'

'तो अग्नी विझल्यानंतर तेथे काय सापडेल? फक्त राखच सापडेल' नागनाथ म्हणाला.

त्याचप्रमाणे तुझ्या मनात असलेला सूड आता लहान असला तरी तो पुढे उग्र रूप धारण करील आणि अग्नीप्रमाणे तो अनेक जीवांची हत्या करील. कदाचित त्यात तुझीही हत्या होईल. पण त्या धुमश्चक्रीनंतर शेवटी काय

उरणार आहे? राखेसारखी प्रेते व खिंडारे, अरे, त्याचप्रमाणे तुझी वस्ती बेचिराख झाली म्हणून तू व्यथित, दुःखी झाल्यास, तसेच वत्तनीया नगर तू उद्ध्वस्त केलेस तर तुझ्याप्रमाणे कोणी व्यथित नि दुःखी होईल की नाही? मग असा अघोर परिणाम घडून आणणारा सूड तू मनात का पोसतो आहेस? ज्याप्रमाणे उकळत्या पाण्यात स्वतःचे रूप दिसत नाही त्याचप्रमाणे सूडाने, मत्सराने, द्वेषाने, रागाने पेटलेल्या माणसात स्वतःचे हित समजत नाही.' नागनाथ आपला उपदेश एकाग्र चित्ताने ग्रहण करीत आहे हे पाहून भिक्खू सब्बबुद्ध यांना समाधान वाटले. त्याची प्रशंसा करून ते म्हणाले, 'माणवाचे अंतिम हित व सुख कशात आहे याचा शोध घेणारा असा तू एक मनुष्य आहेस हे पाहून फार बरे वाटले. नाही तर भिक्खूचे प्रवचन ऐकून परत अंगाला चिखल फासणारे अनेक लोक असतात. पण ज्यांना सतत दुःख, दैन्य, संकटे भोगावी लागतात त्यांना प्रथम सुखाचा व हिताचा शोध घ्यावा लागतो. पण असा प्रयत्न सम्यक ज्ञानाने, विचाराने करायला हवा. म्हणजे मार्गात निर्माण होणाऱ्या संघर्षावर तो सहज मात करू शकतो. तू मघा म्हणालास, आयुष्यावरचा शूद्र डाग नाहीसा करण्यासाठी तू हातात शस्त्र घेतलेस. परंतु त्याकरिता तुला शस्त्र हाती घेण्याची आवश्यकता नाही. जन्मतःच परमेश्वराने तुझ्या आयुष्यावर शूद्र हा डाग धूर्त व स्वार्थी लोकांनी मुद्दामच चिकटवला आहे. तुला गुलाम बनवून तुझ्याकडून आत्यंतिक सेवा करून घेण्यासाठी तुझ्या आयुष्यावर त्यांनी शूद्र हा डाग डकवला. पुढे तुला आपल्या दैन्याची, दुःखाची जाणीव होऊन तू विद्रोह करू नयेस म्हणून त्या गोष्टीला त्यांनी देवाचा व दैवाचा मुलामा दिला. तू ज्ञान मिळवून आपले दुःख व दैन्य म्हणजेच जे दुःख व दैन्य ज्यांनी तुझ्या पदरात टाकले, त्याच्याविरूद्ध बंड करू नये म्हणून तुला त्यांनी ज्ञानापासून वंचित केले. शस्त्रविद्या शिकून शस्त्राच्या बळावर तू त्यांना आव्हान देऊ नयेस म्हणून त्यांनी व्यापार–उदीम यापासून वंचित केले...

भिक्खूंच्या उपदेशाने त्याला प्रकाश मिळाल्याचा आनंद झाला. परंतु तेव्हाच त्याला एक शंका आली आणि तो मध्येच बोलून गेला, 'पण ब्राम्हण हे क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहेत आणि त्यामुळे....

भिक्खूंनी त्याचे भाषण मध्येच तोडले. हो, ते मी तुला सांगणारच आहे. तुझी शंका अशी आहे ना, की ब्राम्हण हे क्षत्रियापेक्षा श्रेष्ठ आहेत. क्षत्रिय हे वैश्यापेक्षा श्रेष्ठ आहेत. वैश्य हे शूद्रापेक्षा श्रेष्ठ आहेत. म्हणजेच क्षत्रिय हे ब्राम्हणापेक्षा नीच आहेत, वैश्य हे क्षत्रियापेक्षा नीच आहेत, शूद्र हे ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यांच्यापेक्षा नीच आहेत. तुझे असे मत असेल तर ते चूक आहे. या जगात कोणी श्रेष्ठ नाही की कोणी नीच नाही. समज, एका पाणस्थळी ब्राम्हणांनी कुदळ घेऊन खड्डा खणला तर तेथे पाणी मिळेल काय?

'होय; तेथे पाणी मिळेल' नागनाथ म्हणाला.

क्षत्रियाने तेथे खड्डा खणला तर, तेथे पाणी मिळेल काय? होय

वैश्याने खड्डा खणला तर, तेथे पाणी मिळेल काय? 'अर्थात'.

शूद्राने तेथे खड्डा खणला तर, तेथे पाणी मिळेल काय?

'होय; शूद्राने तेथे खड्डा खणला तरी तेथे पाणी मिळेल' यावर भिक्खू निग्रही स्वरात म्हणाले, 'मग ब्राम्हणाने खड्डा खणून मिळविलेल्या पाण्यात व क्षत्रियाने खड्डा मिळविलेल्या पाण्यात काही फरक असेल काय?.

'नाही; तसा फरक नसणारच.' नागनाथ म्हणाला.

मग ज्याप्रमाणे व ज्या अर्थी ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांनी खड्डा खणून मिळविलेल्या पाण्यात कसलाच फरक नाही, म्हणजेच ते सारखे आहे, त्याचप्रमाणे व त्या अर्थी ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यात कसलाच फरक नाही म्हणजे ब्राम्हण उच्च आणि क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे त्यांच्यापेक्षा नीच, असा भेदाभेद खोटा आहे. म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे सारखे व समान आहेत.'

नागनाथ या तर्कशुद्ध युक्तिवादाने खूपच भारावला नि उत्साहाने त्याने एक शंका विचारली, 'पण ब्राम्हण कदाचित असे म्हणतील की, ब्राम्हणाने खड्डा खणून मिळविलेले पाणी आणि क्षत्रियाने किंवा वैश्याने किंवा शूद्राने खड्डा खणून मिळविलेल्या पाण्यापेक्षा पवित्र आहे; म्हणून ब्राम्हण श्रेष्ठ आहे किंवा क्षत्रिय असे म्हणतील की, क्षत्रियाने खड्डा खणून मिळविलेले पाणी हे वैश्य व शूद्र यांनी खड्डा खणून मिळविलेल्या पाण्यापेक्षा पवित्र आहे, म्हणून क्षत्रिय हे वैश्य व शूद्र त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहेत. किंवा वैश्य असे म्हणतील की वैश्याने खड्डा खणून मिळविलेले पाणी हे शूद्राने खड्डा खणून मिळविलेल्या पाण्यापेक्षा पवित्र आहे, म्हणून वैश्य हे शूद्रापेक्षा श्रेष्ठ आहेत.

यावर भिक्खू खळखळून हसले व म्हणाले, ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य यांनी आपापल्या पाण्यास पवित्र मानले आहे. याचा अर्थ क्षत्रियाचे पाणी ब्राम्हण व क्षत्रिय यांच्या पाण्यापेक्षा आणखी कमी पवित्र पण तेच पाणी पृथ्वीच्या पोटात असते तेव्हा त्याला असले कमी–अधिक पावित्र्य असते? तर नाही. म्हणजे आपले श्रेष्ठत्व कायम राखण्यासाठी त्यांनी पाण्यात भेद पाडले आहेत. यात पाण्याच्या पावित्र्यापेक्षा त्यांचा स्वार्थच अधिक आहे. समज, ब्राम्हणाने अग्नी निर्माण करून तो एखाद्या घरावर किंवा राजवाड्यावर फेकला तर त्यामुळे त्या घराला किंवा राजवाड्याला आग लागेल काय?

'अर्थात! आग लागणारच नागनाथ उत्साहाने म्हणाला. 'तसेच क्षत्रियाने अग्नी निर्माण करून तो एखाद्या घरावर किंवा राजवाड्यावर फेकला तर त्यामुळे त्या घराला किंवा राजवाड्याला आग लागेल काय?
वैश्याने अग्नी निर्माण करून तो एखाद्या करून तो एखाद्या घरावर किंवा राजवाड्यावर फेकला तर, त्यामुळे त्या घराला किंवा राजवाड्याला आग लागेल काय?

होय; कोणीही त्या घरावर किंवा राजवाड्यावर अग्नी फेकला तर त्या घराला किंवा राजवाड्याला आग लागेल'.

'मग ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांनी निर्माण केलेला अग्नी एखाद्या घराला किंवा राजवाड्याला आग लागू शकते, तर ब्राम्हणाचा अग्नी क्षत्रियाच्या अग्नीपेक्षा पवित्र आहे असे म्हणता येईल काय?'
'नाही; तसे म्हणता येणार नाही; नागनाथ म्हणाला. अशाच तऱ्हेने क्षत्रिय, वैश्य यांनाही कसलेच विशेष हे पावित्र्य लाभले नाही, म्हणून ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ही भेदनीती चूक व अकुशल आहे. मुळात सर्व मानव समान आहेत.'(सुधाकर गायकवाडः शूद्र (कादंबरी), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती 2005, पृ.क्र. 55 ते 62) सुधाकर गायकवाड यांच्या 'शूद्र' या कादंबरीतील नागनाथ आणि सब्बबुद्ध भिक्खू याच्यातील वरील संवादातून बौद्ध तत्त्वज्ञानाचे दर्शन घडते. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे वर्णभेद चुकीचे आहेत. वर्णभेद माणसाने स्वःताच्या स्वार्थासाठी समाजात निर्माण केले आहेत. हे सब्बबुद्ध भिक्खू नागनाथला सांगतो. त्यातून बौद्ध तत्त्वज्ञानाचे दर्शन घडते.

## समारोप

दलित–आंबेडकरी कादंबरीतील 'सूड', 'अघोरी', आणि 'शूद्र' या कादंबऱ्यातून बौद्ध तत्त्वज्ञानाचे दर्शन घडते. बुद्धाचे तत्त्वज्ञान हे धार्मिक कर्मकांडाला विरोध करणारे असले आणि या तत्त्वज्ञानाचा पाया जरी आधात्म असला तरी ते सामाजिक आहे. सामाजिक समता प्रस्थापित करणे हा या तत्त्वज्ञानाचा मुख्य हेतू आहे. बौद्ध तत्त्वज्ञान लिंग, जात, वंश, धर्म, भाषा व प्रांत या भेदांना नाकारणारे आहे. ज्या काळात स्त्रियांना धार्मिक कार्यक्रमात आणि मंदिरात सहभागी होण्याची अनुमती नव्हती त्या काळात बुद्धाने स्त्री आणि पुरूष यांना बरोबरीचे स्थान देऊन सामाजिक समता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जो समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करतो तो बौद्ध आहे. मग तो कोणत्या जातीचा आहे? कोणत्या संप्रदायाचा आहे? हे महत्त्वाचे नाही असा व्यापक विचार बुद्धाने केला. बुद्धाचे तत्त्वज्ञान सामाजिक असून या तत्त्वज्ञानातूनच अंधश्रद्धेचे समूळ उच्चाटन करता येणे शक्य आहे. या तत्त्वज्ञानानेच जगाला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय ही तत्त्वे दिली आहेत. बुद्ध प्रयत्नवादी विचारवंत असल्यामुळे पूर्वजन्माच्या कर्माचे फळ म्हणजे दुःख. या पारंपरिक अंधश्रद्धेला बुद्धाने विरोध करून बुद्धिप्रामाण्यवादाचा पुरस्कार केला. सृष्टीमध्ये घडणाऱ्या प्रत्येक घडामोडीमागे शास्त्रीय कारण आहे. त्यामागे कोणताही चमत्कार नाही असे इहवादी विश्लेषण सर्वप्रथम बुद्धाने केले. त्यामुळे बुद्धाचे विचार आणि तत्त्वज्ञान हे चमत्कारावर आधारित नसून ज्ञानावर आधारित आहे. आज जगभर जात आणि धर्मावरून संघर्ष सुरू असून मानवी मने विषमतेने दुंभली आहेत. स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी जगभर हिंसा सुरु आहे. विचार मान्य नसणाऱ्या लोकांच्या हत्या होत आहेत. प्रतिपक्ष, प्रतिराष्ट्र एकमेकांना संपविण्यासाठी शस्त्रसज्ज होत आहेत. एकूणच संपूर्ण जग हे विनाशाच्या उंबरठ्यावर उभे आहे. जगाची वाटचाल विनाशाच्या दिशेने सुरू आहे. अशावेळी या हिंसाचाराचे जगावरील सावट परतून लावण्यासाठी पुन्हा संपूर्ण जगाला बुद्धाच्या समतावादी विचाराची आवश्यकता आहे.

## निष्कर्ष

1. बुद्धाचे तत्त्वज्ञान समतावादी आहे.

2. बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा पाया अधात्म असला तरी ते सामाजिक आहे.
3. बुद्धाचे तत्त्वज्ञान हे मानवतावादावर आधारित आहे.
4. बुद्धाचे तत्त्वज्ञान हे धार्मिक कर्मकांड आणि अंधश्रद्धा यांना विरोध करणारे आहे.

संदर्भ सूची


१. डॉ. मालती इंगळे : बाबुराव बागूल व्यक्ती आणि वाङ्मय, देवयानी प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती 2009 पृ. क्र. 184
२. डॉ. केशव मेंढे : आंबेडकरवादी साहित्यातील निबंधकार : डॉ. प्रकाश खरात, वत्स विनायक प्रकाशन, पुणे–नागपूर, प्रथमावृत्ती 2019, पृ. क्र. 48
३. बाबुराव बागूल : सूड (कादंबरी) , लोकवाड्.मय गृह, मुंबई, अकरावी आवृत्ती 2014, पृ. क्र. 47
४. सुधाकर गायकवाडः शूद्र (कादंबरी), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती 2005, पृ.क्र. 55 ते 62



**अमित वासुदेव गजभिये**
पीएच. डी. संशोधक विद्यार्थी
मराठी विभाग
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय
कामठी रोड, नागपूर

**डॉ.मनिषा नागपुरे**
मराठी विभाग
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालय
कामठी रोड, नागपूर